१८६२

ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १४३७

कॉन्टिनेन्टल
प्रकाशन

# पराधीन सरस्वती

REFBK-0012294

डॉ. पु. ग.
सहस्रबुद्धे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम 38296 वि: निबंध
क्रमांक 18307 नों. दि. 13-3-63

# पराधीन सरस्वती

साहित्यचर्चा – निबंधसंग्रह

डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे
एम्. ए., पीएच्. डी.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. 92298
REFBK-0012294
REFBK-0012294

कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणें

प्रथमावृत्ति : डिसेंबर १९६२
सर्व हक्क सुरक्षित
किंमत पांच रुपये

प्रकाशक : अ. अं. कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, टिळकरोड पुणें २.
मुद्रक : सौ. उषा नागपूरकर, श्री मुद्रण मंदिर, ५८० सदाशिव, पुणें.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 38356 वि: ......
क्रमांक 1837 नों. दि. 23-3-63

**कै. ती. सौ. वहिनींना —**

तुम्ही आज असतां तर
या पुस्तकाच्या प्रकाशनाने
तुम्हांला अपरिमित आनंद
झाला असता.

# प्रस्तावना

' पराधीन सरस्वती ' हा माझा तिसरा निबंधसंग्रह आज प्रकाशित होत आहे. यांत सर्व साहित्यविषयक निबंध आहेत. सरस्वती म्हणजे प्रतिभा. आपल्या देशांतल्या साहित्यिकांची–कवि, नाटककार, कादंबरीकार, लघुकथाकार, भाष्य-कार, ग्रथकार या सर्वांची–प्रतिभा फार पूर्वीच्या काळापासून आजच्या युगापर्यंत पुनः पुन्हा शब्दप्रामाण्याच्या किंवा कोठल्या तरी इतर प्रामाण्याच्या अधीन झालेली दिसते, मधूनच केव्हातरी अल्पकाल ती मुक्त होते. पण पुन्हा कसल्या तरी प्रामाण्यामुळे तिचें तेज झाकळतें आणि त्यामुळे अशा काळांत कोठल्याच क्षेत्रांत ती श्रेष्ठ साहित्य प्रसवूं शकत नाही. पूर्वी वेदांचें प्रामाण्य असेल तर आज मार्क्स, फ्रॉइड, व पाश्चात्त्य साहित्यिक यांचें प्रामाण्य आहे. पण कुठल्या तरी शृंखला तिला नेहमी पराधीन करतात असें मोठें दुःखाने म्हणावें लागतें. अगदी प्राचीन काळापासून भिन्न भिन्न कालखंडांतील साहित्याचा विचार या निबंधांत केलेला आहे. आणि बहुतेकांतील विचार–सूत्र हेंच आहे. म्हणून संग्रहाला ' पराधीन सरस्वती ' हें नांव दिलें आहे.

' निबंधरचना आणि राष्ट्ररचना ' हा पहिला निबंध. तर्कशुद्ध रीतीने आपले सिद्धान्त मांडणारी, बुद्धीला आवाहन करणारी, इतिहास, अनुभव, अवलोकन यांच्या पायावर उभारलेली विचारप्रधान रचना असा निबंध–ग्रंथ या शब्दांचा अर्थ अभिप्रेत आहे. अशी रचना पाश्चात्त्य विद्या भारतांत प्रसृत होण्यापूर्वी मराठी, बंगाली, कानडी इ. प्रांतीय भाषांतच नव्हे तर संस्कृतांतहि झाली नाही, असें या निबंधाचें प्रतिपादन आहे. अशा विधानाचा भारतांतील पंडितांना, विशेषतः संस्कृत पंडितांना राग येणें साहजिक आहे. अभ्यासकांना माझी एवढीच विनंती आहे की असे निबंध, ग्रंथ त्यांना आढळल्यास त्यांनी ते समाजाच्या निदर्शनास आणावे.

' साहित्यशास्त्रांतील क्रान्ति ' व ' कवीचें काव्यांतील दर्शन ' या दोन निबंधांत प्रामुख्याने अर्वाचीन साहित्यांतील साहित्यिकाची अनुभूति, त्याचा आत्माविष्कार, त्यांतील प्रामाणिकपणा, जीवनाचें यथार्थ चित्रण यांविषयीच्या सध्या रूढ असलेल्या अत्यंत विकृत कल्पना, आणि हिडिस, अमंगळ, अपवादभूत यावरच भर देण्याची, अर्थहीन, विस्कळित, दुर्बोध असें कांही लिहिण्याची व आम्ही स्वतःसाठी लिहितों, असें बरळण्याची प्रवृत्ति यांचा परामर्श घेतला आहे.

' कणिका–क्षणिका ' या लेखांत सध्याच्या समाजस्थितीचें सध्याच्या साहि-त्यांत स्वच्छ प्रतिबिंब कसें दिसतें तें दाखविलें आहे. सध्या आपल्या समाजांतील

व्यापक अवलोक नष्टच झाला आहे. योजलेल्या समग्र कार्याचें आधीच दर्शन घेण्याचें सामर्थ्य आपल्या बुद्धीला नाही. आपण विश्वदृक् होण्याऐवजी कणदृक् झालो आहों. आणि याच वेळीं आपलें साहित्यहि कणिका–क्षणिका या रूपाचें झालें आहे. म्हणून तें समाजस्थितीचें निदर्शक आहे असें मत या लेखांत मांडलें आहे.

' पराधीन सरस्वती ' व ' वास्तवाची अभिरुचि ' या दोन निबंधांत मुख्यतः संस्कृतांतल्या व मराठींतल्या प्राचीन साहित्याचा विचार केला आहे. मराठींत पहिल्या पांचसहाशे वर्षांच्या काळांत कादंबरी, नाटक, लघुकथा, भावकाव्य, इतिहास, चरित्र, निबंध, ग्रंथ, इ. प्रकारचें साहित्य निर्माण झालें नाही याचें प्रमुख कारण त्या काळांत आपली सरस्वती शब्दप्रामाण्याधीन होती, पराधीन होती, पाश्चात्य विद्येच्या प्रसारामुळें तिच्या शृंखला नष्ट होतांच त्या प्रकारचें साहित्य येथे विपुल होऊं लागलें त्यावरून हेंच दिसतें, असा विचार ' पराधीन सरस्वती ' या निबंधांत मांडला आहे. आणि दुसऱ्या निबंधांत रामायण-महाभारताच्या काळापासून आपल्या समाजांतील व साहित्यांतील वास्तवाच्या अभिरुचीचें विहंगमावलोकन केलें आहे.

' संकराचें अपत्य ' हा निबंध चरित्रवाङ्मयाविषयीचा आहे. चरित्र ही कला आहे, असें मत कांही पाश्चात्य लेखकांनी रूढ करण्याचा प्रयत्न केला आहे. आपल्याकडेहि कांही विद्वानांना तें मान्य झालें आहे. पण ही एक अत्यंत भ्रांतिष्ट व अतिशय घातक कल्पना आहे असें माझें मत आहे. मराठींतल्या व इंग्रजींतल्या अनेक चरित्रग्रंथांच्या आधारें हें मत या निबंधांत मीं मांडलें आहे.

या सर्व निबंधांतून साहित्यांतील आत्माविष्कार, साहित्यांतील सत्य व सत्याभास, कला व शास्त्र यांचीं पृथक् क्षेत्रें, कवीचें अंतरंगदर्शन, कवीची अनुभूति व कल्पना शक्ति, साहित्याच्या भिन्न शाखांचा समाजाच्या उत्कर्षापकर्षाशी असलेला दृढ संबंध, याविषयी अनेक सिद्धान्त सांगितले आहेत. नवोदित साहित्यिकांनी प्रामुख्याने त्यांचा अभ्यास करावा अशी विनंती आहे.

' राजविद्या ' हा माझा निबंधसंग्रह पुणें विद्यापीठाने एम. ए. च्या परीक्षेसाठी नेमिला आहे. याबद्दल मी विद्यापीठाचा अतिशय आभारी आहें. महाराष्ट्रांतील विद्यापीठें व पंडित याहि संग्रहाचें असेंच स्वागत करतील असें मी धरून चालतों.

१ डिसेंबर १९६२ **पु. ग. सहस्रबुद्धे**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थापना
अनुक्रम.................... दि: ....................
क्रमांक .................... कों. कि ....................

# अ नु क्र म णि का

१. निबंधरचना आणि राष्ट्ररचना ... नोव्हेंबर १९५९ १– ३३
२. साहित्य शास्त्रांतील क्रान्ति ... ऑक्टो. १९५७ ३४– ५५
३. कवीचें काव्यांतील दर्शन ... नोव्हेंबर १९६० ५६– ७८
४. काणिका–क्षणिका ... जुलै १९५८ ७९– ९७
५. पराधीन सरस्वती ... नोव्हेंबर १९६१ ९८–१२७
६. संकराचें अपत्य ... नोव्हेंबर १९६१ १२८–१६०
७. वास्तवाची अभिरुचि ... नोव्हेंबर १९५८ १६१–१८७

अनुक्रम ३४३ ६ वि: १०.०१.५६
क्रमांक १४३७ नों दि: १३-३-६३
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १२२०४

: १ :

## निबंधरचना आणि राष्ट्ररचना

निबंध हा अत्यंत प्रभावी असा वाङ्मयप्रकार आहे. समाजाच्या जीवनाशीं, राष्ट्राच्या उत्कर्षापकर्षांशीं त्याचा अत्यंत निकटचा संबंध आहे. नाटक, कादंबरी, काव्य, लघुकथा इत्यादि ललितवाङ्मयाचा समाजोन्नतीशीं किती संबंध आहे, याविषयी दुमत असूं शकेल; पण निबंधाविषयी तसा वाद नाही; असूंच शकणार नाही. येथे निबंध हा शब्द व्यापक अर्थाने वापरलेला आहे. तर्कशुद्ध रीतीने केलेली, बुद्धीला आवाहन करणारी, आपले सिद्धान्त साधार सप्रमाण मांडणारी, इतिहास, अनुभव, अवलोकन यांच्या पायावर उभारलेली विचारप्रधान रचना असा अर्थ येथे अभिप्रेत आहे. विष्णुशास्त्री, टिळक, आगरकर, राजवाडे, वैद्य, न. चिं. केळकर, सावरकर, जावडेकर, माटे, द. के. केळकर यांचे निबंध व ग्रंथ हे ' निबंध ' हा शब्द वापरतांना माझ्या डोळ्यांपुढे आहेत. वर सांगितलेली तर्काधिष्ठित, विचारप्रधान रचना २०।२५ पृष्ठांपर्यंत असली तर हल्ली आपण तिला ' निबंध ' म्हणतों. २००।४०० पृष्ठांपर्यंत असली तर तिला ' ग्रंथ ' म्हणतों. ' प्रबंध ' हा एक शब्द अलीकडे रूढ होत आहे. हा प्रबंध यांच्यामध्ये कोठे तरी बसेल; पण त्याची जाति याच प्रकारची आहे. तेव्हा या लेखांत निबंधरचनेचें विवेचन करतांना निबंध या शब्दांत निबंध, प्रबंध, ग्रंथ या सर्वांचा समावेश केलेला आहे हें ध्यानीं घ्यावें. असा हा जो ' निबंध ' नांवाचा वाङ्मयप्रकार त्याचें विवेचन या लेखांत करावयाचें आहे.

वर सांगितलेले सर्व निबंधकार हे गेल्या शंभर वर्षांतले आहेत. १८३० सालापासून आपल्याकडे पाश्चात्त्य विद्येचा प्रसार होऊं लागला. आणि आपल्याकडे त्यानंतरच मराठींत निबंध जन्माला आला असें दिसतें. या निबंधाचें स्वरूप व त्याचें महत्त्व हें तर आपणांस पाहावयाचें आहेच, पण त्याच्या आधींच्या काळीं काय होतें तेंहि पाहावयाचें आहे. मुकुंदराज, ज्ञानेश्वर यांच्या काळापासून मराठी वाङ्मयाच्या इतिहासास प्रारंभ झाला. तेव्हापासून मराठी साम्राज्याचा अस्त झाला त्या काळापर्यंत, म्हणजे सुमारें सहाशें वर्षांच्या काळांत वरील प्रकारची निबंधरचना मराठींत झालेली दिसत नाही. याचें कारण काय, या निबंधाभावाचा आपल्या राष्ट्रीय जीवनावर काय परिणाम झाला, याचाहि आपणांस विचार करावयाचा आहे. आणि मग त्याच्याहि मागे जाऊन संस्कृत वाङ्मयोदधींत शिरावयाचें आहे. जगाला भूषणभूत ठरलेल्या, आजहि जगाने वंद्य मानलेल्या या साहित्यांत राष्ट्रीय जीवनाशीं निकट संबंध असलेल्या या जातीच्या वाक्प्रबंधाचा म्हणजेच निबंधाचा अवतार झाला होता की नाही, असल्यास त्याचें स्वरूप काय होतें, त्याच काळांत ग्रीस, रोम येथे जी निबंधरचना होत होती, झाली होती, तिच्याशीं तुलना केली तर आपल्याकडच्या या रचनेचें स्थान कोणतें ठरेल, इत्यादि प्रश्नांचाहि ऊहापोह करावयाचा आहे. सारांश, भारतांतल्या आजपर्यंतच्या एकंदर निबंधसाहित्याचा आढावा घेऊन त्या इतिहासावरून निघणारे निष्कर्ष या लेखांत वाचकांपुढे मांडावयाचे आहेत.

१८३० नंतरच्या पहिल्या पंचवीस-तीस वर्षांतले निबंध पाहिले तर असें दिसून येतें की पूर्वीच्या सहाशे वर्षांतील वाङ्मयाहून या लेखनाचें स्वरूप अंतर्बाह्य निराळें आहे. आणि याचें प्रमुख कारण हेंच दिसतें की, या वाङ्मयाचें लेखकच अंतर्बाह्य बदलून गेलेले आहेत. वाङ्मयाचें स्वरूप पालटलें याचें कारण हें की माणसाचें स्वरूप पालटलें होतें. महाभारतांत म्हटलें आहे की, 'यादृशः पुरुषस्यात्मा तादृशं संप्रभाषते ।' जसा माणसाचा आत्मा तसें त्याचें भाषण. १८३० नंतर येथल्या माणसाचा आत्माच पालटून गेला होता. आणि त्यामुळे तो अगदी निराळ्या प्रकारचें, पूर्वीहून अत्यंत भिन्न असें साहित्य निर्माण करीत होता. पहिली गोष्ट अशी की, त्याच्या भोवतालीं

ज्या घडामोडी होत होत्या, झाल्या होत्या, त्यांची तो भौतिक कारणमीमांसा करूं लागला होता. त्या वेळची अत्यंत प्रमुख घटना म्हणजे इंग्रजांचें राज्य आणि महाराष्ट्राला व भारताला आलेलें पारतंत्र्य, त्यांची हीन दशा, त्यांची अवनति. आपल्या समाजाचा सर्व बाजूंनी अधःपात झाला आहे, याची मनोमन सर्वांना जाणीव झाली होती. पण पूर्वीच्या काळींहि ही जाणीव लोकांना होतीच. संतांना होती, पंतांना होती, शाहीर, बखरकार, राजकारणी, मुत्सद्दी या सर्वांना याची जाणीव होती. त्या अधःपाताची ते कारणमीमांसाहि करीत. पण त्या मीमांसेंत पापपुण्याला प्रधान स्थान असे. कलियुग सुरू झालें आहे, अनाचार माजला आहे, स्नानसंध्या, स्मरणकीर्तन आता कोणी करीत नाही, कुळधर्म, जातिधर्म लोक पाळीत नाहीत, 'पलंगीं बैसवी राणी, माते म्हणे आणी पाणी,' असें तरुण लोक वागतात, यामुळे ही अवदशा आली आहे, धर्म बुडाला म्हणून सगळा नाश होत आहे, अशीच कारणमीमांसा त्या काळांत केली जात असे. पाश्चात्त्य विद्येमुळे लोकांच्या मनांत पालट झाला तो हा की, ही मीमांसा त्यांना पटेनाशी झाली. आपण व्यापारांत मागे पडलों, आपल्याला जगाचें ज्ञान नाही, आपल्या समाजांत विषमता फार आहे, आपण स्त्रियांना शिक्षण देत नाही, आपला समाज संघटित नाही, इंग्रजांचें विज्ञान आपल्याजवळ नाही, आपली एकंदर विद्याच हीन प्रकारची होती, पाश्चात्त्य विद्या अत्यंत श्रेष्ठ, या व अशा प्रकारच्या भौतिक कारणांमुळे आपली अवनति झाली आहे अशा तऱ्हेचे विचार बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, भाऊ महाजन, ज्योतिबा फुले, माडगांवकर, केशव सखाराम शास्त्री, रामकृष्ण विश्वनाथ इत्यादि त्या वेळच्या निबंधकारांच्या लेखनांत दिसून येतात. ही विचारसरणी पूर्वी पूर्णपणें नव्हे, पण जवळजवळ अज्ञातच होती. त्या वेळच्या कर्त्या पुरुषांनी प्रत्यक्ष व्यवहारांत पापपुण्याच्या मीमांसेचा सर्वस्वी अवलंब केला नव्हता हें खरें; पण इंग्रजांचा सारखा उत्कर्ष होत आहे व आपण पराभूत होत आहों यामागे आपली समाज-रचना, आपलीं धर्मतत्त्वें, आपली अर्थव्यवस्था, आपलें एकंदर जीवनाचें ऐहिक तत्त्वज्ञान, आपली विद्या, या सर्वांतील दोष, त्यांतील वैगुण्यें, त्यांतल्या अत्यंत विपरीत कल्पना, अशासारखी कांही कारणपरंपरा असेल हें त्यांच्या

स्वप्नांतहि कधी आलें नव्हतें. उलट इंग्रजी राज्य येऊन पाश्चात्त्य विद्येने ज्यांची दृष्टि उघडली ते मात्र अहोरात्र याच कारणपरंपरेचा विचार क लागले. निबंध निर्माण झाला तो या त्यांच्या विचारांतून, परिस्थितीच्य चिंतनांतून, भौतिक कारणमीमांसेंतून.

लोकहितवादी यांच्या एका लेखांतून जुन्या व नव्या कारणमीमांसेंतील हा भेद अत्यंत स्पष्ट दिसून येतो. ‘ इंग्रजी राज्यापासून फळ ’ या आपल्या निबंधांत ते म्हणतात की, ‘ सांप्रत हिंदु लोक एकत्र आले की सहज गोष्टी निघतात की, हिंदुस्थानची गत पुढे काय होईल ? त्या वेळीं कोणी बहुत शहाणा, जुन्या काळचा असला म्हणजे तो म्हणतो, मागे यादव, रावण माजले होते. पण त्यांचा नाश झालाच ना ? तसेच इंग्रज कधी तरी बुडतील, धर्मस्थापना होईल, वर्णाश्रमधर्मेंकरून लोक वागूं लागतील. ब्राह्मणांचा हाहाःकार ईश्वराच्या कानावर गेल्याखेरीज रहाणार नाही. ’ ब्राह्मणांच्या या विचारसरणीमुळेच लोकहितवादींनी त्यांच्यावर कडक टीका करून त्यांना मूर्ख, हेकट आणि अडाणी म्हटलें आहे, आणि मग आपलें मत सांगितलें आहे. त्यांच्या मतें आपल्या हीन दशेचीं कारणें म्हणजे सती जाण्याची चाल, मुलें मारावयाची चाल, तीन वर्णांची नीच स्थिति, ब्राह्मणांचें महात्म्य, विद्या क्षणिक, संपूर्ण देशचे लोक आम्हांपुढे तुच्छ व आम्ही श्रेष्ठ ( असा ) गर्व—हीं होत. आपल्याला राज्यकारभार येत नाही, व्यापारधंदा कसा करावा तें कळत नाही, आपल्या धर्मकल्पना विपरीत आहेत हेहि दोष त्यांनी सांगितले आहेत. आणि या लोकांच्या पायांतील ( रूढीच्या ) शृंखला तुटतील, हे चहोदेशांत जाऊन व्यापार करूं लागतील, विद्वान् होतील, व आपले देशांत कापड वगैरे जिन्नस तयार करावयास शिकतील तेव्हा सुखी होतील, असा उन्नतीचा मार्गहि त्यांनी सांगितला आहे. येथे जुन्या-नव्या कारणमीमांसेंतील फरक स्पष्टपणे दिसून येतो. अवनति पापाचरणामुळे झाली व ईश्वरीकृपेमुळे, पुण्यामुळे उन्नति होईल ही जुनी श्रद्धा नष्ट होऊन आपल्या सामाजिक दोषांमुळे, अज्ञानामुळे, अवनति झाली व ज्ञानोपासना, व्यापारवृद्धि, कारखानदारी यांनी उन्नति होणार आहे, हा नवा विचार त्या जागीं येत असलेला आपल्याला दिसून येतो. नव्या माणसाचा आत्माच पालटला असें वर म्हटलें त्याचा यावरून अर्थ ध्यानांत येईल.

निबंध ग्रंथ हें वाङ्मय निर्माण होण्याच्या दृष्टीने लेखकांच्या मनांत दुसरा बदल झाला तो हा की आता लोकांच्या बुद्धीला आवाहन केलें पाहिजे, जें सांगावयाचें तें बुद्धीला पटवून दिलें पाहिजे, हें त्यांच्या ध्यानांत आलें. बुद्धीला कांही सांगावयाचें म्हणजे तर्काच्या आधारें प्रतिपादन केलें पाहिजे हें उघडच आहे. या तऱ्हेने जें केलेलें प्रतिपादन त्याचेंच नांव निबंध किंवा ग्रंथ. जुन्या काळीं लेखकांची ही वृत्तीच नव्हती. धर्मशास्त्रांतले सिद्धान्त ठरलेले आहेत, ते फक्त लोकांना समजावून द्यावयाचे आहेत, अशीच संतांची व पंडितांची भूमिका होती. त्यामुळे उपमा, उत्प्रेक्षा, दृष्टान्त यांपलीकडे जाण्याची त्यांना गरजच नव्हती. ज्ञानयोग व कर्मयोग हे मार्ग परिणामीं एकच आहेत हा सिद्धान्त किती वादग्रस्त आहे ! पण तो स्पष्ट करतांना ज्ञानेश्वर एवढेच म्हणाले की, नदी पूर्व-वाहिनी असो, पश्चिम-वाहिनी असो, शेवटीं ती समुद्रालाच मिळणार. त्याचप्रमाणे हें आहे. पुन्हा, मार्ग एक असले तरी अधिकारपरत्वें उपासनाप्रकार भिन्न होतात हें सांगतांनाहि त्यांनी दृष्टान्तच दिला : झाडावर पक्षी असतो तो चटकन् उडून एकदम फळाशीं जातो. जमिनीवरच्या माणसाला तें साधणार नाही. त्याचप्रमाणे ज्ञानयोगी लवकर मोक्ष मिळवितो, कर्मयोग्याला वेळ लागतो. दृष्टान्त दिले की विवरण संपलें अशीच जुन्या काळीं सर्व संतपंतांची भूमिका होती. वेदान्तांतले किंवा भक्ति-मार्गांतले सिद्धान्त साधार सप्रमाण मांडावे ही वृत्ति जुन्या वाङ्मयांत दिसतच नाही. वामनपंडितांसारखे एकदोन अपवाद वजा केले तर जुन्या मराठी वाङ्मयांत तर्कशास्त्रीय प्रतिपादन करण्याचा प्रयत्नसुद्धा कोणी केलेला नाही. उलट तर्काची, बुद्धीची, पांडित्याची पदोपदीं त्या कवींनी अवहेलनाच केलेली आहे. अर्थात् अशा वृत्तीच्या लेखकांना निबंध रचण्याचें कारणच पडत नाही. बुद्धीला आवाहनच नाही, तिला कांही पटवून देण्याची भूमिकाच नाही. तेव्हा निबंधलेखनाची आवश्यकताच नाही हें उघड आहे. लोकांनाहि ही भूमिका मान्य होती. एवढ्या सहाशें वर्षांच्या काळांत वरील सिद्धान्ता-वर कधी कोणी शंका घेतली नाही, आक्षेप घेतला नाही. आणि शंका घेण्याची, आक्षेप घेण्याची वृत्ति ही तर सर्व ज्ञानाची गंगोत्री आहे.

युरोपमध्ये ही आक्षेप घेण्याची, शब्दप्रामाण्य न मानण्याची वृत्ति तेराव्या शतकांतच अवतीर्ण झालेली दिसते. पदुआचा मार्सिलिओ, ओकॅमचा विल्यम,

कुसाचा निकोलस आणि त्यांच्यासारखेच फ्रान्स, स्कॉटलंड, इंग्लंड येथील इतर अनेक लेखक पोपची धर्मसंस्था व राजाची राज्यसंस्था यांच्याविरुद्ध खवळून उठले होते. या त्यांच्या वृत्तींतूनच युरोपमध्ये मध्ययुगांत निबंधरचना निर्माण झाली. याचा तपशील आपणांस पुढे पाहावयाचाच आहे. म्हणून येथे विस्तार करीत नाही. पण तेराव्या शतकांतील महाराष्ट्र व युरोपांतील वर उल्लेखिलेले देश येथे जें साहित्य निर्माण झालें त्यांत जमीनअस्मानाचें अंतर कां पडलें, त्याच्यामागे मानवी मनाच्या कोणत्या वृत्ति होत्या हें ध्यानांत यावें म्हणून वरील निर्देश केला आहे. सतराव्या शतकांतील तत्त्ववेत्ता रेनी डेकार्ट याला अर्वाचीन युरोपचा जनक म्हणतात. याचें कारण हेंच की, त्याने युरोपला शंका घेण्यास, आक्षेप घेण्यास शिकविलें. लोकांत ही वृत्ति आधी २।३ शतकें निर्माण झालीच होती. डेकार्ट व फ्रॅन्सिस बेकन यांनी तिला शास्त्रशुद्ध रूप दिलें, इतकेंच. पण त्यामुळे लोकांच्या बुद्धीला कांही पटवून द्यावयाचें असेल तर विचारांची मांडणी कशी केली पाहिजे याचें शास्त्र तयार झालें· आणि तेथून पुढे मग युरोपांत निबंध-ग्रंथरचना शीघ्रगतीने होऊं लागली. तेव्हा यांतील कार्यकारणभाव निश्चित आहे हें मान्य करावें लागेल असें वाटतें. पाश्चात्त्यांची ही आक्षेपवृत्ति पाश्चात्त्य विद्येमुळे येथे निर्माण होतांच तींतून येथेहि निबंध निर्माण झाला.

स्त्रीशिक्षण हें हितावह आहे, जातिभेद समाजाला घातक आहे, इंग्रजी राज्यामुळें आपलें कल्याण होत आहे, ब्राह्मणांचें श्रेष्ठत्व नष्ट झालें पाहिजे अशा तऱ्हेचे विचार त्या वेळीं लेखकांना समाजाला सांगावयाचे होते. पण आता आपण हे विचार लोकांच्या बुद्धीला पटवून दिले पाहिजेत ही जाणीव प्रत्येक लेखकाला होती हें त्यांच्या निबंधांवरून स्पष्ट दिसून येतें. १८३४ सालींच बाळशास्त्री जांभेकर हे स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार करीत होते. इतरहि पंडितांनी याविषयी लिहिलें आहे. मुलांना शिकविणें हें स्त्रियांचें काम आहे. पण त्याच अज्ञानी असतील तर त्या काय शिकविणार ? असें बाळशास्त्री विचारतात आणि ही सुधारणा होण्यासाठी लोकमत पालटलें पाहिजे, स्त्रियांस शिकविणें या गोष्टीचा खरेपणा तुमच्या मनांत भरविण्याचें काम म्यां पत्करिलें आहे, एक सभा भरवून हा विषय कसा आहे याची छाननी

करावी, असें सुचवितात. इतर पंडितांनी इंग्रज स्त्रिया शिकतात त्या कुमार्गगामी होत नाहीत, त्यांच्या पुरुषांचें त्यापासून हितच होतें असें सांगून जुन्या लोकांच्या आक्षेपाला प्रत्यक्ष अनुभवाच्या आधारें उत्तर दिलें आहे. याच लेखनपद्धतीचा पुढे विकास होऊन विष्णुशास्त्री, आगरकर, टिळक यांच्या निबंधांत तिची परिणति झाली. विष्णुशास्त्री यांनी इंग्रजी राज्यामुळे आपला नाश झाला आहे हें सांगतांना त्रिखंडाचा इतिहास पुढे उभा केला आहे. रोममध्ये काय झालें, ग्रीसमध्ये काय झालें, पूर्वी मराठे कसे पराक्रमी होते, आम्ही पूर्वी केवढे पराक्रम केले होते हें सर्व ते इतिहासाच्या आधारें सांगतात. त्याचप्रमाणे सामान्य जनांची स्थिति काय झाली आहे हें प्रत्यक्ष अवलोकनाने, अनुभवाने विशद करतात. परराज्यांत दुसरें कांही होणें शक्य नाही हें तर्काने समजावून सांगतात. देशोन्नतीचें मुख्य कारण म्हणजे देशाभिमान हें सांगून तो असला तर उन्नति व नसला तर अवनति हा सिद्धान्त ते अफगाणिस्तान, झुलूंचा देश, हिंदुस्थान, पाश्चात्त्य देश यांच्या इतिहासांतील प्रमाणें देऊन अन्वयव्यतिरेकाने प्रस्थापितात. तो आपल्याकडे कां नव्हता हें सांगतांना जातिभेद व देशाचें विस्तीर्णत्व हीं भौतिक, बुद्धीला पटणारीं कारणें देतात. इंग्रजांचें राज्य चांगलें की वाईट याविषयी विष्णुशास्त्री यांच्या आधी अनेक वेळां चर्चा झाली आहे. लोकहितवादी, ज्योतिबा, केशव सखाराम शास्त्री यांना त्यापासून हित झालें, असें दाखवावयाचें आहे. रामकृष्ण विश्वनाथ यांना त्यापासून हानि झाली असें सांगावयाचें आहे. पण दोन्हीहि पक्षांची पद्धति तर्कनिष्ठच आहे. विद्या मिळाली, जगाचें ज्ञान मिळालें, शांतता प्रस्थापित झाली, भटांचें वर्चस्व मोडलें हीं कारणें अनुकूल पक्षाने दिलीं आहेत, तर कर असह्य आहेत, जमाबंदी, न्यायखातें यांत जुलूम फार चालतो, युरोपीय लोक आमचा अवमान करतात, हीं प्रमाणें प्रतिकूल पक्षाने पुढे केलीं आहेत. म्हणजे येथे लोकांच्या बुद्धीला आवाहन आहे आणि तिला वश करण्यासाठी इतिहास, अनुभव, अवलोकन यांचा आधार घेतला आहे.

पाश्चात्त्य विद्येच्या प्रसारानंतर लेखकांचा आत्मा पालटून गेल्याचें फार मोठें लक्षण हें की, या सर्वांनी आपल्या स्वतंत्र बुद्धीने विचार केला आहे. शब्दप्रामाण्य यांपैकी एकानेहि स्वीकारलेलें नाही. लोकहितवादींनी तर,

‘ वेद म्हणजे काय ? चार विद्वान् लोकांनी एकत्र बसून केलेला विचार ’ असें निर्भयपणें सांगून हजारों वर्षें रूढ असलेल्या वेदप्रामाण्याला धक्का दिला आहे. जुन्या मराठींतलें बहुतेक सर्व तात्त्विक वाङ्मय टीका, भाष्य, दीपिका या स्वरूपाचें आहे. त्यांत ज्याने त्याने आपल्या वृत्तीप्रमाणे कांही स्वतंत्र लिहिलें आहे. पण मूळ शब्दप्रामाण्याची वृत्ति कोठेहि कोणीहि सोडलेली नाही. मूळ बैठकच भाष्यकाराची असल्यामुळे आणि वर सांगितल्याप्रमाणे, मूळ ग्रंथांतले सिद्धान्त विशद करावे एवढेंच धोरण असल्यामुळे जुन्या मराठींत निबंध निर्माण होऊंच शकला नाही. १८३० नंतरच्या लेखकांनी विचार घेतले ते पाश्चात्त्य ग्रंथांतूनच घेतले. पण त्यांपैकी कोणीहि भाष्य-काराची भूमिका घेतली नाही. ग्रंथ समजावून सांगणें ही त्यांची भूमिका नव्हती, विचार समजावून सांगणें, नवें तत्त्वज्ञान समजावून देणें ही त्यांची भूमिका होती. तरी प्रारंभीचे लेखक पाश्चात्त्य वैभवामुळे थोडे दबकलेले, थोडे स्तिमित झालेले असे होते. विष्णुशास्त्री यांच्यानंतर ही स्तिमितता नाहीशी झाली आणि मग निबंधकाराला अवश्य ती स्वतंत्र वृत्ति येथे उदयास येऊन या वाङ्मयप्रकाराचा येथे विकास होऊं लागला. टिळकांनी गीतारहस्य लिहिलें तें गीतेचा अर्थ विशद करण्यासाठीच लिहिलें. पण तें भाष्य किंवा दीपिका नाही. तो ग्रंथ आहे; निबंध आहे. कारण तो विचार व तत्त्वज्ञान स्पष्ट करण्यासाठी लिहिला आहे. त्याची रचना, त्याचा विस्तार, त्याची सर्व उभारणी ही टिळकांनी केली आहे. म्हणून तें टिळकांचें प्रतिपादन आहे. त्यांनी उत्तरार्धांत गीतेचा अर्थ विशद केला आहे. त्यांनी तेवढेंच लिहिलें असतें तर तें भाष्य झालें असतें. पण स्वतंत्र बुद्धीने रचना केल्यामुळे तो ग्रंथ झाला आहे.

भोवतालच्या परिस्थितीकडे मानव पाहतो आणि तिच्याविषयी चिंतन करून कांही निष्कर्ष काढतो, कांही सामान्य सिद्धान्त मनाशीं निश्चित करतो. हे सिद्धान्त तो सांगूं लागला की त्या प्रतिपादनांतून निबंध निर्माण होत असतो. शब्दप्रामाण्यबुद्धीमुळे मनुष्याची ही शक्ति पांगळून जाते. स्वतः निष्कर्ष काढण्याचें त्याचें सामर्थ्य नष्ट होतें. त्यामुळे मग निबंधवाङ्मय निर्माण होत नाही. याचा प्रवृत्ति - निवृत्तीशींहि दृढ संबंध आहे. या भौतिक

जगाबद्दल मनुष्याला आदर असला, या जगांतल्या जीवनाविषयीच्या कांही आकांक्षा असल्या, येथला उत्कर्ष ही प्रेरणा त्याच्या मनाला कार्यप्रवृत्त करीत असली तर तो भोंवतालच्या जगाचा अभ्यास करूं लागतो. आणि मग त्यांतून कांही सामान्य विचार त्याला स्फुरतात. पण निवृत्तिप्रिय, परलोकनिष्ठ, परमार्थगामी मनुष्याच्या मनांत ही प्रक्रिया घडण्याचा संभव कमी. त्याला भोंवतालच्या जगाकडे पाहावयाचेंच नसतें. तो त्याविषयी अगदी उदासीन असतो. त्यामुळे त्या घडामोडींतून स्वतः कांही सिद्धान्त काढण्याची त्याची शक्ति हळूहळू क्षीण होते. आणि ज्या परमार्थाकडे तो पाहत असतो तेथलें ज्ञान हें बुद्धीच्या पलीकडे असल्यामुळे, तें गुरुमुखांतूनच घेतलें पाहिजे असा दंडक असतो. त्यामुळे तेथे स्वतः विचार करणें व निष्कर्ष काढणें हा प्रश्नच उद्‌भवत नाही. कांही असामान्य लोक स्वतः असे कांही सिद्धान्त आत्मानुभूतींतून निश्चित करतात. पण ते दुसऱ्याला सांगतांना त्यांच्या बुद्धीला आवाहन करीत नाहीत. म्हणून धर्म, परमार्थ यावरच सर्व भर देणाऱ्या निवृत्तिवादी समाजांत निबंध निर्माण होण्याचा संभव कमी होतो.

मनुस्मृति आणि तत्सम इतर स्मृति या ऐहिक व्यवहाराचें अनेक ठिकाणीं निरूपण करतात. चार वर्णांचीं कर्तव्यें कोणतीं, राजाचें महत्त्व काय, त्याने प्रजापालन कसें करावें, न्यायालयांतील कारभार कसा चालावा, धनाची वांटणी कशी करावी हेच विषय स्मृतीमध्ये आहेत. पण या स्मृति रचणाऱ्यांची भूमिका शब्दप्रामाण्याची आहे. परमेश्वराने हा धर्म मनूला सांगितला, भगवान् मनूने तो भृगूला सांगितला व भृगूने तो या रूपाने ऋषींना व जगाला सांगितला अशी ही भूमिका आहे. त्यामुळे आज्ञा देणें, उपदेश करणें, विधिनिषेध सांगणें हेंच या स्मृतिग्रंथांचें प्रामुख्याने स्वरूप आहे. विवरण करणें, कार्यकारणसंगति दाखविणें, आधारप्रमाण देणें, आक्षेप उद्‌भावित करून त्यांचें खंडन करणें, आपल्या मतांचें मंडन करणें, ऐतिहासिक दृष्टीने, तुलनेने विवेचन करणें हें या ग्रंथांतून अभावानेच दिसतें. हे जातिधर्म, कुलधर्म मनूने लोकांना लावून दिलेले आहेत म्हणून ते पाळलेच पाहिजेत, मनुष्याने आपल्या बुद्धीने त्यासंबंधी विचार करावयाचाच नाही, असा दण्डक तेव्हा होता. एष धर्मः सनातनः। हें समर्थन प्रत्येक विधानाला पुरेसें

असल्यामुळे त्यापुढे जाऊन विवेचन करण्याची गरजच राहत नाही. आणि म्हणूनच या वृत्तींतून निबंध निर्माण होत नाही. ही आज्ञा मोडली तर पाप लागेल, ती मोडली तर कुलाचा नाश होईल, यामुळे तुम्ही नरकांत जाल, त्यामुळे स्वर्गात जाल, या स्वरूपाचें सर्व निरूपण असल्यामुळे तेथे विषयाचा विस्तार करण्याचें कारणच पडत नाही. ज्या राष्ट्रांत शूद्र न्यायाधीश असतो तें राष्ट्र पंकांत रुतलेल्या गाईप्रमाणे नाश पावतें, तेथे दुष्काळ पडतो, रोग बळावतात, व सर्वनाश होतो, स्त्रीने व्यभिचार केला तर ती पुढच्या जन्मीं कोल्ही होते, अशा स्वरूपाचें धर्मव्याख्यान स्मृतींमध्ये असल्यामुळे तेथे भौतिक कारणमीमांसा केली जात नाही. पूर्वजन्मींच्या पातकांमुळे व इतर पापकृत्यांमुळे नाश, व मेल्यानंतर पुढील जन्मीं त्याचीं फळें, असें सर्व भौतिक कार्यकारणांच्या कक्षेबाहेरचें कथन असल्यामुळे एक तर विषय-विस्तार होत नाही. आणि झालाच तर तर्क, इतिहास, अनुभव, कार्यकारण, संगति-विसंगति, खंडन-मंडन, तुलना यापेक्षा अगदी निराळ्या पद्धतीने होतो. त्यामुळे या रचनेची गणना निबंधांत होऊं शकत नाही.

बुद्धिप्रामाण्य व प्रवृत्तिवाद किंवा ऐहिकता यांचा निबंधरचनेशीं दृढ संबंध कसा असतो तें एका उदाहरणाने स्पष्ट करूं. संस्कृतिसंगम हा प्रा. द. के. केळकर यांचा ग्रंथ पहा. भोंवतालच्या जगाचें नित्य अवलोकन, चिंतन, मनन केल्या-मुळे, ' पाश्चात्त्य व पौर्वात्य या दोन संस्कृति भिन्न नाहीत, त्या एकरूपच आहेत, आणि भिन्न आहेत असा भ्रम रूढ झाल्यामुळे आपल्या समाजाचें अहित होत आहे. ' हा विचार त्यांच्या मनांत निर्माण झाला आणि तो ग्रंथरूपाने मांडण्याचें त्यांनी ठरविलें. तेव्हा प्रथम त्यांनी हा भ्रम कां रूढ झाला त्याच्या कारणांची चिकित्सा केली. नंतर भारतांतहि जडवाद, आसुरी वृत्ति होती व आहे, आणि युरोपांतहि अध्यात्मविद्या दिसून येते हें अनेक प्रमाणांनी सिद्ध केलें. मग आजच्या युरोपच्या संस्कृतीचीं ऐहिक ऐश्वर्याची उपासना, लोकशाही इत्यादि जीं लक्षणें तीं पूर्वकाळीं भारताच्या संस्कृतींतहि कशीं दिसतात हें सांगितलें. त्यानंतर पूर्वीची भारतीय संस्कृति ही आर्य, असुर व द्रविड या तीन संस्कृतींच्या मिश्रणानेच कशी झाली आहे तें दाखविलें. यानंतर अशा बलिष्ठ संस्कृतीला अवकळा कां आली त्याचें विवेचन करून शेवटीं ती

अवकळा नष्ट करण्याचे उपाय त्यांनी सांगितले. या विवेचनाला निबंध किंवा ग्रंथ म्हणावें असा माझ्या मनांतला अभिप्रेत अर्थ आहे. एक विचारबीज मनांत येतांच त्याविषयीची सर्व माहिती संकलित करणें, तिचें वर्गीकरण करणें, मग तिची व्यवस्थित रचना करणें व यावरून शेवटीं निष्कर्ष काढणें या पद्धतीने मानवी मनांत ग्रंथ तयार होत असतो. तसा तो झाल्यानंतर विषयाचें महत्त्व, त्याचीं कारणें, त्याचें पूर्वरूप, सध्याचें रूप, रूढ समज, सत्यदृष्टि, विरोधी विचार, आक्षेप, खंडन, मंडन, इतर पंडितांच्या तसल्याच विचारांची तुलना, ऐतिहासिक दृष्टींतून समीक्षण, परिणाम, अन्वयव्यतिरेकदृष्टीने तपासणी, उपायचिंतन इत्यादि अनेकविध अंगोपांगांनी त्याचा विकास करून त्याचा वटवृक्ष तयार करणें ही निबंधरचना होय. रचनेसाठी जें साहित्य जमवावयाचें तें सर्व अनुभव, इतिहास, तर्क, प्रयोग यांच्या साह्यानेच जमवावयाचें असा निबंधकाराचा कटाक्ष असतो. कारण त्याला समाजाच्या बुद्धीला आवाहन करावयाचें असतें. प्रा. द. के. केळकरांनी आपला ग्रंथ असा रचला आहे. त्याच्या पानापानांतून त्यांचें स्वतंत्र चिंतन, आपल्या समाजाच्या ऐहिक उत्कर्षाविषयीची त्यांची तळमळ, बुद्धिप्रामाण्य, भौतिक कार्यकारणमीमांसा करण्याची वृत्ति, इत्यादि विशेष प्रतीत होत आहेत. निबंध म्हणजे एका स्वतंत्र, चिंतनशील, साक्षेपी, शिस्तबद्ध, तर्कनिष्ठ, ज्ञानसंपन्न, अशा प्रज्ञेंतून निर्माण झालेली रचना असते हें केळकरांच्या या ग्रंथावरून स्पष्ट दिसून येईल. पाश्चात्त्य विद्येने येथल्या लेखकांचा आत्मा पालटून गेला असें वर म्हटलें आहे. ‘ संस्कृतिसंगम ’ या ग्रंथावरून भारतीय मनांत तें जें आमूलाग्र परिवर्तन झालें त्याचें प्रत्यंतर येईल.

जुन्या मराठींत निबंधरचना नव्हती असें प्रारंभी म्हटलें आहे त्याचा अर्थ आता स्पष्ट होईल असें वाटतें. वर एकदा म्हटल्याप्रमाणे भावार्थदीपिका, एकनाथी भागवत, गीतार्णव इत्यादि रचना ही भाष्य व टीका या स्वरूपाची आहे आणि त्या भाष्यकारांनी बुद्धीला आवाहन केलेलें नाही. सिद्धान्त सिद्ध करावे ही त्यांची भूमिकाच नाही. ते उपमादृष्टान्तांनी विशद करावे, समजावून सांगावे, सामान्यजनांना, स्त्रीशूद्रांना सुलभ करून द्यावे अशी त्यांची भूमिका होती. विवेकसिंधु, अमृतानुभव, नामदेव-तुकाराम यांचे अभंग, व याच

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ दि: ........................

प्रकारचीं इतर शेकडो प्रकरणें, हीं भाष्यें नसलीं तरी त्यांच्या लेखकांची भूमिका जुने सिद्धान्त समजावून सांगणाराचीच आहे. बुद्धीला आवाहन करून तर्कनिष्ठ प्रतिपादन करावें असें त्यांचें धोरण नाही. उपमादृष्टान्तांच्या जोडीला त्यांनी कांही लोककथा, कांही पुराणांतील कथा आणल्या व आपला भावार्थ स्पष्ट केला. शिवाय या सर्वांची शास्त्रप्रामाण्यावर निष्ठा आहे. 'नाही श्रुतिपरौती माउली जगा' हें त्यांचें ठरलेलें आहे. शब्दप्रामाण्याबरोबरच गुरुभक्ति, कर्मविपाक, पूर्वजन्म, पुनर्जन्म या सर्वांवर त्यांची श्रद्धा आहे. ही श्रद्धा तर्कनिष्ठ, बुद्धिग्राह्य निबंधरचनेला विरोधक आहे. त्यामुळेच वरील संतांपैकी कोणी निबंधरचना केली नाही. समर्थ रामदासांचीं कांही प्रकरणें वरील वाङ्मयाहून जरा निराळ्या प्रकारचीं आहेत. भोवतालची परिस्थिति, ऐहिक उत्कर्षापकर्ष याविषयी वरील संत उदासीन होते. समर्थांचें तसें नव्हतें. ऐहिक उत्कर्षाची त्यांना अहोरात्र तळमळ होती. परिस्थितीचें त्यांनी अवलोकन केलें होतें व त्यांतून कांही निष्कर्ष काढले होते. ते सांगण्यासाठीच त्यांनी राजधर्म, क्षात्रधर्म, सेवकधर्म, संभाजीस पत्र, आनंदवनभुवन, वन्हि तो चेतवावा रे, गचाळ राजा व हुषार राजा, यत्नाचा लोक भाग्याचा, शक्तीने मिळतीं राज्यें, हीं प्रकरणें लिहिलीं. पण यांतील बहुतेक ठिकाणीं त्यांची भूमिका आज्ञापकाची, उपदेशकाची म्हणजेच कांहीशी स्मृतिकारांची आहे. त्यांचें हें विवरण ऐहिक प्रपंचाविषयी आहे हें खरें. 'ऐका प्रपंच-विचार, संसारधर्म सांगतों, प्रपंचा कारणें मी बोलिलों' असें ठायींठायीं त्यांनी म्हटलें आहे. त्यामुळे जुन्या मराठी वाङ्मयांत या प्रकरणांना अनन्यसामान्य असें स्थान आहे यांत शंका नाही. पण समर्थांची भूमिका बव्हंशीं समाज-शासकाची, गुरूची आहे. म्हणून त्यांच्या या साहित्याला निबंधरूप आलें नाही. पूर्वीच्या संतांनी परमार्थाविषयी सिद्धान्त सांगितले, समर्थांनी या प्रकरणांतून प्रपंचाविषयी सांगितलें. हा फार मोठा फरक आहे आणि स्वतः अवलोकन, निरीक्षण करून हें लेखन केलें असल्यामुळे तें अगदी रोखठोक व जिवंत झालेलें आहे खरें. पण बुद्धीला आवाहन करावें, त्यासाठी तर्कांचा आश्रय करावा, आणि त्यासाठी विषयाचा, वर अनेक ठिकाणीं सांगितल्या-प्रमाणे विस्तार करावा, असें त्यांचें धोरण नाही. त्यामुळे त्यांच्या साहित्यांतून निबंधनिर्मिति झाली नाही. सेवकधर्म, क्षात्रधर्म, अशा कांही प्रकरणांत व

दासबोधांतील महंतांना उपदेश असलेल्या कांही समासांत विषयाचें निबंध-पद्धतीने थोडें विवरण केल्याचें आढळतें. पण तें अत्यंत अल्प, अपवादभूत असें आहे. एरवी सर्वत्र भूमिका गुरूची, शासकाची, सिद्धान्तवक्त्याची ओह.

एकंदर जुन्या मराठी वाङ्मयाविषयी व विशेषतः ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास यांच्या साहित्याविषयी जें लिहिलें आहे त्यामुळे क्वचित् गैरसमज होण्याचा संभव आहे. या थोर विभूतींनी जें धर्मप्रवचन केलें त्याची योग्यता, त्याची असामान्यता, त्यांतील वाग्वैभव यांविषयी वरील विवरणांत कोठेच शंका प्रदर्शित केलेली नाही. त्यांची भूमिका शब्दप्रामाण्याची, धर्मव्याख्यात्यांची, प्रवचनकारांची होती, गुरूची, आज्ञापकाची होती म्हणून विचार-प्रधान, तर्कनिष्ठ, बुद्धीला आवाहन करणारा असा जो निबंध हा वाङ्मय-प्रकार तो त्यांच्या लेखनांतून निर्माण झाला नाही, एवढेंच येथे सांगावयाचें आहे. त्यांनी जें लिहिलें नाही तें लिहिलें नाही एवढेंच म्हटलें आहे. तें त्यांनी लिहावयास हवें होतें असा आग्रहहि व्यक्त केलेला नाही. निबंधस्वरूप रचना त्यांनी न केल्यामुळे त्यांच्या साहित्याला कांही उणेपणा आला असेंहि म्हटलेलें नाही. मात्र हें या संतांविषयी म्हटलें नसलें तरी एकंदर मराठी साहित्याविषयी मात्र निश्चित म्हणावयाचें आहे. निबंध ही समाजांतली एक फार मोठी शक्ति आहे. आणि तिची उपासना महाराष्ट्रांत त्या काळीं कोणीच न केल्यामुळे जुनें मराठी साहित्य फारफार दरिद्री झालें यांत शंका नाही. वर सांगितलेंच आहे की, भोवतालच्या संसाराचें अवलोकन, चिंतन, तेथे दिसून येणाऱ्या उन्नतिअवनतीची कारणचिकित्सा, इतर समाजांचें अवलोकन, इतिहासाचा अभ्यास, त्यांतील घटनांशीं तुलना, त्यावरून निघणारीं अनुमानें आणि तीं लोकांच्या बुद्धीला पटवून देण्याची वृत्ति यांतून निबंध निर्माण होत असतो. तेव्हा निबंध नाही याचा, समाजाच्या ऐहिक उत्कर्षापकर्षाची चिंताच कोणी वहात नाही, असा अर्थ होतो, आणि हा अर्थ फार भयंकर आहे. पण तो तसा असला तरी मान्य करण्याखेरीज गत्यंतरच नाही. त्या काळची आर्थिक स्थिति, शेतीची दुर्दशा, व्यापाराला आलेली अवकळा, परकी राज्य, त्यामुळे नष्ट होत चाललेल्या जुन्या परंपरा, जुन्या विद्या, समाजाची होत असलेली विघटना

यांचा त्या काळीं कोणी विचारच करीत नव्हता असा याचा अर्थ आहे. विचार करणें हा फार व्यापक अर्थानें वापरलेला शब्द आहे. यांविषयी लोकांच्या मनांत विचारच येत नसतील असें नाही. पण त्या समस्यांचा अभ्यास करणें, त्यांची ऐहिक दृष्टीने कारणमीमांसा करणें, इतर देशांकडे पाहून, पूर्वइतिहास पाहून, त्यावर उपाययोजना करणें आणि हें सर्व समाजाला समजावून देण्यासाठी, धर्मप्रवचन करण्यासाठी जसें साहित्य लिहिलें तसे ग्रंथ लिहिणें एवढ्या अर्थानें हा शब्द वापरला आहे. असे ग्रंथ न लिहिल्यामुळे आपल्या समाजाला जी अवकळा आली ती मध्यंतरीं मराठ्यांचें स्वराज्य साम्राज्य आलें तरी गेली नाही. मराठी साम्राज्याला दृढता आली नाही, तें अत्यंत अल्पायुषी झालें याची कारणमीमांसा करतांना, पेशव्यांना व्याख्यानांचें महत्त्व समजलें नाही, आणि तें महत्त्व जाणणारे समर्थांच्यासारखे पुरुष हिंदुस्थानभर झाले नाहीत, त्यामुळे साम्राज्य टिकलें नाही, असें राजवाडे यांनी म्हटलें आहे. त्यांनी तें महाराष्ट्रधर्मापुरतेंच म्हटलें आहे; पण त्यापेक्षाहि फार विशाल अर्थानें 'व्याख्यानें' हा शब्द घेणें अवश्य आहे असें मला वाटतें. १८३० नंतरच्या लेखकांनी जीं व्याख्यानें केलीं तीं करणारे पंडित त्या वेळीं हवे होते. आपली युद्धपद्धति, आपलीं शस्त्रास्त्रें, आपला व्यापार, आपली अर्थव्यवस्था, आपली राज्यकारभारपद्धति, हिंदुस्थानांतील पंथ, त्यांच्यांतील ऐक्याचा धागा, आपलें चातुर्वर्ण्य, जातिभेद, स्त्रियांची परवशता, आपल्यांतील ( विष्णुशास्त्र्यांनी सांगितलेला ) देशाभिमानाचा अभाव, त्या देशाभिमानाची महती, यांचीं व्याख्यानें म्हणजेच यांवरचे ग्रंथ त्या वेळीं झाले असते तरच पाश्चात्त्य आक्रमणाला आपल्याला तोंड देतां आलें असतें. ते झाले नाहीत म्हणून आपल्या समाजांत सामर्थ्य निर्माण झालें नाही. येथे पराक्रम होता. पण तो केवळ रांगडा पराक्रम होता. त्यामुळे तसलाच पराक्रम करणाऱ्या मुसलमान-सत्तेला आपण उलथून पाडूं शकलों. पण राष्ट्रनिष्ठा, विज्ञाननिष्ठा, बुद्धिप्रामाण्य, इहवाद, लोकसत्ता या तत्त्वज्ञानांतून निर्माण होणारें सामर्थ्य ज्यांच्याजवळ होतें त्यांच्यापुढे आपला निभाव लागला नाही. वरील प्रकारचे ऐहिक प्रपंचाची चिंता वाहणारे, उन्नतिअवनतीची भौतिक मीमांसा करणारे ग्रंथ निर्माण झाले असते तर हें सामर्थ्य, विसाव्या शतकाच्या प्रारंभी जसें आपल्याला

प्राप्त झालें, तसेंच अठराव्या शतकाच्या अखेरीलाहि झालें असतें. पण तसे ग्रंथकार, तसे पंडित त्या वेळीं झाले नाहीत म्हणून आपण अयशस्वी झालों. 'इंग्रजी विद्वान् पूर्वी एक असता तर राज्य न जातें' असें लोकहितवादींनी म्हटलें आहे तें याच अर्थाने. आणि त्या लेखांत त्यांनी इंग्रजी विद्वानाचें मुख्य लक्षण सांगितलें आहे तें हें की, तो कोणत्याहि विषयावर ग्रंथ लिहूं शकतो. असा ग्रंथकार पूर्वी नव्हता म्हणून राज्य गेलें, ही प्राचीन मराठी वाङ्मयावर फार प्रखर अशी टीका आहे.

निबंधरचनेचें राष्ट्ररचनेच्या कार्यांत केवढें स्थान आहे हें यावरून ध्यानांत येईल. कोणत्याहि समाजाची संघटना ही कांही तत्त्वावर होत असते. समता, व्यक्तिस्वातंत्र्य, लोकसत्ता, राजसत्ता, धर्माची अनियंत्रित वा नियंत्रित सत्ता, अनियंत्रित अर्थव्यवहार, अशीं कांही तत्त्वें, मूलतत्त्वें म्हणून समाजाने स्वीकारलेलीं असतात. त्यांचा ऊहापोह करून त्यांची सत्यता समाजाच्या बुद्धीला पटविणें हें काम ग्रंथकारांचें असतें. तीं तत्त्वें समाजाला मान्य आहेत तोंपर्यंत समाज संघटितपणें टिकून राहतो, नाही तर फुटतो. युरोपच्या इतिहासावरून पुढे हें दिसेलच. पण राजवाडे, लोकहितवादी यांच्या वचनांवरूनहि तेंच स्पष्ट होतें हें वाचकांनी ध्यानी घ्यावें.

प्राचीन मराठी वाङ्मयाचा विचार झाला. आता संस्कृत वाङ्मयाचा विचार करावयाचा. या अपार वाङ्मयसागराकडे दृष्टि वळवितांच पहिली गोष्ट ध्यानांत येते ती ही की, निबंधरचनेस अवश्य अशी जी अभ्यासपद्धति ती निर्माण करण्यांत संस्कृत पंडितांनी फार मोठें यश मिळविलेलें आहे. प्रत्यक्ष अवलोकन करून ज्ञानकणांचें संकलन करणें, त्यांचें वर्गीकरण करणें, तर्काने व कार्यकारणपद्धतीने त्यांचा संबंध निश्चित करून त्यांची सुबुद्ध रचना करणें व मग त्यावरून निर्णय करणें ही ज्ञानप्राप्तीची शास्त्रशुद्ध पद्धति भारतीय पंडितांनी शोधून काढून ज्ञानाच्या सर्व क्षेत्रांत तिचा अवलंब त्यांनी केलेला दिसतो. या अभ्यासपद्धतीमुळेच भाषाशास्त्र, व्याकरणशास्त्र, अर्थशास्त्र, राजनीतिशास्त्र, समाजशास्त्र अशीं मानवी शास्त्रें व रसायन, पदार्थविज्ञान, गणित, ज्योतिष, वैद्यक इत्यादि वस्तुशास्त्रें त्यांना निर्माण करतां आलीं. मानवाला ज्ञान प्राप्त कसें होतें याचा फार सूक्ष्म अभ्यास या पंडितांनी केला होता. आणि प्रत्यक्ष

अनुमिति, उपमिति व शब्द अशीं ज्ञानाचीं साधनें निश्चित केलीं हातीं. सांख्ययोगादि जीं सहा सुप्रसिद्ध दर्शनें त्यांपैकी प्रत्येक दर्शनांत प्रारंभी ज्ञानप्राप्तीच्या साधनांचा थोडाफार विचार केलेला आढळतोच. या साधनांनी प्राप्त झालेल्या ज्ञानकणांचें वर्गीकरण केल्याचेंहि प्रत्येक दर्शनांत दिसून येतें. कोणाच्या मतें जगांत २५ मूलतत्त्वें आहेत, कोणाच्या मतें १६ पदार्थ आहेत, कोणाच्या मतें ६ आहेत. असें वर्गीकरण केल्यानंतरच दर्शनकारांनी आपले निर्णय निश्चित केले असें दिसतें. अभावांतून भाव निर्माण होणें शक्य नाही व भावाचा अभाव होणार नाही; सर्व जग अणूपासून झालेलें आहे, अशा तऱ्हेचे आजच्या विज्ञानाने पूर्ण संशोधनाअंतीं मान्य केलेले सिद्धान्त या अभ्यासपद्धतींतून त्यांनी निर्मिले होते. मूळ उपनिषदांमध्ये ऋषींना स्फुरलेल्या फक्त कल्पनाच दिलेल्या आहेत. तें वाङ्मय म्हणजे निबंध नव्हे. पण त्यांतील एकेक विचार घेऊन त्यांची शास्त्रशुद्ध मांडणी दर्शनकारांनी केली, त्या विचाराला तर्काचें अधिष्ठान प्राप्त करून दिलें आणि तें शास्त्रबद्ध ज्ञान सांगण्यासाठी सूत्रें रचलीं. आणि कपिल, गौतम, कणाद, जैमिनी इ. सूत्रकारांच्या शिष्यांनी या सूत्रांवर भाष्यें रचलीं तेव्हा या देशांत मोठीच ग्रंथसंपत्ति निर्माण झाली.

पण मूळच्या तत्त्ववेत्त्यांनी सूत्रें रचावयाचीं व दीर्घकाळाने त्यांच्या शिष्यांनी त्यावर भाष्यें लिहावयाचीं या पद्धतीमुळे प्रारंभापासूनच या क्षेत्रांत एक मोठा दोष निर्माण झाला; आणि भारतांतील निबंधसाहित्याला तो अत्यंत मारक ठरला. मूळ दर्शनकारांनीच ग्रंथ लिहून टाकले असते तर आपल्याला ग्रंथरचनेचे फार मोठे आदर्श पहावयास सापडले असते. पण दुर्दैवाने तसें झालें नाही. सूत्रें एकाने रचलीं व भाष्यें दुसऱ्याने लिहिलीं. हीं भाष्यें लिहिणारे लोक दर्शनकारांचे शिष्य व भक्त होते व गुरुमुखींचा शब्द प्रमाण मानणारे होते. त्यामुळे सूत्रांचा अर्थ समजावून देणें, त्यांची संगति लावून दाखविणें एवढेंच त्यांचें कार्य राहिलें आणि हें करतांना प्रत्येक शब्द हा पवित्र व प्रमाण मानल्यामुळे त्याची ओढाताण सुरू झाली. या सर्वांमुळे ज्ञानाचा मूळचा जिवंतपणा नष्ट होऊन त्याला केवळ शब्दरूप आलें आणि भारताची फार मोठी हानि झाली. श्रीमद् आद्य शंकराचार्यांचीं भाष्यें वाचतांना हा विचार पदोपदीं मनांत येतो. उपनिषत्कारांनी त्यांना जें सुचलें तें लिहिलें.

गीताकारांनी तेंच केलें. आचार्यांनी तीच पद्धति अनुसरून मायावाद, बौद्धमत, सांख्यमत, वैशेषिक मत या विषयांवर स्वतंत्र ग्रंथ लिहिले असते तर भारताची सर्व संस्कृतिच बदलून गेली असती. कारण स्वतंत्र ग्रंथरचनेची पद्धति त्यामुळे येथे निर्माण झाली असती. आणि ज्ञानाचें स्वतः संकलन करणें, स्वतःच्या मताने त्याचें वर्गीकरण करणें, स्वतःच्या बुद्धीने त्यांत कार्य-कारण जोडणें ही प्रारंभीची परंपरा कायम राहिली असती. या पद्धतीमुळे माणूस सत्यनिर्णयासाठी मूळ जगाचा, मूळ वस्तुस्थितीचा, भोवतालच्या परिस्थितीचा सारखा अभ्यास करीत राहतो, स्वतः अवलोकन करण्याची त्याची संवय कायम राहते व त्यामुळे त्याच्या बुद्धींतून जिवंत ज्ञान निर्माण होतें. पण सूत्रावर भाष्य, भाष्यावर टीका, आणि टीकेवर दीपिका, चंद्रिका, प्रकाश या पद्धतीमुळे ज्ञानप्राप्तीचे शब्द हेंच साधन शिल्लक राहतें. बाकीचीं साधनें नष्ट होतात आणि समाजांतील ग्रंथरचनेचें सामर्थ्य नष्ट होतें. भारतांत नेमकें हेंच घडलें.

वास्तविक येथे मीमांसाशास्त्र निर्माण झालें होतें. न्यायशास्त्र ( तर्कशास्त्र ) निर्माण झालें होतें. विषय, संशय, पूर्वपक्ष, उत्तरपक्ष व सिद्धान्त या सत्य-निर्णयाच्या पांच पायऱ्या मांडून प्रतिपादनाची शास्त्रीय पद्धति प्राचीनांनी दाखवून दिली होती. ग्रंथांचें तात्पर्य कसें निर्णित करावें याचा विचार करून उपक्रम, उपसंहार, अभ्यास, अपूर्वता, फल या घटकांकडे लक्ष देऊनच निश्चय करावा ही अत्यंत उत्कृष्ट अभ्यासद्धति त्यांनी घालून दिली होती. पण ज्या मीमांसकांनी हें वैभव निर्माण केलें त्यांनी शब्दचिकित्सेला इतकें महत्त्व दिलें की, बुद्धिविकासाच्या दृष्टीने, विचारधनाच्या वाढीच्या दृष्टीने तें वैभव शून्यवत् झालें. आणि पुढे शब्द, शब्द, शब्द एवढेंच शिल्लक राहिलें. युरोपांत १४ व्या, १५ व्या शतकांत नवयुग निर्माण झालें त्याचें प्रधान कारण हें की, प्रत्यक्ष सृष्टीचें अवलोकन करण्याची पद्धति त्या वेळीं लोकांनी अनुसरली. कोपरनिकसने ३० वर्षे आकाशस्थ गोलांचें स्वतः अवलोकन केलें, गॅलिलिओने सूर्याचें स्वतः अवलोकन केलें, कोलंबस स्वतः अटलांटिक महासागर ओलांडून गेला, केप्लर, न्यूटन यांनी हाच मार्ग अनु-सरला. त्या वेळेच्या पॅरसेलससारख्या वैद्यांनी हाच मार्ग स्वीकारला. त्यापूर्वी

ग्रीकांचीं शास्त्रें सर्वसंमत झालीं होतीं. ॲरिस्टॉटल्, गॅलन यांचा शब्द वेदाप्रमाणे मानला जात असे. ग्रीकांनी स्वतः अवलोकन करूनच शास्त्र निर्माण केलें होतें. पण असें एकदाच करून भागत नाही. कारण कोणत्याहि अवलोकनांत दोष राहिलेले असतातच. म्हणून पुनः पुन्हा समाजाचें, सृष्टीचें म्हणजेच जगाचें अवलोकन करणें अवश्य असतें. ज्ञानसाधन करण्याची नवी पद्धति आपण कशी प्रस्थापिली हें डेकार्ट याने ' डिसकोर्स ऑन् मेथड ' या आपल्या ग्रंथांत सांगितलें आहे. तो म्हणतो, " मीं त्या वेळीं सर्व जुनें साहित्य बाजूला ठेवलें आणि ' जगाचा ग्रंथ ' स्वतः पहावयाचा व त्यावरून स्वतः चिंतन करून निर्णय काढावयाचे असें निश्चित केलें. " युरोपची प्रगति झाली ती जगाचा ग्रंथ पहाण्यामुळे झाली. ग्रंथ पाहून ग्रंथ रचणें, सिद्धान्तावरून सिद्धान्त बांधणें व तसें करतांना जगाचा ग्रंथ उघडून जुन्या व नव्या सिद्धान्तांचा पडताळा न पाहणें या पद्धतीमुळे ज्ञान हें डबक्यांतल्या पाण्याप्रमाणे होतें. युरोपमध्ये ग्रीक विद्येच्या पुनरुज्जीवनापूर्वी हेंच झालें होतें. या पद्धतीने निर्माण झालेल्या साहित्याला स्कॉलेस्टिक् थिऑलजी व फिलॉसफी असें इतिहासकारांनी म्हटलें आहे. या पद्धतींत तर्काला महत्त्व असतें पण तो रुक्ष, जीवहीन तर्क असतो. तो प्रत्यक्षावर आधारलेला नसतो. त्याला आधार जुन्या वचनांचा, जुन्या गृहीत सिद्धान्तांचा असतो, सृष्टीच्या ग्रंथाचा नसतो. या पंडिती वाङ्मयाचें वर्णन करतांना इतिहासकार म्हणतात की, त्यांची ती अभ्यासाची रुक्ष व तंत्रप्रधान पद्धति, त्यांनी निर्माण केलेले भेद, पोटभेद, उपपोटभेद, रेखीव, कांटेकोर शब्दज्ञानाचें त्यांचें प्रदर्शन यांमुळे बुद्धीला सूक्ष्मता येत असे, धारहि चढत असे. पण बुद्धीचा स्वतंत्र विकास त्यामुळे कुंठित होई व जिवंत साहित्याच्या निर्मितीला मोठाच अडसर पडे. हीच स्थिति संस्कृत पंडितांची झाली. आपल्याकडे तर्कशास्त्र निर्माण झालें. पण ज्ञानकोशकार म्हणतात त्याप्रमाणे प्रत्यक्षसंकलनमूलक ( इंडक्टिव्ह ) व वाक्यमूलक ( डिडक्टिव्ह ) यांपैकी दुसरी शाखाच आपल्याकडे प्रबळ झाली. तर्काला प्रत्यक्षाचा आधार नित्य देण्याऐवजी जुन्या सिद्धान्ताचाच आधार घेण्याची पद्धत येथल्या पंडितांनी अनुसरली. या वाक्यमूलक तर्कशास्त्राची अत्यंत परिणतावस्था भारतीयांचें मीमांसाशास्त्र दाखवितें. ( ज्ञानकोश, खंड ५ वा., पृ. २१६ ) पुढे मीमांसेचे मूळ सिद्धान्त इतरांनी अमान्य केले. पण

वाक्यमूलक तर्कशास्त्र मात्र सर्वमान्य झालें. आणि त्याचाच परिणाम होऊन प्रत्यक्ष जीवनाशीं या पंडितांचा संबंध सुटला व एका तर्कावरून दुसरा तर्क व एका ग्रंथावरून दुसरा टीकाग्रंथ असें साहित्य ते लिहीत राहिले. अशा वृत्तींतून स्वतंत्र असें निबंधसाहित्य कसें निर्माण व्हावें ?

जगद्विख्यात अशा शांकरभाष्याचेंच येथे आपण उदाहरण घेऊं. आणि त्यांतहि तर्कपाद पाहूं. ब्रह्मसूत्रावरील या भाष्यांत आचार्यांची अगाध विद्वत्ता, त्यांचें अतुल बुद्धिवैभव, त्यांची अनुमानपद्धति, त्यांचें खंडनमंडन-कौशल्य हें सर्व पदोपदीं दिसून येतें. म्हणजे निबंधाची जी बाह्य तांत्रिक रचनापद्धति आहे तिचा परमोत्कर्ष तेथे दिसतो. विरोधी पक्षाच्या मताचें व्यवस्थित प्रतिपादन, त्याचा युक्तिवाद, त्याचे आधार हें सांगून मगच आचार्य त्याचें खंडन करतात. त्यांत त्याच्या अनुमानांतील हेत्वाभास दाखविणें, परस्पर विसंगति स्पष्ट करणें, आपल्या पक्षावर संभवणाऱ्या आक्षेपांना उत्तरें देणें, प्रमाणें देणें, तुलना करणें हा सर्व प्रकार दिसतो. पण ज्या सूत्रांवर आचार्य भाष्य करतात तीं सूत्रें पाहिलीं की हें सर्व निर्जीव आहे असें वाटूं लागतें. ‘रचनानुपपत्तेश्च नानुमानम्।’ असें मूळ सूत्र व त्यावरून ‘रचना जुळत नाही म्हणून अनुमान-(गम्य जें प्रधान तें जगाचें कारण नाही),’ असें भाष्यकाराने विधान तयार करावयाचें आणि मग त्याच्या आधारें प्रतिपक्षाचें मत खोडून काढावयाचें ! ‘प्रवृत्तेश्च’ हें सूत्र. आणि ‘प्रवृत्ति जुळत नाही म्हणूनहि (प्रधान जगाचें कारण नाही),’ हें त्यावरून भाष्यकारांनी केलेलें पूर्ण विधान. ‘दूध व पाणी याप्रमाणे म्हणशील तर तेथेहि’ हें मूळसूत्र आणि ‘दूध व पाणी याप्रमाणे सांख्यांचें प्रधान प्रवृत्त होईल असें म्हणशील तर त्यावर आमचें उत्तर असें की, तेथेहि चेतनापासूनच प्रवृत्ति आहे.’ हें त्यावरून बनविलेलें विधान किंवा वाक्य. यांवरून या भाष्यसाहित्याचें स्वरूप ध्यानीं येईल. पांचशे किंवा हजार वर्षांपूर्वी हीं सूत्रें लिहिलेलीं. त्यांपैकी पुष्कळांत क्रियापदसुद्धा नाही. अशा स्थितींत त्यांचा अर्थ निश्चित करावयाचा, त्याचा आग्रह धरावयाचा आणि त्यावरून एक सर्वांगीण तत्त्वज्ञान उभें करावयाचें ! यांत मनुष्य किती शब्दवश होत असेल याची सहज कल्पना येईल. या भाष्यवाङ्मयांत निबंधरचनेचा बाह्य सांगाडा कितीहि रेखीवपणाने उभारलेला असला तरी एका विचारबीजाच्या विस्तारासाठी स्वतः ज्ञानकण

जमवून त्यांचें पृथक्करण, वर्गीकरण करून त्यांची संगति जोडून त्यावरून निर्णय करणें व प्रत्यक्ष जीवनांतून, अनुभवांतून, इतिहासांतून आधार घेऊन त्याची सिद्धि करण्यासाठी ग्रंथ रचणें हें फार निराळें आहे, हें कोणालाहि मान्य करावें लागेल. विष्णुशास्त्री यांचे 'वक्तृत्व', 'इतिहास', 'आमच्या देशाची स्थिति' हे निबंध; आगरकरांचे 'सुधारक काढण्याचा हेतु', 'इष्ट असेल तें बोलणार', हे निबंध; 'रामदास', 'महाराष्ट्र धर्म' हे राजवाड्यांचे निबंध; 'महाराष्ट्रभाषेची वाढ', 'नव्या पक्षाचीं तत्त्वें', यांसारखे टिळकांचे निबंध, 'वाङ्मय म्हणजे काय?' ( केळकर ); 'दोन शब्दांत दोन संस्कृति' ( सावरकर ) हे निबंध आणि त्याचप्रमाणे गीतारहस्य, संस्कृतिसंगम, आधुनिक भारत, अस्पृष्टांचा प्रश्न, विज्ञानबोध, हे ग्रंथ वाचले म्हणजे जें समाधान वाटतें, स्वतंत्र, चिंतनशील प्रज्ञेचा आविष्कार दृष्टीस पडल्याचा जो आनंद होतो, ही नवनिर्मिति असल्याची साक्ष पटून मनाला जी चेतना मिळते ती भाष्य-वाङ्मय वाचून मिळत नाही. श्रीमद् आचार्यांनी स्वतंत्र ग्रंथरचना केली असती तर भारतांत नवचैतन्य निर्माण होऊन नवयुगाला प्रारंभ झाला असता, असें जें वर म्हटलें आहे तें याच दृष्टीने.

वर सांगितलेला नवनिर्मिति पाहिल्याचा आनंद, जिवंत, स्वतंत्र प्रज्ञेचा आविष्कार दृष्टीस पडल्याचें समाधान हें महाभारत वाचतांना मात्र अनेक ठिकाणीं बऱ्याच अंशाने प्राप्त होतें. शांतिपर्वांतील भीष्मांनी सांगितलेलें 'राजधर्म' हें प्रकरण म्हणजे प्राचीन निबंधरचनेचा एक बऱ्यापैकी नमुना आहे. स्वतंत्र प्रज्ञेने रचलेला तो ग्रंथ आहे. त्यांत पृथक्करण आहे, वर्गीकरण आहे, ऐतिहासिक आढावा आहे, कार्यकारण भाव आहे, तुलना आहे, आक्षेप, खंडन, मंडन, आधार, प्रमाण हें सर्व आहे. प्रत्यक्ष परिस्थितीचें अवलोकन आहे, अनेक राजांचे अनुभव सांगितले आहेत, पंडितांचीं मतें दिलेलीं आहेत. या सर्वांची कल्पना येण्यासाठी या प्रकरणाचें थोडें स्वरूप वर्णन करूं. विषयाचीं सर्व अंगोपांगें यांत कशीं आलीं आहेत तें पहा. राजाचीं कर्तव्यें, धर्मरक्षण, प्रजापालन, राष्ट्रसंरक्षण यांचा विचार यांत आहे. सामदामदंडभेद या चतुर्विध उपायांचें चिंतन आहे. राजा या संस्थेची उत्पत्ति कशी झाली त्याचा इतिहास आहे. अमात्ययोजना कशी करावी, सभासद कोण असावे याचीं कारणें देऊन केलेलें विवेचन आहे. शत्रुमित्र कसे जाणावे, शूरांचीं लक्षणें कोणतीं, राज-

धर्मांत सत्यासत्याचें स्थान काय, कोशसंचय कसा करावा, सेवकांना कसें वागवावें, सैन्याची व्यवस्था कशी करावी, इत्यादि सर्व अंगोपांगांचें विवेचन या निबंधांत आलेलें आहे. आंगिरस, बृहस्पति, कश्यप, उतथ्य, वामदेव इत्यादि प्राचीन पंडितांनी राजधर्माविषयी सांगितलेले विचार भीष्मांनी युधिष्ठिराला ऐकविले आहेत. विदेहाधिपति, ऐल, अंबरीष, या राजांचे अनुभव वर्णिलेले आहेत. मुचकुंद, कैकेय, इत्यादि राजांचीं चरित्रें-आख्यानें राजधर्माच्या स्पष्टीकरणासाठी सांगितलेलीं आहेत. यांत कोठेहि शब्दप्रामाण्य नाही, नुसत्या आज्ञा देऊन भागविलेलें नाही, तर्कावरून तर्क बांधलेले नाहीत, शब्दांची ओढाताण नाही; तर युधिष्ठिराच्या बुद्धीला आवाहन आहे, त्यासाठी कार्यकारणमीमांसा आहे, प्रत्यक्ष घटनांचें वर्णन आहे, तर्कनिष्ठ प्रतिपादन आहे. प्रत्यक्ष व्यवहाराचें विवेचन असल्याने, प्रजा असंतुष्ट झाल्यास काय होईल, अमात्य ज्ञानसंपन्न नसला तर काय होईल, शत्रुमित्रभाव नीट न जाणला तर परिणाम काय होईल, याचें भौतिक, ऐहिक दृष्टीने विवरण केलें आहे. यांत अनेक ऋषींचीं, मुनींचीं, मतें दिलीं आहेत. पण तीं स्वतःच्या विवेचनाला आधार म्हणून दिलीं आहेत. शब्दप्रामाण्यबुद्धीने दिलेलीं नाहीत. किंवा त्यांच्या ग्रंथाचें विवरण करावें हेंहि धोरण नाही. पूर्वकाळीं या देशांत जिवंत विचार कसे चालत असत आणि त्यांतून निबंध कसे निर्माण होत असत त्याचें महाभारतांतील राजधर्म-प्रकरण हें उत्तम उदाहरण आहे. त्यांत दोष एवढाच आहे की दोनतीन हजार वर्षांपूर्वीचें तें साहित्य असल्यामुळे मूळच्या स्थितींत तें आपल्यापर्यंत आलेलें नाही. त्यांत अनेकांनी भर घातली आहे, अनेकांनी कांही फिरवाफिरवहि केली असण्याचा संभव आहे. त्यामुळे कोठे पुनरुक्ति दिसते, कोठे विस्कळितपणा दिसतो. पण यांतूनहि त्याचें जें रूप दिसतें तें पाहतां ही निबंधरचना आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय येत नाही.

महाभारतांत निबंधरचना एवढीच आहे असें नाही. श्रीकृष्ण, अर्जुन, भीम, द्रौपदी, भीष्म यांचीं अनेक भाषणें या स्वरूपाचीं आहेत. शांतिपर्वाच्या आरंभीच धर्मराजाचा वनांत निघून जाण्याचा विचार मोडून काढण्यासाठीं अर्जुन व भीम यांनी जीं भाषणें केलीं आहेत तीं भाषणें म्हणजे उत्तम निबंध आहेत. अर्जुनाचें भाषण पहा -( शांतिपर्व, अ. ८ ) 'हे राजा,

अरण्यांत जाऊन तूं भिक्षावृत्तीने राहीन म्हणतोस; पण सर्व धर्म धनावर, द्रव्यावर अवलंबून आहेत हें तूं जाणतोस ना ?' असा प्रस्ताव करून अर्जुनाने धनाची महती वर्णिली आहे. त्यांत त्याने पुढील विचार मांडले आहेत. " दारिद्र्य हें पातक आहे. दारिद्र्यामुळे धर्म, काम, मोक्ष दुरावतात. बांधव दुरावतात. मित्र दुरावतात. म्हणजे दरिद्री माणसाला इहलोक नाही व परलोक नाही. नहुषाने आपला नाश निर्धनतेमुळे झाला असें म्हटलें आहे. देवांचें आचरण पाहिलेंस तरी हेंच दिसेल. वेदांच्या आज्ञा पाहिल्यास तरी हाच विचार समजून येतो. द्रव्याशिवाय सर्व व्यर्थ आहे. हें द्रव्य दुसऱ्याला अपकार केल्यावांचून कधी मिळत नाही. पृथ्वी जिंकावी व मग अपत्याप्रमाणे तिचें पालन करावें असाच क्षात्रधर्म आहे. नृग, अंबरीष, मांधाता यांनी हाच धर्म आचरिला. तूंहि अश्वमेध करून धन संपादून त्याच धर्माचें आचरण कर. " याच प्रसंगीं अर्जुनाने केलेलें दुसरें भाषण १५ व्या अध्यायांत आहे. त्यांत शासनशक्ति किंवा दण्डनीति या विषयावर आपले विचार त्याने असेच रेखीव पद्धतीने मांडले आहेत.

( १ ) दण्डाच्या भयानेच लोक धर्म आचरतात व प्रजेचें संरक्षण होतें. दण्ड नसता तर लोक उद्दाम झाले असते. जगांत मात्स्यन्याय माजला असता.

( २ ) या दण्डासाठी उत्तम नियंता ( राजा ) अवश्य आहे. त्याच्या भीतीमुळे लोकांच्या डोळ्यांत अंधेरीच आली पाहिजे. मग प्रजा मोह पावत नाही.

( ३ ) या दण्डसामर्थ्यानेच राजाला शत्रूवर जय मिळवितां येतो. इन्द्र, रुद्र, स्कंद, अग्नि, वरुण, विश्वेदेव यांनी असाच जय मिळविला आहे.

( ४ ) सृष्टीमध्ये सर्वत्र दण्डभयानेच प्राणी नीट वागतात.

( ५ ) राज्य धर्माने मिळविलें की अधर्माने, हा प्रश्न गौण आहे. कोणतेंहि कृत्य सर्वस्वी पापमय वा सर्वस्वी पुण्यमय असत नाही. म्हणून राज्य प्राप्त झालें आहे तें तूं घे. न्यायाने प्रजेचें पालन कर व धर्माचें रक्षण कर. "

भीम, द्रौपदी, भीष्म यांचींहि भाषणें अशींच आहेत. बुद्धीला आवाहन, भौतिक दृष्टीने केलेली कार्यकारणमीमांसा, तर्कशुद्धता, ऐतिहासिक दाखले, शास्त्रांचे, ऋषीमुनींचे आधार, या सर्वांत एक सूत्र राखून केलेलें स्वमताचें प्रतिपादन या गुणांनी हीं भाषणें संपन्न आहेत.

पण याहिपेक्षा ग्रंथरचनेचें जास्त चांगलें उदाहरण म्हणजे कौटिल्याचें अर्थशास्त्र. हा राज्यशास्त्रावरचा ग्रंथ आहे. राज्य प्राप्त करून घेणें व त्याचें रक्षण करणें याचें हें शास्त्र आहे असें ग्रंथकाराने प्रारंभीच म्हटलें आहे. ग्रंथकर्तृत्व म्हणजे काय याची या एका ग्रंथावरून बरीचशी कल्पना येईल. पहिली गोष्ट म्हणजे सर्व विषयाचा संपूर्ण व्याप मनापुढे आणून त्याचीं सर्व अंगोपांगें निश्चित करणें – म्हणजेच विषयांचें पृथक्करण करणें ही होय. एका समर्थ अशा प्रज्ञेच्या अंतरांत या नव्या सृष्टीची प्रथम धारणा होते आणि मग तो प्रज्ञावंत पुरुष तिला साकारता आणतो. राज्यशास्त्र म्हणतांच राजाचें व्यक्तित्व, राज्यांतील अनेक खात्यांच्या अध्यक्षांची कार्यनिपुणता, खजिना, सर्व प्रकारचे करारनामे व न्यायव्यवस्था, परराष्ट्रीय राजकारण, युद्ध व तह, सैन्य, राज्यावर येणारीं अनेकविध संकटें, शेती, व्यापार, खेड्यांची रचना, किल्ल्यांची बांधणी, शत्रुमित्रधोरण, इतका सर्व व्याप कौटिल्याच्या प्रज्ञेंत सामावून आला. या प्रत्येक विषयाचीं उपांगेंहि त्याने पुन्हा तितक्याच बारकाईने निश्चित केलीं. युद्ध म्हटलें की शस्त्रास्त्रें, द्रव्य, छावणी, युद्धाच्या पद्धति, चढाई, सैन्यांची व्यवस्था, सेनापति या सर्व तपशिलांत तो शिरतो. राज्यावरचीं संकटें म्हटलीं की, सैन्याचा कमकुवतपणा, व्यापाऱ्यांची लबाडी, अधिकाऱ्यांची फितुरी, महापूर, रोगराई हीं सर्व संकटें त्याच्या दृष्टीपुढे उभीं राहतात. जमिनींत बीज टाकल्याबरोबर अवश्य तीं सर्व पोषक द्रव्यें तें जसें खेंचून घेतें आणि अनवश्यक द्रव्यें त्याच जमिनींत असलीं तरी घेत नाही, त्याप्रमाणे एक विचारबीज मनांत पडतांच त्याच्या विस्ताराला अवश्य तें सर्व ज्ञान, विचार, कल्पना, मतें, आक्षेप, वचनें त्याकडे खेचून घेण्याची व तीं घेतल्यावर बुंधा, शाखा, डहाळ्या, पानें, फुलें व अंतीं फळें असें त्याचे पृथक् भाग करण्याची शक्ति ग्रंथकारास अवश्य असते आणि पहाणाराला हा सर्व एकाच मूळ बीजाचा विस्तार आहे, एकजीव, एकरस अशी ही निर्मिति आहे, जें बीजांत आहे तेंच फळांत आहे, मधला शाखा, पानें, फुलें हा संभार त्या फळांच्या परिणतीसाठीच आहे अशी साक्ष पटते ती या शक्तीमुळेच पटते.

संपूर्ण विषयाचा व्याप, त्याचें पृथक्करण, उपविषयांचें, पोटविषयांचें पृथक्करण हें केलें की भौतिक दृष्टीने कार्यकारणमीमांसा करणें अत्यंत सुलभ

होतें. बुद्धीला आवाहन करण्यासाठी ही मीमांसा अवश्य असते हें वर सांगितलेंच आहे. या भौतिक कार्यकारणामुळेच शब्दप्रामाण्यवृत्ति नष्ट होऊन वेदवचन, गुरुवचन यांना विरोध करण्याचें मनःसामर्थ्य प्राप्त होऊन जिवंत विचारसरणीचा तर्कशुद्ध आविष्कार दृष्टीस पडूं लागतो. यालाच निबंध असें म्हणतात. कौटिल्याने अनेक ठिकाणीं आपल्या गुरुजींचें मत देऊन, हें मला मान्य नाही, याचें कारण अमुक, असें विवेचन केलें आहे. कोणीहि भाष्यकार कितीहि मोठा असला तरी तो हें करूं शकणार नाही. कारण मूळ ग्रंथ प्रमाण मानूनच तो विवेचनास प्रारंभ करीत असतो. तो गुरूला विरोध कसा करणार? ज्याचे प्रजाजन दरिद्री व लोभी आहेत अशा राजावर स्वारी करावी, की ज्याचे प्रजाजन जुलमाने गांजलेले असतात अशावर करावी असा प्रश्न होता. पहिल्यावर स्वारी करावी असें गुरुजींचें मत होतें. तें चूक आहे, असें सांगून कौटिल्य म्हणतो, 'प्रजा दरिद्री व लोभी असली तरी ती राजनिष्ठ असते. आणि राजनिष्ठ प्रजा हा राजाचा मोठा आधार होय. उलट जुलमाने गांजलेली प्रजा राजनिष्ठ नसते, म्हणून त्या राजावरच स्वारी करणें युक्त. याचप्रमाणे सख्य कोणाशीं करावें, जमीन घेतांना कोणतें धोरण ठेवावें, गनिमी कावा चांगला की मैदानी लढाई, अशा अनेक प्रश्नांचें विवेचन करतांना कौटिल्याने अशींच आपल्या गुरुजींचीं मतें देऊन त्यांचें खंडन केलें आहे व आपलें मत तर्कशुद्ध रीतीने मांडलें आहे. गुरूप्रमाणेच भारद्वाज, व्यातव्याधि, पिशुन, कौणपदंत इत्यादि प्राचीन आचार्यांचीं मतें देऊन त्यांचाहि कौटिल्याने असाच परामर्श घेतला आहे.

प्रारंभापासून निबंधरचना म्हणजे काय, ग्रंथाचीं लक्षणें कोणतीं याचें विवेचन अनेक ठिकाणीं केलें आहे. त्या दृष्टीने पाहतां कौटिल्याचा अर्थशास्त्र हा ग्रंथ पुष्कळच वरच्या दर्जाचा ठरेल यांत शंका नाही. पण संपूर्णपणें आदर्श ग्रंथ पाहिल्याचें समाधान मात्र त्यामुळे मिळत नाही. जगद्विख्यात ग्रीक पंडित ॲरिस्टॉटल याचा 'पॉलिटिक्स' हा ग्रंथ पाहिला तर माझ्या म्हणण्याचा अर्थ स्पष्ट होईल असें वाटतें.

ॲरिस्टॉटलचा 'पॉलिटिक्स' हाहि राज्यशास्त्रावरचाच ग्रंथ आहे. पण राज्यशास्त्रांत निर्माण होणाऱ्या अनेक मूलभूत प्रश्नांचें तात्त्विक विवेचन हा

त्या ग्रंथाचा विशेष आहे. हें तात्त्विक विवेचन कौटिल्याच्या ग्रंथांत फारसें सापडत नाही. आणि तात्त्विक विवेचन हा तर निबंधरचनेचा आत्मा होय. कौटिल्याचा ग्रंथ बराचसा व्यवहारनिरूपणात्मक आहे. मधून केव्हा केव्हा तो तात्त्विक सिद्धान्त सांगतो. पण त्याचें सांगोपांग विवेचन तो कोठेच करीत नाही. कोठेकोठे इतर पंडितांचीं मतें देऊन तीं तो खोडूनहि काढतो हें वर दिलेंच आहे. त्या ठिकाणीं तो कारणमीमांसाहि करतो. पण तें सर्व त्रुटित असें विवेचन आहे. उलट ॲरिस्टॉटलचा ग्रंथ तात्त्विक विवेचनानेच भरलेला आहे. पहिलें पान उघडून वाचूं लागल्याबरोबरच हा महत्त्वाचा फरक ध्यानांत येऊं लागतो. आणि सर्व ग्रंथभर तो सारखा जाणवत असतो. आर्थिक समता, सामाजिक समता, समाजांतील भिन्नभिन्न वर्ग व त्यांचीं कार्यें आणि अधिकार, गुलामगिरीची संस्था, शासनसंस्थेचे अंतिम हेतु, कुटुंबसंस्था, स्त्रियांचें तेथील स्थान, असल्या प्रत्येक प्रश्नाचें संपूर्ण तात्त्विक विवेचन ॲरिस्टॉटल करतो. लोकसत्ता, महाजनसत्ता व राजसत्ता हा विषय तर त्याने इतका विशद केला आहे की, ग्रंथरचना म्हणजे काय हें ज्याला पहावयाचें आहे त्याने तें विवेचन अवश्य पाहावें. शेवटीं क्रांतीचें विवेचनहि त्याने असेंच सांगोपांग केलें आहे. आर्थिक विषमता, सामाजिक विषमता, सत्ताधाऱ्यांचा जुलूम यांपैकी क्रांतीचें खरें कारण कोणतें, क्रांति होऊं न देण्यासाठी कसें जपलें पाहिजे, उपाय कोणते योजले पाहिजेत, याविषयीचे सर्व विचार ॲरिस्टॉटलने सविस्तर मांडले आहेत.

आर्थिक समतेचा विचार त्याने कसा मांडला आहे तें उदाहरणार्थ पाहूं— प्रत्येक नागरिकाचें उत्पन्न सारखें असावें असें प्लेटो, फॅलिआस इत्यादि पूर्वींच्या पंडितांचें मत प्रथम देऊन मग त्याने आपले विचार मांडले आहेत. मिळकत सारखी असावी हें त्याच्या मतें युक्तच आहे. पण उत्पन्नाचा आंकडा ठरवितांना कुटुंबांतील माणसांची संख्या पाहून तो ठरविला पाहिजे. नाही तर सारखें उत्पन्न याला त्याच्या मतें कांहीच अर्थ राहणार नाही. पण ॲरिस्टॉटलच्या मतें एवढ्याने भागत नाही. राज्यांत बंडाळ्या होऊं नयेत, असंतोष धुमसूं नये यासाठी आर्थिक समता आपण प्रतिपादितों. पण त्याबरोबरच माणसामाणसांच्या भोगेच्छा फार निराळ्या प्रकारच्या असतात हें विसरून चालणार नाही. उत्पन्न सारखें असलें तरी तीव्र वासना, तीव्र भोगलालसा

असणारे पुरुष तेवढ्यावर संतुष्ट राहणार नाहीत. ते अन्यायाने इतरांच्या धनाचा अपहार करण्यास प्रवृत्त होणारच. म्हणून शिक्षणाने लोकांना संयम शिकविला पाहिजे. त्याचप्रमाणे कीर्ति, मानसन्मान, यांचाहि विचार केला पाहिजे. सामान्य मनुष्य भाकरीसाठी बंडाळी करील व ती मिळाली की शांत होईल; पण श्रेष्ठ कर्तृत्वाचीं माणसें सारख्या उत्पन्नाने संतुष्ट होणार नाहीत. म्हणजे अन्न-वस्त्र, इतर तीव्र वासना आणि कीर्तीची आकांक्षा, अशा माणसाच्या त्रिविध क्षुधा असतात. पहिली तृप्त करण्यासाठी मिळकत पाहिजे. दुसरीसाठी संयम शिकविला पाहिजे. आणि तिसरी आकांक्षा असणाऱ्या लोकांना तत्त्वचिंतनांत, विद्याव्यासंगांत तृप्ति उपलब्ध करून दिली पाहिजे. हें सांगून ॲरिस्टॉटल म्हणतो की, अत्यंत भयंकर गुन्हे हे अन्नवस्त्रां-पेक्षा वरच्या आकांक्षांच्या अतृप्तीमुळेच होतात. म्हणून मानवाच्या या तीनहि क्षुधांचा विचार केला पाहिजे. नुसत्या आर्थिक समतेने फार तर किरकोळ गुन्ह्यांवर नियंत्रण पडेल. या विवेचनाप्रमाणेच या ग्रंथांत लोकसत्ता, क्रांति यांचें केलेलें विवेचनहि असेंच मूलगामी आहे.

ॲरिस्टॉटलचा ‘ नीतिशास्त्र ’ (एथिक्स) हा ग्रंथहि असाच निबंधरचनेचा आदर्श म्हणून दाखवितां येईल. हे त्याचे ग्रंथ आणि डेमॉस्थेनीसचीं भाषणें, थुसिडायडीजचा इतिहास ही निबंधरचना पाहिली आणि पुन्हा भारताच्या तीन-चार हजार वर्षांच्या इतिहासाकडे दृष्टि फिरविली म्हणजे मन जरा खिन्न होतें. १८३० च्या पूर्वी म्हणजे पाश्चात्त्य विद्या येथे येण्याच्या आधी भारतांत ‘ ग्रंथ ’ हें अभिधान पूर्णांशाने सार्थ करील अशी रचना झालीच नाही असें या इतिहासावरून म्हणावें लागतें. मनाला ही फार मोठी धक्का देणारी गोष्ट आहे. या देशांत त्या प्राचीन काळीं प्रत्यक्ष अवलोकन, अनुभव, प्रयोग यांतून निर्माण होणारीं शास्त्रें—ज्योतिष, रसायन, वैद्यक इ. शास्त्रें—निर्माण झालीं होतीं. भाषाशास्त्र, व्याकरणशास्त्र यांचे आदर्श येथल्या पंडितांनी रचले होते. म्हणजे ग्रंथरचनेला अवश्य ते मनाचे संस्कार, ती मनाची घडण येथे घडलेली होती. तरी येथे ॲरिस्टॉटलच्या ‘ पॉलिटिक्स’सारखा एकहि ग्रंथ सापडूं नये याच्यावर विश्वास बसत नाही; पण मागल्या इतिहासाच्या आधारें याचें कांही स्पष्टीकरण करूं जावें तर त्यांनेहि समाधान होत नाही.

कौटिल्याने आपल्या ग्रंथांत अनेक पूर्वीच्या अर्थपंडितांचा उल्लेख केला आहे. त्यांचे ग्रंथ आज आपल्याला उपलब्ध होत नाहीत. खुद्द कौटिल्याचा ग्रंथहि मध्यंतरीं शेकडो वर्षें अज्ञात स्थितींतच राहिला होता. यामुळे असें वाटतें की, येथे निबंधरचनेचे आदर्श वाटावे असे अनेक ग्रंथ निर्माण झाले असतील; पण ते सर्व कालाच्या भक्ष्यस्थानीं पडले असतील. येथे अनेक उत्पात झाले, परकीयांचीं अनेक आक्रमणें झालीं. येथल्या राजमंडळांतहि अनंत युद्धें, अनंत संघर्ष झाले. मुसलमानांच्या राज्यांत तर अनेक मंदिरें, पाठशाळा, विद्यापीठें आणि विद्वान् पंडितांचीं घरें हेतुपुरस्सर उध्वस्त करण्यांत आलीं. भूकंप झाले, जलप्रलय झाले, रोगांच्या सांथींनी गावेंच्या गावें उजाड झालीं. या सर्वभक्षक कालमुखांतून जें साहित्य राहिलें तें फक्त आपल्या हातीं लागलें. तेवढ्यावरून कांही निष्कर्ष काढणें सयुक्तिक नाही असें मनांत येतें. पण वर सांगितल्याप्रमाणे या स्पष्टीकरणाने मनाचें समाधान होत नाही. परमार्थक्षेत्रांतले हजारो हजार ग्रंथ या सर्व अनर्थांतून वांचून राहिले आहेत. हजारो नष्ट झाले असतील; पण हजारो शिल्लक राहिले आहेत. वर उल्लेखिलेल्या भाष्य लिहिणारांचाच विचार पाहिला तर एकेका भाष्यकाराचे किंवा टीकाकाराचेच दहादहा वीसवीस टीकाग्रंथ उपलब्ध होतात. उपनिषदें आहेत, स्मृति आहेत, या स्मृतिग्रंथाच्या आधारें लिहिलेले, ज्यांना जुन्या काळीं निबंध म्हणत असत, असेहि अनेक ग्रंथ आहेत. पण आरंभी ज्या निबंध-वाङ्मयप्रकाराची विवक्षा स्पष्ट केली आहे तसे ग्रंथ दोनचारहि सापडत नाहीत, ही केवळ योगायोगाची गोष्ट असेल असें वाटत नाही. शब्दप्रामाण्य, गुरुमुखाचा अवलंब करण्याची वृत्ति, निवृत्तिवाद यांमुळे असल्या ग्रंथरचने-विषयी पुढे अनास्थाच निर्माण झालेली दिसते. त्यामुळे स्मृति किंवा भाष्यें यांच्या निरनिराळ्या लोकांनी शंभरदोनशे हस्तलिखित प्रती केल्या असल्या तर ऐहिक विषयांवरील ग्रंथांच्या एकदोनसुद्धा केल्या नसतील. नाही तर आज परमार्थवाङ्मयकृति जशा त्या उत्पातांतून वांचून विपुल उपलब्ध होतात तसेच हेहि ग्रंथ झाले असते असें वाटतें.

निबंध या वाङ्मयप्रकाराचें लक्षण सांगून त्याच्या निर्मितीविषयीची एका उपपत्ति मांडण्याचा प्रयत्न या लेखांत मी करीत आहें. त्या दृष्टीनेच येथपर्यंत विवेचन केलें. त्यांत पश्चिमेकडील फक्त ग्रीसमधील ग्रंथरचनेचाच थोडासा

विचार केला. आता मध्ययुगांतील पश्चिम युरोपीय देशांतील निबंधसाहित्याचा विचार करून हें विवेचन संपवूं.

पश्चिम – युरोपांतलें हें मध्ययुग साधारणतः तेराव्या शतकाच्या अखेरीला, म्हणजे ज्ञानेश्वर – नामदेवांच्या काळींच सुरू झालें. ग्रीक संस्कृतीचा अस्त झाला, रोमन संस्कृतीचा उत्कर्षकाळ संपला आणि मग ख्रिस्ती धर्माचा प्रसार मोठ्या वेगाने होऊं लागला. आणि त्याच्याबरोबरच निवृत्ति, शब्द-प्रामाण्य यांचें वर्चस्व प्रस्थापित होऊन युरोपांत तमोयुगाला प्रारंभ झाला. हें तमोयुग बाराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत चालू होतें. एवढ्या दीर्घकाळांत कोणत्याहि प्रकारचें श्रेष्ठ असें साहित्य निर्माण झालें नाही. तेराव्या शतकांत पाश्चिम-युरोपांत विद्यापीठें स्थापन होऊं लागलीं, समाजाच्या स्थितिगतीचा ऐहिक दृष्टीने पंडित पुन्हा विचार करूं लागले आणि मग पुन्हा वाङ्मयरचनेला प्रारंभ झाला. तेराव्या शतकाच्या अखेरीला पोपच्या प्रजेला जबरदस्त विरोध करणारे विचारवेत्ते युरोपांत जन्माला आले. पोपची सत्ता परमेश्वरप्रणीत नसून लोकायत्त आहे, पोपच्या पीठावर कोणी बसावें हें ठरविण्याचा अधिकार लोकांचा आहे, पोपने व त्याच्या धर्माधिकाऱ्यांनी अपरंपार संपत्ति साठविली आहे तिचा निचरा झाला पाहिजे, ख्रिस्ती धर्माचे हे अधिकारी अत्यंत हीन, धर्मभ्रष्ट, नीतिभ्रष्ट, अनाचारी व उन्मत्त असल्यामुळे त्यांना धर्मोपदेश करण्याचा कसलाहि अधिकार नाही, अशा तऱ्हेचे अत्यंत क्रान्तिकारक व पाखंड विचार या पंडितांच्या मनांत येऊं लागले. शब्दप्रामाण्य धुडकावून लावण्याचा त्यांनी निर्धार केला आणि त्यांच्या या वृत्तींतूनच निबंध जन्माला आला. श्रुतिप्रामाण्याला जे विरोध करतात त्यांना लोकांच्या बुद्धीला आवाहन करावें लागतें. आणि बुद्धीला आवाहन करावयाचें तर नुसत्या आज्ञा करून भागत नाही, तर तर्कशुद्ध प्रतिपादन करावें लागतें. प्रत्यक्ष जीवनांतून प्रमाणें द्यावीं लागतात. इतिहास सांगावा लागतो. अन्वयव्यतिरेक, तुलना, आक्षेप, खंडन, मंडन, या पद्धतीने लिहावें लागतें. या पद्धतीने केलेलें लेखन त्यालाच निबंध किंवा ग्रंथ म्हणतात.

पोपच्या सत्तेविरुद्ध बंड करून उठणारा पहिला बुद्धिनिष्ठ, इहवादी व लोकवादी पंडित म्हणजे मार्सीलिओ ( १२७०–१३४० ). पॅरिस विद्यापीठाचा

हा कांही काळ मोठा अधिकारी होता. पोपचे व त्याच्या अधिकाऱ्यांचे उन्मत्त विलास व अनाचार पाहून त्याला पराकाष्ठेची चीड आली होती. आणि ही सत्ता नष्ट झालीच पाहिजे असा त्याचा निश्चय झाला होता. म्हणून धर्मसत्ता, राजसत्ता, शासनसंस्था यांविषयी आपले विचार सांगण्यासाठी त्याने १३२४ सालीं 'डेफेन्सॉर पॅसिस' हा आपला ग्रंथ लिहिला. या ग्रंथाच्या पहिल्या भागांत त्याने शासनसंस्थेच्या मूलतत्त्वांची चिकित्सा केली आहे व दुसऱ्या भागांत त्या चिकित्सेच्या आधारें पोपच्या पीठावर टीका केली आहे. त्यांत त्याने खिस्ती धर्माचा ऐतिहासिक आढावा घेऊन हे धर्माधिकारी युरोपच्या शांततेचे शत्रु आहेत असें प्रतिपादिलें आहे. त्याच्या मतें धर्मसत्तेचें स्थान गौणच होय. राष्ट्रांतलें राजकीय शासन ही सर्वश्रेष्ठ सत्ता होय. धर्मसत्तेने तिच्या तंत्रानेच चाललें पाहिजे. आणि ऐहिक कारभारांत तर तिने मुळीच हस्तक्षेप करतां कामा नये. परमार्थ हेंच तिचें क्षेत्र. आणि यामुळे भोगविलास, धनदौलत, जमीनजुमला हें सर्व तिला वर्ज्य होय. राजकीय क्षेत्रांतहि मार्सिलिओ हा लोकवादीच होता. राजा हा लोकांनी निवडलेला असावा व लोकसभेचें त्याच्यावर नियंत्रण असावें हें पश्चिम-युरोपांत प्रथम यानेच प्रतिपादिलें.

मार्सिलिओसारख्याच विचारांचें प्रतिपादन करणारा दुसरा तत्त्वचिंतक म्हणजे इंग्लिश लेखक विल्यम् ऑफ ओकॅहम ( १२९०-१३४७ ) हा होय. हाहि पॅरिस विद्यापीठांत प्राध्यापक होता. त्याचीं पुष्कळशीं मतें मार्सिलिओ-सारखींच होतीं. 'डिसिजन अपॉन एट केश्चन्स्' हा त्याचा ग्रंथ होय. पोप हा स्खलनशील आहे आणि त्याचे धर्माधिकारी इतर सामान्य जनांप्रमाणेच शासनसंस्थेच्या कायद्याने बद्ध असले पाहिजेत, अशीं आपलीं मतें त्याने त्यांत मांडलीं आहेत.

येथूनच धर्म हें त्या वेळपर्यंतचें समाजरचनेचें प्रभावी तत्त्व अस्त पावलें आणि राष्ट्र हें तत्त्व उदयास आलें. या तत्त्वान्वयें राष्ट्ररचना युरोपांत झाली ती या तीनशे वर्षांतल्या पंडितांच्या निबंधांमुळेच झाली हें सर्व[illegible]न्य आहे.

तेराव्या शतकाच्या अखेरीस पश्चिम-युरोपांत ही जी निबंधलेखनाची परंपरा सुरू झाली ती आजतागायत वर्धिष्णु तेजाने अव्याहतपणें टिकून आहे. युरोपचें हें वैभव अगदी अपूर्व असें आहे. मार्सिलिओ व विल्यम

यांचेच समकालीन महाकवि डांटे व फ्रेंच पंडित पियरी डुबॉइस हे होत. 'डी मॉनर्किया' हा आपला ग्रंथ डांटे याने १३११ सालीं लिहिला. इटली देश त्या वेळीं अंतःकलहांनी छिन्नभिन्न होऊन गेला होता. एका प्रबळ राजाच्या सत्तेखाली त्याचें ऐक्य व्हावें ही डांटेची उत्कट इच्छा होती. डांटे जितका अनियंत्रित राजसत्तेचा अभिमानी होता तितकाच पोपच्या सत्तेचा द्वेष्टा होता. सरकार निधर्मी असलें पाहिजे असें त्याचें मत होतें. इटालियन लोक जगांत अत्यंत श्रेष्ठ असून युरोपभर त्यांचेंच साम्राज्य झालें पाहिजे अशी त्याची मनीषा होती. हे आपले सर्व विचार त्याने आपल्या 'डी मॉनर्किया' या ग्रंथांत मांडले आहेत. डांटे हा इटालियन राष्ट्राचा, तर पियरी डुबॉइस हा फ्रेंच राष्ट्राचा अभिमानी होता. तोहि राजसत्तेचा कट्टा अभिमानी व धर्मसत्तेचा द्वेष्टा होता. 'डी ॲब्रीव्हिएशन' (१३००), 'डी रिकुपरेशन' या आपल्या ग्रंथांत त्याने या विषयांची व राष्ट्रभक्ति, स्त्रीशिक्षण, अशा इतरहि अनेक विषयांची चर्चा केली आहे. ग्रंथकारांची ही परंपरा वायाक्लिफ, निकोलस, मॉकि अव्हेली, जीन बॉडिन, बेकन, डेकार्ट, मिल्टन, हॉब्स, लॉक, डेव्हिड ह्यूम, मॉंटेस्क, रूसो, व्हाल्टेअर, जर्मी बेंथम, ॲडम स्मिथ यांनी पुढे चालविली आणि युरोपचें सर्व जीवन पालटून टाकलें.

या सर्व निबंधकारांचे ग्रंथ पाहतां एक गोष्ट स्पष्ट दिसते की, ते सर्व समाजाच्या ऐहिक उत्कर्षापकर्षांची चिंता वाहात होते आणि एकजात सर्व धर्मसत्तेचे विरोधक होते. धर्मसत्ता ही परमार्थविषयांत श्रेष्ठ, ऐहिकांत तिचा हस्तक्षेप होतां कामा नये आणि धर्मपीठावर असलेल्या पुरुषांनी त्यागी, वैराग्यशील जीवन कंठिलें पाहिजे असें या सर्वांचें प्रतिपादन असे. पोपच्या पीठाला त्यांचा कडवा विरोध होता. यावरून हे सर्व शब्दप्रामाण्याचे विरोधक होते हें स्पष्टच आहे. ही स्वतंत्र वृत्ति आणि तो इहवाद यांतूनच त्यांचें निबंधसाहित्य निर्माण झालें होतें.

त्यांनी ग्रंथ लिहिले ते सर्व राष्ट्रीय प्रपंचांतील विषयांवरच लिहिले. राजसत्ता, लोकसत्ता, शासनसंस्था, समाजशिक्षण, स्त्रियांची प्रतिष्ठा, भिन्न वर्गांची समता, राष्ट्राची अर्थव्यवस्था, आर्थिक समता, त्यासाठी योजावयाचे

उपाय, ज्ञानविज्ञानाची प्रगति, त्यासाठी अवश्य तें व्यक्तिस्वातंत्र्य या सर्व विषयांचें चिंतन या ग्रंथकारांनी केलेलें आहे. त्याच सुमाराला युरोपांत भाषावार प्रदेशरचना होऊं लागली होती. आणि त्यांतून राष्ट्रनिष्ठेचा उदय होत होता. वरील बहुतेक सर्व निबंधकारांच्या लेखनांत या निष्ठेचें विवेचन केलेलें आढळतें. आणि हें अगदी साहजिक आहे. समाज प्रत्यक्ष पाहून, प्रपंचाचा ग्रंथ पाहून जो ऐतिहासिक दृष्टीने चिंतन करूं लागतो त्याला राष्ट्रसंघटनेचें कोणतें ना कोणतें तत्त्व प्रतिपादावेंच लागतें. याच सुमारास महाराष्ट्रांतहि हा विचार एका थोर पुरुषाच्या मनाला स्पर्श करून गेल्याचें दिसतें. म्हणूनच त्याने ' मराठा तेवढा मेळवावा ' हा मंत्र सांगितला. पण डांटे, डुबाइस, वायक्लिफ यांची परंपरा चालविणारे शेकडो ग्रंथकार तिकडे निर्माण झाले. इंग्लंड, फ्रान्स, इटली, जर्मनी या प्रत्येक देशांत झाले; म्हणून तीं तीं राष्ट्रें प्रगत झालीं. महाराष्ट्रांत मात्र रामदासांचा, प्रा. माटे म्हणतात त्याप्रमाणे, पारमार्थिकांनी पराभव केला. निबंध ही काय शक्ति आहे, एक नवें युग, नवें विश्व निर्माण करण्यास ती कशी समर्थ आहे, हें अन्वय-व्यतिरेकाने यावरून ध्यानांत येईल. महाकवि मिल्टन याने आपल्या एका निबंधांत म्हटलें आहे की, " ग्रंथ नष्ट करणारा मनुष्य साक्षात् बुद्धिदेवतेचीच हत्या करीत असतो. आणि बुद्धिदेवता ही परमेश्वराची प्रतिमाच होय. " ग्रंथाची महती या लोकांनी इतकी अचूक जाणली होती. ( युरोपांतील मध्ययुगीन ग्रंथकारांची व त्यांच्या ग्रंथांची माहिती जॉर्ज सबाइन व भंडारी यांच्या पुस्तकांतून घेतली आहे. )

वरीलपैकी अनेक ग्रंथांवर टीका करतांना टीकाकारांनी त्यांच्या लेखन-पद्धतीचेंहि विवेचन केलें आहे. त्यावरून निबंध या वाङ्मयप्रकाराचीं लक्षणेंहि आपल्या ध्यानांत येतात. फ्रेंच कायदेपंडित व तत्त्ववेत्ता जीन बॉडीन हा मोठा इतिहासवेत्ता होता. अलीकडचे तत्त्ववेत्ते मार्क्स, बकल यांच्याप्रमाणेच त्याने एक स्वतंत्र इतिहासमीमांसा मांडली होती. त्याच्या सर्व लेखनांत त्याची ऐतिहासिक दृष्टि व पृथक्करणबुद्धि स्पष्ट दिसून येते. आपल्या काळच्या समाजाचें प्रत्यक्ष अवलोकन आणि इतिहाससंशोधन यावर त्याची मदार असे. याप्रमाणे पुनःपुन्हा टीकाकारांनी या लेखकांची समाजाच्या ऐहिक उत्कर्षाची तळमळ, त्यांची बुद्धिनिष्ठा, त्यांची ऐतिहासिक दृष्टि,

त्यांचें प्रत्यक्ष अवलोकन इत्यादि गुणांचा उल्लेख केला आहे. त्यावरून निबंधलेखनाची मूळ प्रेरणा कोणती आहे तें स्पष्टपणें ध्यानांत येतें. हीच प्रेरणा पुढल्या शतकांतून वाढत गेली आणि युरोपांतील प्रत्येक देशांत मोठमोठे ग्रंथकार निर्माण झाले व त्यांनीच आपल्या समाजाची सुस्थिति राखण्याची चिंता वाहिली. गेल्या शतकांतील स्पेन्सर, मिल्ल, कार्लाइल, इमरसन, ऑगस्ट कोंट, हेगेल, मार्क्स यांच्या ग्रंथांनी केवळ स्वतःच्याच देशांत नव्हे, तर भारतांतहि नवयुग निर्माण करण्यास केवढें साह्य केलें हें सर्वविश्रुतच आहे. आजचे महापंडित बर्ट्रांड रसेल, लास्की, मॅक्डुगल, विल्यम जेम्स, विल डयुरँट यांचा नुसता नामनिर्देश हेंच त्यांचें स्तोत्र आहे. त्यांचे ग्रंथ हें राष्ट्ररचनेस अवश्य असें एक सामर्थ्य आहे हें सांगणें म्हणजे सूर्याला प्रकाश असतो हें सांगण्यासारखेंच आहे.

इंग्रजापूर्वीच्या काळच्या भारतवर्षाच्या कित्येक हजार वर्षांच्या इतिहासांत ग्रंथ झाला नाही, हें विधान अत्यंत धाडसाचें आहे. महाभारत, रामायण हीं आजहि निस्तुल असलेलीं महाकाव्यें ज्या भूमींत झालीं तेथे ग्रंथनिर्मिति झाली नाही या विधानावर विश्वास ठेवणें कोणालाहि फार कठिणच होईल. पण आज जें वाङ्मय उपलब्ध आहे त्यांत तरी वर उल्लेखिलेले जे महापंडित त्यांच्या ग्रंथांच्या जोडीला बसेल असा एकहि ग्रंथ नाही, हें अत्यंत उद्वेगजक व कटु असें सत्य आहे. वर एका ठिकाणीं सांगितल्याप्रमाणे येथे जे अनेक उत्पात झाले त्यांत आपली ही संपत्ति नष्ट झाली असेल असें म्हणून समाधान मानण्याजोगें आहे. पण तें तितकेंसें ग्राह्य वाटत नाही. या पूर्वीच्या काळांत भारतांत इतिहासलेखन झालें नाही ही गोष्ट काय कमी उद्वेगजनक आहे? माझ्या मतें तर निबंधरचनेच्या अभावाचा याच्याशीं घनिष्ठ संबंध आहे. महाभारत-रामायणाचा वर उल्लेख केला आहे. पण त्या दोन महाकाव्यांची पुढील काळांत आपण काय बूज राखली तें सर्वांना माहीतच आहे. त्यांतील कठोर वास्तवतेचा पुढीलांना सर्वस्वी विसर पडला. आणि ज्यांनी ज्यांनी या थोर काव्यांना हात लावला त्यांनी त्यांनी त्यांचें पुराण करून टाकलें. इतिहासाची आस्था नाही, वास्तवतेची अभिरुचि नाही. आणि यांच्या जोडीला शब्दप्रामाण्य, गुरुमुख, वाक्यमूलक तर्कांचा अवलंब करणारें जड पांडित्य, संन्यासधर्मांच्या गायिलेल्या महतीमुळे या देशाला रोगाप्रमाणे

कायमची जडलेली निवृत्ति यांचा विचार केला म्हणजे ग्रंथ कां निर्माण झाले नसतील हें हळूहळू ध्यानांत येऊं लागतें. तरी पण मागल्या इतिहासाबद्दल आपल्याला फारच थोडी माहिती असल्यामुळे त्या काळच्या एवढ्या मोठ्या अभावात्मक घटनेविषयी कांही निश्चित विधान करणें कठिणच आहे. म्हणून वरील धाडसी विधान कोणी खोडून काढील तर मला त्यांत आनंदच होईल.

पण तें कांही असलें तरी आज आपण निबंधसाहित्याचें अतुल सामर्थ्य ध्यानांत घेणें अवश्य आहे. भावी काळाची घडण करण्याची आकांक्षा आपण धरली आहे. आणि त्या दृष्टीने ग्रंथ ही एक मोठी शक्ति आहे हें जगाच्या इतिहासावरून आपणांस दिसत आहे. भारताच्या लोकशाहीच्या प्रगतीसाठी या शक्तीची उपासना करणें तर फारच अवश्य आहे. आर्थिक समता, सामाजिक समता, यांची प्रस्थापना आपणांस करावयाची आहे. राष्ट्रनिष्ठा जनमनांत दृढमूल करावयाची आहे. व्यक्तिस्वातंत्र्याची अभिरुचि निर्माण करावयाची आहे. विवेकनिष्ठा, बुद्धिप्रामाण्य यांचे खोल संस्कार करावयाचे आहेत. व्यक्तिस्वातंत्र्य देऊनहि औद्योगीकरण करण्याचा अभिनव प्रयोग – जगांत आजपर्यंत न झालेला प्रयोग–करावयाचा आहे. हें सर्व कार्य निबंध–प्रबंध–ग्रंथ यावांचून कसें होणार? इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स जर्मनी इत्यादि देशांतील ज्या ग्रंथकारांचा वर उल्लेख केला तसे ग्रंथकार येथे निर्माण झाले, तशी ग्रंथसंपत्ति या देशाला लाभली तरच आपली लोकशाही यशस्वी होण्याचा संभव आहे. ‘ जो ग्रंथ नष्ट करतो तो परमेश्वराची मूर्तिच अशी जणु जी बुद्धि तिचा नाश करतो. ’ असें मिल्टन म्हणाला. हें जर खरें तर, ‘ जो ग्रंथ निर्माण करतो तो परमेश्वराच्या मूर्तीचीच प्रत्येक व्यक्तीच्या चित्तांत स्थापना करतो. ’ असें म्हणणें यथार्थ नाही काय ?

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम.................... दि: ..................
प. स ... ३ क्रमांक .................... नों दि ..............

: २ :

## साहित्यशास्त्रांतील क्रान्ति

आज साहित्यशास्त्रांत क्रांति झाली आहे असें म्हणतात. पूर्वी रस हा काव्याचा, ललितवाङ्मयाचा सर्वश्रेष्ठ गुण मानलेला होता. 'रस आत्मा काव्यस्य', 'वाक्यं रसात्मकं काव्यम्' हा सिद्धान्त सर्वमान्य झाला होता. कोणत्याहि काव्याचें, नाटकाचें आणि अर्वाचीन काळांत कादंबरीचें परीक्षण करतांना त्या ललितकृतींत शृंगारवीरकरुणादि रसांचा परिपोष कसा झाला आहे हें पाहणें महत्त्वाचें मानलें जात असे. पण आता मनु पालटला आहे. गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, इंदिरा संत, मर्ढेकर, विंदा करंदीकर यांच्या कृतींचें परीक्षण रसदृष्टीने कोणी लिहिलें तर त्याची वेड्यांत जमा होईल. सध्याच्या काव्यपरीक्षणांत रसाला अनेक वेळां स्थानच नसतें. आणि रसचर्चेवांचून काव्यपरीक्षणांत कांही उणीव राहील हें पुष्कळांना अमान्य आहे. प्रसाद या गुणाविषयी तेंच आहे. काव्य प्रसन्न असावें, त्याची भाषा अत्यंत सुबोध, पारदर्शक असावी, वाचतां वाचतां सहज अर्थ कळावा आणि अर्थसौंदर्य चटकन् प्रतीत व्हावें हा उत्तम काव्याचा निकष होता. आता आपली दृष्टि बदलली आहे. दुर्बोधता, क्लिष्टता, कदाचित् अर्थशून्यता हेंच काव्याचें व्यवच्छेदक लक्षण आहे असें प्रतिपादन केलें जात आहे; या लक्षणांनी संपन्न असें काव्य टनावारी निर्माण होत आहे. आणि कवींना कोणी हटकलें तर तो टीकाकारच सनातनी, जुन्या युगांतला, बुरसटलेला ठरण्याचा संभव आहे. याचप्रमाणे साहित्याचा विषय, त्याची

रचना, साहित्यिकाचा अनुभव, साहित्य आणि समाज यांचे संबंध यांविषयीच्या मतांत अत्यंत क्रांतिकारक बदल झालेला आहे. अशा कांही मतांचा या लेखांत परामर्श घ्यावयाचा आहे.

प्रथम साहित्यिकाच्या अनुभवाविषयी विचार करूं. उत्कृष्ट साहित्याची निर्मिति व्हावयाची तर लेखकाचा अनुभव व्यापक, गाढ, दीर्घ असा असला पाहिजे. त्याने वर्णिलेलीं सुखदुःखें, हर्षामर्ष, विकार, विचार यांचें खोल ज्ञान त्याला असलें पाहिजे, त्याने चित्रिलेले प्रसंग त्याने पाहिलेले, अनुभवलेले असले पाहिजेत, मानवी मनोव्यापारांचें, मानवाच्या बहुविध क्षेत्रांतील कर्तृत्वाचें, सृष्टीच्या अनेक रूपांचें, तिच्या वैचित्र्याचें लेखकाने सूक्ष्म अवलोकन केलेलें असलें पाहिजे, अशी अपेक्षा मागल्या काळांतहि असे. अशा अनुभवावांचून जिवंत साहित्य निर्माण होणें शक्य नाही, असें साहित्यशास्त्रज्ञांचें निश्चित मत होतें. पण आता ‘ साहित्यिकाचा अनुभव ’ याचा निराळाच अर्थ केला जातो.

समाजांत भिन्न भिन्न वर्ग आहेत. भांडवलदार, जमीनदार, कामकरी, शेतकरी, वरिष्ठ मध्यमवर्ग, कनिष्ठ मध्यमवर्ग अशीं वर्गनामें सध्या रूढ आहेत. आतापर्यंत साहित्यनिर्मिति बहुधा मध्यमवर्गांतले लेखक करीत असत. फार तर भांडवलदार – जमीनदार या श्रीमंत वर्गांतले, पण शेतकरी–कामकरी वर्गांतले, जुन्या काळच्या शूद्र, अस्पृश्य, अंत्यज या वर्गांतले लोक ललितसाहित्य लिहीत नसत. तरी त्यांचीं कांहीशीं चित्रें, त्यांच्या जीवनाचें कांहीसें वर्णन इतर वर्गीय लेखकांच्या साहित्यांत येतच होतें. आता त्या वर्गांतले लोक मधूनमधून साहित्यनिर्मिति करूं लागले आहेत. तेव्हापासून एक नवीन कल्पना उदयाला आली आहे. एका वर्गांतल्या लेखकाला दुसऱ्या वर्गांतल्या लोकांचें जीवन वर्णितांच येणार नाही असें एक मत रूढ होऊं पाहत आहे. कामगारांच्या जीवनाचें वर्णन करावयाचें, त्यावर कादंबरी लिहावयाची, तर लेखक कामगारच पाहिजे. शेतकऱ्याचें सुखदुःख शेतकरीच जाणूं शकेल. इतरांना तें शक्य नाही. त्या वर्गांत जन्मलेला, वाढलेला व तें जीवन प्रत्यक्ष अनुभवणारा मनुष्यच त्या वर्गाच्या संसाराचें चित्र रंगवूं शकेल. इतरांनी रंगविलेलीं चित्रें सत्य असणार नाहीत. प्रत्यक्ष अनुभवाचा सध्या असा महिमा सांगितला जातो. ‘ लंडन मर्क्युरी ’ मासिकाचे संपादक

स्कॉट जेम्स् यांनी तर डिकन्सवरहि, तो वरिष्ठ वर्गाच्या चष्म्यांतून दलितांकड पाहतो, असा आक्षेप घेतला आहे. त्याच मासिकाच्या एका अंकांत विल्यम नत्तल या लेखकाने हेंच मत व्यक्त केलें आहे. वरील मतें उद्धृत करून प्रा. वाळिंबे यांनी 'नत्तलचें मत फारसें चुकलें नाही,' असा आपला अभिप्राय 'साहित्याचा ध्रुवतारा' या पुस्तकांत दिला आहे.

कवि ज्या वर्गांत जन्मतो त्या त्या वर्गाच्या मनोवृत्तीचें प्रतिबिंब त्याच्या काव्यांत उमटतें असा एक विचार दि. के. बेडेकर यांनी 'नवकाव्यांतील विफलता' या आपल्या लेखांत मांडलेला आहे. मर्ढेकर हे आजच्या सुशिक्षित वर्गाचे प्रतिनिधि आहेत असें ते म्हणतात. भांडवलदारी वर्गसंज्ञेची उपसंज्ञा म्हणूनच सुशिक्षित वर्गाची वर्गसंज्ञा जन्मते व तगते असा त्यांचा सिद्धान्त आहे. म्हणजे विल्यम नत्तलसारखेंच त्यांचें मत असावें असें वाटतें. पण त्यांनीच, पन्नास वर्षांपूर्वी केशवसुतांची संज्ञा अशी नव्हती, आणि आजहि सुशिक्षितांत या संज्ञेहून निराळी संज्ञा असलेला एक कवींचा वर्ग आहे, असेंहि म्हटलें आहे. असें असूनहि वर्गसंज्ञा हा शब्द ते वापरतात आणि त्या वर्गाच्या मनोवृत्तीविषयी सामान्य सिद्धान्तहि सांगतात. म्हणून त्या त्या वर्गांत जन्मूनच अनुभव घ्यावा लागतो, इतरांना तो दुर्लभ, असा एक विचारधागा त्यांच्या मनांत असावा असें दिसतें.

वास्तविक इतिहास पाहतां असें दिसतें की मार्क्स, एंगल्स, लेनिन-ट्रॉट्स्की यांनीच कामगारवर्गाचीं सुखदुःखें खरीं जाणलीं आणि त्यांना वाचा फोडली. पुढे प्रत्येक देशांत कामगारवर्गाचे जे पुढारी झाले ते सर्व मार्क्स, एंगल्स, लेनिनप्रमाणेच मध्यमवर्गांतले, सुशिक्षितवर्गांतलेच होते. कामगारवर्गालासुद्धा स्वतःचें जीवन कळलें नाही इतकें त्यांना कळलें, त्याची मीमांसा त्यांनी केली आणि त्यांच्या लढ्याचें नेतृत्वहि केलें. पण मार्क्सच्या वर्गविग्रह, वर्गलढा या मतांचा प्रभाव एवढा आहे की त्यांतून लोक अजूनहि मुक्त होत नाहीत. एवढेंच नव्हे, तर त्यांतले सिद्धान्त साहित्यापर्यंत आणून पोचवितात. टॉलस्टॉय हा स्वतः शेतकरी नव्हता, तरी त्याने शेतकऱ्यांचीं सुखदुःखें उत्तम चित्रित केलीं. लेनिनला त्याच्याविषयी फार आदर होता. पण मार्क्सवादी मतें टॉलस्टॉयने न मांडल्यामुळे लेनिनने त्याच्यावर वर्गसंज्ञेचा शिक्का मारलाच. रशियांतले गेल्या शतकांतलें दलितांचें जीवन

रंगविणारे गॉर्की, डोस्टोव्हस्की इत्यादि जगविख्यात कादंबरीकार शेतकरी-कामकरीवर्गांतले नव्हते. वर सांगितल्याप्रमाणे स्वतः मार्क्स, एंगल्स, लेनिन हेहि त्या वर्गांतले नव्हते. तरी अनुभवाचा आणि वर्गाचा संबंध टीकाकारांना जोडावासा वाटतो हें आश्चर्य आहे.

पण हें मत मान्य केलें तर काय अनर्थ होईल तें पाहा. कामकऱ्यांचें जीवन रंगवावयाचें तर त्यांत भांडवलदार, मध्यमवर्ग यांतील व्यक्ति येतील की नाही? आणि त्या आल्या तर त्यांचीं चित्रें कोणीं रंगवावयाचीं? शेतकऱ्याच्या संसाराच्या चित्रांत जमीनदार, तलाठी, सावकार, वकील, न्यायाधीश यांचीं वर्णनें येणें अवश्य आहे की नाही? अर्वाचीन काळांत स्त्रियांना राजकीय जीवनांत प्रतिनिधित्व पाहिजे आहे याचें कारण असें सांगण्यांत येतें की, स्त्रीचीं दुःखें, तिच्या समस्या, स्त्री जशी जाणील तशा पुरुषवर्गाला जाणतां येणार नाहीत. मग प्रश्न असा की, पुरुषांनी लिहिलेल्या कथा-कादंबऱ्यांत स्त्रियांचें जीवन यथार्थतेने येईल की नाही? आणि तें येत नसल्यास काय उपाय करावयाचा? स्त्रियांनी लिहावें म्हटलें तर पुरुषांचीं वर्णनें त्यांना करतां येणार नाहीत. मध्यंतरीं 'जावें त्याच्या वंशा' या नांवाची एक व्याख्यानमाला नभोवाणीवर झाली होती. त्या मालेंत डॉक्टर, वकील, प्राध्यापक, इत्यादि भिन्न वर्गांतील वक्त्यांचीं भाषणें झालीं. प्रत्येकाचें म्हणणें हेंच होतें की, आमचीं दुःखें इतरांना कळणार नाहीत. 'जावें त्याच्या वंशा तेव्हा कळे.' हेंच खरें. याचा अर्थ असा की, वकील हा डॉक्टर, दुकानदार, इंजिनियर यांचें जीवन रंगवूं शकणार नाही. व्यवहाराच्या सामान्य दृष्टीने पाहतां हें अगदी खरें आहे. एकटा स्त्रीवर्ग घेतला तरी त्याच्यांतहि विधवांचीं दुःखें सधवांना कळणें कठिण, लग्न होत नसलेल्या अर्वाचीन सुशिक्षित मुलीचा होणारा कोंडमारा त्याच घरांतल्या प्रौढ, पोक्त, जुन्या पिढीच्या स्त्रियांना कळणें अशक्य, हें बहुधा सर्वच मान्य करतात. आणि असें जर आहे तर, कथा-कादंबऱ्या ह्या दोनचार जणांनी मिळून लिहिल्या तरच त्या सत्य ठरतील, असें म्हणावें लागेल. अर्थमंत्री, युद्धमंत्री, [illegible]मंत्री, परराष्ट्रमंत्री हे सर्व मिळून ज्याप्रमाणे राज्यकारभार करतात त्याप्रमाणे भांडवलदार, कामगार, मध्यमवर्ग, स्त्रिया, पुरुष अशा सर्वांनी मिळून एक नाटक किंवा कादंबरी लिहिणें अवश्य, अशी आपत्ति येईल. पण हें सर्वसामान्य माणसांच्या दृष्टीने

झालें. कवीच्या अंगीं प्रतिभा, कल्पनाशक्ति, तादाम्य पावण्याचें सामर्थ्य हे गुण असतात याचा या नव्या साहित्यशास्त्राला विसर पडलेला दिसतो. ती शक्ति गृहीत धरली तर वरील आपत्ति येण्याचें कारण नाही. कवि कोणच्याहि वर्गांत जन्मलेला असो, कोठेहि वाढलेला असो; तो आपल्या प्रतिभेने इतरांचीं, इतर जातींचीं, वर्गांचीं, स्त्रियांचीं, पुरुषांचीं, बालकांचीं सुखदुःखें जाणूं शकतो, त्यांच्याशीं तादात्म्य पावून त्यांचें जीवन अनुभवूं शकतो, त्याची सह-अनुभूति त्याला घडते आणि यामुळेच त्याला कोणाचेंहि जीवन चित्रितां येतें, साहित्यांत त्याचें यथार्थ दर्शन घडवितां येतें. त्याला अनुभव अवश्य आहे; पण त्या वर्गांत जन्मल्यानेच तो मिळतो हें म्हणणें सयुक्तिक नाही. शेक्स्पियर, शरच्चंद्र, प्रेमचंद यांनी सर्व थरांतल्या व्यक्तींचे संसार आपल्या ललितकृतींतून वर्णिले आहेत. आणि त्यांनी स्वेतरवर्गीयांचीं काढलेलीं चित्रें मुळीच असत्य नाहीत. त्यांनी अवलोकन केलें होतें, अभ्यास केला होता, जग पाहिलें होतें. आणि जें पाहिलें त्याच्या आधारावर कल्पनाशक्तीच्या साह्याने त्यांनी सर्व विश्व उभें केलें. त्या त्या वर्गांतल्या लेखकांनी स्वतःच्या जीवनाचीं अर्वाचीन काळांत जीं चित्रें काढलीं तीं इतकीं जिवंत मुळीच झालेलीं नाहीत. तेव्हा कवीला अनुभव पाहिजेच; पण अवलोकन, वाचन, अभ्यास, सहवास, दर्शन, मनन, चिंतन या द्वारांनी मिळविलेला अनुभव अवश्य आहे. प्रत्यक्ष त्या जातींत किंवा वर्गांत जन्मून घेतलेला अनुभव, हा अर्थ अत्यंत हास्यास्पद आहे.

प्रसंगांचा, घटनांचा, प्रत्यक्ष अनुभव याचाहि अर्थ फार जपून केला पाहिजे. मर्ढेकरांनी ‘ वाङ्मयीन महात्मता ’ या आपल्या पुस्तकांत याविषयी फार विचित्र मतें मांडलेलीं आहेत. काणेकर, माधव ज्यूलियन, यशवन्त यांच्या त्या त्या कविता निकृष्ट झाल्या असतीलहि; ( मला त्या तशा वाटत नाहीत.) पण अनुभवाच्या अभावाशीं त्या अपयशाची त्यांनी जी सांगड घातली आहे ती मला सयुक्तिक वाटत नाही. मर्ढेकरांच्या मनांत नेमकें काय आहे याविषयी बरेच मतभेद आहेत. पण प्रत्यक्ष अनुभव याचा त्या त्या घटना स्वतः पाहिलेल्या, अनुभवलेल्या असणें असा अर्थ अनेक टीकाकारांनी केलेला आढळतो. पण साहित्यांत तसा अर्थ घेतला तर अनवस्था प्रसंग निर्माण होईल. तशा अर्थाने पाहतां ऐतिहासिक कादंबरी कधीच कोणाला उत्तम लिहितां येणार नाही असें म्हणावें लागेल. हरिभाऊंनी शिवाजीच्या

काळच्या कथा लिहिल्या आणि त्यांतील ‘ उषःकाल ’, ‘ गड आला पण सिंह गेला ’ या कथा अक्षरवाङ्मयांत जमा झाल्या आहेत. पण हरिभाऊंना त्यांनी वर्णिलेल्या घटनांचा, प्रसंगांचा प्रत्यक्ष अनुभव किंवा दर्शन घडणें केव्हाच शक्य नव्हतें. त्या वेळच्या बखरी, थोडीं कागदपत्रें शिवछत्रपतींचें चरित्र इत्यादि साधनसामग्रीच्या आधारेंच त्यांनी थोडक्या माहितीच्या सांगाड्यांत आपल्या कल्पनाशक्तीने जीव भरला आणि उत्कृष्ट कलाकृति निर्माण केली. ज्यांना ही प्रतिभेची देणगी नव्हती त्यांना पुढील काळांत हरिभाऊंच्या दसपट अस्सल कागदपत्रें मिळूनहि अशी कृति निर्माण करतां आली नाही. आता अनुभवाची किंमत मुळीच नाही असें नाही. इंग्रज माणसाला शिवछत्रपतींच्या चरित्रावर अशा कथा लिहितां येतील असें मुळीच नाही. कारण हरिभाऊंना तीनशे वर्षांनंतरहि, महाराष्ट्र, मावळचे मराठे, कोकणांतील हेटकरी, भंडारी, महाराष्ट्रांतले किल्ले, देवळें, मठ, येथल्या भिन्न थरांतील स्त्री-पुरुष, त्यांची भाषा, त्यांची राहणी, त्यांची मनोरचना यांचा जो अनुभव प्रत्यक्ष आला त्याच्या आधारावरच त्यांना भूतकाळांत जातां आलें. त्यावांचून तें शक्य झालें नसतें. म्हणजे अनुभव अत्यंत अवश्य, पण तो या अर्थाने, हें आपण ध्यानांत ठेवलें पाहिजे.

अर्नोल्ड बेनेट याने आपल्या ‘ ओल्ड वाइव्हस् टेल ’ या कादंबरींत फ्रान्समधील गिलोटिन पद्धतीने देहान्तशासन देण्याच्या प्रसंगाचें वर्णन केलें आहे. त्याच्या एका मित्राने त्याचें तें वर्णन योग्य झालें नाही, प्रतीतिकारक वठलें नाही, असा आक्षेप घेऊन स्वतः एक वर्णन लिहून धाडलें. बेनेटला तें फार आवडलें. त्याने मित्राला लिहिलें की, ‘ मीं तो प्रसंग प्रत्यक्ष पाहिलेला नसल्यामुळे मला चांगलें वर्णन करतां आलें नाही. तूं तो पाहिल्यामुळे तुझें वर्णन अर्थातच सरस उतरलें आहे. ’ यावर मित्राने उत्तर धाडलें की, ‘ मींहि गिलोटिनचा प्रसंग स्वतः पाहिलेला नाही. ’ प्रस्तावनेंत वरील सर्व हकीकत सांगून बेनेट म्हणतो, “ हल्ली कादंबरींत एखाद्या प्रसंगाचें वर्णन उत्कृष्ट वठलें की लगेच, हा लेखकाचा प्रत्यक्ष अनुभव असला पाहिजे, हें आत्मचरित्रात्मकच असलें पाहिजे, असें म्हणण्याची चाल आहे. या कल्पनेला माझ्या मित्राचें पत्र हें परस्पर उत्तरच आहे. ” यावरून प्रत्यक्ष अनुभवाचें साहित्यांतलें स्थान आपल्या ध्यानांत येईल. आपण थोडा विचार केला तर

प्रत्येक घटना, प्रत्येक प्रसंग स्वतः पाहिलेला असणें असा अनुभवाचा अर्थ केला तर साहित्य अत्यंत दरिद्री होईल हें आपल्याला सहज कळून येईल.

युद्ध, तुरुंगवास, फाशी, दरोडा, लूटमार, जाळपोळ, खून, हिमालयावरचें आरोहण, सागरतळाचें अवगाहन, राजमहालांतले विलास, मद्यपानाची चांदरात, महापूर, भूकंप, आगगाडी, मोटार, विमान यांचे अपघात, अनेक कंपन्या, कारखाने, सरकारी खातीं यांचे चाललेले गुप्त व्यवहार, यांचा प्रत्यक्ष अनुभव हजारांतील एखाद्या साहित्यिकालाच मिळण्याची शक्यता. पण हें सोडून दिलें तरी विमानप्रवास, सागरप्रवास, काश्मीरची वनश्री, बदरीकेदारचें मंदिर यांचें दर्शन, टिळक, गांधी, नेहरू यांच्या वैयक्तिक जीवनाचा परिचय, हे अनुभव तरी किती जणांना प्राप्त होणें शक्य आहे? एक कॉंग्रेस ही अत्यंत विशाल व प्रसिद्ध अशी संस्था घेतली तरी तिचें मोठें अधिवेशन, कार्यकारिणीची बैठक, पार्लमेंटरी बोर्डाच्या बैठकी, भिन्न प्रांतांतल्या व केंद्राच्या मंत्रिमंडळाच्या बैठकी, गव्हर्नरांनी दिलेले व त्यांना दिलेले खाने हे तरी प्रत्यक्ष अनुभवलेले लोक किती? या सर्वांचा नीट विचार केला तर साहित्यांतील अनुभव या शब्दाची विवक्षा निराळी आहे हें सहज समजून येईल. जें जें कवि पाहतो तें तें इतरांपेक्षा जास्त जाणण्याची शक्ति त्याच्या ठायी असते; तो जें वाचतो तें कल्पनेने स्वतःच्या नजरेपुढे उभें करण्याचें सामर्थ्य त्याच्या मनाला असतें; जेथे आपल्याला प्रत्यक्ष जातां येत नाही तेथे मनाने जाऊन प्रत्यक्षाप्रमाणेच तो अनुभव घेण्याची कला त्याला साध्य झालेली असते; मानवाच्या मनांतले अनंतविध विकारविचार, तो त्यांच्या अल्पशा सहवासाने जाणूं शकतो आणि त्यांचे अर्थहि तो इतरांपेक्षा जास्त तर्कशुद्ध रीतीने लावूं शकतो. या त्याच्या ज्या शक्ति त्यांनाच प्रतिभा म्हणतात. ती वश असली म्हणजे तुमचे, आमचे, सामान्यजनांचे जे अनुभव त्यावरच तो उत्कृष्ट कलामंदिरें उभवूं शकतो. याच्या जोडीला ज्यांचें जीवन त्याला रंगवावयाचें आहे ते कामगार, शेतकरी, आदिवासी, यांच्या सहवासांत कांही दिवस तो प्रत्यक्ष राहिला, भांडवलदार, जमीनदार, डॉक्टर, वकील, इंजिनियर, अधिकारी यांचे व्यवसाय त्याने प्रत्यक्ष जाऊन पाहिले, सभांचीं अधिवेशनें, धार्मिक उत्सव, यात्रा, जत्रा, संमेलनें, संप, सत्याग्रह, मोर्चे या ठिकाणीं तो स्वतः जाऊन आला तर निःसंशय जास्त उपयोग होईल. त्याला सत्याभास जास्त

निर्माण करतां येईल. पण त्यासाठी अडून बसण्याइतकें महत्त्व त्याला नाही. सामान्य, नेहमीचे अनुभव, त्याच्या जोडीला वाचनाने, अभ्यासाने मिळविलेलें ज्ञान आणि त्याच्या जोडीला कल्पनाशक्ति यांच्या जोरावर तो उत्कृष्ट कलाकृति निश्चित निर्माण करूं शकेल. मानव जाणण्याचें सामर्थ्य आणि मानवी जीवनांतल्या घटना जाणण्याचें सामर्थ्य हें कवीचें मुख्य भांडवल आहे. वाल्मीकि किंवा शेक्स्पीयर यांनी जें विश्व निर्माण केलें त्यांतल्या महत्त्वाच्या घटनासुद्धा त्यांनी पाहिलेल्या असणें शक्य नाही. पण त्यांची प्रतिभा अलौकिक होती. तिच्या साह्याने त्यांनी पाहिलेल्या व अनुभवलेल्या जीवनाच्या पलीकडचें न पाहिलेलें व न अनुभवलेलें जीवन स्वतःपुढे मूर्त केलें आणि मग लोकांना त्याचें दर्शन घडविलें. आणि त्यामुळेच तें इतकें सत्य ठरलें की सर्वभक्षक कालहि त्यांतली प्रतीति नष्ट करूं शकत नाही.

### विकृति हाच विषय

लेखकाच्या अनुभवाप्रमाणेच लेखकाने साहित्यासाठी कोणता विषय निवडावा याविषयीहि आज पूर्वीपेक्षा अगदी ध्रुवभिन्न मतें सांगितलीं जातात. मानवाचे शाश्वत मनोधर्म वर्णावे, अखिल विश्वांतल्या मानवाला सर्वसमान असलेल्या भावना, विकार, विचार हा साहित्याचा विषय असावा, काव्यांत एकाच व्यक्तीचें जीवन वर्णिलें असलें तरी अखिल समाजाच्या मनोभावनांचे, सुखदुःखांचे, रागद्वेषाचे, हर्षखेदाचे पडसाद त्यांत ऐकूं यावे, असा पूर्वीच्या साहित्यशास्त्राचा दंडक होता. आता हें सर्व पालटलें आहे. आता अपवादात्मक, विकृत, विचित्र, विक्षिप्त अशाच मनाचें वर्णन करावें, हाच साहित्याचा विषय असावा, अशी साहित्यिकांची बुद्धि झाली आहे. दोन-तीन वर्षांपूर्वी ग्रॅहॅम ह्यू या टीकाकाराचें लंडन बी. बी. सी. वरून ' दि चेंजिंग नॉव्हेल ' या विषयावर भाषण झालें. तो म्हणाला, ' गेल्या शतकांतील कादंबरींत, आम्ही जे भिन्नभिन्न थरांतले सामान्य मानव त्यांच्याच आशा-आकांक्षांचें, आचार-विचारांचें, श्रद्धांचें, निष्ठांचें प्रतिबिंब आम्हांला पहावयास मिळत असे. विक्षिप्त, विकृत, विपरीत यांना तेव्हा वाङ्मयांत स्थान नव्हतें, अशा व्यक्तींच्या कथा सांगाव्या हें त्यामागल्या लेखकांच्या स्वप्नांतहि आलें नसतें. जुनी कादंबरी वाचली की वाचक म्हणत,' होय, संसार असाच आहे. माणसें अशींच असतात. आमच्याभोवती

अशाच व्यक्ति आम्हांला दिसतात. जीवन असेंच असतें.' पण नवी कादंबरी वाचतांना ते म्हणतात, 'हें किती विचित्र आहे, छेः छेः ! आम्हीं हें कधीच पाहिलें - देखिलें नव्हतें.' नवा लेखक अपवादात्मक व्यक्तीच्या मनोवर्णनांत जास्त लक्ष घालतो. विपरीत, विकृत अशा भावनांचें वर्णन करण्यांत त्याला धन्यता वाटते. आजच्या कादंबरींत समाजमनाचें चित्रण नाही. व्यक्तीचें मन, तिच्या एकाकी अ-सामान्य भावना हा तिचा विषय आहे. विल्यम फॉल्कनेर हा अमेरिकन कादंबरीकार आहे. १९४९ सालीं त्याला नोबेल पारितोषिक मिळालें आणि १९५५ सालीं त्याला अमेरिकेंतलें सर्वोत्तम साहित्याला मिळणारें पुलिट्झर पारितोषिक मिळालें. त्याच्याबद्दल टीकाकारांनी म्हटलें आहे की, रोगट, दुबळ्या, सडक्या मनाच्या कथा सांगणें हेंच त्याला प्रिय आहे. अधम, नृशंस, क्रूर, भ्रष्ट अशा जीवनाचेंच तो वर्णन करतो. त्याच्या व सध्याच्या एकंदर अमेरिकन साहित्याविषयी बोलतांना एक अमेरिकन टीकाकार म्हणाला, "या साहित्यांत वर्णिल्याप्रमाणे जर अमेरिकन नागरिक असेल तर अमेरिका म्हणजे नरकच ठरेल. हा मानव अत्यंत ओंगळ, हिडीस व कमालीचा विकृत आहे. आमचे तरुण स्त्री-पुरुष असे असतील तर मोठा अनर्थच आहे."

जेम्स जॉइस, डी. एच्. लॉरेन्स यांनी निर्माण केलेलें हें युग आता आपल्याकडे प्रवर्तित झालें आहे. गंगाधर गाडगीळ हे त्याचे अध्वर्यु आहेत. 'वर्षा', 'उध्वस्त विश्व' या त्यांच्या कथासंग्रहांत एकामगून एक अशाच रोगट, दुबळ्या नि विकृत मनाच्या कथा आहेत. 'लिलीचें फूल' ही त्यांची कादंबरी त्याच चाकोरींतली आहे. गंगाधर गाडगीळ यांच्या 'भेकड', 'पिंजरा' ह्या कथा, अरविंद गोखले यांची 'कथ्थक', शशिकांत पुनर्वसु यांची 'दोन वितीचें विश्व' इत्यादि कथा वाचून पाहिल्या म्हणजे नव्या साहित्याची कल्पना येईल. 'सत्यकथा', 'छंद' या मासिकांतून येणाऱ्या एकंदर कथांची ठेवण अशीच आहे. बहुतेक सर्व लेखक विकृतीचे भोक्ते आहेत. प्रकृतिवर्णन त्यांना प्रिय नाही. अरविंद गोखले यांची एक कथा पहा. एका तरुण स्त्रीला एक तरुण पुरुष एका मवाल्याच्या हातून सोडवितो. त्यानंतर रस्त्यांत त्या पुरुषाची गाठ पडते तेव्हा त्या स्त्रीला तो तरुण आपल्याकडे उपकारकर्त्याच्या दृष्टीने पहात आहे, अशी शंका येते. त्याच्या

नजरेंत अभिलाष आहे, कामुकता आहे अशी त्या स्त्रीची तक्रार नाही. उपकारकर्त्याच्या दृष्टीने तो पहातो, यामुळे ती घाबरते, त्याला टाळते. घाईने दूर जाते व मैत्रिणीच्या घरीं जाऊन आश्रय घेते. आणि मैत्रिणीला म्हणते, ' त्या मवाल्याची मिठी बरी, पण ही नजर नको. ' तरुण स्त्रीचें हें मन सामान्यजनांना अतर्क्य आहे.

या विकृत मानवी मनाच्या वर्णनामागे गाडगीळ, मर्ढेकर यांचें एक तत्त्वज्ञान आहे. मानव हा एक क्षुद्र जंतु आहे असें त्यांचें मत आहे. सर्व महाभारतांत व रामायणांत गाडगिळांना काय दिसलें तें त्यांनी ' चक्र ' या आपल्या कथेंत (?) सांगितलें आहे. जीविताला वैतागून शरयूंत जीव देणारा रामचंद्र, यदुकुलाचा नाश अगतिकपणें पहाणारा योगेश्वर श्रीकृष्ण, दुर्योधनाचा द्वेष, पत्नीशीं संग केल्यामुळे मृत्यु पावणारा पंडुराजा, कर्णाचा सतत होणारा तेजोभंग, शंतनूची कामवासना, आणि अश्वत्थाम्याची सूडबुद्धि! महाभारतांतलीं हीं माणसें आणि लेखकाला वाटेंत एका झाडाखाली दिसलेलें चतकोर कोरड्या जागेंत वळवळणारें कृमिकीटकांचें जग — दोन्ही सारखींच. उत्पत्ति आणि लय यापलीकडे कांही नाही. मर्ढेकरांच्या तत्त्वज्ञानाचाहि हाच गाभा आहे. उगीचता! निर्हेतुक उत्पत्ति आणि लय!

एखाद्याचा दृष्टिकोन असा असला तर त्यांत आक्षेपार्ह कांही नाही. मानवी जीवनाच्या सफलतेबद्दल, विफलतेबद्दल आजवर हजारो लोकांनी हजारो मतें मांडलीं आहेत. तशींच गाडगिळांनी. पण हीं मतें हा वास्तववाद आहे असें त्यांचें म्हणणें आहे. जगाविषयी एखादें मत असणें निराळें आणि तशी वस्तुस्थिति आहे असें म्हणणें निराळें. ध्येयवाद, उदात्तता, त्याग यांत अर्थ नाही असें एखाद्याला वाटलें तर त्याने तसें म्हणावें. पण मानवी मनांत या भावनाच नाहीत असें कोणी म्हटलें तर त्याच्या साहित्याची कीव करावी लागेल. आणि हाच वास्तववाद असें तो म्हणूं लागला तर त्याच्या अजाण बालभावाचें कौतुक करावें लागेल.

पण सध्याचे अनेक लेखक असे आहेत हें खरें. महाभारतांतहि, रामायणांतहि त्यांना भव्य, उदात्त असें कांही दिसत नाही, मग रोजच्या जीवनांत कसें दिसणार! मौज अशी की हेच लेखक आज श्रेष्ठ समजले जातात.

वास्तविक अत्यंत सामान्य, निकृष्ट, दीन, दरिद्री अशा जीवनांतहि उदात्ततेचे सुवर्णकण सापडतात हें माटे, महादेवशास्त्री जोशी यांनी आपल्या कथांमधून दाखविलें आहे. आणि ज्या मध्यमवर्गीयांच्या विफलतेविषयी आज एवढा गाजावाजा झाला आहे त्यांच्या जीवनांतहि, नित्याच्या रोजच्या जीवनांतहि उदात्त भावना पावलोपावली आढळतील. पण त्या भावनांच्या मागेहि कांही हीन वासना असतात असें सिग्मंड फ्राइड एकदा म्हणाला होता. तेव्हा तेथपर्यंत प्रत्येक उदात्त कृतीचा धागा पोचवून देणें हें साहित्यिकांचें अर्थातच कर्तव्य आहे. आमचें वाङ्मय अजूनहि परपुष्ट आहे काय ?–असा प्रश्न कोणा परीक्षकाने एकदा विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना विचारला होता !

ना. सी. फडके यांनी जें कथाविश्व निर्माण केलें त्यांत बहुतेक सुस्वरूप तरुण रमणी, रुबाबदार तरुण पुरुष, चित्रकला, शिल्पकला यांत रमलेले लोक, टेलिफोन, मोटार यांनी सजलेला संसार, अकल्पित योगायोगाने घडलेलें मीलन यांवर भर असे. टीकाकारांनी, अवास्तव, कल्पनारम्य, अद्‌भुतरम्य असें म्हणून त्यांचें वाङ्मय हेटाळण्याची चाल पाडली. आणि आज भेकड, अर्धवट, बावळट पुरुष, कामपिसाट स्त्रिया, ओंगळ, हिडिस प्रसंग, नागव्याने हिंडणाऱ्या वेड्या बाया, तोंडांतून लाळ गळणारे पुरुष, यांचें विश्व लेखक निर्माण करीत आहेत. आणि हेंच जगाचें खरें दर्शन, हाच वास्तववाद म्हणून ते व त्यांचे भक्त जाहीरनामे लावीत आहेत. मूळ साहित्य जसें परपुष्ट तशीच आमची अभिरुचीहि परपुष्ट झाली की काय अशी शंका यामुळे येते. कारण याच लेखकांना, यांचें जीवनदर्शनाचें सामर्थ्य शतगुणित झालें आहे, असें प्रशस्तिपत्र आज टीकाकार देत आहेत.

**रचनाहीन साहित्य**

आणि साहित्याचा विषय पाहून त्यानंतर नवसाहित्यिकांचीं साहित्याच्या रचनेविषयीचीं मतें आणि कृति पाहिली की एकंदर साहित्यजगतावर एक विकृतीची प्रचंड लाट आली आहे असें वाटूं लागतें. मानवी जीवनाला रचना नाही, सुसंबद्धता, सुसंगति नाही, सुसूत्रता नाही; म्हणून त्याचें दर्शन घडविणाऱ्या साहित्यालाहि ती असतां कामा नये, असें एक मत रूढ होऊं पहात आहे. एक अमेरिकन टीकाकार म्हणतो, ‘ जीवनाचें यथार्थ दर्शन हें वाङ्मयाचें अंतिम साध्य आहे. जीवन हें विस्कळित, योजनाहीन, रचनाशून्य,

दिशाशून्य, विसंगत, फुटीर, तुटकें असें आहे. तेव्हा साहित्यहि जितकं जास्त विस्कळित, असंबद्ध, सूत्रहीन, तुटकें, अपुरें व रचनाशून्य असेल तितकें तें जास्त श्रेष्ठ होय. प्रसंगांची निवड, त्यांची गुंफण, कथानकाचा विकास, त्याची पूर्णता यांमध्ये जीवनाच्या रचनाशून्यतेची कल्पना येत नाही. ती वरील प्रकारच्या रचनाहीन, तुटक्या लेखनाने येईल. '

या दृष्टीने साहित्य लिहिलें तर तें कसें होईल हें पहाण्यासाठी एक उदाहरण घेऊं. ' एकच प्याला ' नाटक आहे. सुधाकर दारू पिऊन कोर्टांत गेला व त्याची सनद रद्द झाली. यानंतर त्याचा शेवटपर्यंत अधःपात कसा झाला हें गडकऱ्यांनी दाखविलें आहे. पण तें न दाखवितां दुसरा एखादा लेखक असें दाखवील की, अशा स्थितींत सुधाकर रस्त्याने चालत असतांना गाडीखाली सापडून मेला, आणि नाटक संपलें. तुम्ही म्हणाल, ' अरे हें काय, हें कसलें नाटक ? ही कथा अशी कशी संपली ? ' त्यावर तो म्हणेल की, ' यांत अवास्तव काय आहे ? असें जीवनांत घडत नाही काय ? माणसें गाडीखाली सापडत नाहीत काय ? तसा हा सापडला अन् मेला. मी त्याला काय करणार ? जसें जीवन आहे तसें मीं रंगविलें ! ' याला तुम्ही काय उत्तर देणार ? तुम्हांला हें पटणार नाही. पण हा वास्तववाद आहे ! कारण जीवन तसें आहे ! प्रसंगाविषयी हें झालें. तेंच मानवी मनाविषयी. कारण तेंहि सुसंगत नाही. कसें तरी कोठे तरी तें भरकटतच असतें. ' जादूगार ' या कांदबरींत आनंदराव व इंदुमति यांच्या प्रेमाची कथा आहे. आणि या धाग्याशीं सुसंबद्ध असेच प्रसंग, घटना, विचार-विकार यांचें वर्णन फडक्यांनी केलें आहे. पण नववास्तववादाच्या दृष्टीने हें कृत्रिम आहे. आनंदराव आपल्याला केव्हा भेटतील हा विचार इंदुमतीच्या मनांत चालू असतांना इतरहि हजारो विचार तिच्या मनांत येत असतात. तिच्यासमोर कॅलेंडर आहे. त्यावर सुंदर पातळ नेसलेली स्त्री उभी आहे. इंदूच्या मनांत पातळाचे विचार आले. त्यावरून तें ज्या दुकानांत घेतलें त्याचे विचार, तेथे मैत्रीण भेटली, तिच्याशीं आपण भांडलों हे विचार, भांडण शब्द येतांच रस्त्यावर दोन कजाग बायका शिव्या देऊन भांडत होत्या त्यांची आठवण, मग त्यावरून आपल्या घरच्या मोलकरणीची आठवण, तिचा नवरा तिला मारतो त्याविषयी विचार, मग तो दारू पितो याविषयी विचार, दारूवरून दारूच्या दुकानावरच्या निरोधनाचे विचार,

त्यावरून गांधींच्या कायदेभंगाच्या चळवळींतलीं दृश्यें, त्या दिवशीं आपण व्याख्यानाला गेलों होतों तो प्रसंग, व्याख्याता तरुण व उमदा होता, त्याच्याविषयी आपल्या मनांत काय भावना आल्या ही आठवण व त्यामुळे आलेली अस्वस्थता, असे इंदुमतीचे विचार भरकटत असतात. आणि असेंच कोणच्याहि माणसाचें मन असतें. नवसाहित्यशास्त्राचें म्हणणें असें की, हा संज्ञाप्रवाह दाखविला तरच तें वास्तव चित्र. यामध्ये आणखीसुद्धा एक गोष्ट हवी. आपली विचाराची साखळी मध्येच तुटते. थोडा वेळ कांहीच विचार मनांत येत नाहीत. तें दर्शविण्यासाठी मध्ये अनेक टिंबें, फुल्या हें आलें पाहिजे. कांही इंग्रजी कादंबऱ्यांत कित्येक पृष्ठांत निम्म्याअधिक फुल्याच असतात. मानवी मनाच्या नैकविध, गुंतागुंतीच्या विचारांचें चलत्‌चित्र लेखकाने दाखविलें पाहिजे असा नवीनांचा कटाक्ष आहे. आपलें विचारभ्रमण हें बहुतेक वेळां हेतुशून्य, तुटकें स्खलित असें असतें. तें दाखविणें हा वास्तववाद. इंग्रजी टीकाकारांचा हाच आशय गंगाधर गाडगिळांनी स्वतंत्रपणे मराठींत सांगितला आहे. त्यांच्या मतें, मानवी मन सुसंगत नाही. तें क्षणापुरतेंच जगतें. यामुळेच नव्या लेखकांची भाषा अशा मनांतल्या विचारांची नोंद करणारी म्हणूनच तुटकी, तोकडी, अशुद्ध पण आशयाच्या, अभिव्यक्तीच्या दृष्टीने बरोबर अशी असते.

मानवी जीवन विसंगत, योजनाहीन, रचनाशून्य असें असतें. तेव्हा त्याचें वास्तव दर्शन घडवावयाचें तर साहित्यहि तसेंच तुटकें, रचनाशून्य, भरकटलेलें असलें पाहिजे हा युक्तिवाद फारच अजब आहे. जुन्या साहित्याने जीवनाचें हें वास्तवरूप दाखविलें नाही काय? रामायणांत दुसरें काय आहे? आपण योजतों एक, होतें भलतेंच. सत्य, न्याय आणि मानवाला प्राप्त होणारें सुखदुःख यांचा कांही संबंध नाही, हें या काव्याने दाखविलेलें नाही काय? सीतेसारख्या त्रैलोक्यपावनीला जन्मभर अपमान, क्लेश, वियोग व लोकप्रवाद सहन करावे लागले, रामचंद्रासारख्या राजर्षीला जन्मभर यातनांशिवाय दुसरें कांही मिळालें नाही, आणि रावण, वाली हे अन्याय, अपहार, जुल्म यांचे अवतारच असतांना ते जन्मभर सुखांत राहिले; यावरून जीवन हें योजनाहीन आहे, विसंगत आहे हें कळत नाही काय? मानवाचें आंतलें रूप निराळें, बाहेरचें निराळें, क्षणांत हें रूप तर क्षणांत दुसरेंच, हेंहि या काव्यांत जागोजाग

दिसतें. रामाच्या तत्त्वज्ञानांतली विसंगतीहि आपल्याला स्पष्ट दिसते. प्रजानुरंजन हें त्याचें ध्येय होतें. यासाठी त्याने सीतात्याग केला. पण स्वतः वनांत निघून जातांना त्या ध्येयाचा त्याने विचार केला नाही. तेथे पित्राज्ञापालन हें श्रेष्ठ व्रत ठरलें. पण मानव असाच असतो. श्रेष्ठ-कनिष्ठ निष्ठा त्याला खेळवीत असतात. आणि यामुळे मनांत होणाऱ्या द्वंद्वाचेंच महाकवि दर्शन घडवीत असतो. पण त्यासाठी त्यांना साहित्य दिशाहीन, रचनाशून्य करावें लागत नाही. उत्कृष्ट रचना करूनहि रामायण, महाभारत, हॅम्लेट, ज्यूलियस सीझर, अंकल टॉम्स केबिन, टेस, पण लक्षांत कोण घेतो, यांच्या निर्मात्यांनी जीवनाचें यथार्थ दर्शन--त्यांतील विसंगतीचें, दिशाशून्यतेचें, योजनाहीनतेचें उत्कृष्ट दर्शन—घडविलें आहे. त्यासाठी त्यांना तोकडी, तुटकी, अशुद्ध भाषा कधीच वापरावी लागली नाही. टिंबें नाहीत, फुल्या नाहीत. सर्व पानें भरूनहि जीवन रितें आहे, भकास आहे, शून्य आहे हें त्यांना दाखवितां आलें. किंवा त्यांनी आपल्या वाणीने साहित्याचीं पृष्ठें परिपूरित करून टाकल्यामुळेच हें ते दाखवूं शकले. नव्या पद्धतीने शून्यता, रितेपणा दाखवावयाचा तर पानें कोरींच ठेविलीं पाहिजेत. जीवन शून्य आहे हें दाखविण्यासाठीं कोरीं पानें, अनाकलनीय आहे, गूढ आहे हें दाखविण्यासाठी सर्वत्र काळी शाई, आणि तुटकें आहे हें दाखविण्यासाठी फुल्या व टिंबें, हेंच खरें नवसाहित्याचें स्वरूप, तर्कशुद्ध दृष्टीने, असावयास पाहिजे.

मानवी जीवन सुसंगत नाही, रचनाहीन आहे, हें प्राचीनांनाहि मान्य होतें आणि आपल्या साहित्यांत तें त्यांनी तसें दाखविलेंहि. पण मानवी मन सुसंगत नाही हा विचार त्यांना मुळीच मान्य नव्हता. आजहि तो कोणाला मान्य होईल असें वाटत नाही. वर सांगितल्याप्रमाणे तें भरकटत असतें, तें त्याचें भ्रमण हेतुशून्य, दिशाशून्य असतें यांत वाद नाही. पण त्यामुळे तें सुसंगत नाही, तें क्षणापुरतेंच जगतें, हें कसें सिद्ध होणार? आपल्या सर्व आयुष्याचा आढावा घेतला, तर वयाचीं सत्तरऐशीं वर्षें मी कोण, माझे आप्त कोण, मित्र कोण, माझा व्यवसाय काय, आता काय चाललें आहे, पूर्वी काय घडलें, उद्या काय करावयाचें, ही जाणीव, ही सुसंगति सतत, अखंड मानवी मनांत जागृत असते; त्याच्या जाणीवेचा मुख्य ओघ एकाच पात्रांतून वहात असतो. या जागृतीचा क्षणभर जरी लोप

झाला तरी माणूस वेडा ठरेल. मानवी मन क्षणापुरतेंच जगत असतें तर, पुढच्या क्षणीं मनुष्य आपल्या बायकोला, मुलांना ओळखणार नाही. आपण कोठे चाललों आहों, काय करतों आहों हें त्याला कळणार नाही. तो फार तर नवसाहित्य रचूं शकेल. यापलीकडे कांही नाही. पुष्कळ वेळा माणसाचें वर्तन विसंगत आहे असें आपण म्हणतों. पण त्याचें मन सुसंगत नाही असा याचा अर्थ कधीच होणार नाही. महात्माजींच्या वर्तनांत, उक्तींत, लेखनांत अनेक विसंगति होत्या. पण त्यांचें त्यांच्या दृष्टीने जें समर्थन तें त्यांच्याजवळ होतेंच. म्हणजे त्यांचें मन सुसंगत होतें. आणि थोड्याफार फरकाने प्रत्येक माणसाचें वर्तन असेंच असतें. त्याच्या आचरणांत इतरांना विसंगति वाटेल. पण ती तर्कदृष्टीला दिसणारी विसंगति. ती अनेक साहित्यिकांनी दाखविली आहे. शंकरसामंजींचें वर्तन विसंगत होतें, राघोबाचें वर्तन विसंगत होतें, धृतराष्ट्राचें वर्तन विसंगत होतें, शकाराचें वर्तन विसंगत होतें. पण त्यांचीं मनें—शकाराचेंसुद्धा—सुसंगतच होतीं. तशीं ज्यांचीं नसतात त्यांना वेडे म्हणतात.

पण नवसाहित्यिकांना शुद्धीवर असलेल्या माणसांचींच मनें सुसंगत नसतात असें म्हणावयाचें आहे. मानवी मन अनेक वेळां भरकटत असतें, दिशाशून्य भ्रमण करीत असतें हें सर्वांनाच मान्य आहे. नवीनांचा आग्रह असा की, तीच मानवाची खरी स्थिति मानून तिचें चित्रण केलें पाहिजे. जेम्स् जॉइस या इंग्रज लेखकाने ‘ युलिसिस ’ कादंबरी लिहून हें चित्रण करून दाखविलें. एका माणसाच्या मनाचें चोवीस तासांत जें भ्रमण झालें त्यावर त्याने आठशें पानें लिहिलीं. जें मनांत येईल तें शब्दांत मांडावयाचें असा त्याचा बाणा. त्यावर एका टीकाकाराने त्याला म्हटलें की, असें चित्रण करावयाचें तर आठशे पानेंहि अपुरींच पडणार ! मानवी जीवनांत घडलेल्या प्रसंगांतून कांही प्रसंग निवडून एका हेतूने, एका दिशेने, त्यांची गुंफण करावयाची हें जुनें धोरण एकदा सोडलें की थांबावयाचें कोठे हें कसें सांगणार ? देवलांनी संशयाने घेरलेलीं चार माणसें एकत्र आणून त्या एका सूत्रांत बसणाऱ्या प्रसंगांचींच फक्त गुंफण केली. पण त्या काळांत फाल्गुनराव, कृत्तिका, अश्विनशेट, रेवती यांच्या जीवनांत इतर प्रसंग घडतच होते. इतर विषयांचे विचार त्यांच्या मनांत येतच होते. त्यांनी आपला व्यापार-

व्यवसाय पाहिला असेल, हिशेब केले असतील, ते मुंबईला गेले असतील, तेथील मित्रांत मिसळले असतील, काशी-रामेश्वरला जाण्याचा त्यांनी बेत केला असेल, आणि हें सर्व करीत असतांना अनंत विचार, अनंत कल्पना त्यांच्या मनांत येऊन गेल्या असतील. साहित्यांत या सर्वांचें दर्शन झालें पाहिजे असा नव्या पंथाचा कटाक्ष आहे. जेम्स् जॉइसने एका दिवसाच्या घटनांवर आठशे पानें लिहिलीं तीं याच धोरणाने. लेखकांचा हा एक पंथच आहे, आणि एका इंग्रज टीकाकाराने याला ‘ पुट इन् एव्हरीथिंग स्कूल ’ ऊर्फ ‘ पोतडी पंथ ’ असें नांव दिलें आहे. दुसऱ्याने जॉइसच्या ‘ युलिसिस ’ या कादंबरीला म्युनिसिपालिटीच्या कचऱ्याची पेटी म्हटलें आहे. निवड ही कल्पना एकदा नाहीशी झाली की साहित्याला दुसरें काय नांव देतां येणार आहे ?

अलीकडे वाङ्मयांत आत्माविष्कार या कल्पनेचें जें खूळ माजलें आहे त्यामुळे हे सगळे अनर्थ झाले आहेत असें मला वाटतें. आत्माविष्काराचे किती भ्रामक अर्थ साहित्यिकांच्या मनांत रूढ आहेत त्याचें विवेचन मीं मागे अन्यत्र केलें आहे, म्हणून त्याची पुनरुक्ति येथे करीत नाही. ते भ्रामक अर्थ अनर्थाला कसे कारण झाले एवढेंच येथे सांगतों. वाङ्मयांत आत्माविष्कार असावा असा पक्का ग्रह झाल्यामुळे, आपल्या अनुभवाची दुसऱ्यांना पुन्हा अनुभूति घडविणें हें त्या आविष्काराचें अंतिम कार्य आहे, याचाच लेखकांना विसर पडला. वाचकांना अनुभूति घडवावयाची हें लक्ष्य डोळ्यां-पुढे असतें तर ‘ रचना ’ नको हा विचार क्षणभरहि लेखकांच्या मनांत टिकला नसता; कारण सुसंगत रचनेवांचून आपल्या भावनांची अनुभूति इतरांना घडणें अशक्य आहे. ॲबर क्रौंबी या टीकाकाराने या विचारा-मुळेच ‘ एक्सप्रेशन ’ ( आविष्कार ) हा शब्द टाकून देऊन मुद्दाम ‘ कम्यु-निकेशन ’ ( ‘ सह-अनुभूति ’ ) हा शब्द वापरला. साहित्य ही नवी सृष्टि, नवी निर्मिति आहे, सर्जन आहे तें याच अर्थाने. वाचकांना ती नवी अनुभूति वाटते. आणि नवी सृष्टि ही रचनेवांचून शक्य नाही. शेतांत माती पुष्कळ असते. तींत आंब्याची कोय पडली की ती कोय, तें बीज आपल्या विकासास अवश्य तेवढींच द्रव्यें, तेवढेच रस शोषून घेते; शेजारीं गव्हाचा दाणा पडला तर

तो त्याला अवश्य तेंच निवडून, शोषून घेतो; आणि दोन्ही बीजें त्या मातींतून स्वतंत्र रचना, स्वतंत्र निर्मिति करून दाखवितात. आम्रवृक्षाच्या प्रत्येक फांदींत, डहाळींत, पानांत, फुलांत (मोहोरांत) आणि शेवटी फळांत त्याचें वैशिष्ट्य असतें. त्यावांचून मधुर सुगंध, मधुर स्वाद व मधुर रस हे मिळणारच नाहीत. अवश्य ते रस निवडून, शोषून घेतले म्हणून ही मधुर नवनिर्मिति शक्य झाली. तसें न करतां आजचे साहित्यिक ती मूळचीं मातीच वाचकांच्या अंगावर फेकीत आहेत, आणि 'बिनचेहऱ्याची संध्याकाळ' ही नवनिर्मिति आहे असें सांगून धूळफेक करीत आहेत. सध्याचें वाङ्मय 'बिनचेहऱ्याचें' आहे. कारण मानवनिर्मितीला लागणाऱ्या मातीची रचना लेखक करीत नाहीत. तो कुंभाराचा रद्दाच आमच्यापुढे आणून ठेवतात. आणि हें 'आम्हीं' केलें असें वर सांगतात. आणि हा वास्तववाद अशी प्रौढीहि मिरवितात.

वास्तववादाच्या दृष्टीने पाहिलें तरीसुद्धा ही दिशाभूल आहे. मानवी जीवनांत रचनेला इतकें महत्त्व आहे की, 'रचना' हा मानवी जीवनाला पर्याय-शब्द म्हणून वापरला तरी चालेल. सभोवती आपण कोठेहि नजर टाकली तरी मानवाला उपयुक्त जी जी वस्तु ती ती म्हणजे एक रचनाच आहे, असें ध्यानांत येईल. टेबल, खुर्ची, पुस्तक, वहाणा, धोतर, टोपी यांत मूळ स्वरूपांत कांहीहि नाही; सर्व रचना आहे. कागद ही रचना आहे. लेखणी, शाई, पुस्तक ही रचना आहे. घर, रस्ता, गाडी, वीज, दिवा, या रचना आहेत. धरण, कालवा, विहीर, बाग, शेत—सर्व सर्व रचना आहेत. वस्तूची किंमत म्हणजे तिच्यावर खर्च झालेल्या श्रमांची किंमत, असें मार्क्स म्हणाला, त्याचा अर्थ हाच आहे. मूळच्या रूपांत एकहि वस्तू मानवी जीवनाला उपयुक्त ठरत नाही. तिच्यावर संस्कार करावेच लागतात. आणि संस्कार करावयाचे असें म्हणतांच हेतु, दिशा, योजना, रचना हें सर्व आलेंच. कलेच्या कोणत्याहि प्रांतांत पाहिलें तरी तेथे रचनेला प्राधान्य असल्याचें (अजून तरी) दिसतें. गायनामध्ये अत्यंत कसोशीने केलेली स्वररचना आहे, म्हणूनच गायन हें गायन आहे. कोणाच्याहि घशांतून मूळ स्वरूपांत निघणाऱ्या आवाजाला गायन म्हणत नाहीत. नृत्य, शिल्प यांतहि हेंच आहे. कोणतीहि कला ही हेतु, योजना, दिशा हें निश्चित करून त्या धोरणाने मूलद्रव्याची

दा. क्र. १२२८४

केलेली रचनाच आहे. आणि याच अर्थाने आयर्विन एडविनने ‘आर्ट अँड दि मॅन’ या आपल्या पुस्तकांत मानवी संस्कृति ही एक कला आहे ( रचना आहे ) असें म्हटलें आहे. असंबद्धांतून सुसंबद्ध, अव्यवस्थेंतून व्यवस्था, पसाऱ्यांतून रचना निर्माण करणें याचेंच नांव कला. साहित्य ही सर्वांत श्रेष्ठ कला आहे. पण रचना ही त्यांतून काढून टाकून, साहित्य म्हणजे सामान, साधनसामग्री या मूळ अर्थाने आपल्या मनाचीं भ्रमणें लोकांपुढे ठेवावीं, असा नवसाहित्यिकांचा विचार आहे.

साहित्यिकाचा अनुभव, साहित्याचा विषय आणि रचना यांविषयीच्या भ्रांत कल्पनांमुळे दुर्बोधता हा जो नवसाहित्याचा व्यवच्छेदक गुण तो निर्माण झाला आहे. आविष्काराचा अंतिम हेतु प्रतीति हा आहे हें जर लेखकांच्या ध्यानांत असतें तर हा अनर्थ झाला नसता. पण तो झाला आहे आणि त्यांत नवकवि भूषण मानतात असेंहि दिसतें. ‘तुझें लेखन दुर्बोध आहे’ अशी एका मित्राने जेम्स् जॉइसवर टीका केली, तेव्हा तो म्हणाला, ‘तें समजून घेण्यासाठी वाचकांनी सारा जन्म घालवावा अशी माझी अपेक्षा आहे.’ हा उद्धटपणा अत्यंत घृणास्पद आहे. पण तोच आपल्या लेखकांना भूषणास्पद वाटतो. ‘आम्ही कांही तरी अलौकिक, विलक्षण, असें सांगत आहों, तुम्हांलाच तें कळण्याची पात्रता नाही’ अशी नवकवींची भूमिका आहे. प्रा. रा. श्री. जोग, कविवर्य बोरकर, राजकवि यशवन्त यांनाहि, आजच्या काव्याचें आकलन होत नाही, अशी तक्रार करावी लागत आहे. सर्व जन्म साहित्यांत घालविणाऱ्या या रसिकवरांना आकलन होणार नाही असें कांही आजच्या साहित्यिकांना सांगावयाचें आहे. मौज अशी की, आजच्या पंडितांजवळ, तत्त्ववेत्त्यांजवळ, शास्त्रज्ञांच्याजवळ इतकें गहन असें कांही नाही. त्यांना जें सांगावयाचें आहे तें सगळ्यांना समजण्याजोगें आहे. आणि ज्यांना शुद्ध कसें बोलावें आणि शुद्ध कसें लिहावें हेंसुद्धा समजत नाही त्यांना मात्र आपल्याजवळ असें कांही आहे असें वाटावें, हें मनोविकृतीचें किती किळसवाणें प्रदर्शन आहे.

या दुर्बोधतेचा अपरिहार्य परिणाम म्हणजे नवसाहित्याची नीरसता, शुष्कता, त्याचा रटाळपणा हा होय. लॉर्ड सेसिल डेव्हिड याने आपल्या ‘व्हिक्टोरियन नॉव्हेलिस्टस्’ या पुस्तकांत जुन्या व नव्या कादंबरीकारांची

तुलना केली आहे. तो म्हणतो, ' अर्वाचीन कादंबरी वाचणें म्हणजे डोक्यावर गोणी वाटते. पूर्वी आपण कादंबरी वाचीत असलों आणि मध्येच दुसर काम निघालें तर भराभर पुढचीं पानें उलटून चालू प्रसंगाचें, त्यांतील व्यक्तींचें पुढे काय झालें, हें पहात असूं. इतकी उत्कंठा तेव्हा वाटे. सध्याच्या कादंबरीचीं पानें उलटून पहावीं असें कोणाच्या स्वप्नांतहि येणार नाही. औत्सुक्य, उत्कंठा हें सर्व आता बादच झालें आहे. ' कादंबरी कर्तव्यबुद्धीने वाचावयाची. ह्यू वालपोल हा कादंबरीकार व टीकाकारहि आहे. त्यानेंहि नव्या-जुन्या कादंबरींची तुलना केली आहे. तो म्हणतो, 'पूर्वी कादंबरी म्हणजे रस्त्याच्या कडेला, रानांत कुठेहि फुलणारें एक रम्य फूल होतें. ज्याला हवें त्याने खुडावें आणि त्याचा मनमुराद सुगंध लुटावा. आता कादंबरी म्हणजे केंब्रिजला कांचेच्या घरांत वाढविलेलें एक रोप आहे. कांही वरिष्ठ लोकांनाच तेथे प्रवेश; इतरांना नाही.' आपल्याकडचे टीकाकार प्रा. वा. ल. कुलकर्णी हे नव्या वाङ्मयाचे चहाते आहेत. तरी त्यांना वाङ्मयाला हें शुष्क रूप आलें आहे हें मान्य आहे. सध्याच्या वाङ्मयाला कथानक नाही, त्याचें स्वरूप वृत्तपत्रांतील रिपोर्टांसारखें आहे, असें त्यांनी म्हटलें आहे. तरी त्याचें जीवनदर्शनाचें सामर्थ्य शतगुणित झालें आहे असें त्यांचें मत आहेच. ' नवकथा ही व्यक्तिचित्रें, संवाद, प्रसंग, विकास, कलाटणी या विटाळ्यांतून मुक्त झाली ' या विचाराने कांही टीकाकार संतुष्ट झाले आहेत. म्हणजे दुर्बोधतेंत जसें नवसंप्रदायाचे लोक भूषण मानतात तसेंच ते रटाळपणांतहि मानतात असें दिसतें. कारण कथानक, प्रसंग, व्यक्तिचित्रें, भावना, विकास हें गेल्यावर खाली शिल्लक काय रहाणार ? कथा-काव्यांतून हे घटक गेले, आणि त्या जागीं आलें काय ?–तर या नवसाहित्यिकांच्या कांही क्षणिक, तुटक्या अनुभूतीचा आविष्कार. मध्यंतरीं आचार्य अत्रे यांनी दोन नव्या कवींचीं काव्यें आपल्या पत्रांत पुन्हा छापून त्यांचा अर्थ लावून दाखविणारांस बक्षीस जाहीर केलें होतें. कांही लोकांनी त्यांचे अर्थ लावून दाखविले; पण त्यांचा आणि मूळ काव्याचा संबंध अनेकांच्या ध्यानांत आला नाही. काव्य वाचतांवाचतांच अर्थप्रतीति होऊन मनाला आनंद व्हावा, ही अपेक्षा आता यापुढे वेडेपणाची, सनातनीपणाची ठरेल. खरोखर, दुर्बोधता हेंच आमचें भूषण, असें मानणारा कवि भूतलावर कधी जन्माला

येईल असें कधी कोणाला वाटलें नसेल ! वाणी प्रथम निर्माण झाली तेव्हा माणसांच्या जातीला मोठा आनंद झाला असेल; आता एकमेकांचें मनोगत एकमेकांना स्पष्ट सांगतां येईल असें वाटून त्या आदिमानवांना हर्ष झाला असेल. अर्थवहन हेंच वाणीचें खरें सौभाग्य, हें त्या काळापासून आजपर्यंत सर्वांना मान्य झालें होतें. पण आज वाणीचें हें मूळचें वैभवच कवींच्या मुखांतून लुप्त होत आहे. आणि दुर्दैव हें की, कवींना त्यांत अभिमान वाटत आहे.

वाङ्मयांतील नव्या संकेतांचें आणि प्रवृत्तींचें वर जें विवेचन केलें तें कोणाला पटेल, कोणाला पटणार नाही. पण या प्रवृत्तीमुळे वाङ्मय सामान्य वाचकांच्या कक्षेबाहेर जाऊन समाजाचें अपरिमित नुकसान झालें आहे याविषयी दुमत होईल असें वाटत नाही. रामायण-महाभारतादि कथांनी कोट्यवधि लोकांना आज हजारों वर्षें अमाप आनंद दिला आहे. शृंगार-वीरकरुणादि रसांनी दुथडी भरून वाहणाऱ्या साहित्यामुळे, कादंबरीनाटक-काव्यामुळे लक्षावधि लोकांना संसाराचा ताप क्षणभर तरी विसरण्याची सोय आजवर झालेली होती. आता नवी कथा घटना-प्रसंग-व्यक्तिचित्राच्या विटाळ्यांतून व नवकाव्य अर्थाच्या भारांतून मुक्त झाल्यामुळे लोकांचा हा आनंद नष्ट होणार आहे. थकूनभागून आल्यावर साक्षर माणसाला तरी कथा हा विरंगुळा असे. पूर्वीच्या निरक्षरतेच्या काळांतहि श्रीधराचीं काव्यें खेड्यांत कोणी तरी वाचीत असे व तीं ऐकून शेतकऱ्याचा शीणभार हरत असे. आता शहरांतल्या बोरकर-यशवन्तांच्यासारख्या रसिकांनाहि काव्यवाचन हा शीण वाटेल. कादंबरी अजून या उच्च पातळीला आलेली नाही; पण लवकरच येईल. आणि मग कादंबरी वाचतांना आलेला शीण घालविण्यासाठी दुसरा कांही विरंगुळा शोधून काढावा लागेल. समाजाची ही अपरिमित हानि आहे. ज्ञानेश्वरांनी म्हटल्याप्रमाणे महाभारतांत – ‘ चातुर्य शहाणें झालें, प्रमेय रुचीस आलें आणि सौभाग्य पोखलें सुखाचें येथ. ’ मोठमोठीं गहन प्रमेयें मधुर करून महाभारताने जगाला सांगितलीं, आणि कथेच्या आकर्षणामुळे लोकांनी तीं श्रवण केलीं. त्यांच्यासांगातीं काव्याचें सौभाग्य, सौंदर्य हेंहि त्यांना अनुभवण्यास मिळालें; आता या आनंदाला बहुजन मुकणार आहेत. कारण कथानक, प्रसंग, व्यक्तिचित्रें, भावना यांच्या व अर्थसौंदर्याच्या जाचांतून ललितवाङ्मय मुक्त होणार आहे.

भर्तृहरि म्हणाला होता, ' यदि अस्ति सुकविता राज्येन किम् ! ' काव्यानंद मिळत असेल तर राजविलासहि तुच्छ होत. पण काव्याचा अर्थच कळला नाही, काव्यांत नवसृष्टि दिसली नाही, त्यांत सहानुभूति घडली नाही, तर या मोठ्या आनंदाला रसिक लोक मुकतील. सामान्यजनांचा शीणभार काव्याने हरतो. भर्तृहरीसारख्या श्रेष्ठ रसिकांना राजविलासहि तुच्छ वाटावे असा आनंद त्यापासून मिळतो. तो यापुढे नष्ट होईल. जड शारीर सुखाची प्राप्ति केव्हाहि मर्यादितच असणार. कितीहि प्रगति झाली तरी राजविलास सर्वांनाच प्राप्त होणार नाहीत. अशा स्थितींत समाजांतल्या कर्तृत्वशाली लोकांची सुखतृष्णा, राजविलासतृष्णा काव्यानंदामुळे पुष्कळशी कमी होत असते. काव्यसुख भौतिक सुखापेक्षा कित्येकांना श्रेष्ठ वाटतें. आणि हेच लोक कर्तबगार, पराक्रमी व समर्थ असतात. त्यांच्या तृष्णांची तृप्ति काव्याकडून झाली नाही तर त्यांच्या सामर्थ्याचा सर्व ओघ राजविलासांच्या प्राप्तीकडे वळेल. गेल्या महायुद्धाच्या ऐन धुमश्चक्रींत कॅसाब्लांकाला दोस्त राष्ट्रांची परिषद् भरली होती. तिचें काम उरकल्यावर चर्चिलने दोन दिवस सुटी घेतली आणि जगाच्या भवितव्याची जबाबदारी शिरावर असतांना दोन दिवस चर्चिल चित्रें काढीत बसला होता. कॅसाब्लांकाला जातांनाच रंग, कुंचले इत्यादि साहित्य तो घेऊन गेला होता. या कलानंदामुळे दोन दिवसांत त्याच्या श्रांत मनाला नवता आली आणि लंडनला आल्यावर दुप्पट जोमाने तो कामाला लागला. चर्चिलसारख्या महासमर्थ मनाच्या सुखतृष्णा कला तृप्त करूं शकते हाच कलेचा जगावर मोठा उपकार आहे. कला, साहित्य यांनी समर्थ मनाच्या तृष्णांची अशी तृप्ति केली नाही तर हे पुरुष जगाजवळ जड सुख-साधनांचा जो परिमित साठा आहे, त्यावर धाड घातल्याविना राहणार नाहीत. कित्येक समर्थ मनांना राजविलास तुच्छ लेखायला लावण्याचें काव्याचें जें सामर्थ्य आहे त्यामुळे समाजाच्या स्थैर्यांत व म्हणूनच सुखांत भर पडत असते. पण नवकाव्य ही महनीय कामगिरी करण्याचें नाकारीत आहे.

या सर्व अनर्थांच्या बुडाशीं, काव्य व एकंदर ललितवाङ्मय यांविषयी समाजांत प्रसृत झालेल्या भ्रांत कल्पना, हें कारण आहे. कवीला अनुभव पाहिजे तो प्रत्येक प्रसंगाचा प्रत्यक्ष अनुभव पाहिजे असें मनांत ठसल्यामुळे

कविमन दरिद्री राहतें. कारण प्रत्यक्ष अनुभव फारच मर्यादित असणार. तोच काव्यांत प्रकट करावयाचा असें बंधन आलें, की काव्य दरिद्री होणारच. काव्याचा विषय निवडतांना विकृत, अपवादात्मक असें कांही कवीने निवडलें तर त्याची प्रतीति वाचकांना न आल्यामुळे त्यांना त्यापासून आनंद होणार नाही. आणि मनाचीं भ्रमणें जशींच्या तशीं रचना न करतां कागदावर मांडण्याच्या अट्टाहासामुळे काव्यांतून नवसृष्टि निर्माण होणार नाही व ती नाही म्हणजे काव्य नीरस, शुष्क, वृत्तपत्रीय अहवालासारखें होऊन बसणार. असलें साहित्य कांही मूठभर लोक हौशीने वाचतीलहि. पण बहुजनांचा शीणभार हरण्याची, वा समर्थ मनाला शारीरभोग तुच्छ वाटायला लावण्याची शक्ति त्याच्या ठायीं कालत्रयीं येणार नाही.

साहित्यशास्त्रांत सध्या जी क्रांति होत आहे तिचीं फळें हीं अशीं आहेत. आपण आशा करूं या की, हीं फळें स्पष्ट दिसूं लागतांच तरुण कवींच्या मनाला तिच्याविषयी वाटणारा मोह नष्ट होईल आणि ते अर्थनिर्भर, सौंदर्य-संपन्न व रसपरिपूरित काव्यें निर्माण करतील.

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ३४३८६. वि: निबंध
क्रमांक १४३२. नों दि १३-३-६३.

## : ३ :

# कवीचें काव्यांतील दर्शन

कालिदासाबद्दल एक दंतकथा प्रसिद्ध आहे. त्याच्या काळींहि एक नवकवि होता. त्याने एक काव्य रचलें : 'पक्कानि जंबूफलानि, विमले जले पतन्ति, मत्स्यैः तानि न भक्ष्यन्ते'। हें तें काव्य होय. 'पिकलेलीं जांभळें नदीच्या स्वच्छ पाण्यांत पडत आहेत, आणि मासे तीं जांभळें खात नाहीत.' एवढीच क्षणिका कवीने रचली, आणि आपण केलेल्या प्रामाणिक अभिव्यक्तीवर तो संतुष्ट झाला. पण त्याच्या मित्राला तें काव्यच वाटेना. तो म्हणाला, "अरे, यांत काय आहे? हें कसलें काव्य?" "ही अनुभूति आहे. प्रत्यक्ष अनुभव आहे. त्याचें मीं यथार्थ चित्रण केलें आहे." असें कवि सांगूं लागला. पण मित्राला तें पटेना. तेव्हा याविषयी कालिदासाचा अभिप्राय घ्यावा असें त्या दोघांनी ठरविलें. कालिदासाच्या मतेंहि ती क्षणिका म्हणजे काव्य नव्हतें. पण कविमित्राला जें करतां आलें नाही तें त्याने चटकन् केलें. कवीची तीच अनुभूति त्याने घेतली व तींत एका विचाराची भर घातली. रचनाहि थोडी बदलली. मग पुढीलप्रमाणे काव्य तयार झालें :

जंबूफलानि पक्कानि, पतन्ति विमले जले।
मत्स्यैः तानि न भक्ष्यन्ते, जालगोलकशंकया॥

कालिदासाने भर घातली ती शेवटच्या चरणाची. मासे तीं जांभळें खात

नव्हते. कारण ते जाळ्याला लाविलेले ( आमिषांचे, मांसाचे ) गोळे आहेत अशी शंका त्यांना वाटत होती. निसर्गदृश्य तेंच. पण तेवढ्या वर्णनाने काव्य होत नाही. त्यांत कोठे तरी स्वतः कवि यावा लागतो. त्याचें अस्तित्व प्रतीत व्हावें लागतें. येथे निसर्गातील घटनेचें कारण सांगून कवि काव्यांत आला. कारणमीमांसा निसर्गात नसते. ती मनुष्य करतो. आणि मग त्या निसर्गघटनेला अर्थ निर्माण होतो. अर्थ निर्माण झाला की काव्य सिद्ध होतें. काव्यांत कवि येणें याचा हा अर्थ आहे.

वर एक दंतकथा सांगितली. आता कालिदासाचा एक खरा श्लोक घेऊं. —

सरसिजमनुविद्धं शैवलेनापि रम्यम् ।
मलिनमपि हिमांशोर्लक्ष्म लक्ष्मीं तनोति ॥
इयमधिकमनोज्ञा, वल्कलेनापि तन्वी ।
किमिवहि मधुराणां मंडनं नाकृतीनाम् ॥

या श्लोकांत पहिल्या तीन चरणांत तीन निरनिराळीं विधानें आहेत. चौथा चरण रचून कवीने तीं एकसूत्रांत गुंफलीं आहेत. कमळ शेवाळ्यांत असलें तरी रम्य दिसतें. चंद्रावर काळा डाग असला तरी त्याने त्याची शोभा वाढतेच. ही रमणी वल्कलांनीसुद्धा अधिक सुंदर दिसते. या तीन घटना परस्परांशीं असंबद्ध आहेत. ‘ जातीच्या सुंदरांना काय शोभणार नाही ? ’ या शेवटच्या चरणाने त्यांना एकजीव करून टाकलें आह. हें काम कवीचें आहे. शेवटच्या विधानावांचून त्या तीन विस्कळित, असंबद्ध विधानांतून अर्थ निर्माण होणार नाही. त्या अनुभूति आहेत. पण त्या तुटक्या आहेत; म्हणून अर्थशून्य आहेत. काव्यांत अशा अनुभूतींना स्थान नाही. तेथे सार्थ अनुभूतींनाच प्रवेश मिळतो. तो अर्थ चौथ्या विधानाने निर्माण झाला. तो कवीने केला आहे. कवि काव्यांत स्वतः प्रविष्ट झाल्या-वांचून काव्य निर्माण होत नाही म्हणतात त्याचा हा अर्थ आहे.

पुण्याजवळची मुठा नदी पावसाळ्यांत भरली, तिला पूर आला की तिचें पाणी ओंकारेश्वराच्या देवळांत शिरतें. हें दृश्य गडकऱ्यांनी पाहिलें आणि ते म्हणाले, ‘ शिवमंदिरिं भगिनी गिरिजा, तिस भेटे सागरभाजा । ’ नदी पर्वताची कन्या. पार्वती, गिरिजा त्याचीच कन्या. म्हणून त्या बहिणी

झाल्या. नदी माहेराहून सासरीं निघाली. तिला माहेरच्या वियोगाचें दुःख होत होतें; पण इतक्यांत बहिणीचें घर दिसलें. म्हणून ती आंत शिरली. आणि मग—'या परी सिंधुमंदिरीं, जात सुंदरी, पूर्ण जलसारिता, शिव-गिरिजादर्शनमुदिता ॥' बहीण व भाऊजी भेटले म्हणून आनंद होऊन नदी सुखाने सासरीं सागराकडे गेली.

यांत मूळ निसर्गघटना नित्याचीच आहे. पाऊसकाळीं पर्वतावरून नदी वाहूं लागते. वाटेंत भरतभरत, वाढतवाढत शेवटीं ती सागराला जाऊन मिळते. एवढेंच नुसतें सांगणें हें काव्य नव्हे. कारण त्यांत कवि कोठेच नाही. पण या घटनेवर, कन्या सासरीं जात आहे, तिला पितृवियोगाचें दुःख होत आहे, म्हणून ती आक्रोश करीत आहे, आणि वाटेंत बहीण, माहेरचें माणूस भेटल्यामुळे आनंदित होऊन मग सुखाने सासरीं जात आहे,—अशा कल्पनांचा आरोप कवीने केला. त्यामुळे त्या मूळ घटनेला निराळाच अर्थ प्राप्त होऊन तिला काव्यांत प्रवेश मिळाला. तो अर्थ निर्माण करणें हें कवीचें कार्य. त्याच्या कृतीला नवनिर्मिति म्हणतात तें यासाठी. पाऊस पडणें, नदी वाहणें, ती समुद्राला मिळणें, ही निर्मिति निसर्गाची आहे. कवीने केवळ तिला शब्दरूप दिलें तरी तेवढ्यामुळे ती नवनिर्मिति होणार नाही. कवीने त्या घटनेचा स्वतःच्या मनाशीं कांही अर्थ बसवून तो व्यक्त केला, की ती नवनिर्मिति होते. तो अर्थ अनेक प्रकारचा असूं शकेल. घटनेची ती कारणमीमांसा असल, अनेक घटनांतून निघणारा तो सिद्धान्त असेल, किंवा कवीने आपली कल्पना त्या घटनांवर आरोपित करून त्यांत मानवी भाव आणले असतील. आणखीहि अनेक प्रकार पुढे आपल्याला पाहावयाचे आहेत. पण नवनिर्मितीची प्रक्रिया काय असते तें एवढ्यावरून ध्यानांत येईल. कवीच्या कल्पनेंत, मानसांत प्रथम काव्यकल्पना उद्भवते. आणि मग ती आपल्यासाठी देह शोधूं लागते, किंवा तयार करते. तांदूळ, गहू यांचें बीं, आंब्याची कोय, गुलाबाचा डोळा हीं सर्व बीजें जमिनींत पडतांच आपल्या विकासाला पोषक अशींच जीवनद्रव्यें मातींतून आपल्याकडे खेचून घेतात. द्रव्यें कोणतीं खेचून घ्यावयाचीं तें बीजाच्या जातीमुळे निश्चित होत असतें. गुलाबबीज हें फक्त त्याला अनुरूप, त्याला उपयुक्त अशींच द्रव्यें घेणार, अन्य नाही. तीं द्रव्यें म्हणजे मूळ मातीच

असते. पण गुलाबबीज त्यांचें रंगरूप, त्यांचा आकार, त्यांचा गंध, त्यांची रुचि,—सर्व पालटून टाकतें आणि प्रत्येक पानापानांत, फांदींत, पाकळींत कांस्यांतहि गुलाबपणा, भरून टाकतें. आंबा, फणस हेंच करतात. गहू, बाजरी यांचीं बीजें यांची प्रक्रिया हीच असते. काय निर्मावयाचें, कशासाठी, त्याचें रूप काय, हें सर्व बीजांतच ठरलेलें असतें. तें बीज आपल्या इच्छे-प्रमाणे सृष्टीला आकार देतें तेव्हाच नवनिर्मिति होते. प्रथम गुलाब, आंबा हा नवनिर्मितीचा अंतिम हेतु किंवा संकल्प निश्चित होतो. मग त्यासाठी जीवनद्रव्यांची निवड होते. मग त्याची एक विशिष्ट रचना केली जाते. हें झालें की नवनिर्मिति झाली. या नवनिर्मितींत, तिच्या प्रत्येक घटकांत-मूळें, खोड, फांद्या, पानें, फुलें, फळें,—या प्रत्येकांत मूळ बीजाचें वैशिष्ट्य प्रतीत झालेंच पाहिजे. फणसाचें खोड, पान, फूल, फळ हें आंब्याच्या खोडाहून, पानाफुलाफळांहून अणुअणूंत, रेषेरेषेंत भिन्न असतें. पण सर्व निर्मिति ज्या मातींतून झाली ती माती मात्र एकच असते.

श्रीज्ञानेश्वरांनी एक निराळा दृष्टान्त देऊन नवनिर्मितीची हीच प्रक्रिया स्पष्ट केली आहे :

“ एरव्ही तरी भूमीआंतूनि स्वयंभ, काय घडेयागाडगेयाचे निघती कोंभ, परी ते कुलालमतीचे गर्भ, उमटले की। ज्ञाने. ९-७४। मातीचा घडा किंवा गाडगें, किंवा रांजण हा प्रथम कुंभाराच्या मतीच्या गर्भात निर्माण होतो. मग माती हातांत घेऊन तो तिला मनांतल्या त्या संकल्पाप्रमाणे आकार देतो. रांजण मनांत येतांच त्याचा हेतु, त्याचा आकार, त्याला अवश्य ती माती आधीच ठरते. मग कुंभाराच्या हाताने तो प्रत्यक्षांत अवतरतो. ललित कृति अशीच निर्माण होते. बीजाभोवती, किंवा कुंभाराच्या दृष्टीपुढे सर्वत्र माती पसरलेली असते. त्याचप्रमाणे कवीच्या मनाभोवती सर्वत्र जीवन पसरलेलें असतें. मग कवीच्या मनांत जो संकल्प, जी कल्पना उठेल, तिचें बीज या जीवनांत पडलें की त्यांतून तें आपल्याला हव्या त्या घटना खेचून घेतें आणि त्यांना एकसूत्रांत गुंफून स्वतंत्र आकार देऊन, त्यांचा रंग, रूप, गंध, नाद सर्व बदलून त्यांतून एक स्वतंत्र नवा वृक्ष, नवा घडा, नवी सृष्टि निर्माण करतें. नवनिर्मिति ती हीच. ही नवी कां? आंब्याच्या पानाफुलाफळांत ज्याप्रमाणे रेषेरेषेंत, कणाकणांत आम्रत्व प्रतीत

होत असतें, त्याप्रमाणे या निर्मितींत प्रत्येक व्यक्ति, घटना, प्रसंग, भाषा, शब्द यांत कवि प्रतीत होत असतो. म्हणजे त्यांत कवीचें प्रत्यक्ष रूप दिसत असतें असें मुळीच नाही. गुलाबाचें बीज सर्व गुलाबवृक्षांत कोठेहि प्रत्यक्ष दिसत नाही. तरी त्याचें अस्तित्व प्रत्येक घटकांत जाणवत असतें. बीज सर्वत्र स्वतःच्या रूपांत आविष्कृत होऊं लागलें तर अनर्थच होईल. त्यांचप्रमाणे कवि स्वतःच्या रूपांत सर्वत्र दिसूं लागला तर त्याच्या कृतीला नवनिर्मिति म्हणतां येणार नाही. प्रत्येक घटनेचा जो अंतिम अर्थ त्या रूपानेच फक्त कवि प्रगट होत असतो. कवि काव्यांत येतो तो अशा रूपाने, या अर्थाने. तसें त्याने केलें की त्याची कृति नवनिर्मिति ठरते.

कवीच्या व्यक्तित्वाची त्याच्या काव्यांत प्रतीति येत असते ही कल्पना जुनीच आहे. काव्याची घडण वर सांगितल्याप्रमाणे होते, हा सिद्धान्त प्राचीन काळीं लोकांना मान्य होता. 'स यत् स्वभावः कविः तदनुरूपं काव्यम् ।' असें राजशेखराने म्हटलेंच आहे. कवीच्या स्वभावाप्रमाणे काव्य घडतें म्हणजे काय तें वर सांगितलेंच आहे. त्याने केलेली विषयाची निवड, त्याचें केलेलें निवेदन, त्यासाठी उभ्या केलेल्या व्यक्ति, त्या व्यक्तींचीं आंतर्बाह्य वर्णनें, वर्णनें सजविण्यासाठी वापरलेले अलंकार, मधूनमधून सुभाषितांतून प्रगट केलेला अभिप्राय, कथानकाचा त्याने केलेला शेवट, या सर्वांतून कवींचा स्वभाव दिसत असतो. या सर्वांतून तो प्रत्येक घटनेचा, प्रसंगाचा, व्यक्ति-स्वभावाचा अर्थ सांगत असतो. तो अर्थ लावण्याची जी प्राक्रिया तींतून कवीच्या स्वतंत्र व्यक्तित्वाची प्रतीति येत असते.

निसर्गाचा, त्यांतील घटनांचा अर्थ कवि सांगतो, त्याप्रमाणे तो जुन्या कथांचाहि अर्थ सांगतो. म्हणूनच काव्याला त्याने जुन्याच कथा निवडल्या तरी, त्याचें काव्य नवीन, स्वतंत्र असें मानलें जातें. कालिदासाने 'रघुवंश' लिहिला. त्यांतील सर्व कथा जुन्याच होत्या. पुराणांत, रामायणांत त्या येऊन गेल्या होत्या. मग कालिदासाने काय केलें ? 'राजाचा धर्म' म्हणजे प्रजापालन, धर्मरक्षण, त्याग, संयम, नीति यांचा आदर्श घालून देणें, हा होय, ही कल्पना कवीच्या मतीच्या गर्भात स्फुरली. आणि मग 'सूर्यप्रभववंश' ही जमीन त्याने निवडली व त्यांत हें बीज टाकलें. त्या बीजाचा विकास होऊन 'रघुवंश' हा वृक्ष—हें काव्य निर्माण झालें. या वंशाच्या इतिहासांत अनेक

घटना घडल्या असतील. पण 'राजधर्म' या बीजाने आपल्याला हवीं तों जीवनद्रव्येंच तेवढीं त्या भूमींतून खेचून घेतलीं. काव्यनिर्मितीचा हा हेतु आहे हें प्रारंभीच कालिदासाने सांगून टाकलें आहे. –" 'सोऽहम्–आजन्म-शुद्धानां, आफलोदयकर्मणां, आसमुद्रक्षितीशानां, त्यागायसंभृतार्थानां, वार्धके मुनीवृत्तीनां'–अशा राजांचें चरित्र सांगणार आहें." अशी कवीची प्रतिज्ञाच आहे. आणि ती सिद्ध करण्यासाठी त्याने दिलीप, रघु, अज, रामचंद्र यांची निवड केली. त्यांच्या जीवनांतील त्यागाचे, धीरोदात्ततेचे, शौर्याचे, सत्त्वपरीक्षेचे, भक्तीचे, कमालीच्या दुःखाचे, असे प्रसंग निवडले, आणि ही नवनिर्मिति केली. श्रेष्ठ राजधर्म हा या सगळ्याचा अर्थ आहे, हें तो मधूनमधून सांगत आहे आणि अनंत घटनांची गुंफण एकसूत्रांत करीत आहे. राजांचें वर्णन करतांना तो म्हणतो,—

"स पिता पितरस्तासां केवलं जन्महेतवः। तं वेधा विदधे नूनं महा-भूतसमाधिना। एकान्तविध्वंसिषु मद्विधानां पिंडेष्वनास्था खलु भौतिकेषु। सहस्रगुणमुत्स्रष्टुं आदत्ते हि रसं रविः। आदानं हि विसर्गाय सतां वारि-मुचां इव।" (१–त्यांचे मातापिता हे केवल जन्मदाते होत. दिलीप हाच खरा त्यांचा पिता. २–ब्रह्मदेवाने त्याला विभूतींच्या सामग्रीनेच घडविलें होतें. ३–अत्यंत क्षणभंगुर असा जो हा मातीचा देह त्याबद्दल माझ्या-सारख्यांना कधीच प्रेम वाटत नाही. ४–रवि जीवनरस शोषून घेतो ते सहस्रपटींनी पुन्हा परत द्यावे या हेतूनेच. ५–सज्जन लोक दान स्वीकार-तात ते मेघाप्रमाणे पुन्हा परत देण्यासाठीच होय.)

हें त्याच्या घडणीचें सूत्र आहे; प्रत्येक घटनेचा हा अर्थ आहे. हीच प्रतीति यावी यासाठी कवि ज्या ज्या योजना करतो त्यांत तो स्वतः प्रतीत होतो. सृष्टीची उदात्तता, सर्वत्र भरून राहिलेली सात्त्विकता, ऋषींचे आश्रम, गंगेचें पावित्र्य, सागराचें अगाधत्व, सूर्याचें तेज, चंद्राची शीतलता, हेंच कालिदासाच्या या काव्यांत सर्वत्र सापडावयाचें. कारण पानाफुलां-फळांत सर्वत्र राजधर्माची प्रतीति झाली पाहिजे. तो एकच अर्थ सारखा जाणवत राहिला पाहिजे. तो जेथे जेथे जाणवतो तेथे तेथे काव्यांतील कवि आपणांला दिसतो.

वर सांगितलें की काव्यांत कवीचें दर्शन घडणें ही सनातन गोष्ट आहे.

त्या दर्शनावांचून काव्य घडत नाही, नवनिर्मिति होत नाही, हें प्राचीनांना आजच्याइतकेंच मान्य होतें. मात्र आज कवीच्या या काव्यांतील दर्शनाचा कांही विपरीत अर्थ केला जात आहे. त्याचा विचार आपण केला पाहिजे.

आजच्या कवींना दुसऱ्यासाठी गाणें, दुसऱ्यासाठी रडणें, दुसऱ्यासाठी विशिष्ट भाव, विशिष्ट विचार, विशिष्ट पद्धतींनी व्यक्त करणें याचा कंटाळा आला आहे असें म्हणतात. आजपर्यंतचे कवि दुसऱ्यासाठी जगले. आता हे कवि स्वतःसाठी जगूं पाहत आहेत. भोंवतालच्या सृष्टीपासून दूर जावें आणि स्वतःच्या अंतःसृष्टीशीं प्रामाणिक राहावें असा त्यांचा प्रयत्न आहे. ते स्वतःशींच गुणगुणतात, पुटपुटतात, आपल्या अंतर्मनाचा ठाव घेण्याचा प्रयत्न करतात. त्यांची निर्मिति मूलतः आत्मसमाधानासाठी असते; लोकांसाठी नसते. त्यामुळे त्यांच्या अभिव्यक्तीचें रूप तऱ्हेवाईक बनतें. इतरांच्या दृष्टीने त्यांत विस्कळितपणा येतो, तुटकपणा येतो. इतरांना त्यांतून सुसंगत दर्शन घडायला थोडी पंचाईत पडते. ‘ कलावाङ्मयांतील नवें आणि जुनें ’ या आपल्या लेखांत प्रा. वा. ल. कुलकर्णी यांनी नव्या कवि-कथाकारांची ही कैफियत दिली आहे. ते पुढे म्हणतात, ‘आज नवकला व नववाङ्मय यांत जी दुर्बोधता येत आहे तिचीं कारणें विविध आहेत. जें जाणवतें आहे तें तितकेंसें नीटपणें व्यक्त करतां येत नाही म्हणून ही दुर्बोधता येत असेल. जें व्यक्त करावयाचें आहे तेंच कलावंतांना स्वतःला गोंधळांत टाकणारें असल्यामुळे हा त्यांच्या मनाचा गोंधळ त्यांच्या कलेंत व्यक्त होत असेल; परंतु कलेंत काय किंवा काव्यांत काय, कलावंताच्या अंतःकरणाचें प्रतिबिंब बघावयाचें असतें. त्याच्या अंतरात्म्याला जें जाणवतें त्याचे निनाद ऐकावयाचे असतात. त्याच्या अंतःचक्षूसमोर जो देखावा तरळत असतो तो बघावयाचा असतो.’

कवि काव्यांत दिसतो याचा नवीन अर्थ किती विपरीत आहे हें यावरून ध्यानांत येईल. वर सांगितलें की जीवनांतील घटना पाहून, अनेकविध प्रसंग पाहून, कोणा पुरुषाचें चरित्र पाहून, इतिहास पाहून कवीला त्याचा कांही अर्थ प्रतीत होतो. आणि मूळ घटनेंत नव्हे, तर या अर्थ सांगण्याचा प्रक्रियेंत, अनेक घटना एका सूत्रांत गोवून त्यांतील सुसंगति दाखविण्याच्या प्रयत्नांत कवि भासमान होत असतो.—हा जुना अर्थ झाला. आता नवा अर्थ काय

आहे ? कवीला अजून कांही उलगडलेलें नाही, कांही कळलेलें नाही. त्याच्या मनापुढे कांही तरळत आहे, त्याची त्याला संगति लावतां येत नाही, तो स्वतःच गोंधळांत पडलेला आहे. असें जें त्याच्या मनांतल्या भावानुभवांचें अर्धपक्क, तुटकें, विस्कळित, आकारहीन, वेडेंविद्रें रूप, तें वाचकांनी पहावयाचें आहे ! कवीच्या काव्यांत या त्रिगुणात्मक संसारांतील दृश्यें आम्हीं पहावीं आणि तीं पाहतां पाहतां अप्रत्यक्षपणे कवीचें दर्शन घ्यावें अशी जुनी पद्धत होती. आता कवीलाच आम्हीं पाहावें अशी अपेक्षा आहे. हा उद्धटपणाचा अगदी कळस झाला. आपल्या अंतःकरणांत कसले नाद उमटत आहेत हें ज्याला कळत नाही त्याचें अंतःकरण आम्हीं जाणून घ्यायचें आहे. कवि काव्यांत दिसतो, याचा अर्थ ' कविच दिसतो ' असा झाला आहे. कारण काव्य म्हणून दुसरें कांही नाहीच. त्याला कांही अर्थप्रतीति झाली, विश्वाच्या बेबंद पसाऱ्यांत कांही सुसंगति जाणवली, या गोंधळांत कोठे रचना दिसली तर तिला आम्ही काव्य म्हणत होतों. आता तसें कांही झालेलें नाही, हें नवकवींचें वकीलच सांगत आहेत. मग काव्य कोणतें ? – तर कवीचें अर्ध-बोबडें, तुटकेंफुटकें, छिन्नभिन्न मन ! गोंधळांतून कवीने निर्माण केलेली सुसंगति हें काव्य नसून, तो मूळचा गोंधळ, आणि तोहि कवीच्या दुबळ्या, दरिद्री, भिकारी मनांतला ! हें नवकाव्य. उद्धटपणा तो हाच. आम्हीं काव्य मागितलें तर वेड्याविद्र्या रूपांत कवि आपणच उभा राहतो आणि वर ' कलेंत काय किंवा काव्यांत काय, कलावंताच्या अंतःकरणाचें प्रतिबिंबच पहावयाचें असतें.' या सिद्धान्ताचा आधार घेतो. काव्यांत कवि पाहावयाचा म्हणजे प्रत्यक्ष त्यालाच पहावयाचें असा आजचा अर्थ आहे.

रचना नाही, सुसंगति नाही, अर्थप्रतीति नाही, अभिव्यक्ति नाही तरी काव्य मात्र आहे ! मग कवीचा गुण तरी काय ? प्रामाणिकपणा ! या प्रामाणिकपणाची सांथच हल्ली सर्वत्र पसरलेली आहे. जो तो लेखक प्रामाणिक आहे ! कोणताहि काव्यगुण नसला तरी प्रामाणिकपणा हा पुरेसा गुण आहे असें दिसतें. आपल्या अंतरांत कांही जमलेलें नसलें तरी कवि तें प्रामाणिकपणे उघडें करून दाखवीत आहेत. त्यांना अगदी घाई झालेली आहे, तीहि प्रामाणिक आहे. वास्तविक कोणत्याहि व्यवसायांत केवळ प्रामाणिकपणाच्या भांडवलावर नवनिर्मिति केली आहे असा दावा मांडतां

येणार नाही. स्थापत्यविशारदाला घर बांधण्यासाठी बोलाविलें असतां दगड, विटा, चुना, माती, फळ्या, सळ्या, वाळू हें सर्व सामान त्याने आपल्या आवारांत पसरून दिलें, आणि कोणतीहि रचना, बांधणी, उभारणी न करतां त्या सामानाच्या पसाऱ्यालाच तो प्रामाणिकपणें घर म्हणूं लागला तर त्याची संभावना काय होईल? सध्याच्या कवीचें काव्य असें आहे. त्यांचे वकील म्हणतात की, तें त्यांनी स्वतःसाठीच केलें आहे. आत्मसमाधान हा त्यांचा हेतु आहे. या समर्थनामुळेच ही एक नवी वेड्यांची जात निर्माण झाली आहे असें वाटतें. वरच्यासारखा पसारा मांडून ठेवला तर कवीचें स्वतःचें तरी समाधान होईल काय? कवि हा तर सर्वांत चोखंदळ व रसिक टीकाकार असतो असें म्हणतात. प्रत्येक साहित्यिक हा अभावितपणें का होईना, साहित्यशास्त्रज्ञ असतोच, असें म्हणतात. कारण प्रत्येक क्षणाला आपली निर्मिति कशी सजत चालली आहे हें त्याला पाहतां येणें अवश्य असतें. त्यावांचून एक पाऊल त्याला टाकतां येणार नाही. असें असतांना नव-कविकथाकार या पसाऱ्यावर, ठायीं ठायीं पडलेल्या त्या ढिगावर, पुंजक्यावर जर आत्मसमाधान मानीत असले, तर प्रामाणिकपणाच्या जोडीला कमालीची अरसिकता, अभिरुचिशून्यता हाहि गुण त्यांच्या ठायीं असणें अवश्य आहे. एरवी त्यांना समाधान प्राप्त होणें शक्य नाही. अर्थात् हाहि गुण त्यांच्या ठायीं असला पाहिजे. त्यावांचून—

'पक्षी जें झाडावर गाणें गातो, आहे झाडच दुसरें पुन्हा त्या गाण्यांत, पक्षी जें झाडावर गाणें गातो! झाडावर जें गाणें पक्षी गातो, आहे पक्षी दुसरा गाण्यांतच त्या पुन्हा, झाडावर जें पक्षी गातो'

—या काव्यांतून त्याला समाधान प्राप्त होणार नाही. नवी वेड्यांची जात निर्माण होत आहे असें वाटतें तें असल्या काव्यामुळे!

माझ्या मतें, कवीने काव्यांत दिसणें ऊर्फ आत्माविष्कार याचा कांही विपरीत अर्थ केल्यामुळे ही वेडी अनर्थपरंपरा ओढवलेली आहे. याचें उत्तम उदाहरण आंद्रे मार्वा या फ्रेंच लेखकाच्या 'आस्पेक्टस् ऑफ बायॉग्रफी' या पुस्तकांत सापडेल. अलीकडे काव्यनाटकाप्रमाणेच चरित्र हीहि एक कला आहे असा एक पंथ निघाला आहे. आंद्रे मार्वा हा या पंथाचा वकील आहे. या पुस्तकांत "चरित्र — एक आत्माविष्काराचें साधन" असें एक

प्रकरण त्याने लिहिलें आहे. कलाकाराच्या दृष्टीने कला हें एक विरेचन आहे, निचरा आहे, भार हलका करण्याची प्रक्रिया आहे, उत्सर्ग आहे, अशीच त्याने कलेची व्याख्या प्रारंभी दिली आहे. कलाकाराचें मन कांही पूर्वायुष्यांतील दुःखांनी व्याकुळ झालेलें असतें. भावसंचय फार झाल्यामुळे तें ठणकत असतें. तेव्हा त्या दुःखाचा निचरा करण्यासाठी तो कादंबरी वा काव्य लिहितो व आपल्यासारखीं माणसें निर्माण करून त्या दुःखांना वाट करून देतो. डिकन्स, बाल्झॅक, फ्लाबेर यांनी, मार्वाच्या मतें, हेंच केलें. हीं कादंबरीकारांचीं उदाहरणें देऊन नंतर मार्वा चरित्राकडे वळतो. कारण त्याच्या मतें चरित्र हीहि कादंबरीप्रमाणेच कला आहे. आणि मग तो स्वतःचे अनुभव सांगतो. ते अनुभव वाचतांना चरित्र, कला आणि आत्माविष्कार या कल्पनांचे एक माणूस किती धिंडवडे करूं शकतो हें आपल्या सहज ध्यानांत येतें. मार्वा याने इंग्लिश कवि शेले याचें चरित्र लिहिलें. हाच कवि त्याने का निवडला? तर लहानपणीं शाळेंत त्याच्या व्यक्तिस्वातंत्र्य, सुधारणा यांविषयी ज्या भावना होत्या तशाच शेलेच्या होत्या. आणि परिस्थितीमुळे मार्वाच्या भावनांना जसा प्रतिरोध झाला तसाच शेलेच्याहि भावनांना झाला होता. अर्थ असा की, शेलेचें चरित्र लिहिलें की या प्रतिरुद्ध भावनांना वाट मिळेल, त्यांचा उत्सर्ग होईल आणि लेखक मोकळा होईल. तसें झालें का? मार्वा म्हणतो, 'मला आता तें चरित्र मुळीच आवडत नाही. कारण चरित्र लिहितांना मीं शेलेविषयी सहानुभूतीने लिहिण्याऐवजी उपहासाने लिहिलें. जणू कांही मीं स्वतःवरच टीका केली!' अशी ही आत्माविष्काराची कल्पना आहे. चरित्र ही कला आहे आणि कलेंत कलावंत दिसला पाहिजे याचा अर्थ मार्वाने इतका विपरीत केला आहे. कादंबरीकाराने कल्पनेने निर्माण केलेल्या व्यक्तिरेखेंत स्वतः कादंबरीकार दिसावा येथपर्यंत ही कवीच्या दर्शनाची कल्पना कशी तरी सुसह्य मानतां येईल. हेंहि पूर्णपणें खरें नाही. आधीच्या एका प्रकरणांत मार्वाने स्वतःच तसें सांगितलें आहे. कादंबरींत वा काव्यांत लेखक जी भूमिका घेतो, जीं मतें मांडतो तीं त्याचीं वैयक्तिक मतें मानणें केव्हाहि युक्त नाही, असें त्यानेच म्हटलें आहे. पण या प्रकरणांत त्याचा त्याला विसर पडलेला

आहे. (पूर्वी काय लिहिलें याचा या ग्रंथांत मार्वाला अनेक वेळां विसर पडलेला आहे. तें असो.) पण कादंबरी सोडून चरित्र–क्षेत्रांत येऊन दुसऱ्याच्या चरित्रांत लेखकाने आत्माविष्कार करूं पाहणें ही आत्माविष्काराच्या विपरीततेची परासीमा झाली. वर सांगितलेल्या नवकवींच्या उद्धटपणापेक्षा हा दसपट जास्त उद्धटपणा आहे. आणि आश्चर्य असें की, स्वतः या मताचा पुरस्कर्ता जो मार्वा त्याला स्वतःला हें साधलें नाही. हें साधणें जवळजवळ अशक्य आहे, हें तोच स्वतः म्हणतो. तरी चरित्र ही कला आहे, आणि आत्माविष्कार, हें कलेचें प्रधान लक्षण आहे, ही कवटाळून धरलेली कल्पना सोडून देण्यास मात्र तो तयार नाही. कवीचें काव्यांत दर्शन घडणें, याचा जो नवा विपरीत अर्थ रूढ झाला आहे त्यामुळे हा सर्व अनर्थ होत आहे हें अगदी उघड आहे. या कल्पनेचें स्पष्टीकरण करतांना पुढे पुढे मार्वाने ती अगदीच पातळ करून टाकली आहे. चरित्रनायकाचें सर्व चरित्र चरित्र-लेखकासारखें असलें पाहिजे असें नाही. बायरनचें चरित्र लिहितांना आपण तसें छंदीफंदी होणें अवश्य आहे असें नाही. फक्त अशा मानवी भावना शक्य आहेत, एवढें आपल्याला वाटलें म्हणजे झालें, असें तो म्हणतो. चरित्रकाराने चरित्रनायकाशीं समरस व्हावें, कार्लाइलच्या चरित्रकाराने क्षणभर तरी कार्लाइल व्हावें, असें तो सांगतो. हा कोण्या गावचा आत्मा-विष्कार? यांत नवीन काय आहे? एवढ्यावरून चरित्र ही कला कशी ठरते?— असे अनेक प्रश्न या स्पष्टीकरणांतून निर्माण होतात. अर्थातच त्यांचीं उत्तरें मिळणार नाहीत. कारण लेखकालाच तीं माहीत नाहीत. मार्वा तर शेवटी असें म्हणतो की, चरित्रकार हा चरित्रनायकाचें चांगलें आकलन व्हावें म्हणून त्याच्याशीं तद्रूप होतो. आणि हा आत्माविष्कारच होय! आपला विवेक शाबूत ठेवून आपण विचार केला तर हा आत्माविष्कार नसून आत्मलोप आहे असें आपल्या ध्यानांत येईल आणि मग हेंच काव्याच्या यशाचें रहस्य फार प्राचीन काळापासून कवींनी जाणलें होतें, यांत नवीन कांही नाही, नवीन असलें तर येवढेंच की, आत्माविष्काराचा 'स्वतःच दर ठिकाणीं आपलें प्रदर्शन करणें' हा विपरीत अर्थ मात्र आहे, हा विचार आपल्याला सहज पटेल.

कला, काव्य हें कवीच्या मनाचें विरेचन आहे, उत्सर्ग आहे, निचरा

आहे, या कल्पनेमुळे काव्यांतील कवीच्या दर्शनाचा आणखीच विपरीत अर्थ झाला आहे. दुःख कमी व्हावें, भारावलेलें मन हलकें करावें, ठणका बंद व्हावा, कळा नाहीशा व्हाव्या, म्हणून जर हें करायचें तर जितक्या घाईने हें करतां येईल तितकें बरें, असा विचार दिसतो. चित्रपटनिर्माता स्टुडिओंतल्या गोंधळाला, पसाऱ्याला कधीच चित्रपट म्हणणार नाही. फोटो घेण्याचें काम चालू आहे, त्यापूर्वी लोक वाटेल तें बोलत आहेत, इतर माणसेंहि आसपास उभीं आहेत, कोणी रंग लावताहेत, कोणी कपडे करीत आहेत, सजावटीचा पसारा सर्वत्र पडलेला आहे, पुढल्या प्रवेशाचीहि तयारी आणखी पलीकडे चालू आहे, असा सर्व बाजार म्हणजे चित्रपट, असें म्हणण्याची त्याची छाती होणार नाही. पण नवकवि व त्यांचे वकील या बाबतींत शूर आहेत. मनांतला बेबंद पसाराच ते बाहेर दाखवितात आणि तीच कला असें म्हणतात. कारण त्या काव्यामुळे त्यांच्या मनांतील घाण बाहेर पडून निचरा झालेला असतो. आणि निचरा, विरेचन हें तर कलेचें मुख्य लक्षण, असें मार्वासारखे लोक म्हणतात. तेव्हा घाई केलीच पाहिजे.

प्रा. रा. श्री. जोग यांनी ‘मुख्यार्थाची कैफियत’ या आपल्या भाषणांत या घाईचें थोडें विवेचन केलें आहे. प्रथम त्यांनी एका नवकाव्याचें उदाहरण दिलें आहे. “झोपेवांचून तळमळणाऱ्या, भारावलेल्या दिनयामिनींचीं, हिसळलेल्या मूक दुःखांचीं, अर्धवलयें, पूर्णवलयें आदळतात मनकांठावर; रितें करतात आपुलें ओझें, माझ्या भावनांच्या विरल्या झोळांत, अर्ध-गाइल्या डोहाळ्यांचें गीत, फेकतें बाहेर उरली मूकता, अधू झालेल्या गर्भाशयांतून अपुऱ्या दिसांचें जसें बालक.” हें उदाहरण देऊन प्रा. जोग म्हणतात, कवीच्या मनांत त्याच्या दुःखाच्या अनुभूति कांही तरंग उठवितात, पण त्याच्या भावकोषांत त्यांना अर्धवट आकार मिळतो न मिळतो तोंच, ती कविता, तिचीं सर्वांगें पूर्णाकार घेण्याच्या आधीच, बाहेर येते,— असा या कवितेचा अर्थ असावा. आणि मग ते विचारतात की, असेंच व्हायला पाहिजे काय? कवितारूप बालक अपुऱ्या दिवसांचेंच जन्मास येणें अपरिहार्य आहे काय? संपूर्ण दिवस झाल्यावर मिळणाऱ्या सुटकेचें समाधान मिळविण्याचा प्रयत्न कवीनें कां करूं नये? अर्धवट साकारलेलीं बालकें लोकांपुढे कां मांडावींत? अशी कोणती निकड आहे की अशी अर्धीकच्ची

निर्मिति झालीच पाहिजे ? यानंतर जोग आणखी एक प्रश्न विचारतात की, ( संपूर्ण दिवस भरल्यानंतर बालकाला जन्म देणें ) यांत आत्मनिष्ठेचा ( प्रामाणिकपणाचा ) भंग होतो काय ?

तो होत नाही हीच तर दुःखाची गोष्ट आहे. आपण करतों त्यांत प्रामाणिकपणा आहे अशी कवींची खात्री आहे. आणि तेवढा गुण कलेच्या श्रेष्ठतेस पुरेसा आहे. मग सर्व दिवस भरण्याची वाट कशासाठी पहावयाची ? या तत्त्वाअन्वयें स्त्री आपल्या पुरुषाला असेंच म्हणेल, 'बालक अर्धवट झालें याचा खेद तुम्ही मानूं नका. मी तुमच्याशीं प्रामाणिक होतें की नाही तेवढें पहा.' 'झाडावर पक्षी, पक्ष्यावर झाड, पक्ष्यांचें गाणें, गाण्यांतील पक्षी' हें लिहितांना कवि आपल्या अंतःसृष्टीशीं प्रामाणिक आहे ना एवढेंच पाहावें. कलेंत काय किंवा काव्यांत काय, कलावंताच्या अंतःकरणाचें प्रतिबिंब बघावयाचें असतें ! तें यांत निश्चित आहे. मग हें काव्य नाही असें कसें म्हणावें ? त्यांत दुर्बोधता असली तरी हरकत नाही. तें तुटकें आहे, विस्कळित आहे, नीट व्यक्त झालेलें नाही, सगळा गोंधळ आहे, सर्व खरें. पण त्यांत कवि भासमान होतो, त्याच्या दुःखाचें त्यांत विरेचन आहे, उत्सर्ग आहे. आणि हींच कलेचीं लक्षणें आहेत. आणखीहि अनेक समाधानें नवकवींचे वकील प्रा. वा. ल. कुलकर्णी यांनी आपल्याला प्राप्त करून दिलीं आहेत. हे कवि जें दिसतें त्यावर संतुष्ट नाहीत, या दिसण्यामागे जें असतें तें शोधून काढण्याची त्यांची धडपड आहे. वरवरच्या वास्तवापेक्षा अधिक खोलवर असलेल्या वास्तवाचें चित्र रेखाटण्याचे त्यांचे प्रयत्न चालू आहेत. त्यांच्या या कृतीकडे पाहतांच आपल्याला त्यांचा अर्थ कळत नसेल, आपल्या सौंदर्य-दृष्टीला धक्का बसत असेल, परंतु याकडे लक्ष द्यावयास त्यांना फुरसद नाही ! हें समर्थन वकिलाला शोभण्यासारखें आहे यांत शंका नाही ! वाचकांना मात्र शंका अशी येते की, आमच्या सौंदर्यदृष्टीला धक्का बसतो याचा विचार करावयास तुम्हांला फुरसद नसेल, पण वरवरच्या वास्तवाखालचें जें आंतलें वास्तव तुम्ही शोधणार त्याचा पुरता शोध घेण्यास व त्याचें स्वरूप नक्की करण्यासहि तुम्हांला फुरसद नाही हें कसें ? आत्मसमाधानासाठी तुम्ही लिहितां, आम्हां पामरांसाठी नाही हें खरें असलें तरी प्रश्न असा की, दिसण्यामागे जें असतें त्याचें स्वरूप नक्की कळल्यावांचून तुमचें समाधान

व्हावें इतकी तुमची अभिरुचि, रसिकता हीन पातळीला कशी गेली ?

याचा अर्थ हाच आहे की, काव्यांत कवीचें जें दर्शन त्याच्याविषयी या नवकवींनी व त्यांच्या वकिलांनी अत्यंत विकृत कल्पना उराशीं कवटाळलेल्या आहेत. कला म्हणजे आत्मनिष्ठा किंवा प्रामाणिकपणा, कला म्हणजे दुःखमुक्तीसाठी केलेला उत्सर्ग, आणि कला म्हणजे कवीच्या स्वतःच्या दरिद्री, बालिश मनाचें, भावभावनांचें काव्यांत होणारें दर्शन अशी ही विकृत कल्पना आहे. त्यांत प्रामाणिकपणा हा अर्थ व्यक्त करण्यासाठी 'आत्मनिष्ठा' हा अत्यंत विपरीत शब्द वापरून मर्ढेकरांनी जास्तच अनर्थ करून ठेवला आहे. काव्य म्हणजे आत्मनिष्ठा—म्हणजे आपलें स्वतःचें ओंगळ प्रदर्शन, हाच अर्थ अनेक कवींच्या मनांत दिसतो. आणि प्रा. जोगांनी म्हटल्याप्रमाणे त्यांनी व त्यांच्या वकिलांनी त्याचें तत्त्वज्ञान बनविलें आहे. नाही तर असलें प्रदर्शन करण्याचा उद्धटपणा त्यांनी केला नसता.

कवीचें काव्यामध्ये होणारें, कलावंताचें कलेंत होणारें दर्शन. याचा अर्थ फार, फार निराळा आहे. स्थापत्यविशारदाने बांधलेली उत्कृष्ट इमारत पाहतांना पावलोपावलीं त्याच्या कौशल्याची जाणीव होत राहते. इमारतीची भव्यता, तिची रचना, तिच्यांतल्या सुखसोयी, तिचा भक्कमपणा या गुणरूपाने त्या इमारतींत त्या स्थापत्यशास्त्रज्ञाचें दर्शन घडावें हें युक्त आहे. त्याऐवजी इमारतींत दहापांच ठिकाणीं त्यानेच आपलीं चित्रें लावून ठेवलीं तर तो आत्माविष्कार या नवकवीच्या आत्माविष्कारासारखा होईल आणि तो केव्हाहि सुसह्य होणार नाही. वेरूळचें कैलास लेणें पाहतांना हे विचार सारखे मनांत येत असतात. कलेमध्ये कलावंताच्या अंतःकरणाचें प्रतिबिंब बघावयाचें असतें, असें वा. ल. कुलकर्णी म्हणतात. कैलास लेण्यामध्ये तें दिसत नाही काय ? आणि दिसत असेल तर नवकवींच्या अपुऱ्या दिवसांच्या तुटक्याफुटक्या, गाधळी काव्यांत जसें दिसतें तसेंच तें आहे काय ? कैलास लेण्याच्या आजूबाजूला अर्धवट राहिलेलीं, तुटकींफुटकीं अशीं कांही लेणीं आहेत, चित्रें आहेत, कोरीव मूर्ति आहेत. पण त्यांना कोणी कलाकृति म्हणत नाहीत आणि त्यांत शिल्पकाराच्या अंतःकरणाचें प्रतिबिंब पाहावें ही ओंगळ कल्पना तर कोणाच्याच मनांत येत नाही. लोक लोभावतात तें कैलास लेण्यावर. त्यांत शिल्पकाराचा भव्य संकल्प, त्याची सौंदर्याभिरुचि, कागदांत खेळ करावे

इतक्या सहजपणें दगडांत कातरकाम करण्याची त्याची हातोटी, रागद्वेष, हर्षामर्ष, लोभमत्सर दगडांतून व्यक्त करण्याचें त्याचें कौशल्य, पुराणकथांवरील त्याची भक्ति, दगडांत त्या व्यक्त करण्यासाठी दीर्घकाळ करावे लागणारे परिश्रम, त्यांतली चिकाटी, हे सर्व गुण दिसून येतात आणि कलाकाराच्या असामान्यतेची प्रेक्षकांना पावलोपावलीं जाणीव होते. पण यापलीकडे त्याच्या अंतःकरणाचें प्रतिबिंब कोठेच दिसत नाही. त्या दृष्टीने कसलाहि आत्माविष्कार त्याने केलेला नाही. असला तर संपूर्ण आत्मलोपच आहे. तरी वेरूळची कला ही कलाच नव्हे असें म्हणण्याचें धाडस अर्वाचीन काळांतहि कोणी करील असें वाटत नाही.

शिल्प, चित्र, नृत्य, संगीत यांहून जीवनाचा अर्थ व्यक्त करण्याच्या दृष्टीने साहित्य ही श्रेष्ठ दर्जाची कला आहे. आणि तो अर्थ सांगतांना कविहृदय, कवीचें अंतःकरण, त्याचें व्यक्तिमत्त्व किती तरी पटींनी अधिक प्रगट होतें. पण त्यांतहि आत्माविष्काराचा नवकवींचा दरिद्री अर्थ नाही. कादंबरी, नाटक यांत जी जी व्यक्ति येईल तिच्या प्रत्येक कृतीचा अर्थ आणि अशा सर्व व्यक्तींच्या चरित्रांतून प्रतीत होणारा जीवनाचा अर्थ कवि सांगतो; आणि त्यांतून कवीचें दर्शन घडतें.

प्रत्यक्ष जीवनांतल्या व्यक्ति आणि कादंबरींतल्या व्यक्ति यांत फार मोठा फरक पडतो तो हाच होय. कादंबरींतल्या व्यक्ति आपल्याला पूर्णपणें कळतात. त्यांचे रागद्वेष, त्यांच्या आशाआकांक्षा, त्यांच्या कृतींमागली कार्यकारणपरंपरा, त्यांना प्रेरित करणाऱ्या भिन्न शक्ति, हें सर्व सांगण्यासाठी म्हणजेच त्या व्यक्तींचा अर्थ सांगण्यासाठी त्यांच्या शेजारीं कादंबरीकार सारखा उभा असतो. ‘उषःकाल’मधील रंगराव अप्पांचा मुलगा नानासाहेब घर सोडून जातो. एरवीच्या जीवनांत बापाशीं भांडून तो घरांतून गेला, एवढेच इतरांना कळतें. कादंबरींत त्याच्या मनांत लहानपणापासून असलेला मुसलमानांचा द्वेष, स्वदेशाविषयींची भक्ति, धर्मावरील निष्ठा, शिवछत्रपतींकडे जाण्याची तळमळ, हें सर्व सर्व तपशिलाने सांगितलेलें असतें. कधी त्याच्या उद्गारांतून, कधी इतरांबरोबरच्या संवादांतून, कधी त्याच्या कृतींतून, कधी स्वतः वर्णन करून कादंबरीकार हें आपल्याला सांगत असतो. आणि म्हणूनच नानासाहेब ही व्यक्ति आपल्याला कळते. आणि त्या काळीं

एकंदर महाराष्ट्रांत जुलमी परकी सत्तेमुळे क्रांतीची उठावणी कशी होत होती त्याचाहि—म्हणजेच त्या वेळच्या जीवनाचाहि अर्थ कळतो. किल्लेदार रंगरावअप्पा या व्यक्तिरेखेचें असेंच आहे. त्यांची स्वामीनिष्ठा किती परा-कोटीला गेली होती हें हरिभाऊंनी अत्यंत तपशीलाने वर्णिलें आहे. म्हणून त्यांच्या विविध कृतींचा अर्थ आपल्याला कळतो. मुलाची ते निर्भर्त्सना करतात, त्याचें तोंड पाहूं नये असें त्यांना वाटतें, प्रत्यक्ष पोटच्या पोराला पकडून पातशहाच्या स्वाधीन केलें पाहिजे असें त्यांना वाटतें, तसें आपण केलें नाही तर कर्तव्यच्युत झालों अशी टोचणी त्यांना लागते, या सर्वांचा उलगडा कादंबरीकार सारखा शेजारीं उभा नसेल तर होणारच नाही. प्रत्यक्षांतल्या व्यक्ति आपल्याला निकटपरिचयावांचून अशा कळणार नाहीत. आणि परिचयानंतरहि कादंबरीकार त्यांचें जें विश्लेषण करतो तें आपल्याला जमत नाही. म्हणून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा बराचसा भाग अज्ञात असाच राहतो. तो ज्ञात करून देणें हें कवीचें वा कादंबरीलेखकाचें कार्य आहे. हें कार्य करीत असतांना, हा अर्थ सांगत असतांना, ही संगति लावून दाखवितांना कवीचा आत्माविष्कार होत असतो. त्याच्या अंतःसृष्टीचें प्रतिबिंब कलेंत पडत असतें. हरिभाऊंच्या मनांत शिवछत्रपतींच्याविषयी गाढ प्रेम होतें; त्यांच्या कार्याविषयी आदर होता. ती भक्ति महाराष्ट्रीयांच्या मनांत दृढमूल करावी असा त्यांचा प्रयत्न होता. समर्थ आणि त्यांचें कार्य यांचें त्यांना बरोबर आकलन झालें होतें. शिव आणि समर्थ या दोन स्वतंत्र, स्वयंभू अशा महाशक्ति होत्या असें त्यांचें मत होतें. क्रांति घडते ती सांवळ्या, यम्या, सुभान्या यांच्याइतक्या सामान्य माणसापर्यंत जेव्हा नव्या निष्ठा जाऊन पोचतात, हे सर्व जेव्हा उठावणी करतात तेव्हा होते, हा सिद्धान्त त्यांच्या मनांत निश्चित झाला होता. स्त्रीबद्दल हरिभाऊंच्या मनांत अपार सहानुभूति, निरतिशय आदर होता. केवळ परगृहवासामुळे किंवा परस्पर्शामुळे ती कलंकित होते ही कल्पना त्यांना मान्य नव्हती.—हे सर्व हरिभाऊंच्या अंतःकरणाचें प्रतिबिंब आहे. आणि तें आपल्याला उषःकाल या कादंबरींत पानोपानीं दिसत असतें. काव्यांत कवि दिसतो तो या अर्थाने.

कोणतीहि घटना एखाद्या लेखकाच्या दृष्टिकोनांतून पाहिली तर ती आपल्याला जास्त आकर्षक, जास्त चित्तवेधक वाटते. कारण इतकेंच की, ती

त्यामुळे आपल्याला कळते, तिचा जीवनांतल्या इतर घटनांशीं असलेला संबंध आपल्या ध्यानांत येतो आणि कळण्यामुळेच तिच्यांत आपल्याला गोडी वाटते. ललित साहित्यांत कोणतीहि घटना, कोणतीहि व्यक्ति आपल्यापुढे येते ती कोणाच्या तरी दृष्टिकोनांतूनच येते. स्वतंत्रपणें व्यक्तींना वा घटनांना साहित्यांत प्रवेशच नसतो. आकाशांतून पडणारें पाणी आपल्याला दिसत असते. पण तें जसेंच्या तसें आपल्या संसारांत येऊं शकत नाही. नदींतून, तलावांतून तें आपल्यापर्यंत येतें. अर्थात् त्याच्यावर नदीच्या मातीचे, क्षारांचे, वनस्पतींचे संस्कार होऊन मगच तें आपल्या मुखीं येतें. त्याचप्रमाणे प्रत्यक्ष जीवन जरी आपण पाहत असलों तरी त्या जीवनाचा रसास्वाद आपणास कविप्रतिभेंतूनच घ्यावा लागतो. आणि कवि तो रस आपल्याला देतांना त्यावर त्याचे स्वतःचे संस्कार करूनच देणार. हे त्याने केलेले संस्कार, त्याची विषयाची निवड, त्याने केलेली रचना, त्याचा अभिनिवेश, निवेदनशैली, त्याने रेखाटलेली व्यक्तिचित्रें, त्याने कथेचा केलेला शेवट, त्याने व्यक्तिमुखांतून प्रगट केलेली संस्कृति, यांतून दिसत असतात. या सगळ्या संस्कारांमुळे प्रत्यक्ष सृष्टीपेक्षा साहित्यसृष्टि निराळी होते. प्रत्यक्ष जीवनांतल्या घटना अशा संस्कारित नसतात, साहित्यांतल्या पूर्ण संस्कारित असतात. जीवनांतल्या घटना या ईश्वराच्या असतात. साहित्यांतल्या कवीच्या असतात. म्हणून त्यांतून आपल्याला वर सांगितल्याप्रमाणे कवीचें दर्शन घडतें.

फ्रेंच टीकाकार सेंट बव्ह याने प्रथम, कवीचें वैयक्तिक चरित्र आणि त्याचें काव्य यांचा अभेद असतो, असा सिद्धान्त मांडला. काव्य समजण्यासाठी कवीचा देश, वंश, पूर्वज, आईबाप, भाऊ, बहिणी, मित्र, त्याची श्रीमंती, गरिबी, दिनक्रम, व्यसनें, दोष, धार्मिक मतें, स्त्रियांविषयीची दृष्टि हें सर्व समजलें पाहिजे हें अतिरेकी मत त्याने मांडलें. त्याच्या मतें, प्राचीन काळच्या कवींचा अभ्यास करणेंच शक्य नाही. कारण त्यांच्या चरित्राची माहिती उपलब्ध नाही! हें मत साहित्यक्षेत्रांत एखाद्या साथीसारखें पसरलें आणि मग तेथे नाना प्रकारचे वेडेचार सुरू झाले. शेक्स्पीयर हा वकील असावा, शेतकरी असावा, शिक्षक असावा, शिपाई असावा, अशीं मतें मांडलीं जाऊं लागलीं. एलन टेरी या विदुषीने याला उत्तर म्हणून असें मत मांडलें की, तो स्त्री असावा! प्रत्येक ललित कृतींत टीकाकार

कवीच्या अंतःकरणाचें प्रतिबिंब पाहण्याचा प्रयत्न करूं लागले. आणि ज्या कृतींत तें सापडेना ती अर्थातच हीन, अधम ठरूं लागली. ब्रँडीस या टीकाकाराच्या मतें 'मॅक्बेथ' हें नाटक हीन आहे. कारण त्याने स्वतः शेक्स्पीयरच्या चरित्राची कांही कल्पना बसाविली होती तीअन्वयें शेक्स्पीयरचें दर्शन 'मॅक्बेथ' मध्ये होत नव्हतें. किंग्ज मिल् या टीकाकाराने अर्नोल्डच्या 'सोहराब आणि रुस्तुम' या काव्याची अशीच वासलात लावली. शेक्स्पीयरने शोकांतिका लिहिल्या त्या कळांत तो निराश मनःस्थितींत असावा, असें कांही टीकाकार म्हणूं लागले. निदान तो आजारी असलाच पाहिजे, असें इतरांनी निश्चित केलें. वास्तविक कलेचें स्वरूप या लोकांनी थोडें जरी न्याहाळलें असतें तरी आत्माविष्काराच्या असल्या वेडगळ कल्पनांना त्यांनी थारा दिला नसता. पुष्कळ वेळां कलाकृति हें कलाकराच्या मनींचें एक स्वप्न असतें. प्रत्यक्ष त्याच्या आयुष्याशीं त्याचा कांही संबंध नसतो. कधी कधी कलाकृति हा एक मुखवटा असतो. कवीने तो बाह्यतः धारण केलेला असतो. समाजाला तशीं मतें, तसें प्रतिपादन आवडतें म्हणून तो तसें लिहितो. ( अर्थात् यामुळे काव्य वाईट होतें असा बिलकुल अर्थ नाही.) कधी कधी जें जीवन कवीला घृणास्पद वाटतें त्याचेंच त्याने चित्र काढलेलें असतें. सर्व मानव केवळ जंतु आहेत असें कवीला वाटतें, आपण मात्र तसें नाही ही त्याची खात्री असते. आणि अशा भूमिकेवरून तो साहित्य लिहितो. असें असल्यामुळे, कलेंत किंवा काव्यांत कलावंताच्या अंतःकरणाचें प्रतिबिंब बघायचें तें फार जपून, अगदी निराळ्या अर्थाने बघितलें पाहिजे. तोच अर्थ कालिदास, हरिभाऊ यांचीं उदाहरणें घेऊन वर स्पष्ट केला आहे.

रेनी वेलेक आणि ऑस्टिन वॉरन यांनी आपल्या 'थिअरी ऑफ लिटरेचर' या ग्रंथांत वरीलप्रमाणे आत्माविष्कार-मताचा परामर्श घेऊन कला म्हणजे ( साध्या अर्थाने ) आत्माविष्कार, हें मत अगदी भ्रामक असल्याचें सांगितलें आहे. आणि नाटक, कादंबरी, लघुकथा व भावगीत-भावगीतसुद्धा—यांपैकी कोणत्याहि वाङ्मयप्रकारांत तसला अर्थ घेणें शक्य नाही हें दाखविलें आहे. काव्याच्या, ललित कृतीच्या मागे तिचा कर्ता उभा असतो, त्याचें दर्शन काव्यांत घडतें हें, त्यांना मान्य आहे. पण हा कर्ता, हा कवि, म्हणजे नित्य प्रपंचांतली व्यक्ति नव्हे. डांटे, गोएथे, टॉलस्टॉय,

मिल्टन यांच्या ललित कृतींवर त्यांच्या त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे शिक्के मारतां येतील हें खरें, कारण त्यांच्या भिन्न कृतींतून तसें साधर्म्य दिसत असतें. पण हें साधर्म्य वा वैशिष्ट्य फक्त त्यांच्या ललित कृती पाहूनच निश्चित करावें लागेल. व्हर्जीलियन म्हणजे काय आणि शेक्स्पीरियन म्हणजे काय हें आपण निश्चित जाणूं शकतों. पण त्या वैशिष्ट्यांचा त्यांच्या चरित्राशीं निश्चित असा कांही संबंध नसतो. चरित्र न पाहतांहि तें ठरवितां येतें.

यावरून हें ध्यानीं येईल की, ‘ कलेंत काय किंवा काव्यांत काय, कलावंताच्या अंतःकरणाचें प्रतिबिंब बघावयाचें असतें, ’ ही कल्पनाच वेडीविद्री आहे. आम्ही ‘ उषःकाल ’ वाचतों किंवा कैलास लेणें पाहतों तेव्हा हरिभाऊंचें किंवा त्या अज्ञात शिल्पकाराचें अंतःकरण जाणून घेण्याची आमची लवमात्र इच्छा नसते. शिल्प पाहावें, रचनासौंदर्य पाहावें, शिवाजी, नानासाहेब, रंगरावअप्पा, चंद्राबाई, रणदुल्लाखान, तानाजी, श्रीधरस्वामी यांच्या मनाचे हर्षामर्ष, सुखदुःखें, आशाआकांक्षा पाहाव्या, सावळ्या, यम्या यांचींहि मनें स्वराज्यकल्पनेने कशीं भारून गेलीं होतीं तें पाहून त्यांच्याशीं समरस व्हावें, आपला काळ विसरून क्षणभर अडीचशें वर्षांपूर्वीच्या काळांत जाऊन तेथे रमावें, समर्थांच्या त्या तपोवनांत त्या पुण्य वातावरणाचा क्षणभर अनुभव घ्यावा, छत्रपतींच्या भव्य, उत्तुंग व्यक्तिमत्त्वाचें दर्शन घ्यावें, अशा इच्छेने वाचक ‘ उषःकाल ’ हातांत घेतो. हरिभाऊंचा–त्याचा कांही संबंध नसतो. त्यांचें दर्शन या कादंबरींत वर सांगितल्याप्रमाणे घडतें हें खरं; पण रसास्वादाशीं, आमचें देहभान जें हरपून जातें त्याच्याशीं त्याचा कांही संबंध नाही. दुसऱ्या कादंबरींत हरिभाऊंनी कांही निराळ्याच व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार केला तर आम्हांला त्याचें काहीहि सुखदुःख नाही. पुष्कळ वेळां एका कलाकृतींत कलाकाराचें एक प्रकारें व्यक्तिमत्त्व भासतें, तर दुसऱ्या कृतींत दुसऱ्या प्रकारें, आणि तिसरींत काहीच भासत नाही. पण त्यामुळे कांहीच बिघडत नाही. कवीच्या अंतरात्म्याचे निनाद ऐकण्यांत आम्हांला कसलीहि गोडी नसते. टीकाकारांनी ते निनाद, तें प्रतिबिंब सापडलें तर शोधून काढावें. तें सापडलें तरी वाहवा, न सापडलें तरी वाहवा. ‘ कुमारसंभव ’, ‘ कैलास लेणें ’, ‘ उषःकाल ’ यांच्या गोडींत त्यामुळे कांही फरक पडत नाही.

याचा अर्थ असा नव्हे की, कवीच्या काव्यांतल्या अस्तित्वाला कांहीं महत्त्व नाही. साहित्याच्या प्रक्रियेंत त्याला अग्रस्थान आहे. त्यावांचून साहित्याला गोडीच निर्माण होणार नाही. पण साखरेच्या कारखान्यांत जी प्रक्रिया घडते तिचा आणि साखरेची गोडी चाखणाराचा जसा कांही संबंध नसतो तसाच साहित्यप्रक्रियेचा आणि रसास्वादाचा कांही संबंध नसतो. ती प्रक्रिया झाल्यावांचून साखरेला गोडी येणार नाही हें खरें. त्याचप्रमाणे विशिष्ट व्यक्तींच्या दृष्टिकोनांतून जीवनांतील घटनांचा अर्थ सांगितला गेला नाही, काव्यांतील व्यक्तीच्या कृतींचें स्पष्टीकरण करण्यासाठी कवि सारखा जवळ उभा राहिला नाही, त्याने जीवनांतील सुसंगति आम्हांला दाखविली नाही, तर आम्हांला समोरच्या दृश्यांचा बोध होणार नाही, आणि मग गोडी वाटणार नाही. पण आमचें सर्व लक्ष समोरच्या जीवनाकडे आहे, त्याच्या सुबद्ध रचनेकडे आहे, त्याच्या सौंदर्याकडे आहे. त्यांतील सुसंगतीकडे आहे; त्या कवीकडे नाही. तें जीवन तुटकें झालें, विस्काळित झालें, त्यांत आम्हांला संगति दिसेनाशी झाली, त्याचा अर्थ कळेनासा झाला, तर आमची कलाकृतींतील गोडी संपली. नव्या कवींच्या वकिलांचा आग्रह असा आहे की, तें जीवन तुम्हांला दिसलें नाही, त्याचा अर्थ तुम्हांला लागला नाही, तरी त्या कवीच्या अंतःसृष्टीकडे पाहून तुम्ही समाधान माना. कारण कलेंत आणि काव्यांत तेंच बघायचें असतें ! म्हणजे साखर एखाद्याला गोड लागत नाहीशी झाली तर हे टीकाकार म्हणतील की, तूं कारखान्यांतील तिच्या घडणीची प्रक्रिया पाहा. ती मोडकातोडकी असली तरी पाहा, गोडी त्यांतच आहे ! त्या कारखान्यांतले नाद ऐकणें यांतच रस आहे ! रसिकता ती हीच.

सेंट बव्हच्या नादीं लागून टीकाकारांनी काव्यावरून रसिकांचें लक्ष उडवून तें कवीवर खेंचल्यामुळे काय अनर्थ झाले आहेत, त्याची वरील विवेचनावरून कल्पना येईल. प्रथम हे अनर्थ टीकाशास्त्रांत झाले आणि नंतर ते प्रत्यक्ष साहित्यनिर्मितींत होऊं लागले. जीवनाचा कांही अर्थ बसवून त्याला शब्दरूप द्यावें, लोकांना आपण अनुभवलेल्या सौंदर्याची अनुभूति घडवावी, विस्काळित जीवन एका सूत्रांत गुंफून त्याची रम्यता प्रगट करावी, असंगतींत सुसंगतीची प्रतीति वाचकांना आणून द्यावी, हें आपलें कार्यच

नव्हे असें साहित्यिक समजूं लागले. आपलेंच दर्शन लोकांना घडवावयाचें असा त्यांनी आत्माविष्काराचा अर्थ केला आणि तेंहि नीटपणें घडविण्याची जबाबदारी आपल्यावर नाही असें म्हणण्याइतकें करंटें औद्धत्य त्यांच्या ठायीं निर्माण झालें. आंद्रे मार्वासारख्यांनी तर हा उद्धटपणा इतक्या टोकाला नेला की, चरित्राला कला ठरवून चरित्रनायकाच्या चरित्रांत चरित्रकाराचा आत्माविष्कार झाला पाहिजे असा आग्रह त्यांनी धरला. आपण काव्यांत प्रकट व्हावयाचें तें प्रारंभी सांगितल्याप्रमाणे कार्यकारण-मीमांसा करतांना, कांही तत्त्वाभोवती प्रसंगाची गुंफण करतांना, जीवनाचा, त्यांतील व्यक्तींच्या वर्तनाचा, घटनेचा अर्थ स्पष्ट करतांना, कल्पनाविलास दाखवितांना प्रगट व्हावयाचें असें न मानतां आपण म्हणजे अगदी साडेतीन हाताचे आपण, असें कलाकारांना वाटूं लागलें. आणि या भ्रांतींतूनच अर्थहीन, दुर्बोध विस्किळत, अर्धवट, विद्रूप कलाकृति निर्माण होऊं लागल्या. बीजाने जमिनींतून जीवनद्रव्यें खेचून घेऊन त्यांतून गुलाब निर्माण करावा, आम्रवृक्ष उभारावा आणि तो लोकांना दाखवावा हें उद्दिष्ट नाहीसें होऊन, तें बीज 'मलाच पहा' म्हणूं लागलें तर दुसरें काय होणार ? सगळ्या सौंदर्यशास्त्राचा पायाच येथे उखडून टाकल्यासारखें झालें आहे. सौंदर्य कवीने केलेल्या रचनेंत आहे, कवींत नाही.

डॉ. वाटवे यांनी 'संस्कृत काव्याचे पंचप्राण' या आपल्या ग्रंथांत कवीच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार याचा अर्थ स्पष्ट केला आहे. कालि-दास, भारवि, माघ या जुन्या कवींनी बहुधा जुन्या पौराणिक कथाच काव्यासाठी निवडल्या आहेत. पण कालिदास व भारवि यांनी स्वकालाला उद्देशून त्या कथांतून नवा अर्थ काढला आहे. या कथा निवडण्यांत स्वतःच्या मनांतलें कांही तत्त्व सांगावें असा त्यांचा हेतु स्पष्ट दिसतो. म्हणूनच त्यांना महाकवि म्हणावयाचें. माघाच्या 'शिशुपाल-वधां'त असें कांहीच दृग्गोचार होत नाही. अर्थात् त्याला महाकवि म्हणतां येणार नाही. स्वकालीन समाजावर प्राचीन कथांतून पडणारा नवा प्रकाश व कवीच्या राष्ट्रव्यापक व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार हे काव्यरचनेचे दोन प्राणभूत हेतु होत. यांपैकी एकहि हेतु माघाच्या नवनिर्मितीला प्रेरक झालेला दिसत नाही. त्यामुळे सबंध माघकाव्यांत खरा माघ कोठेच दिसत नाही, असें

सांगून डॉक्टर वाटवे यांनी, ‘ यामुळे माघ हा केवळ पुराणिक होय, कवि नव्हे,’ असा अभिप्राय दिला आहे.

काव्यांत कवीचें दर्शन घडणें याचा अर्थ काय हें यावरून स्पष्ट होईल. कवीचा कांही हेतु असतो, संकल्प असतो व त्याभोवती तो गुंफण करीत असतो. नव्या कवींना स्वतःचा हेतु काय हेंच उमगलेलें नसतें. त्यामुळे त्यांच्या काव्यांत सर्व विस्काळित, सर्व बेबंद व आकारशून्य असतें. आंब्याची कोय तिच्या विकासाला अवश्य तींच जीवनद्रव्यें शोषून घेते म्हणून आम्रवृक्षांत सुसंगति दिसते; पानाफुलाफळांत आम्रत्व दिसतें. पण नवकाव्यांतील आम्राच्या रचनेंत मध्येच फणस येईल, पिंपळ येईल बाभळ डोकावेल आणि निवडुंगाचे कांटेहि मध्येच येतील. कारण बीजाचें स्वत्व तेथें निश्चित झालेलें नसतें. तरी पण नवकवींना प्रतिभा नाही असें कोणी म्हणतां कामा नये. त्यांचें पुरस्कर्ते सांगतात की, जुन्यांनी जें केलें नाही तें नवकवि करणार आहेत. म्हणजे त्यांना प्रतिभा आहे. मग ते रचना कां करीत नाहीत ? अर्थबोध व्हावा असा प्रयत्न कां करीत नाहीत ? याचें उत्तर असें की, त्यांना त्या पद्धतीचा कंटाळा आला आहे. ते आता स्वतःसाठी जगूं पाहत आहेत ! जीवनासाठी कला की कलेसाठी कला हा वाद जुना आहे. त्यांत कलेसाठी कला असें कांही साहित्यशास्त्रज्ञांनी उत्तर दिलें. आता त्यापलीकडे आपल्याला गेलें पाहिजे. नवकवींना प्रतिभा आहे; पण ती प्रतिभेसाठीच प्रतिभा आहे. त्यांना दुसऱ्यासाठी कांही करावयाचें नाही. आत्मसमाधानासाठी गुणगुणावयाचें आहे, पुटपुटावयाचें आहे. पण अशा या गुणगुणण्यांतून जें अर्धवट, विस्कळित, आकारहीन, गोंधळी कवन निर्माण होईल त्यांत त्यांच्या अंतः-करणाचें प्रतिबिंब लोकांनी पाहावें, त्यांच्या अंतरात्म्याला जें जाणवतें त्याचे निनाद लोकांनी ऐकावे, हा त्यांचा आग्रह मात्र कायम आहे. आत्मसमाधानासाठी काव्य लिहायचें तर हा आग्रह कशासाठी ? स्वतःसाठीच जगावयाचें तर मग यांच्या अंतरात्म्याचे निनाद लोकांनी कां ऐकावयाचे ? याचा स्पष्ट अर्थ असा की, या कवींचें काव्यापेक्षा स्वतःवर जास्त प्रेम आहे. काव्यसौंदर्य लोकांना दाखवावयाचा त्यांना कंटाळा आला आहे. आणि आपलेंच दर्शन घडवावें या अधम हेतूने ते प्रेरित झाले आहेत. ते स्वतःसाठी जगत आहेत आणि त्यामुळे काव्य मरत आहे. पूर्वीचे कवि आत्मलोप

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.

अनुक्रम ........................ दि: ....................

करून काव्य जगवीत असत; आतांचे कवि स्वतःला जगवून काव्यलोप घडवीत आहेत. काव्यांतील कवीचें दर्शन याचा विपरीत अर्थ केल्यामुळे हा अनर्थ आज घडत आहे. काव्यसौंदर्यांचें दर्शन घडवितां घडवितां जें कवीचें दर्शन घडेल तेंच त्याचें खरें दर्शन हा अर्थ मान्य केला तर या अनर्थांतून साहित्याचें रक्षण होईल.

●●●

: ४ :

## कणिका–क्षणिका

काव्य व एकंदर ललितसाहित्य हें समाजस्थितीचें निदर्शक असतें, तो सामाजिक आविष्कार असतो. समाजस्थितीचें साहित्यांत प्रतिबिंब पडतें, असें फ्रेंच टीकाकार मॅडम द स्टाएल यांचें मत होतें. आता तें मत रूढ झालें आहे. बहुमान्य झालें आहे. हें मत पूर्ण सत्य नसलें तरी मर्यादित अर्थानें तें खरें आहे. आणि आज आपल्या देशाची स्थिति पाहिली तर या मर्यादित सत्याचा बराच पडताळा येतो असें सध्याचें ललितवाङ्मय पाहून म्हणावेंसें वाटतें. सध्या आपण कणदृक् झालों आहों. नैय्यायिकांच्या मतें जगाचें मूळ कारण अणु किंवा कण हे होय. असें त्यांचें मत असल्यामुळे इतर पंथीय लोक त्यांना कणभुक् म्हणत. त्या चालीवर सध्याच्या समाजाने ललित लेखकांना कणदृक् म्हणावें असें वाटतें. वस्तू सबंध पहाण्याचें सामर्थ्य वा इच्छा त्यांच्या ठायीं नाही. तिचा एक कण कण निराळा पहावा आणि त्यांतच आनंद मानावा, कृतकृत्यता मानावी अशी प्रवृत्ति सध्या रूढ होत आहे. सामग्र्यदर्शन, व्यापक आलोक, दीर्घ स्थल व काल आपल्या दृष्टीने आटोपून घेण्याची शक्ति आपल्या समाजांतून नष्ट होत आहे अशी भीति वाटते. क्षणापुरता विचार करावा, कणापुरतीच दृष्टि ठेवावी आणि तेवढ्यांत जें सुचेल, जें दिसेल त्यावरूनच निर्णय करावा, त्या क्षणाच्या अनुभवाचेंच स्तोम माजवावें, हा कणच महत्त्वाचा आहे असा

आग्रह धरावा असें धोरण समाजांतल्या सगळ्याच धुरीणांनी आखलें आहे की काय अशी शंका येते. एखादी कृति करावयाची तर समाजाच्या सर्व क्षेत्रांत तिचे परिणाम काय होतील, तिची झळ कोठे कोठे लागेल असा व्यापक विचार करण्याचें सामर्थ्य आपल्यांतून नष्ट होत चाललें आहे. एवढेंच नव्हे तर या सामर्थ्याचें महत्त्व आपल्या ध्यानांत येत नसावें अशी भीति वाटूं लागली आहे.

समाजजीवनाच्या सर्वच अंगांत याचा प्रत्यय येत आहे, सर्वच क्षेत्रांत या दौर्बल्याची जाणीव होत आहे; आणि या लेखांत प्रामुख्याने याचाच विचार करावयाचा आहे. पण त्याचें सम्यक् आकलन व्हावें या हेतूनें वाचकांच्या जरा जास्त परिचयाचें असें जें नवसाहित्य त्याचा विचार प्रथम केला आहे. प्रथम सांगितल्याप्रमाणे साहित्य हें एकंदर समाजमनाचें निदर्शक असतें हा सिद्धान्त मर्यादित अर्थानेच खरा आहे. तरी मानवी जीवनाविषयीच्या इतर अनेक सिद्धान्ताइतकें महत्त्व त्याला निश्चितच आहे. आणि आपल्या सामाजिक जीवनांत जें व्यंग आज पावलोपावलीं दिसत आहे ते सध्याच्या अगदी नवतम साहित्यांत स्पष्टपणें प्रतिबिंबित झालें असल्यामुळे तेथूनच विवेचनाला प्रारंभ केला आहे.

प्रथम सध्याचें ललितसाहित्य या प्रवृत्तींचें निदर्शक आहे या म्हणण्याचें थोडें स्पष्टीकरण करूं. आजच्या अनेक लघुकथा, कविता या क्षणिका किंवा कणिका असतात. कुठल्या तरी एखाद्या क्षणीं आपल्याला काय वाटलें, कसली अनुभूति झाली, कसले भावानुभव घडले हें कथालेखक वा कवि सांगतो. आपल्या एकंदर अनुभूतीशीं त्या अनुभूतीचा संबंध काय किंवा त्या अनुभवाचें जीवनांत महत्त्व काय याचा विचार करण्यास तो थांबत नाही. तसें थांबणें ज्याला शक्य नसतें; कारण आंतून अनावर उमाळा आलेला असतो, असें त्याच्या बाजूचे साहित्यशास्त्रज्ञ सांगतात. या प्रकारच्या कथा पंधरावीस ओळींत आटोपतात, कविता तीन चार ओळींत संपतात. कारण अनुभवाचा एक कणच लेखकाला वाचकापुढे ठेवावयाचा असतो. या कणाचें आम्हीं काय करावयाचें, त्याचा अर्थ काय असा वाचकाला प्रश्न पडतो. पण त्याची पर्वा लेखक वा कवि करीत नाहीत. तशी पर्वा करूं नये असें नवें साहित्यशास्त्र सांगतें.

' पत्रव्यवहार ' म्हणून एक गोष्ट आहे. एका मुलीला आपल्याला कुणी पत्रें पाठवीत नाही म्हणून खंत वाटली. संताप आला. तिची आई म्हणाली, ' आपण दुसऱ्यांना पत्रें पाठविलीं नाहीत तर दुसरे आपल्याला कां पाठवितील ? ' मुलीला तें पटलें व तिने मैत्रिणीला, काकांना, मावस-बहिणीला पत्रें लिहिलीं. त्यांत मजकूर अगदी मामुली होता. पण पत्रें लिहून झाल्यावर तिला समाधान वाटलें. आता फक्त इतरांच्या पत्रांची वाट पहायची ! तिचें हृदय समाधानाने भरून आलें. झाली गोष्ट ! आपल्या अनुभूतीचा एक कण यांत लेखिकेने आविष्कृत केला आहे,

— ( विजया आपटे–छंद–जानेवारी, ५६ )

आणखी एक गोष्ट ऐका. एक कॉलेजकुमार होता. त्याच्या शेजारीं दोन बहिणी रहात असत. एकीने दुसरीला विचारलें, ' कालचा सिनेमा कसा होता ? ' दुसरी म्हणाली, ' बेस्ट होता, पण रडूं येतं. ' या उत्तराचं त्याला हसू आलें. कांही दिवसांनी त्याच्या ध्यानांत आलें की ती मुलगी आपल्या दाराच्या झरोक्यांतून याच्या खोलींत दोन-दोन तास पहात उभी असते. त्यानंतर परीक्षा संपल्यावर तो कॉलेजकुमार गावीं जाण्यास निघाला. फाटकांत ती उभी होती, पण तिच्याकडे त्याने पाहिलें नाही. रस्ता धरला. पुढे वळण आलें. वळतांनाही पाहिलें नाही. आणि वळण संपवलं ! गोष्टीचें नांव ' वळण.' —( मधु कुलकर्णी–छंद– जाने., ५६ )

अशा या कणिका निःसंकोचपणें लेखक लिहितात. आणि तितक्याच निःसंकोचपणें संपादक छापतात.

अशा प्रकारच्या कविताहि असतात,

" परीघ वाऱ्याचा, अडकला शिडांत रांडेच्या, गोळा रक्ताचा, वरती जगताचा. " अशी एक कविता आहे. तिचें नांव–' परीघ वाऱ्याचा '
—( पु. शि. रेगे–रचना–नोव्हें. ५४ )

दुसरी एक कविता—

" चांदोबा चांदोबा भागलास का ? पदरामागे लपणार का ? पदर आहे करवंदी, मनांतला वाडा चिरेबंदी, तोहि आता कोसळला ... "
—( अनामिक–रचना–नोव्हें., ५४ )

वरील लघुकथांप्रमाणेच अशा कविताहि निःसंकोचपणे रचल्या-छापल्या जातात.

हें लिखाण वाचून मनांत अनेक प्रश्न येतात. हे लेखक कशासाठी लिहितात. काय मनांत आलें म्हणून हे लेखणी उचलतात? हा कशाचा आविष्कार आहे? आविष्कार करण्याजोगें हें कांही आहे असें यांना वाटतें काय? या लेखनाला ते साहित्य मानतात की काय?

आम्ही आपली अनुभूति व्यक्त करतों, आमच्या भावानुभवांचा आविष्कार करतों, असें हे लेखक म्हणत असतात. आणि नवे टीकाकारहि याचेंच समर्थन करीत असतात. पण अनुभूति म्हणजे काय आणि तिचा आविष्कार करावयाचा म्हणजे काय, याचा थोडा विचार केला पाहिजे. एखाद्या कवीने एखादें झाड पाहिलें, आणि तो म्हणाला की, 'मीं झाड पाहिलें' तर हें वाक्य काव्य होईल काय? ही शब्दार्थाने अनुभूतीच आहे. मग तें काव्य कां होऊं नये? खायला मिळेना म्हणून आपल्या दोन अर्भकांसह एका स्त्रीने जीव दिला, नाना वेष घेऊन एका माणसाने अनेक सराफांना फसविलें, अमक्या गावीं दरोडा पडला, आईबाप लग्नाच्या आड आले म्हणून मुलगी पळून गेली, अशा तऱ्हेच्या बातम्या रोज वर्तमानपत्रांत येत असतात, त्यांना लघुकथा म्हणतां येईल काय? या सर्व बातमी पाठविणाराच्या अनुभूतीच असतात. मग त्या लघुकथा कां ठरूं नयेत?

साहित्य म्हणजे स्वानुभूतीचा आविष्कार असें म्हणतात त्या वेळीं 'अनुभूति' शब्दाला कांही विशिष्ट अर्थ असतो. झाड पाहिलें, सागर पाहिला, सतारीचे बोल ऐकले, निर्झर दृष्टीस पडला, भृंगावर लक्ष खिळून राहिलें, घट भरून चालला तरी तशीच उभी राहणारी तरुणी मनापुढे आली तर हीं दृश्यें पाहून कवीच्या मनांत जे अनेक विचारतरंग उठले, ज्या कल्पना, निर्माण झाल्या, त्याचे जे भाव प्रक्षुब्ध झाले ते कोठल्या तरी एका सूत्रांत गोवून त्याची एक घडण तयार करून, तो जेव्हा मांडतो तेव्हा त्याने अनुभूतीचा आविष्कार केला असें म्हणतात, आणि अशी कविता त्याने लिहिली म्हणजे त्याने कशाला लिहिले, असा प्रश्न मनांत येत नाही. 'सागरास', 'निर्झर', 'भृंग', 'घट भरे प्रवाही', 'केवढें क्रौर्य हें', 'सुवास', 'स्त्री आणि पुरुष', 'गोफण', 'सतारीचे बोल' या कविता अशा आहेत.

यांच्यामागची अनुभूति कांही विशेष आहे. आणि तिचा आविष्कार हा रम्य आहे. त्या अनुभवाला महत्त्व आहे आणि त्याच्या आविष्कारांत कांही सूत्र आहे. रचना आहे. म्हणजे अनुभव व आविष्कार हे शब्द विशेष अर्थाने येथे वापरले आहेत.

पण हे विशेष अर्थ नवकथाकाव्यांच्या कांही लेखकांना मान्य नाहीत असें दिसतें. मनांत जें येईल त्याला ते अनुभूति समजतात. आणि तें लिहून टाकलें की आविष्कार झाला असें त्यांना वाटतें. हे लोक कणवादी आहेत असें वाटतें. अनुभवाचा एखादा कण, एखादा अणु त्यांच्या मनांत येतो. आणि त्याचा विकास होण्याच्या आधीच, त्याचा जीविताशीं, मनांतल्या इतर अनुभवांच्या कणाशीं संबंध काय, त्या अणुरूप अनुभवाचा अर्थ काय हें त्यांचें त्यांच्या ध्यानीं येण्याच्या आधीच, ती स्वल्प अनुभूति, तो कण ते लोकांपुढे मांडून ठेवतात. आणि यालाच साहित्य असें ते नांव देतात.

पण अनुभवांच्या या कणांना, तुटक्या, फुटक्या, अर्थशून्य अनुभवांना काव्य म्हणत नाहीत, साहित्य म्हणत नाहीत हें त्यांच्या ध्यानांत येत नाही. साहित्य पदवी प्राप्त होण्यास अनुभूति संपूर्ण व सार्थ असावी लागते. ‘ एका भिक्षुकाने आपली लहानशी मुलगी एका म्हाताऱ्याला देण्याचा विचार केला ’ असें एखाद्याला दिसलें तर भाषेंतील साध्या अर्थाने ती अनुभूति आहे, पण साहित्याच्या अर्थाने नव्हे. ती कन्या, तिचा पिता, तो म्हातारा, यांच्या भावना, स्वार्थ, वासना, त्यांचे सामाजिक अर्थ, त्यामागल्या परंपरा, भिन्न गटांत त्याविषयी होणारी प्रतिक्रिया हें सर्व विश्व ज्याच्या मनांत उभें राहील व त्याची सुरम्य रचना जो करील त्यालाच अनुभूति झाली असें म्हणतात. त्यालाच कवि म्हणतात. पण नवे लेखक मुलगी रडते आहे, बाप रागावतो आहे, आई दुःखी झाली आहे एवढेंच पाहतील, तेवढेंच लिहितील, त्याचा कांही अर्थ सांगितला पाहिजे असें त्यांना मुळीच वाटणार नाही. आणि अशा अधांतरी सोडून दिलेल्या गुंतवळांना वेणी म्हणावें अशी अपेक्षा मनांत बाळगतील. पण लोकांना तसें वाटत नाही. ते म्हणतात, या गुंतवळांचा अर्थ काय ? हे कशाला फेकले आहेत ? नव्या लघुकथेची इतके दिवस ज्यांनी तरफदारी केली ते प्रा. वा. ल. कुळकर्ण्यांसारखे टीकाकारहि, “ आज नवकथेंत आणि थोड्याफार प्रमाणांत सर्व ललितवाङ्मयप्रकारांत

अर्थपूर्ण आशयाचें एवढें दारिद्र्य जाणवतें की तिचा अवतार कशासाठी आहे हेंच अनेकदा प्रामाणिकपणे विचार करूनहि लक्षांत येत नाही," असें म्हणूं लागले आहेत.

कण मनांत येतांच तो प्रसवावा, त्या अपूर्ण फुटक्या-तुटक्या प्रसवाकडे पाहूनच संतोष मानावा व ती आपली निर्मिति चारचौघांना आनंदाने दाखवावी अशी असल्या नवलेखकांची वृत्ति आहे. ते कणवादी आहेत, अणुवादी आहेत. क्षणिका, कणिका यांतच रमलेले आहेत, असें म्हणावेंसें वाटतें तें या अर्थाने.

ॲबर क्रोंबी, जॉन ड्युई यांसारख्या पंडितांनी या प्रवृत्तीवर बरीच टीका केली आहे. समग्र, सुसंगत, स्वयंपूर्ण अनुभव म्हणजेच कलात्मक अनुभव, अनुभव-मालिकांची मनोहर गुंफण म्हणजेच साहित्य असें यांचे म्हणणें आहे. सूर्य पाहिला ही अनुभूति नव्हे. तो ज्ञानेंद्रियावरचा संस्कार आहे. अनुभूति म्हणजे मनावरचा संस्कार आणि नुसता संस्कार नव्हे तर अनेक संस्कारमालिका व त्यांतून प्रतीत होणारा अर्थ. सूर्यास्त पाहून कांही प्रेमाचे, विषादाचे, दुःखाचे भाव मनांत येतील, ते येण्यास कांही पूर्वीच्या कारणपरंपरा असतील, त्यावरून भावी काळाविषयी विचार, कल्पना, हर्षामर्ष निर्माण होतील. जगाचें क्षणभंगुरत्व, अनंतत्व, विधात्याच्या सृष्टीची गूढता इ. तात्त्विक विचार मनांत येतील. या सर्वांची एक सुसूत्र, संबद्ध व कलापूर्ण अशी मांडणी म्हणजे काव्य किंवा साहित्य होय. अनुभूति सार्थ, साभिप्राय असली पाहिजे याचा अर्थ हा आहे. प्रत्यक्ष अनुभव व साहित्यांतील अनुभव यांत हा महत्त्वाचा फरक आहे. प्रत्यक्षांत आपण अनेक दृश्यें, अनेक घटना पाहतों. त्यांचा अर्थ पुष्कळ वेळां आपल्याला कळत नाही. तो अर्थ न कळण्याचें कारण एवढेंच की त्यांचा परस्परसंबंध आपल्याला उमगत नाही. म्हणून त्या घटना विस्कळित, तुटक्या व फुटीर आणि म्हणूनच अर्थशून्य अशा दिसतात. अशा घटनांना साहित्यांत स्थान नाहीं. साहित्यांतील दृश्यें, घटना कल्पना, विचार, तत्त्वें हीं सर्व परस्परबद्ध, एकजीव, एकसूत्र, एकरस असलींच पाहिजेत. तरच त्यांच्या अनुभूति सार्थ व साभिप्राय होतील. नवसाहित्य दुर्बोध असतें याचें कारण हें आहे की त्यांतील कणांची संहति झालेली नसते. संहति नाही, एकसूत्रता नाही

म्हणजे अर्थनिष्पत्ति नाही. रूपकथ्थककृत कथा, 'माणूस नांवाचें बेट' यासारखीं नाटकें हीं पाहिलीं म्हणजे हा काय रोग आहे याची कल्पना येईल. (प्रारंभीं उदाहरणें दिलीं आहेत तीं लहान कथांचीं, स्वल्प काव्यांचीं आहेत. आणि आज प्रामुख्याने तसल्याच साहित्याचें जें पीक येत आहे तेंच डोळ्यापुढे आहे. पण नवसाहित्यांतील अनेक दीर्घकथा, काव्यें व नाटकेंहि कणपुंजासारखींच असतात. त्यांचा परस्परसंबंध कांही नसतो. लेखकांनाच तो ज्ञात नसतो, आणि हीच अनुभूति असें त्यांना वाटत असतें. तेव्हा साहित्यिकांची कणदृक् वृत्ति हाच रोग आहे. लहान किंवा मोठें काव्य याला तितकेंसें महत्त्व नाही.) अबर क्रोंबीसारख्या साहित्यशास्त्रज्ञांच्या मतें तुटके अनुभव हें साहित्यच नव्हे. साहित्य ही नवनिर्मिति आहे म्हणजे त्यांतील प्रत्येक कण इतरांशीं संहत, बद्ध असलाच पाहिजे. नैय्यायिकांच्या मतेंहि मूळ परमाणूंचा परस्परसंबंध होऊं लागल्यावरच सृष्टि निर्माण होते. परमाणु विलग असतांना नाही. तेंच शास्त्रज्ञांच्या मतें साहित्याविषयी सत्य आहे. साहित्याच्या भिन्न घटकांत अंगांगीभाव, अवयव–अवयवीभाव स्पष्ट दिसला पाहिजे. अवयवाला स्वतंत्र अस्तित्वच त्यांत नसतें. तो अवयवीसाठी असतो. आणि अशी संहति झाली तरच वाणी अर्थभारवती होते. म्हणजे काव्यपदवीला पोचते. ही संहतिच पुष्कळशा नवसाहित्यांतून नष्ट होत चालली आहे. माणसें इंद्रियार्थसंनिकर्षालाच अनुभूति समजत आहेत आणि त्या अनुभूतीचे एक वा अनेक कण उधळून देत आहेत.

आरंभीं सांगितल्याप्रमाणे नवसाहित्याचा विचार करावा हा आजच्या लेखाचा उद्देश नाही. प्रारंभीं निर्देशिलेलें साहित्य हें केवळ लक्षण आहे. तें ज्या रोगाचें लक्षण आहे त्याचा विचार या लेखांत करावयाचा आहे.

१९४६ सालीं कॅांग्रेसने सत्ता हातीं येतांच प्रांतविकास योजना आंखली होती. चार वर्षांनी त्या कार्याचें परीक्षण करून त्यासंबंधी अभिप्राय द्यावा अशी डॉ. ग्यानचंद या अर्थपंडितांना सरकारने विनंती केली होती. तीप्रमाणे सर्व अभ्यास करून त्यांनी जें निवेदन सादर केलें त्यावरून समग्रदर्शनाचें सामर्थ्य आपल्या ठायी मुळीच नाही असें स्पष्ट दिसून येतें. डॉ. ग्यानचंद यांनी या योजनांच्या कार्यवाहींतील सर्वांत मोठा दोष दाखविला तो हा की अखिल भारत डोळ्यांपुढे ठेवून कोणी विचार करीत नाही.

प्रत्येक प्रांत व त्यांतील प्रत्येक खातें म्हणजे जणु निराळा स्वयंपूर्ण घटक आहे असें धरून कामें चाललीं आहेत. नवीन रस्त्यांची बांधणी पंजाब व बंगाल या प्रांतांत होणें अवश्य होतें. पण या प्रांतांत रस्त्यांवर एक-दोन कोटीच खर्च झाला असून उत्तर प्रदेशांत मात्र तेरा कोटी रुपये झाला. आसाम व मुंबई या प्रांतांत मोठे करखाने निघणें अवश्य होतें. पण त्या प्रांतांत त्यांच्या योजना सुद्धा नाहीत. पाटबंधाऱ्यावर सर्वांत जास्त खर्च मध्यप्रदेशांत होणें अवश्य होतें पण त्याच प्रांतांत यावर सर्वांत कमी खर्च झाला आहे. हें सर्व सांगून डॉ. ग्यानचंद म्हणतात, या सर्व कार्यक्रमांत एकसूत्रता अशी नाहीच. एका प्रांताचा दुसऱ्या प्रांताशीं संबंध नाही. आणि अखिल भारताचें समग्रदर्शन तर कोणालाच नव्हतें. सर्व प्रांत परस्परनिरपेक्ष काम करीत होते. कोणाला कोणाचा मेळ नव्हता. पंडित नेहरूंनी तर ग्यानचंद यांच्या पुस्तकाला प्रस्तावना लिहून तींत सांगितलें, की एकसूत्रतेचा, समग्रदर्शनाचा अभाव ग्यानचंद म्हणतात त्यापेक्षा किती तरी पट जास्त आहे. भारताचा विस्तार प्रचंड आहे. येथे नैसर्गिक संपत्ति विपुल आहे. पण या अफाट पसाऱ्यांतून अनेक घटकांना सूत्रबद्ध करून त्यांतून एक भारतमूर्ति निर्माण करण्याचें सामर्थ्य आपल्या ठायीं नाही.

आणि पुढल्या दहा वर्षांत तर आपला हा रोग वाढलाच आहे. नवकवि ज्याप्रमाणे एका क्षणाचा अत्यंत क्षुद्र, अत्यंत दरिद्री अनुभव उराशीं कवटाळून बसतात, समग्र जीवनांत त्यांचें स्थान कोणतें, इतर अनुभवांशीं त्याचा संबंध काय, त्यांच्या परस्पर क्रिया-प्रतिक्रिया काय होतील याचा विचार करीत नाहीत त्याचप्रमाणे आपल्या योजनांचे शिल्पकार कोठल्या तरी एका कणाचा विचार करून त्यावरूनच मत बनवून लगेच कार्याला लागतांना दिसतात.

शिक्षणक्षेत्रांतील भिन्न मतांकडे पाहा. विद्यापीठांतील शिक्षण दिवसें-दिवस अतिशय महाग होत चाललें आहे. त्यासाठी साह्य मागावयास तेथले अधिकारी गेले की, ‘ आमचें सर्व लक्ष प्राथमिक शिक्षणावर आहे, उच्च शिक्षणाचें आम्हांला महत्त्व वाटत नाही. ’ असें सरकार सांगतें. पण दुसऱ्या बाजूने विकासयोजनेसाठी अवश्य तेवढे तंत्रज्ञ आपल्या देशांत नाहीत, दहा हजार इंजिनियर आम्हांला लागतात, पण सात-आठशेच्या वर मिळतच

नाहीत अशी तक्रार सरकारचे अधिकारीच करीत असतात. आता प्रशाळा, महाविद्यालय, विद्यापीठ येथल्या शिक्षणावर भर दिल्यावांचून, त्याचें महत्त्व जाणवल्यावांचून तंत्रज्ञ व इंजिनियर कसे तयार व्हावयाचे असा प्रश्न आपल्या मनांत येतो, पण सरकारच्या मनांत तसा येत नाही. म्हणजे कणिका, क्षणिका लिहिणाऱ्या नवकवीप्रमाणेच या दोन स्वतंत्र अनुभूति आहेत. प्राथमिक, साध्यमिक, विद्यालयीन शिक्षण-त्यांतून तयार होणारे तंत्रज्ञ, विकास-योजनांचा व्याप, त्यासाठी अवश्य असणाऱ्या तज्ज्ञ, कर्तबगार, निपुणांची आवश्यकता हें सर्व चित्र एका आलोकांत सामावून त्यांतील या घटकांचे परस्परसंबंध जाणावे हें सामर्थ्य आमच्यामध्ये नाही असें यावरून दिसतें. आम्हांला क्षण दिसतो, कण जाणवतो. आणि तेवढ्यांतच पूर्णता अनुभवि-ल्याचा आनंद प्राप्त होतो.

शेतीच्या पाण्यासाठी बांधलेल्या धरणांची हकीकत म्हणजे अशीच कणिका आहे. गेल्या दोन वर्षांत वर्तमानपत्रांतून पांच-सहा वेळां तरी बातम्या आल्या की, धरणाचें पाणी शेतकरी घेईनात म्हणून शेवटीं कोट्यवधि घनफूट पाणी परत नदींत सोडून द्यावें लागलें. धरण बांधण्यापूर्वी सरकारने हिशेब जाहीर केले होते की या तलावाने एक लाख एकर जमीन भिजेल, त्याने दोन लाख भिजेल. पण प्रत्यक्षांत दोन-चार हजार एकरां-पलीकडे जमीन भिजली नाही, कारण पाण्याचे दर परवडेनात म्हणून शेतकऱ्यांनी पाणी घेण्याचें नाकारलें; आणि शेवटीं सरकारला धरणांतलें पाणी सोडून द्यावें लागलें. याचा अर्थ काय ? याचा अर्थ असा की या विषयांतले सर्व घटक विचारांत न घेतां इंजिनियरांनी धरणाच्या पायाची कुदळ टाकली. ज्यांची जमीन भिजावयाची त्या शेतकऱ्यांची कुवत काय, त्यांना पाण्याचे दर परवडणें शक्य आहे की नाही, नसल्यास काय करावयाचें, त्या दृष्टीने मोठी योजना आखण्यापेक्षा लहान लहान योजना हातीं घेणें जास्त फायद्याचें व व्यवहार्य होईल किंवा कसें, पाण्याची शेती करण्या-साठी त्या शेतकऱ्यांचें मन वळविणें, तसलीं पिकें काढण्यासाठी त्यांना कांही शिक्षण देणें किती अवश्य आहे याचा समग्र हिशेब न करतां स्फूर्ति आल्याबरोबर कार्याला प्रारंभ केल्याचीं हीं लक्षणें आहेत. आणि त्यामुळे इकडे शेतकरी दरिद्री, भुकेला, त्याच्या जमिनी कोरड्या, ओसाड आणि

लक्षावधि रुपये खर्चून तलावांत साठविलेलें कोट्यवधि गॅलन पाणी सरकार नदींत सोडून देत आहे, आणि तें कोरड्या जमिनीशेजारून शेतकऱ्यांच्या अश्रूसह वहात आहे, असें विपरीत दृश्य सुजला व सुफला अशा आपल्या भूमींत ठायीं ठायीं दिसत आहे. मागल्या क्षणाला जें घडलें, सध्याच्या क्षणीं जें घडत आहे व पुढल्या क्षणाला जें घडणार आहे त्याचा संबंध जोडण्याचें सामर्थ्य हें मनुष्यबुद्धीचें पहिलें लक्षण. हें सामर्थ्य जेथे जास्त विकसित झालेलें असतें तेथला समाज जास्त प्रगत झालेला असतो. या निकषावर घासतां आपला समाज कोणच्या पातळीवर येईल याचा विचार आपण केला पाहिजे.

दिक्कालांचा व्यापक आलोक आणि समाजाचें सामर्थ्य याचा संबंध काय आहे हें चौदाव्या पंधराव्या शतकांतला हिंदुस्थानचा इतिहास पाहिला असतां थोडेंसें कळून येईल. त्या वेळीं हिंदुसमाज, मुस्लीमसमाज व नुकताच यथे येऊं घातलेला पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्रज यांचा युरोपीय समाज असे तीन समाज स्पर्धाक्षेत्रांत उतरले होते. त्यांतील हिंदुसमाज हा स्वतःच्या देशाबाहेर किंवा प्रांताबाहेरहि न गेलेला, जगाची कसलीहि कल्पना नसलेला, स्वतःचा इतिहासहि न जाणणारा असा दिक् व काल या दोन्ही दृष्टींनी पूर्ण क्षणवादी व कणवादी होता. मुसलमान हा या दृष्टीने त्याच्यापेक्षा किती तरी श्रेष्ठ होता. अरबस्तान, तुर्कस्तान, मध्य आशिया येथपर्यंत तो हिंडत असे. धर्माच्या व स्वारीच्या निमित्ताने तो तेथून भारतांत व भारतांतून बाहेर दौडत होता आणि दिल्लीला राज्य करीत असतांनाहि एवढा सगळा भूखंड त्याच्या आलोकांत सतत उभा असे. मोगलांच्या सैन्यांत तुर्कस्थानांतील लढाया लढलेले, युरोपीय समाजाशीं परिचित असलेले, आशियांतून फिरून आलेले असे अनेक सैनिक व सरदार असत. तशी व्यापक दृष्टि असलेला एकहि सरदार वा सेनापति त्या वेळीं भारतांत नव्हता. हीच गोष्ट इतिहासज्ञानाविषयी. अल्बेरुणीसारखे इतिहासकार अकराव्या शतकांतच मुस्लीम समाजांत होते. अबुल फाजल व फैजी हे यासाठीच प्रसिद्ध होते. बाबर, सेलीम यांनी आत्मचरित्रें लिहून ठेविलीं आहेत. अकबराच्या पदरीं बदाऊनी हा इतिहासकार होता. यावरून हें निश्चित दिसतें की, मुस्लीम समाजाचे नेते, त्यांतले समाजधुरीण हे तत्कालीन भारतीय नेत्यांपेक्षा जास्त जग पाहिलेले, व जास्त कालखंडावर दृष्टिक्षेप करण्याचें सामर्थ्य असलेले असे होते. प्रारंभीच्या शंभर

दोनशे वर्षांत सारा उत्तर हिंदुस्थान त्यांनी पादाक्रान्त केला याच्या अनेक कारणांपैकी हें एक निश्चित कारण आहे. याच्या पुढची इयत्ता इंग्रजांची होती. ते तर चारहि खंडांत जमिनीवरून, पाण्यावरून हिंडले होते. त्यांनी समुद्राचा ठाव घेतला होता. आकाशाचे अंतरंग भेदलें होतें. इतिहासाचें त्यांचें ज्ञान असेंच होतें. सीझरच्या काळापासून लिहिलेलीं आत्मचरित्रें त्यांना उपलब्ध होतीं. तारीखवार इतिहासाची नोंद करून त्यावर भाष्य करण्याची कलाहि त्यांनी अभ्यासिली होती. त्यांनी भारतांत अपूर्व विजय मिळविले आणि हिंदू, मुस्लीम, शीख या सर्वांनाच चीतपट मारलें यांत नवल कसलें? पाश्चात्त्यांचें भौतिक ज्ञान, त्यांची राष्ट्रनिष्ठा, त्यांची संघशक्ति यांतच त्यांचें सामर्थ्य होतें यांत शंका नाही. पण जगाविषयीचें– भूगोलाचें व इतिहासाविषयीचें त्यांचें ज्ञान, एका आलोकांत तीनहि खंडें सामावण्याचें त्यांचें सामर्थ्य हेंहि त्यांना साहाय्यभूत झालें हें नाकारतां येणार नाही. किंबहुना या त्यांच्या सामर्थ्यामुळेच वरील संपदांची त्यांना प्राप्ति झाली असेंहि कांही पंडितांचें मत आहे. आणि या त्यांच्या संपन्नतेंतूनच समग्रदर्शनाची शक्ति त्यांच्या ठायी निर्माण झालेली आहे. एखादी योजना आखावयाची, एखादी घडण घडवावयाची, एखादी संस्था स्थापावयाची तर त्यासंबंधीचे सर्व संलग्न घटक पाश्चात्यांच्या दृष्टिक्षेपांत एकदम येतात. त्यांचे कार्यकारण संबंध, त्या कृतीचे भावी परिणाम, यशाच्या मार्गांत येणारे संभाव्य व्याघात या सर्वांचा आटोप त्यांच्या बुद्धीला आहे. त्या नव्या सृष्टीचें समग्र चित्र तें कल्पनेने आधी पाहूं शकतात. आणि याच शक्तीचा अभाव हें भारती मनाचें दारुण वैक्लव्य आहे. आपण कणदृक् झालों आहों. क्षणजीवी झालों आहों.

सौजन्यमूर्ति श्री. बाळासाहेब खेर यांनी इंग्रजीच्या अध्ययनाला कात्री लावली त्या वेळीं त्यांनी कणिकेच्या जातीचेंच नवकाव्य केलें यांत शंका नाही. हा कायदा करतांना त्यांनी कोणचा विचार केला होता? इंग्रजीचें वा कोणत्याहि परभाषेचें अध्ययन चार वर्षांत होऊं शकेल हें खरें आहे. पण त्यापूर्वी मातृभाषेचें अध्ययन अत्यंत कसोशीने पूर्ण झालें असलें तरच हें शक्य असतें. एका भाषेची घडण उत्तम समजली, त्या भाषेचें व्याकरण, वाक्यरचना, तिची प्रकृति, वाक्प्रचार यांचा उत्तम परिचय झाला तरच मग दुसरी

भाषा शिकणें सुलभ जातें. पण अशा तऱ्हेची कसलीहि व्यवस्था न करतां एकदम इंग्रजीचें अध्ययन सौजन्यमूर्तींनी बरबाद करून टाकलें. त्याचे पुढे परिणाम काय होतील याचाहि विचार त्यांनी केला नाही. स्थापत्य, विज्ञान, वैद्यक यांचें अध्ययन इंग्रजींतून चालू आहे. सरकारच्या व इतर मोठमोठ्या संस्थांच्या परीक्षा इंग्रजींतून व्हावयाच्या. असें असतांना आपल्या मुलांचें इंग्रजी तोडलें तर तीं मागे पडतील, या मुलांच्या ज्ञानाला कस राहणार नाही, त्यांच्या उत्कर्षाचा मार्ग रोधला जाईल व अशा रीतीने महाराष्ट्राचा सर्वस्वी घात होईल हें भवितव्य बाळासाहेबांना दिसूं शकलें नाही. आज तो घात झालेला डोळ्यांना दिसत असल्यामुळे चिडून जाऊन याच हेतूने बाळासाहेबांनी आमचें इंग्रजी तोडलें असा आरोप अनेक पंडित त्यांच्यावर करतात. असा आरोप टिकणें कठिण आहे. पण तो हेतु नव्हता तर मग पाहिलाच प्रश्न उद्भवतो. इंग्रजीच्या अध्ययनाला कात्री लावण्याने काय परिणाम घडतील, ते घडूं नयेत म्हणून काय व्यवस्था करणें अवश्य आहे याचा समग्र विचार त्या मंत्रिमंडळाने केला होता काय? केला नव्हता हें स्पष्ट आहे. तें सामर्थ्यच आमच्यांत उरलेलें नाही. कणाच्या अनुभूतीचा त्या क्षणींच आविष्कार करावा, आणि हृदय समाधानाने भरून यावें अशी आमची वृत्ति आहे.

खादीचें उत्पादन, सर्वोदयाचा ग्रामोद्योग, अन्नधान्याचें उत्पादन हीं सर्व अशींच दुर्बोध, गहन, रहस्यमय क्षणकाव्यें आहेत. दिल्लीच्या गांधी-आश्रमाचे अध्यक्ष आचार्य कृपालानी यांनी परवा जाहीर केलें की खादीचा उठाव होत नसल्यामुळे अंबर चरख्याचें उत्पादन सध्या स्थगित केलें आहे. त्याच वेळीं त्याच दिल्लींतील ग्रामोद्योगभवनाचे डायरेक्टर रामनाथ टंडन यांनी सांगितलें की, खादीचा पुरवठा कसा करावा अशी आम्हांला चिंता पडली आहे. अंबर चरख्याचीं वर्णनें येतात यावरून ही एक कामधेनु असावी असें वाटूं लागतें. साध्या चरख्यापेक्षा अडीच तीन पट सूत त्यावरून निघतें तेव्हा याच्या साह्याने राष्ट्रांतील बेकारीचा प्रश्न आपण सोडवूं अशी त्या क्षेत्रांतील कार्यकर्त्यांची श्रद्धा आहे. अशा या कामधेनूची निपज अध्यक्षांनी स्थगित करून टाकली; कारण मालाचा उठाव नाही. आणि टंडन म्हणतात मालच नाही. मागणीइतका पुरवठा करतां येत नाही! आता या दोन अगदी स्वतंत्र

अशा आत्मनिष्ठ अनुभूति आहेत असें दिसत नाही काय? खादीचा पुरवठा किती आहे, खप किती आहे, हा सगळा हिशेब दिल्लींतल्या दिल्लींत मिळवून मग अंबर चरख्याचें उत्पादन बंद करावयाचें की काय हें ठरवितां आलें असतें. पण या गोष्टी कृपलानी किंवा टंडन यांना वस्तुनिष्ठ वाटतच नसाव्या. त्यांच्या मतें हें सर्व व्यक्तिगत भावानुभाव असावे. यामुळेच खादीविषयीच्या सर्व प्रश्नांचा विचार परस्परसंबद्ध अशा सूत्राने करावा असे त्यांना वाटलें नाही. म्हणून आपल्या भावानुभावाप्रमाणे त्यांनी आविष्कार केला. यालाच साहित्यशास्त्रांत ' रोमँटिसिझम् ' म्हणतात.

मूलोद्योग-शिक्षण हा एक असाच प्रकार आहे. त्याचा पुरस्कार करण्यामागचा गांधीजींचा हेतु, बौद्धिक विषयांशीं त्याचा संबंध, त्यावर सध्या होणारा खर्च, त्यामुळे मुलांच्या मनावर होणारे संस्कार यांचा कांही परस्पर संबंध असेल अशी सध्यांच्या व्यवस्थेवरून शंकासुद्धा येणार नाही. प्राथमिक शिक्षण सर्वांना मिळालें पाहिजे; पण त्या शिक्षणाचा खर्च आपल्याला झेपणार नाही; म्हणून मुलांनी कांही उद्योग करून पैसा निर्माण करावा व त्यांतून शिक्षकांचा पगार, पाट्या, पुस्तकें इत्यादींचा खर्च भागवावा ही मूळ कल्पना. पण आता ते सर्व दृष्टीआड झालें आहे. व या मूलोद्योगासाठीच वाटेल तसा पैसा खर्च होत आहे. त्याचप्रमाणे या मूलोद्योगांनी इतिहास, गणित साहित्य या विषयावर आक्रमण करून त्यांना कोपऱ्यांत ढकलून दिलें आहे. म्हणजे या विषयांच्या अध्ययनासाठी मूलोद्योग हें साधन म्हणून होतें. आता मूलोद्योग हा एक स्वतंत्र आनंद झाला आहे. तेंच अंतिम झालें आहे. तोच प्रकार सर्वोदयाचा आहे. आश्रमांतून जे हस्त-व्यवसाय चालतात त्यांचा खर्च भागून त्यांतून कांही शिल्लक पडावी व त्या लोकांच्या उपजीविकेची सोय व्हावी असा कांही यामागे हेतु असावा असें लोकांना वाटतें. पण तसा कांही एक प्रकार नाही. सर्वोदयाश्रम चालावे म्हणून सरकारलाच कोट्यवधि रुपये खर्च करावे लागतात. म्हणजे हेतु, कृति व फळ यांचा कांहीहि संबंध राहिलेला नाही. आणि हेच आपलें सध्याचें लक्षण आहे. दोन गोष्टींचा संबंध जोडणें याचेंच आपल्याला वावडें आहे. या क्षणाचा त्या क्षणाशीं, या कणाचा त्या कणाशीं संबंधच नाही, सर्व स्वतंत्र, स्वयंपूर्ण, केवल व आत्मतृप्त असें आहे.

या कणनिष्ठ, क्षणनिष्ठ वृत्तीचा अगदी कळस झालेला दिसतो तो आपल्या राष्ट्रविकास योजनांमध्ये. हें युग नियोजनाचें आहे. समाजाचें आर्थिक, सामाजिक व राजकीय व्यवहार यांवर पूर्वकालीं कसलेंच नियंत्रण नव्हतें. यदृच्छया ते चालतील तसे चालतील अशी पूर्वींची स्थिति होती. आता आपण त्यांचें नियंत्रण करून आपण आखलेल्या रुळांवरूनच हा गाडा चालवावयाचा असा मनसुबा रचला आहे. पावसाचें पाणी यदृच्छेने वाटेल तेव्हा, वाटेल तेथे, वाटेल त्या प्रमाणांत पडतें. त्यावर बंधन कसलेंच नाही. त्यामुळे अतिनुकसान होतें. तेव्हा धरणें बांधून तें साठवून ठेवावयाचें आणि आपल्याला हवें तेव्हा, हवें तेथे आणि हवें त्या प्रमाणांत वापरावयाचें हें नियोजनाचें साधें उदाहरण आहे. हेंच धोरण सामाजिक व्यवहाराला लावलें की राष्ट्रविकासाचें नियोजन झालें. आता धरणाच्या उदाहरणावरून असें ध्यानांत येईल की पाण्याचें नियंत्रण करावयाचें तर तें सर्व बाजूने केलें पाहिजे. एका बाजूला भिंत बांधली पण अन्यत्र कोठे दोन टेकड्यांमधून किंवा इतर मार्गाने पाण्याला वाट मिळत राहिली तर त्या भिंतीचा आत्मानंदाखेरीज दुसऱ्या कशालाहि उपयोग होणार नाही. आपलीं सर्व नियोजनें अशीं चालू आहेत. आर्थिक व्यवहाराचें कोणचेंहि नियोजन करावयाचें तर प्रथम भावनियंत्रण केलें पाहिजे. विशेषतः शेतकऱ्याने निर्माण केलेल्या अन्नधान्याच्या भावाचें नियंत्रण फारच कडकपणें केलें पाहिजे. त्यामुळे इतर सर्व किंमती स्थिरावतात, शेतकऱ्याला शाश्वती मिळते व तो कष्टाला तयार होतो. या धान्यभावनियंत्रणाच्या पायावरच नव्या सृष्टीची सर्व इमारत उभी रहावयाची असते; आणि नेमका तो पायाच आपल्याकडे अभावरूपानें आहे. यामुळे एकीकडे साठविलेले पाणी दुसरीकडून वाहून जात आहे. धरणाच्या भिंती कोसळत आहेत आणि त्यामुळे योजनावर योजना होऊनहि बेकारी वाढत आहे. अन्नाची तूट पडून तें परदेशाहून आणावें लागत आहे, कर वाढत आहेत, प्रांतिक सरकारें डळमळत आहेत, व लोक हैराण झाले आहेत. पण याशिवाय दुसरें कांही होणेंच शक्य नाही. पायाच नाही तेथे इमारत डळमळली तर आश्चर्य कसलें! पण नियोजन आणि भावनियंत्रण यांचा परस्परसबंध लक्षांत घ्यावयाचें सामर्थ्यच येथे शिल्लक राहिलेलें नाही त्याला काय करावयाचें! तुटीच्या अर्थसंकल्पाचा

हाच प्रकार आहे. तुटीचा अर्थसंकल्प, म्हणजे भांडवल–पुरवठ्याच्या हेतूने वाजवीपेक्षा जास्त नोटा छापणें. पण हा खेळ अत्यंत धोक्याचा आहे. निष्ठुर भावनियंत्रण व आयात–निर्यातीचा कडक बंदोबस्त यांवांचून तुटीचा अर्थसंकल्प म्हणजे राष्ट्रीय संसारांत गंमतीने आगकाडीचा खेळ खेळण्यासारखेंच आहे. हिटलरच्या जर्मनीने हा खेळ अत्यंत यशस्वीपणे करून दाखविला; पण हिटलरी शिस्तीच्या व कठोर दंडनाच्या अभावीं आपण तोच खेळ करण्याची उमेद बाळगली आहे ! साहित्यांतील रोमँटिसिझम् म्हणजे स्वच्छंदवाद म्हणजेच स्वैर, अनिर्बंध आत्माविष्कार आपण अशा रीतीने जीवनांत आणला आहे.

आपल्या देशाचा सामाजिक, आर्थिक सर्वच कारभार असा कणदृष्टीने चाललेला पाहून मनाला खेद होतो व आपल्या भवितव्याविषयी चिंता वाटते. पण त्याहिपेक्षा जास्त चिंता आपल्या शालेय शिक्षणाकडे पाहून वाटते. व्यापक आलोक, समग्रदर्शन यांचें सामर्थ्य शालेय शिक्षणांतील कांही विषयांतून विद्यार्थ्यांना प्राप्त व्हावयाचें असतें. विद्यार्थ्यांना इतिहास, इंग्रजी, मराठी भाषा, नागरिकशास्त्र या विषयांत विचारांची मांडणी करावयास शिकावयाचें असतें. ‘ मराठेशाही कशाने बुडाली ? ’ याविषयी केळकर कांही मत मांडतात. तें विद्यार्थ्यांनी समजून घेऊन परीक्षेंत लिहावें अशी अपेक्षा असते. आता तें मत मांडावयाचें म्हणजे विषयाचा ४०।५० ओळी तरी विस्तार करणें अवश्य असतें. केळकर प्रथम इतरांचीं मतें सांगतात, त्यांचें खंडन करतात, मग आपलें मत सांगतात, तें बरोबर ठरण्यासाठी प्रमाणें देतात. एवढा सलग विचार विद्यार्थ्यांना बुद्धींत सामावतां आला पाहिजे. पण मराठीच्या प्रश्नपत्रिकेंत हा विचार ८ किंवा १० ओळींत लिहावयास सांगतात. महाभारताची थोरवी, शिवरामपंतांचें वाङ्मयीन श्रेष्ठत्व यांचीं उत्तरें ७।८ ओळींत लिहा असें एस्. एस्. सी.च्या विद्यार्थ्यांना सांगितलेलें असतें. तिसरी-चवथींत विद्यार्थी आला म्हणजे त्याला झाड, सूर्य, हत्ती अशा विषयावर ८।१० ओळी लिहावयास सांगतात. पांचवी सहावीमध्ये मातेची थोरवी, खेळाचें महत्त्व हे विषय देतात. आणि ओळींचें प्रमाण थोडें वाढतें. अशा क्रमाने अकरावीच्या अखेर एका विषयासंबंधी परस्परसंबद्ध असे ४।५ विचार म्हणजे

या कणनिष्ठ, क्षणनिष्ठ वृत्तीचा अगदी कळस झालेला दिसतो तो आपल्या राष्ट्रविकास योजनांमध्ये. हें युग नियोजनाचें आहे. समाजाचे आर्थिक, सामाजिक व राजकीय व्यवहार यांवर पूर्वकालीं कसलेंच नियंत्रण नव्हतें. यदृच्छया ते चालतील तसे चालतील अशी पूर्वींची स्थिति होती. आता आपण त्यांचें नियंत्रण करून आपण आखलेल्या रुळांवरूनच हा गाडा चालवावयाचा असा मनसुबा रचला आहे. पावसाचें पाणी यदृच्छेने वाटेल तेव्हा, वाटेल तेथे, वाटेल त्या प्रमाणांत पडतें. त्यावर बंधन कसलेंच नाही. त्यामुळे अतिनुकसान होतें. तेव्हा धरणें बांधून तें साठवून ठेवावयाचें आणि आपल्याला हवें तेव्हा, हवें तेथे आणि हवें त्या प्रमाणांत वापरावयाचें हें नियोजनाचें साधें उदाहरण आहे. हेंच धोरण सामाजिक व्यवहाराला लावलें की राष्ट्रविकासाचें नियोजन झालें. आता धरणाच्या उदाहरणावरून असें ध्यानांत येईल की पाण्याचें नियंत्रण करावयाचें तर तें सर्व बाजूने केलें पाहिजे. एका बाजूला भिंत बांधली पण अन्यत्र कोठे दोन टेकड्यांमधून किंवा इतर मार्गाने पाण्याला वाट मिळत राहिली तर त्या भिंतीचा आत्मानंदाखेरीज दुसऱ्या कशालाहि उपयोग होणार नाही. आपलीं सर्व नियोजनें अशीं चालूं आहेत. आर्थिक व्यवहाराचें कोणचेंहि नियोजन करावयाचें तर प्रथम भावनियंत्रण केलें पाहिजे. विशेषतः शेतकऱ्याने निर्माण केलेल्या अन्नधान्याच्या भावाचें नियंत्रण फारच कडकपणें केलें पाहिजे. त्यामुळे इतर सर्व किंमती स्थिरावतात, शेतकऱ्याला शाश्वती मिळते व तो कष्टाला तयार होतो. या धान्यभावनियंत्रणाच्या पायावरच नव्या सृष्टीची सर्व इमारत उभी रहावयाची असते; आणि नेमका तो पायाच आपल्याकडे अभावरूपानें आहे. यामुळे एकीकडे साठविलेले पाणी दुसरीकडून वाहून जात आहे. धरणाच्या भिंती कोसळत आहेत आणि त्यामुळे योजनावर योजना होऊनहि बेकारी वाढत आहे. अन्नाची तूट पडून तें परदेशाहून आणावें लागत आहे, कर वाढत आहेत, प्रांतिक सरकारें डळमळत आहेत, व लोक हैराण झाले आहेत. पण याशिवाय दुसरें कांही होणेंच शक्य नाही. पायाच नाही तेथे इमारत डळमळली तर आश्चर्य कसलें ! पण नियोजन आणि भावनियंत्रण यांचा परस्परसंबंध लक्षांत घ्यावयाचें सामर्थ्यच येथे शिल्लक राहिलेलें नाही त्याला काय करावयाचें ! तुटीच्या अर्थसंकल्पाचा

हाच प्रकार आहे. तुटीचा अर्थसंकल्प, म्हणजे भांडवल–पुरवठ्याच्या हेतूने वाजवीपेक्षा जास्त नोटा छापणें. पण हा खेळ अत्यंत धोक्याचा आहे. निष्ठुर भावनियंत्रण व आयात–निर्यातीचा कडक बंदोबस्त यांवांचून तुटीचा अर्थसंकल्प म्हणजे राष्ट्रीय संसारांत गंमतीने आगकाडीचा खेळ खेळण्यासारखेंच आहे. हिटलरच्या जर्मनीने हा खेळ अत्यंत यशस्वीपणे करून दाखविला; पण हिटलरी शिस्तीच्या व कठोर दंडनाच्या अभावीं आपण तोच खेळ करण्याची उमेद बाळगली आहे ! साहित्यांतील रोमॅंटिसिझम् म्हणजे स्वच्छंदवाद म्हणजेच स्वैर, अनिर्बंध आत्माविष्कार आपण अशा रीतीने जीवनांत आणला आहे.

आपल्या देशाचा सामाजिक, आर्थिक सर्वच कारभार असा कणदृष्टीने चाललेला पाहून मनाला खेद होतो व आपल्या भवितव्याविषयी चिंता वाटते. पण त्याहिपेक्षा जास्त चिंता आपल्या शालेय शिक्षणाकडे पाहून वाटते. व्यापक आलोक, समग्रदर्शन यांचें सामर्थ्य शालेय शिक्षणांतील कांही विषयांतून विद्यार्थ्यांना प्राप्त व्हावयाचें असतें. विद्यार्थ्यांना इतिहास, इंग्रजी, मराठी भाषा, नागरिकशास्त्र या विषयांत विचारांची मांडणी करावयास शिकावयाचें असतें. ' मराठेशाही कशाने बुडाली ? ' याविषयी केळकर कांही मत मांडतात. तें विद्यार्थ्यांनी समजून घेऊन परीक्षेंत लिहावें अशी अपेक्षा असते. आता तें मत मांडावयाचें म्हणजे विषयाचा ४०।५० ओळी तरी विस्तार करणें अवश्य असतें. केळकर प्रथम इतरांचीं मतें सांगतात, त्यांचें खंडन करतात, मग आपलें मत सांगतात, तें बरोबर ठरण्यासाठी प्रमाणें देतात. एवढा सलग विचार विद्यार्थ्यांना बुद्धींत सामावतां आला पाहिजे. पण मराठीच्या प्रश्नपत्रिकेंत हा विचार ८ किंवा १० ओळींत लिहावयास सांगतात. महाभारताची थोरवी, शिवरामपंतांचें वाङ्मयीन श्रेष्ठत्व यांचीं उत्तरें ७।८ ओळींत लिहा असें एस्. एस्. सी.च्या विद्यार्थ्यांना सांगितलेलें असतें. तिसरी-चवथींत विद्यार्थी आला म्हणजे त्याला झाड, सूर्य, हत्ती अशा विषयावर ८।१० ओळी लिहावयास सांगतात. पांचवी सहावीमध्ये मातेची थोरवी, खेळाचें महत्त्व हे विषय देतात. आणि ओळीचें प्रमाण थोडें वाढतें. अशा क्रमाने अकरावीच्या अखेर एका विषयासंबंधी परस्परसंबद्ध असे ४।५ विचार म्हणजे

सुमारें ५० ओळी त्याने लिहाव्या अशी अपेक्षा असते. आणि ७-८ वर्षांपूर्वी असेच प्रश्न असत. पण आता क्षणिकेच्या लाटेंत शिक्षणतज्ज्ञहि सापडलेले दिसतात. परस्परसंबद्ध वाक्यें म्हणजे परिच्छेद. तो ६ वी ७ वींत शिकविला जातो. त्यानंतर परस्परसंबद्ध परिच्छेद म्हणजे निबंध ही विचार मांडण्याची पद्धति चारपांच वर्षांत विद्यार्थ्यांना अवगत व्हावी. व्यापक आलोकांचें, समग्र दर्शनाचें सामर्थ्य यांतूनच विकसित व्हावयाचें असतें. पण सध्याच्या शिक्षणतज्ज्ञांनी मुळावरच घाव घातला आहे. बुद्धाच्या उपदेशाचीं मुख्यतत्त्वें कोणतीं? विशाल भारत म्हणजे काय? अशा चार प्रश्नांचीं उत्तरें लिहावयाचीं व त्याला आठ गुण मिळावयाचे. म्हणजे बुद्धाचीं तत्त्वें ४।५ ओळींत लिहावीं अशीच अपेक्षा असणार! डुप्ले, कॅनिंग यांच्याविषयी माहिती मुलांनी अशीच ६-७ ओळींत द्यावयाची असते. वास्तविक बुद्ध, डुप्ले, कॅनिंग, शंकराचार्य यांच्याविषयी ७-८ ओळी लिहिण्याची तयारी ७ वी ८ वींतच व्हावयास पाहिजे. पूर्वी म्हणजे ८-१० वर्षांपूर्वी असेंच धोरण असे. आता विद्यार्थ्यांच्या डोक्यांत ठेचून ज्ञान भरण्याचें धोरण आहे. त्यामुळे परस्परसंबद्ध असे चार-पांच विचार पेलणें हें जें शिक्षणाचें एक साध्य तें विद्यार्थ्यांच्या आवाक्याबाहेर जात आहे. परस्परसंबद्धतेचा, कार्यकारणनिबद्धतेचा, पूर्वापरबंधनाचा आपल्याला सध्या वीट आलेला आहे असें दिसतें. आपल्याला क्षणिका आणि कणिका प्रिय झाल्या आहेत. दोन-चार, दहा-वीस विचारकण एकत्र आणून त्यांची गुंफण करण्याचें आपल्याला महत्त्व वाटेनासें झालें आहे.

एस्. एस्. सी.च्या इंग्रजीच्या प्रश्नपत्रिकेंत तर उत्तरें चार-पांच वाक्यांतच लिहा असें सांगितलेलें असतें. मुलांना इंग्रजी मुळीच येणार नाही अशी परीक्षकांची खात्री होत चालली आहे. पण तसें झाल्यामुळे उत्तरांची मर्यादा कमी करण्याचें कारण नव्हतें. पण तशा रचनेचें महत्त्वच हल्ली कोणाला वाटत नाही याचें हें द्योतक आहे. परीक्षापद्धतींत आणखी एक प्रकार आहे. त्यांत प्रश्नाचीं उत्तरें 'होय' किंवा 'नाही' एवढीच लिहावयाचीं असत. म्हणजे वाक्यरचनेची सुद्धा कटकट संपली. आणि कणनिष्ठा अगदी पूर्णतेस गेली. अजून एस्. एस्. सी.च्या प्रश्नपत्रिकेंत या पद्धतीचा प्रवेश झालेला नाही. पण कालौघ पाहतां लवकरच तो होण्याचा संभव आहे.

परीक्षांतील प्रश्नपद्धतीवर असा आक्षेप घेतला की कणिकापक्षाचे पंडित सांगतात की दीर्घरचनेच्या अभ्यासासाठी निबंध ठेवलेलाच आहे. निबंध पंचवीस ओळींचा असतो त्यांत तुम्हीं समाधान मानावें. पण या निबंधरचनेच्या शिक्षणाची शाळाकॉलेजांत काय परवड चाललेली आहे तें ज्याने पाहिलें तो असें उत्तर देण्याचें धाडस करणार नाही. अनेक शाळांत स्वतंत्रपणे निबंधलेखन शिकविण्याची सोय नसते. जेथे असते तेथे कोठल्या तरी शिक्षकाकडे तें दिलेलें असतें. २७, २८ तास इतिहास, भूगोल, गणित, विज्ञान यांचे आणि राहिलेले दोन तास कोठल्या तरी तुकडीचे इंग्रजी निबंधलेखन अशी व्यवस्था असते. हा विषय कोणालाहि येतो असें तरी चालकांचें मत असलें पाहिजे किंवा नाही शिकवला तरी चालेल, असें तरी त्यांना वाटत असलें पाहिजे. कॉलेजा-मध्येहि अशीच स्थिति आहे. बी. ए. च्या परीक्षेंत २५ गुण इंग्रजी निबंधाला असतात. पण त्यासाठी एकहि तास नसतो. मराठीची हीच परवड पूर्वी होती. सध्या एक तास त्यासाठी दिला जातो. तेव्हा निबंधाचा हवाला देण्याला कितपत अर्थ आहे हें सहज कळून येईल.

वास्तविक निबंध, प्रबंध, ग्रंथ यांची रचना हा मानवी बुद्धीचा प्रकर्ष आहे. बुद्धीच्या विकसित सामर्थ्याचें निबंधरचना हें गमक आहे. विद्यार्थ्यांच्या बुद्धीचें सामर्थ्य वाढविणें हें शिक्षणाचें कार्य आहे. विज्ञानाने सृष्टिघटनांचें कार्यकारण समजून येतें. त्यामुळे अंधश्रद्धा नष्ट होऊन प्रयत्नवादाचें शिक्षण मिळतें. इतिहासाने मानवी जीवनांतील कार्यकारण समजतें व राष्ट्रनिष्ठेचें शिक्षण मिळतें. भूगोलाने जगाचें स्वरूप समजून येतें. त्याचप्रमाणे निबंध-रचनेने अनेक विचार कार्यकारणाने, साधर्म्याने, अवयव-अवयवी संबंधाने, आक्षेपखंडणाच्या नात्याने, उपमान-उपमेयाच्या संबंधाने एकत्र निगडित करण्याची शक्ति विद्यार्थ्यांना प्राप्त होते. या शक्तीचें महत्त्व अनन्यसाधारण आहे. मानवाच्या कोणच्याहि उद्योगाच्या बुडाशीं नवी रचना ही असतेच. इतिहास, अर्थशास्त्र, तत्त्वज्ञान अशा विषयावरचे ग्रंथ असोत, इमारती, धरणें, कारखाने हें स्थापत्य असो किंवा मानवसमाजाची संघटना असो, प्रत्येक ठिकाणीं नवरचना हेंच कार्य आहे. आणि त्याची प्रक्रिया सर्वत्र एकच आहे. भिन्न घटक एकत्र जोडणें हीच ती प्रक्रिया. निबंधरचना या शब्दाचा व्यापक अर्थ हाच आहे. शाळाकॉलेजांत प्रत्येक प्रश्नाचें उत्तर, निबंधस्वरूपच असलें

पाहिजे असा पूर्वी दंडक होता. त्याचा हेतु हाच होता. हा संस्कार विद्यार्थ्यांच्या मनावर जितक्या तऱ्हेने करता येईल तितका केला पाहिजे. यामुळे त्यांच्या मनाचें रचनासामर्थ्य विकासित होतें. कोणच्याहि व्यवहारांत हातीं घेतलेल्या कार्याचा व्याप जाणणें, त्यांतील भिन्नघटकांचा परस्पर संबंध आकळणें, पुढे येणाऱ्या संभाव्य व्याघातांची ( आक्षेपांची ) आगाऊ कल्पना येणें, त्यांच्या निराकरणाची ( खंडनाची ) योजना आंखणें, आणि सिद्ध होणाऱ्या कार्यांचें आधी समग्ररूप पाहण्याचें सामर्थ्य असणें या गुणांची आवश्यकता असते. हे सर्व संस्कार निबंधरचनेच्या अभ्यासाने व्हावयाचे असतात. जोर बैठका ही जशी शरीराची तशी ही बुद्धीची तालीम आहे. पण आज एस्. एस्. सी. च्या सोळा-सतरा वर्षांच्या विद्यार्थ्यांना सुद्धा सात-आठ ओळींचीं उत्तरें लिहावयास सांगून त्यांना कणदक् करून ठेवण्याचें धोरण शिक्षणशास्त्रज्ञांनी आखलें आहे. आणि या शिक्षणांतून अखिल भारताचे प्रश्न सोडविणारे विश्वदक् नेते निर्माण व्हावे अशी अपेक्षा आहे.

इंग्रजी भाषा गेली, मुलें आंधळीं झालीं. इंग्लंडचा इतिहास गेला. लोकशाही मूल्यांचा अभ्यास गेला. बुद्धीला पीळ भरणारे अभ्यास-व्याख्या, नियम-यांची पूर्वीच वासलात लागली आहे. आणि आता निबंधरूप उत्तरें लिहिण्याचा संस्कारहि गेला. असें सध्याचें शिक्षण आहे. असो. येथे आपला संबंध सुश्लिष्ट रचनेपुरता आहे.

काव्य हें समाजस्थितीचें निदर्शक आहे, निबंध व ग्रंथरचना हें तिचें कारक आहे. या दोन्हीचा विचार केला आणि आपल्या राष्ट्रीय प्रपंचाचा प्रत्यक्ष कारभार पाहिला तर आपल्या मनाचें जें वैक्लव्य दिसून येतें त्याचा येथवर विचार केला. सामर्थ्यशाली मनें भारतांत सध्या नाहीत. हा त्याचा सारार्थ होय. येथून पुढे राष्ट्रीय प्रपंचाची अनेक प्रकारची उलाढाल आपल्याला करावयाची आहे. त्या वेळीं जें कार्य शिरावर घेतलें त्याचा सर्व आटोप आपल्या दृष्टीने पाहूं शकणारे पुरुष जर आपल्याजवळ नसतील तर आपली दशा काय होईल हें सध्याच्या आपल्या प्रपंचस्थितीवरून दिसून येईल. भारताची अर्थव्यवस्था, त्याचे परराष्ट्रसंबंध, अखिल भारताची राजकीय संघटना, येथील वाहतूक-व्यवस्था, आपल्या सरहद्दीचें संरक्षण आपल्या विकास-योजना हें सर्व मोडकळीस आल्यासारखें दिसत आहे.

क कार्याची एक ठाशीव कणखर व भरीव मूर्ति दिसावी त्याऐवजी तडे तुकडे उडालेलें असें रूप दिसतें. अवयव तुटले आहेत, प्रतिक्षणीं कांही त आहेत, भुगा पडत आहे, आणि एकंदर विघटना चालू आहे पडतें. याच्या अनेक कारणांपैकी एक हें निश्चित आहे की ालों आहों. आपला अवलोक अत्यंत अल्प, अत्यंत क्षुद्र ाणि दुर्दैव असें की याची जाणीव आपल्याला नाही. हें चाललें, हें वैक्लव्य नष्ट करून आपल्या भावी पिढीचें मनःसामर्थ्य ढविण्याचे प्रयत्न झाले नाहीत तर आपल्या राष्ट्रीय प्रपंचाची विघटना झाल्याखेरीज राहणार नाही.

● ● ●

: ५ :

# पराधीन सरस्वती

: १ :

इ. स. ११८८ सालीं मुकुंदराज या महाराष्ट्रांतल्या आद्यकवीने आपला ‘ विवेकसिंधु ’ हा ग्रंथ लिहिला. त्यानंतर पुढल्या सहाशे-साडेसहाशे वर्षांच्या काळांत प्राचीन मराठी साहित्याची गंगा अखंड वहात होती. संतवाङ्मय, पंडिती वाङ्मय, शाहिरी वाङ्मय अशीं भिन्न-रूपें तिने कालपरत्वें भिन्न कालखंडांत धारण केलीं होतीं. पण तिचा ओघ अखंड व विपुल होता. असें असतांना या कालखंडांत कादंबरी, नाटक, लघुकथा, भावकाव्य, निबंध, इतिहास, चरित्र इत्यादि बहुविध वाङ्मयप्रकार महाराष्ट्रसारस्वतांत कां निर्माण झाले नाहीत, असा एक प्रश्न या सारस्व-ताचा मागला इतिहास वाचीत असतांना मनांत सारखा येत राहतो. त्या सहाशे वर्षांत राजकारण, अर्थशास्त्र, समाजकारण, रसायन, पदार्थविज्ञान, या विषयांवरहि ग्रंथ झाले नाहीत. मराठीला त्या काळांत कोणी व्याकर-णाची शिस्त लावली नाही, तिचें शब्दभांडार कोणी कोशनिबद्ध केलें नाही. भाषाशास्त्राच्या दृष्टीने तिची कोणी पाहणी केली नाही ! उलट त्या सहाशे साडेसहाशे वर्षांच्या काळांत जें झालें नाही तें नंतरच्या शंभर-सवाशे वर्षांत सहज घडून आलें. या सर्व प्रकारच्या ग्रंथांनी, वाङ्मयप्रकारांनी मराठी सारस्वत आज समृद्ध झालेलें दिसतें. विष्णुशास्त्री, टिळक, आगरकर,

अनुक्रम ........................ दि: ........................



केळकर, यांसारखे निबंधकार–ग्रंथकार, राजवाडे, तेलंग, शं. बा. दीक्षित, चिं. वि. वैद्य यांसारखे संशोधक, दादोबा पांडुरंग, कृष्णशास्त्री चिपळूणकर, दामले, डॉ. केतकर यांसारखे व्याकरणकार–कोशकार, हरिभाऊ आपटे, वा. म. जोशी, फडके, माडखोलकर असे कादंबरीकार, खरे, सरदेसाई, पारसनीस, भावे, पांगारकर यांसारखे इतिहास–लेखक, किर्लोस्कर, देवल, खाडिलकर, गडकरी हे नाटककार, केशवसुत, बालकवि, सावरकर, तांबे हे कवि यांनी पन्नास-साठ वर्षांच्या अवधींतच मराठी सारस्वत समृद्ध करून टाकलें. येथे शास्त्रज्ञ झाले, गणिती झाले, रसायनवेत्ते, पदार्थशास्त्रज्ञ झाले, ज्योतिर्विद झाले, भाषाशास्त्रज्ञ झाले आणि महाराष्ट्रबुद्धिवैभवाचा हा सर्व आविष्कार केवळ एका शतकाच्या कालावधींत झाला. यामुळेच मनापुढे तो प्रश्न उभा राहतो की, मागल्या सहा–सात शतकांच्या प्रदीर्घ कालांत या प्रकारची निर्मिति अगदी अभावाने कां दिसावी ?

पण या प्रश्नाचा विचार करूं लागतांच इतरहि अनेक प्रश्न मनांत येऊं लागतात. या दीर्घ कालखंडांत महाराष्ट्रांतून कोणी लोक भारताबाहेर प्रवासाला गेले होते काय ? इंग्लंड, फ्रान्स, पोर्तुगाल, जर्मनी, स्पेन, हॉलंड येथून पाश्चात्त्य लोक येथे हजारांनी आले. त्याचप्रमाणे इजिप्त, अरबस्थान, इराण, मध्य आशिया येथून अनेक मुसलमान भारतांत व महाराष्ट्रांतहि आले. पण महाराष्ट्रांतून किंवा भारतांतून त्यांच्या देशांत कधी कोणी हिंदु गेले नाहीत. व्यापार, धर्मप्रसार व राज्य या त्रिविध हेतूंनी हे लोक येत असत. पण यांपैकी कोणच्याहि हेतूने महाराष्ट्रीय मात्र बाहेर कधी गेला नाही. त्याने कधी जग पाहिलें नाही. तो कूपमंडूकच राहिला. याचा साहित्याशीं कांही संबंध असेल काय ? जगप्रवास करणें सोडून दिलें. महाराष्ट्रांतल्या तरी व्यापाराची किंवा धर्महानीची येथल्या राज्यकर्त्यांनी चिंता वाहिली काय ? पेशवे नित्य कर्ज-बाजारी असत. पण महाराष्ट्रांत व्यापारवृद्धि झाली पाहिजे, त्याचा व राज्याचा दृढ संबंध आहे याची जाणीव त्यांना व शिंदे, होळकर, भोसले, गायकवाड पटवर्धन या त्यांच्या सरदारांना कधी झाली होती काय ? समाजांतल्या इतर धुरीणांना तरी व्यापाराचें, पेढ्यांचें महत्त्व कळलें होतें काय ? महाराष्ट्रांत सावकार पुष्कळ होते. पण भारतभर किंवा महाराष्ट्रभर व्यापारी पेढ्यांचें जाळें विणणारा एक तरी मोठा व्यापारी त्या वेळीं होता काय ? मुळीच

नव्हता. शाहू छत्रपति, पेशवे यांनी मुसलमान, युरोपीय व्यापाऱ्यांना उदंड आश्रय दिला होता. तसा महाराष्ट्रीय व्यापाऱ्यांनाहि त्यांनी दिला असता. पण तसे व्यापारीच येथे नव्हते. येथे अर्थशास्त्रावर ग्रंथ झाले नाहीत. आणि आर्थिक उलाढालीहि मराठ्यांनी केल्या नाहीत. महाराष्ट्रांत तेव्हाहि वरचेवर दुष्काळ पडत असत. पण तळीं बांधावीं, धरणें बांधावीं, कालवे काढावे असा विचारहि कोणाच्या मनांत कधी आला नाही. आर्थिक विचार सोडून द्या. येथे धर्मजागृति तर झाली होती. पण दहाव्या शतकापासून ईजिप्त, अरबस्तान येथून मुसलमान धर्मप्रसारक महाराष्ट्रांत येऊन स्थायिक झाले होते व त्यांनी हजारो लोकांना बाटवून संघटित करून यादवांच्या व दक्षिणेंतल्या इतर राजसत्तांच्या विनाशाची तयारी करून ठेविली होती; याची धर्मपंडितांना किंवा राज्यकर्त्यांना दखल होती काय? बाटलेल्या लोकांना पुन्हा स्वधर्मांत घेतलें पाहिजे, नाही तर पुढे अनर्थ ओढवतील अशी चिंता येथे कोणालाहि केव्हाहि वाटली नाही. राज्यरक्षण, युद्ध हा तर राज्यकर्त्यांचा मुख्य उद्योग. पण उत्तर हिंदुस्थानांत मुस्लीम आक्रमण येऊन तीनशे वर्षें झालीं, मुस्लीमांनी सर्व उत्तर आक्रमिली, तेथलीं मूळचीं हिंदु-बौद्धजैनांचीं राज्यें धुळीस मिळविलीं. पण हें संकट उद्या आपल्यावरहि येईल, त्याला तोंड देण्याची तयारी आपण केली पाहिजे असा विचार दक्षिणेंतल्या एखाद्या राजाच्या किंवा त्याच्या प्रधानाच्या मनांत आला होता काय? स्वप्नांतहि नाही. त्यामुळे १३०४ ते १३२० या पंधरा-सोळा वर्षांच्या काळांत अवघी दक्षिण धुळीस मिळाली. हें असें कां घडलें याची मीमांसा तरी नंतरच्या काळांत करण्याचा प्रयत्न झाला काय? अल्लाउद्दिन, मलिककाफूर यांच्या यशाचा कोणी विचार केला काय?

साहित्याच्या क्षेत्रांतच प्रारंभीं सांगितल्याप्रमाणे दारिद्र्य व दिवाळखोरी होती असें नाही. तर जीवनाच्या सर्वत्र क्षेत्रांत ती दिसून येते. राज्यकारभार, व्यापार, शेती, शिक्षण, धर्मप्रसार, सर्वत्र हेंच. याचा सारस्वतांतील दारिद्र्याशीं कांही संबंध असेल काय?

दा. क्र. 922९४

: २ :

## ते उदासीन होते

गेल्या शंभर वर्षांतील निबंध, कादंबरी, नाटक, काव्य, इतिहास, चरित्र इत्यादि प्रकारचें जें वाङ्मय त्याचें स्वरूप व त्याचे विषय आपण पाहिले तर मागल्या सहा-सात शतकांत तसलें वाङ्मय कां झालें नाही याचें एक प्रधान कारण आपल्या सहज ध्यानांत येईल. या वाङ्मयाच्या लेखकांना जें सांगावयाचें होतें तें पूर्वीच्या काळीं कोणालाच सांगावयाचें नव्हतें. या पंडितांच्या, विद्वानांच्या, कादंबरीकारांच्या चित्तांत ज्या आकांक्षा होत्या, त्यांच्या मनांत जे विचार उसळत होते तसे मागल्या काळीं कोणाच्याच मनांत येत नव्हते. लोकहितवादी म्हणाले की, आम्हांला पार्लमेंट हवें आहे. त्या पार्लमेंटांत तेली, तांबोळी, परीट, महार हेहि ब्राह्मण क्षत्रियांच्या बरोबरीने बसावे. आपल्या लोकांनी व्यापारवृद्धि करावी, कारखाने काढावे. येथील चाकू-कात्री इंग्लंडांत खपली पाहिजे असेंहि ते सांगत असत. मागल्या काळांत हे कोणी लिहिलें नाही याचें कारण हें की या विषयासंबंधी तेव्हाचे लोक अगदी उदासीन होते. राज्य, व्यापार, कारखाने, तलाव, कालवे यांविषयी आपण कांही चिंतन करावें असें त्यांच्या मनांतहि कधी आलें नसेल. शिवाजीची जन्मतारीख कोणची, दिल्लीला जाण्यांत त्याचें काय राजकारण होतें, पानपतचा पराभव कां झाला, त्यांत भाऊसाहेबांना अपश्रेय किती व गोविंदपंत बुंदेले दोषी किती याचा अभ्यास झालाच पाहिजे व लोकांना याचा उलगडा करून सांगितलाच पाहिजे अशी आंतरिक तळमळ राजवाड्यांना होती म्हणून एकेक कागदपत्र धुंडीत ते वणवण करीत हिंडत होते. इतिहासाला देशाच्या उन्नतीच्या दृष्टीने महत्त्व आहे असें त्यांना वाटत होतें. हें त्या प्राचीन मराठीच्या काळांत त्या शास्त्रीपंडितांना वाटलें असतें तर मुळीच श्रम न करतां राजवाड्यांपेक्षा एक हजार पट कागदपत्रें त्यांना उपलब्ध झालीं असतीं. पण त्यांना यांशीं कांही कर्तव्य नव्हतें ! जुन्या श्रुतिस्मृतीवर, वेदान्तग्रंथावर किंवा व्याकरणग्रंथावर ज्या टीका झाल्या होत्या त्या टीकांवर दीपिका, दीपिकांवर चंद्रिका, चंद्रिकांवर मनोरमा अशा टीका लिहिण्याचा व व्रतवैकल्यें, उद्यापनें, यांवर प्रचंड ग्रंथ लिहिण्याचा उद्योग त्यांना पुरेसा

होता. इंग्रजी राज्य येथून नष्ट झालें पाहिजे असें विष्णुशास्त्री यांना वाटत होतें. म्हणून त्यांनी त्या विषयाची चिकित्सा केली; आणि आपल्या लोकांत देशाभिमान नाही, तो पूर्वेकडेच्या देशांत कधीच नव्हता, जातिभेद हें त्याचें एक कारण आहे इ. सिद्धान्त सांगितले. आमच्या भाषेची स्थिति काय आहे, आमच्या देशाची स्थिति काय आहे, पूर्वी काय होती, तें पूर्वीचें वैभव कशाने गेलें, तें मिळविण्यासाठी ज्ञानाची उपासना कशी केली पाहिजे हें लोकांना सांगण्याचें शास्त्रीबोवांना जें महत्त्व वाटत होतें तें मागल्या काळीं कांही अपवाद वजा जाता, कोणालाच वाटत नव्हतें. समर्थांना ही तळमळ वाटत होती. त्यामुळे त्यांनी तें लिहिलें. पण बाकी सर्व लोक थंड होते. याच्याशीं आपला कांही संबंध नाही अशीच त्यांची प्रामाणिक श्रद्धा होती. भारतांत लोकशाहीची प्रस्थापना झाली पाहिजे, लोकजागृति केली पाहिजे, लोकांत असंतोष पेटविला पाहिजे, सर्व भारतांत हा असंतोष पेटवून त्यांत ब्रिटिश साम्राज्याची आहुति दिली पाहिजे असा प्रक्षोभ टिळकांच्या चित्ताचा होत असे. त्यामुळे रोज उठून त्या विषयांवर ते लिहीत असत. तुरुंगांत टाकलें तरी, फाशीं दिलें तरी हें लिहिलेंच पाहिजे, हें सांगितलेंच पाहिजे अशी त्यांच्या अंतरींची भावना होती. म्हणून त्यांनी चाळीस वर्षे तसलें साहित्य निर्माण केलें. मराठी साहित्याच्या मागल्या दीर्घ कालखंडांतील पूर्वार्धांत म्हणजे सोळाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत बहामनी राज्याविषयी असे विचार इतक्या उत्कट-पणे कोणाच्या चित्तांत स्फुरले नाहीत. फाशीं दिलें तरी ते लिहिले पाहिजेत असें कोणाला वाटलें नाही. म्हणून त्या विषयावर कोणी लिहिलें नाही. अगदी साधें कारण आहे !

त्या काळांतल्या लोकांना ज्या विषयासंबंधी तळमळ वाटत होती, ज्याचें महत्त्व वाटत होतें त्याविषयी त्यांनी विपुल साहित्य लिहिलें हें आपण पाहतच आहों. आत्मा, परमात्मा, मोक्ष, जगाचें क्षणभंगुरत्व, भक्तिमार्ग, कर्ममार्ग, योगमार्ग, पंचीकरण, नाममहिमा, संतमहिमा, पंढरीमाहात्म्य, कथाकीर्तन, वासनात्याग, वैराग्य या विषयांबद्दल त्यांना पराकाष्ठेची आस्था होती. सर्व संतवाङ्मय निर्माण झालें तें या आस्थेंतून, तळमळींतूनच झालें आहे आणि तें कांही ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम या श्रेष्ठ संतांनीच

निर्माण केलें असें नव्हे तर समाजांतल्या सर्व थरांतल्या शेकडो लोकांनी वेदान्त, भक्ति, मोक्ष यांवर आपले विचार मांडले आहेत. न्हावी, तेली, कुंभार, महार, चांभार या जातींतील लोकांनी वेदान्त लिहिला आहे. स्त्रियांमध्येहि श्रेष्ठ स्त्रियांनी साहित्य लिहिलें आहे, दासींनी लिहिलें आहे, वेश्यांनी लिहिलें आहे. अमका एक वर्ग, अमुक एक जात, असका समाजांतील थर यांत नव्हता असें नाही. अध्यात्माचें, विठ्ठलभक्तीचें तें स्फुरण सर्व महाराष्ट्राला झालें होतें. आणि सर्व महाराष्ट्र अध्यात्मवाङ्मय निर्मीत होता. यावरून हें उघडच आहे की वर सांगितलेले पार्लमेंट, मुस्लीम आक्रमण, पानपतचा पराभव, देशाभिमान, लोकशाही, स्वराज्य, स्वातंत्र्य, व्यापार, कारखाने, तलाव, कालवे हे सर्व त्या लोकांना अविषय होते. तळमळून कांही लिहावें असे हे विषय आहेत असें त्यांना वाटत नव्हतें; म्हणूनच त्यांनी त्यांवर कांही लिहिलें नाही. त्यांनी स्वतः लिहिलें नाही इतकेंच नव्हे तर इतर कोणीहि अध्यात्मविद्या त्यागून त्या विषयावर लिहावें हें त्यांना मान्य नव्हतें. ज्योतिष, शिल्प, नीति, वैद्यक, काव्य, नाटक व्याकरण, शब्दकोश, या विषयांचें ज्ञान, अध्यात्मज्ञान नसेल तर, व्यर्थ होय, असें ज्ञानेश्वरांचें मत होतें. असल्या ज्ञानाला आग लागो असें त्यांनी म्हटलें आहे. " वानू आवडे लौकिक । तोहि तोचि ॥ जो लौकिक विषयां-संबंधी आवडीने बोलतो तो अज्ञ समजावा, " असें त्यांनी सांगितलें आहे. ( ज्ञाने. १३-८२५ ते ८३५ ). दादोबा पांडुरंग, कृष्णशास्त्री, लोकहितवादी, विष्णुशास्त्री, राजवाडे, डॉ. केतकर हे सर्व त्या काळच्या लोकांच्या मतें या अज्ञ वर्गातच आले असते. हे सर्व लौकिक विषयांसंबंधी बोलत असत, लिहीत असत. ते सर्व अध्यात्मविद्याविहीन होते, इतकेंच नव्हे तर त्या विद्येबद्दल त्यांना मुळीच प्रेम नव्हतें. श्रद्धा नव्हती. त्यांतले कांही तर नास्तिकच होते !

हरिभाऊंनी त्यांच्यापूर्वी अडीचशें वर्षांपूर्वी होऊन गेलेल्या शिवछत्र-पतींच्या जीवनावर कादंबऱ्या लिहिल्या. आणखी पूर्वीच्या काळांत शिरून त्यांनी पृथ्वीराज-जयचंद यांची कथा लिहिली. मग त्यामागे हजार वर्षे कल्पनेची झेप फेकून त्यांनी सम्राट् चंद्रगुप्ताचें जीवन मूर्त करून महाराष्ट्रापुढे उभें केलें. सावरकरांनी असलेच विषय काव्याला निवडले. विनायकांनी

रजपूत रमणींचीं गाणीं गाइलीं. आणि मग अनेक कवींनी, कादंबरीकारांनी ‘ पूर्व दिव्य ज्यांचें त्यांना रम्य भावि काल ’ ही श्रद्धा ठेवून आपल्या वैभवशाली पूर्वजांचें जीवन कथाकाव्यांत अभिमानाने रंगविलें. मागल्या सहाशे वर्षांच्या काळाकडे या दृष्टीने पाहिलें तर काय दिसतें ? शिवकालापर्यंत तर आपल्याला असा कांही दिव्य पूर्व इतिहास आहे, याची दखलसुद्धा कोणी घेतलेली नाही. चंद्रगुप्त, अशोक, कुमारगुप्त, समुद्रगुप्त, हर्ष, पुलकेशी, यशोवर्मा, सिंघण, हे केवढाले महापराक्रमी ऐतिहासिक पुरुष या भूमींत होऊन गेले होते. पण १२०० ते १८०० या काळांतल्या लोकांच्या दृष्टीने हे पुरुष येथे जणु झालेच नव्हते. या मागल्या पूर्वजांचें राहूं द्या. विजयनगरचा इतिहास तर या लोकांच्या डोळ्यांसमोर घडत होता. अगदी शेजारीं घडत होता. बाप्पा रावळ, चक्रवर्ती हम्मीर यांचें दिव्यचरित्र त्यांना ऐकूं येत होतें, पण यांचा चुकून उल्लेखसुद्धा कोणी केलेला नाही. पंडितांनी, रामायण, महाभारत, पुराणें यांतील कथांवर काव्यें लिहिलीं. पण हे ऐतिहासिक पुरुष त्यांच्या लेखी या भूमींत झालेच नव्हते. याचेंहि कारण हेंच आहे. त्यांचें चरित्र गाऊन या भवसागरांतून तरून जातां येईल असें त्यांना वाटत नव्हतें. रामकृष्ण, हरिश्चंद्र, अंबरीष यांच्या कथा त्यांनी गाइल्या त्या ‘तरण्यासाठी’, मोक्षासाठी ! समुद्रगुप्त, हर्ष यांच्यावरच्या कवनांनी तो लाभ होण्यासारखा नव्हता. मग तीं व्यर्थ कशाला गावीं ? यांच्या चरित्रांतून स्वराज्य, स्वातंत्र्य, साम्राज्य यांविषयी स्फूर्ति देतां आली असती. पण बहुजनांच्या मोक्षाची त्यांना जशी चिंता होती तशी स्वराज्यसाम्राज्याची नव्हती. म्हणून त्यांनी त्यांच्या जीवनावर कादंबऱ्या, कथा, काव्यें लिहिलीं नाहीत. हरिभाऊ, सावरकर, गडकरी, विनायक यांना ही दुसरी चिंता होती. म्हणून त्यांनी त्या ऐतिहासिक परंपरेचें दिव्य वैभव गाणारें साहित्य निर्माण केलें. त्या कालखंडांतील उत्तर भागांत म्हणजे स्वराज्यस्थापना झाल्यानंतर लोकांची वृत्ति थोडी बदलली. मराठा वीरांचे पोवाडे ते गाऊं लागले. त्यांच्या बखरी रचूं लागले. याचेंहि कारण हेंच आहे. स्वराज्य, स्वातंत्र्य, दिल्ली पादाक्रान्त करणें, रूमशामवर स्वारी करणें, या आकांक्षांना, या पराक्रमाला त्यांच्या दृष्टीने महत्त्व होतें. पण यांतूनहि अर्वाचीन काळाप्रमाणे इतिहास-चरित्रें निर्माण झालीं नाहीत. बखरी, पोवाडे हें साहित्य झालें. तरी

त्यांत ऐतिहासिक दृष्टि नाही. पण त्याचा विचार पुढे करूं. सध्या एवढेंच ध्यानांत घ्यावयाचें की, या विषयाचें, ऐहिक पराक्रमाचें महत्त्व ज्यांना वाटलें त्यांनी त्या विषयावर लिहिलें. ज्यांना वाटलें नाही त्यांनी लिहिलें नाही.

महाराष्ट्रसारस्वताच्या प्राचीन म्हणजे १२०० ते १८०० या काळांत निबंध, कादंबरी, नाटक, विनोद, भावकाव्य, इतिहास, चरित्र इ. वाङ्मय कां निर्माण झालें नाही याची त्या साहित्याच्या विषयाच्या दृष्टीनेच सध्या आपण चिकित्सा करीत आहों. पुढे अनेक दृष्टींनी ही पाहणी करावयाची आहे. पण प्रारंभीं अगदी ढोबळपणें दिसणारी गोष्ट घेतली आहे. ऐहिक वैभव, पराक्रम, स्वातंत्र्य, पारतंत्र्य, स्वराज्य, साम्राज्य, व्यापार, शेती, याविषयी तो मागला समाज प्रारंभीच्या काळीं अगदी उदासीन होता. म्हणून त्याने त्याविषयी लिहिलें नाही. अध्यात्माचें त्याला फार महत्त्व वाटत होतें. म्हणून त्याने त्या विषयावर विपुल साहित्य निर्मिलें.

अर्वाचीन काळांतलें सामाजिक ललित वाङ्मय पाहिलें तरी हाच निर्णय दृढ होतो. या ललित-लेखकांनी जे विषय निवडले ते त्या जुन्या लेखकांच्या मतें साहित्याचे विषयच होऊं शकत नव्हते. स्त्री-जीवन आणि दलित जीवन यांनी आपल्या कादंबरी, लघुकथा, नाटक, काव्य या साहित्याचा केवढा तरी भाग व्यापला आहे. ‘ पण लक्षांत कोण घेतो ’ मध्ये यमुना, तिची आजी, आई, सावत्र आई, तिची उमासासू, तिची मैत्रीण दुर्गी या सर्व स्त्रियांचें आक्रंदन आपल्याला ऐकूं येतें. आणि आज पन्नास-साठ वर्षें झालीं तरी कथाकादंबऱ्यांचा तोच विषय आहे. अस्पृश्य, शेतकरी, कामकरी, आदिवासी यांच्यासंबंधी तेंच आहे. ‘ काळ तर मोठा कठिण आला ’, ‘ अंत्यजाच्या मुलाचा प्रश्न ’, ‘ मजुरावर उपासमारीची पाळी ’ या कथा-काव्यांपासून आज ‘बनगरवाडी’, ‘ बारी ’, ‘ फकीरा ’,‘ लिलाव ’ यांच्या-पर्यंत त्यांच्या जीवनाचें बहुविध दर्शन लेखक घडवीत आहेत. त्यांच्या सुखदुःखाची, प्रामुख्याने दुःखाची कहाणी ते आपल्याला ऐकवीत आहेत. पण पूर्वीच्या काळांतल्या कवींना त्याचें कसलेंच सुखदुःख नव्हतें. स्त्री ही नरकाची वाट आहे, मोक्षमार्गांतली धोंड आहे, पुरुषाला मायामोहांत गुंतविणारी आहे, नारायणा, तिचा संग आम्हांला घडूं देऊं नको, असें म्हणून तिच्या सर्व समस्या त्या लोकांनी सोडून टाकल्या होत्या. तिचें

कांहीं स्वतंत्र जीवन आहे, त्याला प्रतिष्ठा आहे, तिच्या समस्या आहेत हें त्यांना मान्यच नव्हतें. आणि वैधव्य, पराधीनता, कष्ट अशीं कांही तिचीं दुःखें असलींच तरी त्यांच्या वर्णनासाठीं स्वतंत्र काव्यकथा लिहाव्या हा विचार त्यांना स्वप्नांतहि शिवला नाही. त्याचें त्यांना महत्त्वच वाटत नव्हतें. दलितांच्याविषयी थोडी अधिक सहानुभूति त्यांना होती पण ती त्यांच्या मोक्षाविषयी ! त्यांच्या व इतरांच्या दुःखाचीं ते वर्णनें करीत. पण हा संसार किती दुःखमय आहे, दारुण आहे, गलिच्छ आहे, हें दाखवून त्याविषयी उदासीन राहणें कसें अवश्य आहे हें मनावर ठसविण्यासाठीच तीं वर्णनें येत. अर्थात् तीं अनुषंगाने येत. मुख्य विषय आत्मा, परमात्मा, मोक्ष, भक्ति, नाममहिमा हाच असे. तिकडे लोकांनी वळावें म्हणून स्त्रीनिंदा संसारनिंदा हे विषय येत.

' महाराष्ट्रभाषेची वाढ ' या आपल्या निबंधांत लो. टिळक म्हणतात, ' कोणत्याहि भाषेंतील मोठमोठे प्रसिद्ध ग्रंथकार घ्या, त्यांचीं अंतःकरणें, त्यांचें हृद्गत लोकांस कळविण्यास अत्यंत उत्सुक असतात असेंच आढळून येतें. आपले विचार खरे आणि देशहिताचे आहेत ही त्यांची स्वतःची खात्री असते. विचार प्रसृत करण्याकरिताच ईश्वराने आपणास जन्मास घातलें आहे असा दृढ समज असल्याखेरीज कोणाच्याहि हातून स्वभाषेची सेवा होणें शक्य नाही. '

मागल्या काळांत अध्यात्मविषयक साहित्य विपुल झालें आणि कादंबरी-नाटकादि ललित साहित्य व इतिहासराजकारणादि तात्त्विक साहित्य झालें नाही याचें कारण यावरून उघड होईल. पहिलें साहित्य लिहावें अशी त्या वेळच्या लोकांना तळमळ होती. दुसऱ्याविषयी ते उदासीन होते. हें एक कारण झालें. आता दुसरें कांही कारण दिसतें का तें पाहूं.

: ३ :

## बद्ध प्रतिभा

अर्वाचीन साहित्याचें रूप जास्त जवळून न्याहाळलें तर या प्रकारचें साहित्य त्या प्राचीन काळांत निर्माण होणें शक्यच नव्हतें, हें आपल्या ध्यानीं येईल. केशवसुतांचे उद्गार पहा. ' जुनें जाऊं द्या मरणा लागुनि, जाळुनि

किंवा पुरूनी टाका ','प्राप्तकाल हा विशाल, भूधर,सुंदर लेणीं तयांत खोदा ', 'गत शतकाचीं पापें घोरें क्षाळायाला तुमचीं रुधिरें पाहिजेत रे ', 'नियमन मनुजासाठी, मानव नसे नियमनासाठी जाणा ', 'देव दानवा नरें निर्मिलें ' 'पद्य पंक्तिची तरफ घेऊनी...जगउलथुनिया, देऊं कसें ' हे व असले उद्दाम विचार मागल्या काळीं सांगणें कोणाला शक्य झालें असतें काय ? 'दसरा ', 'स्मशानांतलें गाणें' यांसारख्या कविता त्या काळीं लिहून प्रसिद्ध करतां आल्या असत्या काय ? दादोबा पांडुरंग, ज्योतिबा फुले, लोकहितवादी, विष्णुशास्त्री, टिळक, आगरकर यांनी व त्यांच्या अनुयायांनी समाजकारण, धर्मकारण, राजकारण या विषयांत अत्यंत क्रांतिकारक विचार मांडले, ते स्वतःचे म्हणून मांडले व त्यांचें इतिहासाच्या व अनुभवाच्या साह्याने समर्थन केलें. 'इंग्रजी विद्वान् पूर्वी जर हिंदुस्थानांत एक असता तर राज्य न जातें.' 'वास्तविक पाहिलें तर इंग्रजी विद्वानाप्रमाणे मला धर्मिष्ठ कोणीच दिसत नाही.' 'ज्या देशांत स्त्रियांचे अधिकार लोक मानीत नाहीत त्या देशांत लोकांची स्थिति वाईट असते.' 'शास्त्र म्हणजे लोकांस सुख होण्यास रीति घातली आहे, त्याहून जर विपरीत कांही असेल तर एकीकडे ठेवल्यास चिंता काय ?' ( लोकहितवादी ) 'इकडील देशांतून देशाभिमान ही मनोवृत्तीच म्हणण्यासारखी लोकांस माहीत नाही. या राष्ट्राचें विस्तीर्णत्व व जातिभेद हीं त्याचीं मोठीं कारणें आहेत. आपण त्याची गुरुकिल्ली पाश्चात्त्यां-पासून घेतली पाहिजे.' ( विष्णुशास्त्री ). 'जातिभेद ही राजनीति बिघडल्याचीं लक्षणें आहेत.' 'सर्व प्रजा एक कुटुंब या खऱ्या राजनीतीवांचून होणार नाही ' ( विष्णुबुवा ब्रह्मचारी ). 'लग्न झाल्यावर मुलीने आईबापांचें घर सोडावें तें एकदम नवऱ्याच्या स्वतंत्र संसाराचें आधिपत्य पत्करावें.' 'मनुष्यजातीची पूर्णावस्था अद्याप पुढे यावयाची आहे.' 'तीव्र भूक व विषयवासना यांस उत्तम रीतीने भागवितां आल्यास जें समाधान होतें तें अद्वितीय, अवर्णनीय आहे.' 'एखाद्या दुसऱ्या मनु-पाराशरांची कथा काय ? ' 'इष्ट असेल तें बोलणार व साध्य असेल तें करणार.' ( आगरकर ) हें व या तऱ्हेचें तत्त्वज्ञान निबंधकारांनी व ग्रंथकारांनी मांडले व त्यांतूनच कादंबरी, लघुकथा, नाटक, विनोद, भावगीत हें अर्वाचीन साहित्य निर्माण झालें. मागल्या त्या दीर्घकालखंडांत हें तत्त्वज्ञान कोणी मांडलेंच नाही. त्या

प्रकारचें धैर्य कोणी प्रगट केलें नाही. म्हणून मग त्याच्या आधारें प्रगट होणारें ललित साहित्यहि निर्माण झालें नाही.

मराठी सारस्वताच्या ज्या कालखंडाचा आपण विचार करीत आहों त्याच कालखंडांतील पश्चिम युरोपांतील देशांच्या वाङ्मयांचा इतिहास पाहिला तर नाटक, कादंबरी, विनोद या प्रकारचें किंवा राजकारण, इतिहास, चरित्र या प्रकारचें साहित्य आपल्याकडे कां निर्माण झालें नाही हें सहज समजून येईल. तेराव्या शतकाच्या अखेरपर्यंत युरोपांत तमोयुग होतें. आणि सर्व समाज शब्दप्रामाण्यवादी व परमार्थनिष्ठ, इहविमुख असाच होता. त्यानंतर ग्रीक विद्येच्या पुनरुज्जीवनामुळे तेथे मानवाची बुद्धि हळूहळू स्वतंत्र होऊं लागली तशी सामाजिक रूढि, धार्मिक बंधनें व राजसत्तेचें नियंत्रण यांतून ती मुक्त होऊं लागली. तशी ती मुक्त होतांच प्रत्येक व्यक्तीचें व्यक्तित्व, तिची अहंवृत्ति, तिची आत्मनिष्ठा ही जागृत आणि समर्थ होऊं लागली आणि मग तिचा अनंत प्रकारें आविष्कार हाऊं लागला. तो आविष्कार म्हणजेच वर सांगितलेलें बहुविध ललित व तात्त्विक साहित्य होय. मानवाची बुद्धि मुक्त होतांच ती स्वतः जगाचें अवलोकन करूं लागते आणि मग त्या जगाच्या व्यवहारासंबंधी स्वतःचे स्वतंत्र सिद्धान्त बांधण्याचें सामर्थ्य तिला प्राप्त होतें. या लोकव्यवहाराचा, मानवी जीवनाचा प्रत्येक व्यक्ति स्वतःपुरता स्वतंत्र अर्थ लावते, त्या जीवनावर स्वतःचें भाष्यहि रचते. ललित साहित्य या भाष्यांतूनच निर्माण होत असतें. हें भाष्यसामर्थ्य ज्या बुद्धीला नाही ती कादंबरी वा नाटक कधीहि लिहूं शकणार नाही. ज्या बुद्धीला अवलोकनांतून स्वतंत्र निर्णय करून सामान्य सिद्धान्त प्रस्थापित करण्याची शक्ति नाही ती इतिहासमीमांसा काय करणार आणि राजकारणाचें शास्त्र कसें निर्माण करणार ? ती निबंध कसे लिहिणार आणि ग्रंथ कसे रचणार ? चवदाव्या-पंधराव्या शतकांत पाश्चिम युरोपीय देशांतील मानवाने धार्मिक, सामाजिक व राजकीय संग्राम करून प्रथम आपली बुद्धि, आपली प्रज्ञा व आपली प्रतिभा म्हणजेच साहित्यजननी सरस्वती बंधमुक्त केली, तिला स्वातंत्र्य प्राप्त करून दिलें आणि त्यामुळे व्यक्तिव्यक्तीच्या चित्तांतून मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रांत हुंकार स्फुरूं लागले, सर्व विषयांत तिचे उन्मेष निःशंक रहाटूं लागले. जीन फ्राइसॅरट ( जन्म १३३८ ) याने

इंग्लंडचा इतिहास लिहिला. रिचर्ड हॅकलुईट ( जन्म १५५२ ) याने इंग्लंडच्या जलपर्यटनाचा इतिहास लिहिला. राफेल हॉलिनशेड यानेहि १५७७ सालीं इंग्लंडचा इतिहास प्रसिद्ध केला. मॉंटेन याचे निबंध १५८१ सालीं प्रसिद्ध झाले. बेकनचे निबंध व ' ॲडव्हान्समेंट ऑफ लर्निंग ' व ' नोव्हम् ऑरगॅनम् ' हे ग्रंथ १६०५ व १६२० सालीं प्रकाशित झाले. शेक्स्पीयरची नाट्यरचना याच काळांतली आहे. सतराव्या शतकांत तर पश्चिम युरोपांत सर्व प्रकारच्या सारस्वताला अगदी उधान आलें. रेसिन, कार्नेली, मोलियर या फ्रेंच नाटककारांनी आपल्या अमर कलाकृति याच शतकांत निर्माण केल्या. सॅम्युएल बटलरचें ' ह्युडिब्रास ' हें काव्य १६६० च्या सुमाराचें आहे. ही एक जहरी उपहासिनी आहे. प्युरिटन लोकांच्या अतिरेकी कर्मठपणावर तींत वक्रोक्तिपूर्ण टीका आहे. जॉन ईव्हलीन व सॅम्युएल पेपी यांनी आपल्या प्रचंड रोजनिशा याच शतकांत रचल्या. आपल्या काळच्या सामाजिक, धार्मिक व राजकीय घडामोडींविषयी त्यांनी आपले विचार यांत संग्रहीत करून ठेविले आहेत. सरव्हॅंटीसची ' डॉन क्विक्झोट ' ही कादंबरी या शतकाच्या प्रारंभीं आणि डानियल डेफो याची ' रॉबिन्सन क्रूसो ' ही कादंबरी व ' कॅप्टन सिंगलटन ' इ. आणखी कादंबऱ्या पुढल्या शतकाच्या आरंभीं प्रसिद्ध झाल्या. मॅकिआव्हेलीचा ' प्रिन्स ' हा राजकारणशास्त्रावरचा ग्रंथ सोळाव्या शतकांतच जगाने वाचला होता. ह्यूगो ग्रोशस याचा ' राइट्स् ऑफ वॉर अँड पीस ' हा आंतरराष्ट्रीय कायद्यावरचा ग्रंथ आणि थॉमस हॉब्स् याचा ' लेव्हियाथन ' हा राजकारणशास्त्रावरचा ग्रंथ हे याच शतकांत प्रसिद्ध झाले.

हें सर्व साहित्य निर्माण झालें त्याच्या आधी मानवाची बुद्धि मुक्त झाली होती हें वर सांगितलेंच आहे. पण त्या बरोबरच ती मुक्त बुद्धि जगभर फिरूं लागली होती हें आपण ध्यानांत ठेविलें पाहिजे. मार्कोपोलो १२९८ सालींच आशिया खंड पाहून परत गेला होता. पुढे मग कोलंबस, वास्को-डि-गामा, हें जुनें नवें जग पाहून आले आणि मग युरोपचे नागरिक विश्वसंचार करूं लागले. त्यांनी बाह्य पृथ्वी पाहिली, तिचें अंतरंगहि निरीक्षिलें. सागर पाहिला आणि त्याचा थांगहि काढला. याच वेळीं कोपर्निकस, केप्लर, गॅलिलिओ, न्यूटन यांनी तीस-तीस वर्षें नभोमंडळांत राहून नक्षत्र,

ग्रहतारे, सूर्यचंद्र यांच्या मुलाखती घेतल्या. सारांश, मानवाची बुद्धि मुक्त होतांच तिने जड, चेतन, चराचर सर्व विश्व आपल्या दृष्टिपथांत सामावून घेतलें, त्याचें सूक्ष्म अवलोकन केलें आणि त्यामुळेच तिला एक अद्‌भुत अशी सर्जनशक्ति, नवनिर्माणशक्ति प्राप्त झाली. या सरस्वतीच्या कृपेमुळेच युरोपने वर सांगितलेलें काव्यनाटकादि साहित्य निर्माण केलें. जगप्रवास, व्यापार, स्वराज्य, स्वातंत्र्य, राजकारण यांचा आणि साहित्याचा कांही संबंध असेल का असा प्रश्न आरंभी आपण विचारला होता. युरोपच्या इतिहासावरून हे मानवी प्रज्ञेचे सर्व आविष्कार परस्परावलंबी आहेत, परस्परसंबद्ध आहेत, बहुधा अविभाज्य आहेत असें आपणांस दिसून येईल. केवळ अध्यात्मज्ञान हवें असेल, केवळ परमेश्वरप्राप्ति हा जरी हेतु असला तरी भूगर्भ, आकाश, भूगोलरचना, चंद्रसूर्य, तारामंडळें, ग्रहमंडळें, मेघमंडळें, नवखंडें, चौदा भुवनें, रागज्ञान, तालज्ञान, रोगचिकित्सा, औषधिज्ञान, एवंच सर्व पिंडब्रह्मांडरचना श्रवण करावी असें समर्थांनी सांगितलें आहे. मग ज्यांना मानवी जीवनाविषयी साहित्य निर्मावयाचें आहे त्यांनी लोकव्यवहाराचें, चराचर विश्वाचें, पिंडब्रह्मांडाचें किती श्रवण केलें पाहिजे, किती जवळून अवलोकन केलें पाहिजे, हें सांगावयास पाहिजे काय? श्रवणभक्तीवांचून सरस्वती कधींच प्रसन्न होत नाही.

: ४ :

## अहंवृत्तीचा अभाव

आपण प्राचीन मराठी काळ पाहिला तर असें दिसतें की मनुष्याच्या ज्या अहंवृत्तींतून, व्यक्तित्वाच्या हुंकारांतून, आत्मस्वातंत्र्यांतून, सर्व साहित्य निर्माण व्हावयाचें तें स्वातंत्र्य, ती अहंवृत्ति, तें व्यक्तित्व येथें जागेंच झालें नव्हतें. कारण युरोपियनांनी सामाजिक रूढि, धार्मिक सत्ता व राजसत्ता यांशीं संग्राम करून जशी आपली बुद्धि, आपली प्रज्ञा मुक्त करून घेतली होती तशी भारताच्या नागरिकांनी घेतली नव्हती. वेदप्रामाण्य, गुरुवचनप्रामाण्य, पूर्वकर्म, जातिबंधनें, कर्मकांडाचे विधिनिषेध या बंधनांनी त्यांची बुद्धि दीर्घकाल जखडलेली होती. स्वातंत्र्य असें तिला कसलेंच नव्हतें त्यामुळे ती अगदी पंगु होऊन गेली होती. असली पंगु बुद्धि

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
...३४३...द्द... वि: ...२/३१...
...१४३०... नों: दि: २३-३-६२



पण लक्षांत कोण घेतो ', ' उषःकाल ', ' शारदा ', ' सवाई माधवरावाचा मृत्यु ', 'स्फूर्ति', ' तुतारी ', ' भृंग ', ' मूर्ति दुजी ती ', ' सागरास ', ' निर्झर ', ' अरुण ', असल्या कलाकृति निर्माण करूं शकत नाही. ' वक्तृत्व ', 'इतिहास', ' विद्वत्त्व ' आणि कवित्व ', ' महाराष्ट्रधर्म ', ' भारतीय विवाहपद्धति ', ' शिवकालीन समाजरचना ', ' मनुष्यसमाजाची पूर्णावस्था ', ' स्वयंवर ', ' प्रियाराधन ', ' घटस्फोट ', ' आमचें काय होणार ? ', ' स्त्रीशिक्षण ', ' दोन शब्दांत दोन संस्कृति ', ' मृगशीर्ष ', ' आर्यांचें मूलस्थान ' असले निबंध प्रबंध ती रचूं शकत नाही. पूर्वसूरींनी लिहिलेलीं काव्यें, पूर्वजांनी लिहिलेल्या पुराणकथा यांच्या आधारांनीच ती चालणार. त्यांतील धर्म, त्यांतील नीति, त्यांतलेंच अध्यात्मज्ञान ती सांगणार. ' नियमन मनुजासाठी, मानव नसे नियमनासाठी, देव दानवां नरें निर्मिलें, ' हे विचार तिला पेलणार नाहीत. किंवा सर्व विश्वाविरुद्ध उभे राहून ' इष्ट असेल तें बोलणार व साध्य असेल तें करणार' असें छातीठोकपणें सांगण्याचें धैर्य तिला होणार नाही. हे सर्व अहंवृत्तीचे, व्यक्तित्वाचे आविष्कार आहेत. त्याचाच त्या काळीं बव्हंशीं अभाव होता मग त्याचे आविष्कार कोठून निर्माण होणार. प्रबळ अस्मिता ही सारस्वताची जननी–सरस्वती–होय. तीच पराधीन झाल्यावर सारस्वत कसें निर्माण व्हावें ?

'बव्हंशीं' अभाव होता असें म्हटलें त्याचें कारण असें की ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास या थोर विभूति याच कळांत जन्मल्या होत्या. त्यांची अस्मिता, त्यांची अहंवृत्ति प्रबळ होती म्हणूनच त्यांच्या हातून तें थोर साहित्य निर्माण झालें. वेदालाहि बोल लावावा हें धैर्य ज्ञानेश्वरांनी दाखविलें. अमृतालाहि जिंकणारी भाषा आपण लिहूं हा आत्मविश्वास त्यांना होता. महाराघरीं जेवावयास जावें, अस्पृश्य बालकाला उचलून घ्यावें, हा रूढिभंग करण्याची शक्ति एकनाथांजवळ होती. तुकाराम तर कळिकाळालाहि पैजारा मारण्यास भीत नव्हते. ' वेदांतील मर्म आम्हांसीच ठावें, येरांनी वहावे भार माथा' असें म्हणून शिष्ट ब्राह्मणांना हेटाळून टाकण्याचा ठसपणा त्यांनी पदोपदीं प्रगट केला आहे. प्रपंचपरमार्थांतील श्रेष्ठकनिष्ठभाव उलटून टाकून ' आधी प्रपंच करावा नेटका ' असें समर्थांनी सांगितलें. ही अहंवृत्ति, हें व्यक्तित्व असामान्य आहे यांत शंका नाही. पण आपण एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे की या महापुरुषांनी

स्वतः जरी इष्ट तें बोलण्याचें व साध्य तें करण्याचें धैर्य दाखविलें तरी मनुष्याचें व्यक्तित्व, त्याची प्रज्ञा मुक्त करण्याचें तत्त्वज्ञान त्यांनी सांगितलें नाही. त्या बाबतींत त्यांनी जुन्या तत्त्वज्ञानाचाच आग्रहाने, अट्टाहासाने पुरस्कार केलेला दिसतो. 'श्रुतिपरौती माऊली जगा नाही', 'जन्मप्राप्त कर्म कोणाला डावलतां येणार नाही', 'सद्‌गुरुविना सोय नाही.' इ. तत्त्वज्ञान ज्ञानेश्वरांनी ठायी ठायी सांगितलें आहे. एकनाथ एकदा महाराघरीं जेवले. पण तो विचार समाजाला त्यांनी शिकविला नाही आणि अंत्यजांच्या बालकांना कायमचें उचलून घ्यावें, ही रूढि त्यांनी निर्माण केली नाही. वेदप्रामाण्य, पूर्वकर्म, जन्मप्राप्तकर्म, सद्‌गुरुसेवा आणि कलियुग या मानवी बुद्धीच्या शृंखलांवर यांपैकी चुकूनसुद्धा कोणी प्रहार केला नाही. समर्थांचें कांहीं बाबतींत तत्त्वज्ञान जरा निराळें दिसतें. पण त्यांच्या एकंदर ग्रंथ-संभारांत तें म्हणजे दर्यांमें खसखस ! त्यांनी निराळें कांही सांगितलें आहे हें आज तीनशें वर्षांनी शोधून काढावें लागत आहे.

युरोपांतल्या समाजधुरीणांनी जुनें शब्दप्रामाण्याचें, गुरुवशतेचें, विषम-तेचें तत्त्वज्ञान बुद्धिपूर्वक उलथून टाकलें आणि व्यक्तिस्वातंत्र्याचे व इहवादाचे सिद्धान्त, प्राणार्पण करून, प्रस्थापित केले. आणि हे शेकडो ग्रंथ-कारांनी, शास्त्रज्ञांनी तत्त्ववेत्त्यांनी व धर्मसुधारकांनी केलें. धार्मिक, सामाजिक अन्यायाचा प्रतिकार करण्यासाठी त्यांनी आत्मबलिदान केलें. शतकानुशतकें त्यासाठी संग्राम केला. एवढ्या दीर्घ प्रयत्नानंतर तेथल्या लोकांची बुद्धि मुक्त झाली आणि तिला सर्जनशक्ति प्राप्त झाली. येथे तसा प्रयत्नहि झाला नाही. उलट ज्यांची अहंवृत्ति प्रबळ होती त्यांनी सुद्धा जुन्याच तत्त्वांचा आग्रहाने पुरस्कार केला. त्यामुळे, कांही अपवाद वगळले तर, येथे समाजमनांत साहित्य-निर्मितीला अवश्य त्या अहंवृतीचा, व्यक्तित्वाचा अभाव होता असेंच म्हणणें प्राप्त आहे. पुढे राजकीय क्षेत्रांत हें असेंच दृश्य दिसतें. श्रीशिवछत्रपति म्हणजे एका असामान्य अस्मितेचें स्फुरणच होय. त्या अस्मितेमुळेच महाराष्ट्राचा व भारताचा इतिहास बदलून गेला. शिवछत्रपतींनी तर नवें तत्त्वज्ञानाहि सांगितलें होतें. त्या अन्वयें अनेकदा आचारहि केला. पण अन्यत्र एका लेखांत ( शिवछत्रपतींचें क्रांतिकार्य-' वसंत ' दिवाळी अंक १९६० ) सांगिल्याप्रमाणे त्या काळच्या कोणाहि शास्त्रीपंडितांनी तें क्रांतिकारक तत्त्व-

ज्ञान ग्रंथनिविष्ट न केल्यामुळे एका पिढीच्या आंतच गाडी पहिल्या चकारीं-तून चालूं लागली. कृतीच्या मागे तत्त्वज्ञान सारखें उभें राहिलें तरच समाजाची मनःक्रांति होते. पेशव्यांच्या काळांत शेकडो रामदास हवे होते असें राजवाड्यांनी म्हटलें आहे त्याचा अर्थ हाच आहे. त्याच लेखांत ग्रंथ-समूह, धर्मव्याख्यानें यांचें महत्त्व त्यांनी सांगितलें आहे. आणि तोफाइतकाच व्याख्यानांचा व विचारी पुरुषांचाहि राष्ट्रांतील लोकांचें मन वळविण्यास उपयोग होतो असें मत मांडलें आहे.

डॉ. के. ना. वाटवे यांनी ' संस्कृत काव्याचे पंचप्राण ' या आपल्या ग्रंथांत कालिदास, भारवी, माघ व श्रीहर्ष यांच्या महाकाव्यांचें विवेचन करतांना महाकवि ही पदवी कोणाला देतां येईल याचा विचार केला आहे. ज्याच्या काव्यांत कवीच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार होतो तो महाकवि होय. इतर कवि केवळ पुराणिक होत असें त्याचें मत आहे. त्यांच्या मतें कालिदास भारवी हे महाकवि होत. पण माघ मात्र केवळ पुराणिक होय. कारण ते म्हणतात की, माघकाव्यांत माघ कोठे दिसत नाही. कालिदासाने ' कुमार-संभव', ' रघुवंश ' या आपल्या काव्यासाठी विषय जुन्या पुराणांतलेच निवडले होते. पण त्याने केवळ शिवपार्वतीविवाहांचा किंवा सूर्यवंशाचा वृत्तान्त सांगितला नाही. या कथांतील घडामोडीचा त्याने एक स्वतंत्र अर्थ बसविला होता. त्यांची एक संगति लावली होती. कुमारसंभवांत स्वार्थ-त्यागाचा एक भव्य व महान् आदर्श त्याला दाखवावयाचा होता. स्त्री-पुरुष प्रेम हें केवळ कामतृप्तीसाठी नाही. तसें मानणाऱ्या समाजाचें तेज, सामर्थ्य नष्ट होतें, उलट शारीरप्रेमाची कर्तव्याच्या अग्नींत आहुति दिली तर त्यांतूनच प्रचंड तेज, प्रचंड प्रतिकारशक्ति निर्माण होते, हा शिवपार्वती प्रेमाचा अर्थ कालिदासाने लावला आणि मग त्या बीजांतून त्याने महाकाव्यवृक्ष निर्माण केला. रघुवंशांत त्याला राजधर्मांचा आदर्श निर्माण करावयाचा होता. ' त्याग हाच राजधर्मांचा प्राण होय ' हा स्वकालीन समाजाला संदेश द्यावयाचा होता. भारवीचा ' किरातार्जुनीय ' रचण्यांत असाच हेतु होता. भेकड संन्यासवृत्तीचा निषेध करून त्याला क्षात्रधर्मांची प्रेरणा स्वसमाजाला द्यावयाची होती. आणि त्या सूत्रांत त्याने ती घटना गुंफली होती. नव-

निर्मितीचा हा अर्थ आहे. जुन्या कथा हा कच्चा माल समजून कवि आपल्या मनांतले विचार बीज किंवा तत्त्वबीज त्यांत टाकतो. आणि त्या कच्च्या मालांतून, त्या मातींतून नवा वृक्ष निर्माण करतो. ती मूळची माती ही नव-निर्मिति नाही. कविमनाने, त्याच्या व्यक्तित्वाने ती अलंकृत झाली की तिला काव्यपदवी येते. हें होण्यासाठी कवीच्या मनांत स्वसमाजाला कांही स्वतंत्र विचार वा कल्पना वा तत्त्व सांगण्याची तळमळ असली पाहिजे. जो स्वकालीन समाजाशीं त्याच्या सुखदुःखाशीं एकरूप होत नाही, त्याशीं समरस होत नाही, त्याला कांही सांगावें असा उन्मेष ज्याच्या चित्तांत येत नाही तो महाकवि कधीच होणार नाही. माघ या कवीच्या मनाला ही थोरवी नव्हती. स्वसमाजाला सांगावें असें स्वतंत्र प्रतिपाद्य त्याच्याजवळ कांही नव्हतें. म्हणून डॉ. वाटवे त्याला केवळ पुराणिक म्हणतात.

मराठी पंडितकवींची हीच पदवी आहे. त्यांच्या कवितेला मराठी कविता म्हणणें हेंसुद्धा विष्णुशास्त्री यांना मान्य नाही. वामनपंडित, मोरोपंत यांची कविता केवळ संस्कृत भाषेच्याच धाटणीवर असल्यामुळे तीस मराठी कविता म्हणण्यापेक्षा संस्कृत कवितेचें रूपांतर म्हणणें वाजवी होय, असें 'कविता' या निबंधांत त्यांनी म्हटलें आहे. 'मोरोपंताची कविता' या निबंधांत प्रथम त्या कवीचा मोठा गौरव केल्यानंतर समारोपाच्या वेळीं 'आमच्या महाराष्ट्र कवींनी सामान्यतः अर्थव्यंजनाच्या पलीकडे थोडेंच लक्ष दिलेलें आढळेल. त्यांचा ग्रंथरचना करण्यांतला उद्देश केवळ भक्ति, ज्ञान, वैराग्य यांपैकीच असल्यामुळे भाषा कमविण्याचा जो अप्रधान उद्योग त्याची त्यांनी उपेक्षा केली यांत मोठेंसें नवल नाही.' असा अभिप्राय त्यांनी दिला आहे. 'विद्वत्त्व व कवित्व' या निबंधांत मोरोपंतासारख्या कवींचा गौरव करणाऱ्यांना त्यांनी अप्रबुद्ध ठरविलें आहे. याच संदर्भात शास्त्रीबुवांनी जुन्या संस्कृत शास्त्रीपंडितांच्या रासिकतेविषयी काय मत दिलें आहे तें पाहून ठेवणें उपयुक्त होईल. 'या जुन्या शास्त्र्यांना कवितेचें रमणीयत्व व तिचे मुग्धविलास अगदीच कळत नाहीत. त्यांना काव्याभिरुचि कितपत असते हें त्यांच्या टीकांवरून व संभाषणप्रसंगीं संस्कृत कवींच्या ग्रंथांतून ते जीं सुभाषितें काढतात त्यावरून अगदी स्पष्ट दिसून येतें. युरोपांतील सामान्य पंडितांस आमचे काव्यग्रंथ जसे समजतात तसे इकडील शास्त्र्यांस अगदीच समजत

नाहीत व त्यांतील अप्रतिम रसाचा आस्वाद घेण्यास जर हे परस्थ लोक आम्हांस न शिकवते तर तो आम्हांस कधीहि समजता ना यांतहि अगदी शंका नाही.' असा अगदी परखड अभिप्राय 'विद्वत्त्व व कावित्व' या निबंधाच्या प्रारंभींच त्यांनी देऊन ठेवला आहे. जुना प्रख्यात संस्कृत टीकाकार मल्लीनाथ याच्याविषयीहि शास्त्रीबुवाचें तेंच मत आहे. शब्दार्थ, व्याकरण यांपलीकडे तो जात नाही. इंग्रजी टीकाकारांची योग्यता त्याला नाही. 'या जुन्या टीकाकारांच्या मतें सारे कवि सारखेच, साऱ्यांचीं काव्यें उत्कृष्टच व सारींच पद्यें बहारीचीं असल्यासारखें दिसतें, असा उपहास ते करतात. डॉ. केतकरांनी 'महाराष्ट्रीयांचें काव्यपरीक्षण' या आपल्या ग्रंथांत खुद्द जुन्या पंडितकवींच्या रसिकतेविषयी असेंच मत व्यक्त केलें आहे. या कवींनी आपल्या आधीच्या कवींचीं चरित्रें लिहिलीं. पण कवींच्या काव्याचें पृथक्करण करून गुणावगुणांचें परीक्षण करण्याची त्यांची पद्धत नव्हती. श्रद्धेमुळे त्यांची परीक्षणशक्ति दुर्बल झाली होती. परीक्षण करण्यासाठी जें मानसिक स्वातंत्र्य लागतें तें या संप्रदायबद्ध कवींना नव्हतें.

मानसिक स्वातंत्र्य नव्हतें! डॉ. केतकरांनी जें साहित्यचिकित्सेविषयी म्हटलें तें सर्वच क्षेत्रांत झालें होतें. ती निवृत्ति, ती उदासीनता ते सद्गुरु, तें शब्दप्रामाण्य, तो दैववाद, ती पूर्वकर्मांमुळे निर्माण झालेली अगतिकता, यांनी येथल्या माणसांचीं मनें अधू झालीं होतीं, त्यांच्या चित्तांतील सरस्वती पराधीन झाली होती. त्यांचें मन पंगु झालें होतें. पंगु मनांतून नवी सृष्टि कशी निर्माण होणार?

: ५ :

## जीवनाचा अर्थ

भोवतालची सृष्टि पाहून, जगाचें, संसाराचें, मानवी जीवनाचें अवलोकन करून त्याचा कांही अर्थ लेखक मनाशीं निश्चित करतो. आणि मग तो समाजाला सांगावा अशी तळमळ त्याच्या मनाला लागते. या आंतरिक प्रेरणेंतून साहित्य निर्माण होतें. तें कादंबरीनाटकादि ललित साहित्य असो किंवा इतिहास, राजकारण, रसायनादि शास्त्रीय असो. त्याचें सर्जन होण्याची

प्रक्रिया हीच आहे. उषःकाल कादंबरी हरिभाऊंनी कशी लिहिली, तिच्या निर्मितीची प्रक्रिया कशी घडली हें पाहणें उद्बोधक होईल. मराठ्यांच्या स्वराज्याचा हा उदयकाल होता. त्याविषयी विचार करतांना क्रांति कशी घडत जाते याची एक कल्पना, एक सिद्धान्त हरिभाऊंनी मनाशीं निश्चित केला आणि मग त्या सूत्रांत सर्व घटना बसवून एकजीव अशी ही कलाकृति त्यांनी निर्माण केली. यांत त्यांच्या मनांत आधी काय आलें, मग काय स्फुरलें हा भाग गौण होय. त्यांनी कोणत्या सूत्रांत गुंफण केली हें महत्त्वाचें आहे. क्रांति घडतांना अखिल देशांत शेकडो लोकांच्या मनांत प्रथम असंतोष धुमसूं लागतो. हें राज्य उलथून पडावें, नष्ट व्हावें, कोणी तरी या उन्मत्तांना धूळ चारावी अशी तीव्र इच्छा लोकांच्या मनांत उद्भवते; पण सामान्य लोक अगतिक असतात, धैर्यहीन असतात. ते नुसते संतप्त होतात, हात चोळीत, बसतात, शिव्याशापापलीकडे जात नाहीत. पण त्यांची इच्छा मात्र तीव्र असते. हीच इच्छा कोणा तरी तेजस्वी पुरुषाच्या रूपाने मूर्त होते आणि मग हजारो लोक त्याच्याभोवती जमा होतात. संघटना होते, सामर्थ्य निर्माण होतें आणि मग भडका उडतो. कथानक सांगतांना दहा-बारा ठिकाणीं हरिभाऊंनी हें सूत्र, हें तत्त्व पुनः पुन्हा सांगितलें आहे. मराठ्यांच्या या क्रान्तीविषयी आणखीहि अशींच दोन तीन-तत्त्वें त्यांना सांगावयाचीं होतीं. स्त्री-पावित्र्यांच्या अतिरेकी रजपुती कल्पना, त्यांचें अविवेकी शौर्य व साहस हे मराठ्यांनी, शिवबाराजांनी, समर्थांनी पालटून टाकलें. शौर्याला सावधतेची, कारस्थानाची, मुत्सद्देगिरीची, बुद्धीची जोड दिली हा महाराष्ट्राचा विशेष त्यांना सांगावयाचा होता.

क्रान्तीसाठी धर्माच्या वारकरी कल्पना बदलून 'स्वराज्य-संस्थापन हेंच तुमचें कर्तव्य, हेंच पुरश्चरण, तुमची तपश्चर्या हीच' ही धारकरी कल्पना रूढ होणें अवश्य असतें हें हरिभाऊंना सांगावयाचें होतें. हें सर्व शेक्स्पीयरने म्हटल्याप्रमाणें, प्रथम त्यांच्या कल्पनेंत सिद्ध झालें, त्यांनी तें अंतश्चक्षूंनी प्रथम पाहिलें आणि मग त्याला आपल्या लेखणीने मूर्त करून नामरूपाधीन करून टाकलें. पण मराठ्यांचा इतिहास वाचतांना, इतर ग्रंथांचें अध्ययन करतांना, मानवी व्यवहाराचें अवलोकन करतांना त्याचा अर्थ बसवून कांही सिद्धान्त मनाशीं निश्चित करून त्या जीवनावर स्वतंत्र भाष्य

करण्याचें सामर्थ्य हरिभाऊंच्या ठायीं होतें. हें सामर्थ्य प्राप्त व्हावें असें मानसिक स्वातंत्र्य त्यांना होतें म्हणूनच ही कादंबरी त्यांना निर्मितां आली. शब्दप्रामाण्यामुळे अवलोकन-निर्णयाचें सामर्थ्य जिचें नष्ट झालें ती बुद्धि ऐतिहासिक घडामोडींचा अर्थ कसा बसवणार ? तो कळण्याची तिला पात्रता कोठून येणार ? आणि ती नाही म्हणजे मग नाटककादंबरी हें साहित्य कसें निर्माण होणार ?

साहित्यनिर्मितीला जी अहंवृत्ति, जें कणखर व्यक्तित्व, जो आत्मप्रत्यय अवश्य असतो तोच प्राचीन मराठी कालखंडांत नष्ट झाला होता. आणि त्यामुळे जिवंत साहित्याची निर्मिति झाली नाही, हा विचार आता स्पष्ट झाला असेल असें वाटतें. व्यक्तित्व नष्ट होण्याचीं, शब्दप्रामाण्य, लाचार गुरुभक्ति, कर्मसिद्धान्त, जातिसिद्धान्त हीं कारणें वर सांगितलीं. आणखी एका प्रबळ कारणाचा आता विचार करूं. राजवाडे, खरे यांनी इतिहास-संशोधन केलें, हरिभाऊंसारख्यांनी ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या. याच्यामागे प्रेरणा काय होती ? ‘ पूर्वदिव्य ज्यांचें त्यांना रम्य भाविकाल ’ असा एक विश्वास, अशी दृढ, अविचल श्रद्धा त्यांच्या मनांत होती. विष्णुशास्त्री यांनी पूर्वपरंपरेचा अभिमान अंगारासारखा फुलत ठेवण्याचा प्रयत्न केला तो यासाठी की या दिव्य पूर्वइतिहासाच्या प्रेरणेने गतवैभव पुन्हा मिळवून भावी काळ रम्य करून टाकण्याची उमेद लोकांना यावी. पण भावी काळाबद्दलच्या सर्व आशा ज्यांच्या मनांतून जळून खाक झाल्या आहेत, ज्यांच्या मनांत त्यांच्या धर्मानें भावी काळाबद्दल संपूर्ण निराशाच भरून ठेविल्या आहेत त्यांना ही उमेद यावी कशी ? भारतामध्ये शेकडो वर्षें कलियुगकल्पना लोकांच्या मानगुटीची पकड घेऊन बसली आहे. येथून पुढे सर्व अधःपातच होणार, धर्म लयाला जाणार, विनाश ओढवणार, हें पदोपदीं धर्मधुरीण लोकांच्या कानींकपाळीं ओरडून सांगत आहेत. सत्ययुग पूर्वी होऊन गेलें, आता माणसाच्या हातून पापच घडणार, स्त्रिया पुरुषांचें ऐकणार नाहीत, सबगोलंकार होणार, धरित्री पिकें देणार नाही, मेघ वर्षाव करणार नाहीत, सर्वत्र प्रलय होणार, आणि हा सर्वनाश अटळ आहे, मानवाच्या हातीं कांही नाही, हें तत्त्वज्ञान समाजमनाला, कर्त्या पुरुषांच्या बुद्धीलाहि आज शेकडो वर्षें खच्ची करीत आहे. मनुष्य जसा

वेदाधीन आहे, कर्माधीन आहे, जन्माधीन आहे तसाच तो काळाधीन आहे हा विचार ज्याच्या मनांत दृढ झाला त्याला साहित्य-निर्मितीला, ग्रंथरचनेला, शास्त्रसंशोधनाला अवश्य असणारें व्यक्तित्व, तें आत्मस्वातंत्र्य कसें प्राप्त व्हावें ? त्याला सरस्वती कशी प्रसन्न व्हावी ?

ललित साहित्याचा येथवर बराच विचार केला. आता राजकारण, अर्थशास्त्र, इतिहास, रसायन, पदार्थविज्ञान यांच्या दृष्टीने विचार करूं.

: ६ :

## जिज्ञासा कोठे गेली ?

मराठ्यांचा इतिहास वाचतांना एक प्रश्न माझ्या मनाला नेहमी अस्वस्थ करतो. सतराव्या शतकाच्या प्रारंभीच इंग्रज हिंदुस्थानांत आले, तेथपासून व्यापार व राजकारण या क्षेत्रांत अखिल भारतांत त्यांचे जे प्रचंड उद्योग चालू होते ते येथल्या मराठ्यांच्या, मुसलमानांच्या, रजपुतांच्या व इतर जमातींच्या उद्योगाहून सर्वस्वी भिन्न होते. त्यांचें सैन्य अत्यंत शिस्तबद्ध होतें. त्यांचीं शस्त्रास्त्रें जास्त मारक होतीं; त्यांचा कारभार रेखीव होता. व्यापारावर त्यांचा फार भर असे, त्यांत त्यांना अमाप पैसा मिळे. त्यांचे सेनापति कर्जबाजारी नसत. त्यांच्याजवळ छापलेलीं पुस्तकें होतीं आणि येथेहि त्यांनी पुस्तकें छापण्यास प्रारंभ केला होता. या सर्व गोष्टी आपल्या जीवनापेक्षा, संस्कृतीपेक्षा अगदी भिन्न होत्या. असें असून त्या काय आहेत, त्या कशा चालतात, ही शिस्त त्यांना का शक्य होते, पैसा त्यांना कोठून मिळतो, छापखाना ही काय कल्पना आहे, याचें काडीमात्र कुतूहल भारतांतील लोकांना, येथल्या बुद्धिमंतांना, कारागिरांना, व्यापाऱ्यांना, पंडितांना, वाटूं नये याचा अर्थ काय ? हें मनुष्याच्या जिवंतपणाचें लक्षण आहे काय ? समोर घडत असलेलें पाहण्याची, व त्याचा अर्थ समजण्याची शक्तीच या समाजांतून नष्ट झाली होती काय ? एक दोन गोष्टींकडे तर राजकारणी लोकांचें निश्चित लक्ष जावयास हवें होतें. शिवछत्रपतींच्या आधी इहलोकींच्या उत्कर्षाविषयी लोक उदासीन होते. ते निवृत्तिमार्गी होते. पण स्वराज्यस्थापनेनंतर प्रत्यक्ष राजकारभार करणारे, स्वारीशिकारीचा, युद्धाचा उद्योग करणारे लोक तर

उदासीन नव्हते ना ? स्वराज्य-साम्राज्य हें त्यांचें उद्दिष्ट होतें. तो त्य. नित्याचा उद्योग होता. मग या देशांतल्या कोणच्याहि राज्यांतला, कोणच्याहि धर्मांचा माणूस, जरा थोडें कारण घडतांच, स्वजनद्रोह करतो, फितूर होतो, शत्रूला जाऊन मिळतो, त्यांच्या बाजूने लढतो आणि उलट इंग्रज किंवा फ्रेंच माणूस अपवादाला सुद्धा असें करतांना आढळत नाही, हा काय चमत्कार आहे याची निदान जिज्ञासा तरी या धुरंधर लोकांना वाटावी की नाही ? जिज्ञासा हें तर मानवत्वाचें पहिलें लक्षण ! तेंच या भूमींतून कसें नष्ट झालें ? नाना फडणीस, सखाराम बापू आणि त्या वेळचे साडेतीन व साडेतीनशे शहाणे यांच्या देखत इंग्रजांच्या राज्यकारभारांत एक विलक्षण गोष्ट घडत होती. वॉरन हेस्टिंग्ज हा काल सर्व सत्ताधीश असतो. आणि आज कॉर्नवालीस विलायतेहून येतांच एका क्षणांत तो सर्व सत्ता, सर्व अधिकार खाली ठेवून त्याच्या हातीं सूत्रें देतो याचा अर्थ काय ? हिंदुस्थानांत सत्ताधारी मेल्यावांचून किंवा मारल्यावांचून आपल्या जागेवरून हलत नाही आणि येथे सर्वाधिकारसंपन्न माणूस, अगदी खुषीने, नवीन येणाऱ्या अधिकाऱ्याचें स्वागत करून त्याच्या हातीं सत्ता देतो, याचें रहस्य काय आहे ? या दोघांना सहज खेळविणारी अशी कोणची शक्ति वर आहे, तें आपण पाहिलें पाहिजे, जाणलें पाहिजे, शक्य तर ती शक्ति आपल्याला प्राप्त करून घेतली पाहिजे, असा विचार, अशी तळमळ त्या साडेतीनशे शहाण्यांपैकी एकलाहि कां वाटली नाही ?

ही तळमळ ज्या क्षणीं त्याला वाटली असती त्या क्षणीं तो राजकारण-शास्त्रावर ग्रंथ लिहिण्यास बसला असता. मग त्याने जुने ग्रंथ पाहिले असते, जीवन अवलोकिलें असतें आणि मग सिद्धान्त करण्याची, परिस्थिति अभ्यासून निष्कर्ष काढण्याची शक्ति त्याला आली असती. दुर्दैव असें की भारतांतून या शक्तीचाच लोप त्या काळांत झाला होता. सर्व शास्त्र-निर्मितीच्या बुडाशीं हीच शक्ति असते. तिच्या अभावीं शास्त्रें कशीं निर्माण होणार ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ग्रंथालय
अनुक्रम ............ वि: ............
क्रमांक ............ नों: दि: ............

: ७ :

## सिद्धान्तसामर्थ्य

दहा, वीस, पन्नास, शंभर वनस्पति माणसाने पाहिल्या आणि त्या सर्वांतील सामान्यधर्म त्याच्या ध्यानांत आला की वनस्पतिशास्त्र तयार होऊं लागतें. आकाशांतील ग्रहगोल तारे तो वर्षानुवर्षें न्याहाळीत बसला की त्यांतील सामान्यधर्म, त्यांच्या गतिस्थितीचे नियम त्याला समजतात आणि त्यांतून ग्रहज्योतिषशास्त्र, खगोलशास्त्र तयार होतें. हजार मानवी मनाचा त्याने अभ्यास केला की त्यांविषयी कांही सामान्य सिद्धान्त सांगण्याची, निष्कर्ष सांगण्याची शक्ति त्याला प्राप्त होते. रसायन, पदार्थविज्ञान या शास्त्रांचें असेंच आहे आणि तसेंच अर्थशास्त्र, राजकारण यांचें आहे. पण त्यासाठी प्रथम आर्थिक घडामोडी अभ्यासाव्या लागतात; राजकीय घडामोडींचें सूक्ष्म अवलोकन करावें लागतें. भारतांत पूर्वी हें घडत. असलें पाहिजे. त्यावांचून रसायन, वैद्यक, खगोल हीं शास्त्रें, त्याचप्रमाणे व्याकरण, भाषा, हीं शास्त्रें, राजनीति, अर्थविद्या हीं शास्त्रें निर्माणच झालीं नसतीं. पुढील काळांत ही अवलोकनवृत्ति, अभ्यासवृत्ति लुप्त झाली म्हणून नवीं शास्त्रें जन्माला आलीं नाहीत आणि जुनीं कुजून गेलीं. नित्य प्रयोग, नित्य अनुभव, नित्य पडताळा, नित्य संशोधन हें शास्त्रज्ञानाला—त्याच्या जन्माला, विकासाला व परिणतीला—अवश्य असतें. तें नाही म्हणजे समोरच्या घडामोडीचें आकलन करण्याचें मानवी मनाचें सामर्थ्य नष्ट होतें. त्याच्या चित्तांतील सरस्वती अंतर्धान पावते.

शास्त्रीय व ललित वाङ्मय यांचें विवेचन या निबधांत मीं सरमिसळ केलें आहे. याचें कारण असें की, या दोन्ही प्रकारच्या वाङ्मयाचीं जीवित-तत्त्वें निराळीं असलीं तरी या जगाबद्दलचें प्रेम, संसाराविषयी उत्साह, उभारी, भविष्यकाळाबद्दल आशा, जीवनाचें अवलोकन याची दोहीलाहि सारखीच आवश्यकता असते. पंडितकवींच्या काव्यांतील निसर्गवर्णनें पाहिलीं की त्यांनी निसर्गाचें प्रत्यक्ष अवलोकन किती केलें होतें तें सहज ध्यानांत येतें. सर्व स्थळीं, सर्व काळीं सर्व ऋतूंत त्यांच्या काव्यांतील वृक्षलता फळा-फुलांनी बहरलेल्या असतात. हिमालय असो, सातपुडा असो; सह्याद्रि असो,

गंगा, यमुना, नर्मदा, गोदा, कृष्णा कोणचीहि नदी असो सर्वत्र वनस्पति-सृष्टि त्यांच्या लेखीं सारखीच असते. डॉ. म. वि. आपटे यांनी मागे अनेक लेख लिहून कालिदासाच्या काव्यांतील सृष्टिवर्णनें आजच्या वनस्पति-शास्त्राप्रमाणेसुद्धा अगदी बिनचूक ठरतात हें दाखवून दिलें आहे. मेघदूतांतील 'सारंग' याचें 'कुरंग' असें कोणी भाषांतर केलें तर तो प्रमाद आहे असें आपटे म्हणतात. कारण दोन्ही हरिणांच्याच जाति असल्या तरी त्यांत फरक आहे आणि कालिदास यांविषयी कटाक्षाने सावध असतांना त्या भेदावर आपण बोळा फिरविणें योग्य नाही असें ते म्हणतात. सृष्टीचें हें अवलोकन कोठे आणि मराठी पंडितकवींचा सबगोलंकार कोठे! सृष्टीचें हें अवलोकन जसें कवीला उपयोगी पडतें तसें आणखी खोलांत गेल्यावर तेंच वनस्पति व वैद्यक शास्त्रासहि उपयोगी पडतें. पण तें नाही म्हणजे शास्त्रहि नाही आणि काव्यहि नाही. कवीच्या कल्पनेलाहि वस्तुस्थितीचा भक्कम आधार लागतोच. निदान कालिदासाचें तरी तसें मत होतें.

प्राचीन मराठीच्या उत्तरकालखंडांत, स्वराज्यसंस्थापनेच्या नंतरच्या काळांत महाराष्ट्रांतील मराठे ऐहिक संसाराला उन्मुख झाले असतांनाहि इतिहास, चरित्र, राजनीति, अर्थविद्या हीं शास्त्रें येथे कां निर्माण झालीं नाहीत असा प्रश्न येतो. त्याचें उत्तर आता ध्यानांत येईल. या काळांतहि अध्यात्माच्या, निवृत्तीच्या पकडींतून, शब्दप्रामाण्याच्या मगरमिठींतून, पूर्वकर्म, कलियुग, सद्गुरु या जंजाळांतून मराठी मन पूर्ण मुक्त झालें नव्हतें. जीवनाचें नवें तत्त्वज्ञान उभारावें असें वाटण्याइतका जीवनाबद्दलचा उत्कट उत्साह जनमनांत तेव्हाहि नव्हता. परदेशाला जावें, परभाषा शिकाव्या, निदान भारतांतल्या सर्व प्रांतांतून हिंडून तेथलें राजकारण पहावें, येथल्या तरी अनेक भाषा शिकाव्या, लढाईच्या दृष्टीने भिन्न प्रांतांतील हवामान, नद्यापर्वत, भूगोलरचना अभ्यासावी, हें स्वप्नांतसुद्धा मराठी मनांत आलें नाही, उलट कोणचाहि इंग्रज अधिकारी असला तरी आपल्या राजकीय जबाबदाऱ्या संभाळून, असा काही तरी उद्योग तो करीतच असे. वॉरन हेस्टिंग्ज भागवताचा अभ्यास करीत असे. सर विल्यम जोन्स १७८३ सालीं वयाच्या सदतिसाव्या वर्षी कलकत्त्याला न्यायाधीश म्हणून आला. पण त्याच्या आधीच वयाच्या विसाव्या वर्षापासून त्याने आशियां-

तील काव्यवाङ्मयावर ग्रंथरचना करण्यास प्रारंभ केला होता; नादिरशहाच्या चरित्राचें भाषांतर केलें होतें; आणि १७८१ सालीं अरबस्तानांतील प्राचीन दहा काव्यांचीं भाषांतरें केलीं होतीं. तो मूळचा कायदेपंडित. पण येथे येतांच त्याने संस्कृत भाषेचा अभ्यास सुरू केला. ती भाषा लॅटिन व ग्रीक भाषांपेक्षा जास्त विकसित व जास्त सुधारलेली आहे असा अभिप्राय देऊन तिच्या अभ्यासासाठी एक संस्था स्थापन केली व थोड्याच अवधींत ‘ शाकुंतल ’ व ‘ मनुस्मृति ’ यांचीं भाषांतरें करून तीं प्रसिद्धहि केलीं. ग्रँट डफ याने त्या धामधुमीच्या काळांतहि वेळ काढून मराठ्यांचीं कागदपत्रें जमवून ‘ मराठ्यांचा इतिहास ’ लिहिला हें प्रसिद्धच आहे. प्रवास, सृष्टिनिरीक्षण, लोकव्यवहाराचें अवलोकन, ग्रंथांचा अभ्यास, परभाषांचा, परधर्मांचा अभ्यास या सर्वांनी मनुष्याची सिद्धान्तशक्ति विकसित होते. महाराष्ट्रांत या शक्तीचें अत्यल्प, अगदी सामान्य असें एक उदाहरण दिसतें. तें म्हणजे रामचंद्रपंत अमात्य यांचें ‘ आज्ञापत्र ’. हा अगदी प्राथमिक स्वरूपाचा प्रबंध आहे. पण तोच आज आपणांस अलौकिक वाटत आहे; हा त्या काळच्या असल्या सामर्थ्याच्या संपूर्ण दारिद्र्याचाच पुरावा आहे. भारतीयांच्या आणि मराठ्यांच्या ठायीं हें सामर्थ्य नसल्यामुळेच येथे शास्त्रनिर्मितीहि झाली नाही आणि काव्यनिर्मितीहि झाली नाही.

प्राचीन मराठी कालखंडांत अर्वाचीन काळासारखें कादंबरी–नाटकादि ललित साहित्य किंवा अर्थराजकारणादि शास्त्रीय साहित्य कां निर्माण झालें नाही. याची मीमांसा करतांना इहविमुख वृत्ति, मानसिक पारंतत्र्य, अहंवृत्तीचा अभाव आणि सिद्धान्तशक्तीचें दौर्बल्य या कारणांचा येथवर विचार केला. आता आणखी एका महत्त्वाच्या कारणाचा विचार करून ही मीमांसा संपवूं.

: ८ :

## हें अपूर्णांचें साहित्य

अध्यात्मविद्या ही पूर्णतेची विद्या आहे; तर उलट वर उल्लेखिलेलें दोन्ही प्रकारचें साहित्य हें अपूर्ण मानवी संसाराचें साहित्य आहे. अध्यात्मांत स्वतः परमेश्वर हा सर्वगुणसंपन्न, सर्वसमर्थ, सर्वव्यापी व पूर्ण असा आहे.

आणि भक्त जरी प्रारंभीं तसे नसेल तरी अंतीं तीच अवस्था त्यांना प्राप्त होते. आधीच्या साधक अवस्थेंत त्यांना पूर्णता लाभली नसली तरी परमेश्वर त्यांची अहोरात्र चिंता वाहत असल्यामुळे त्यांच्या त्या जीवनांतहि तो वैगुण्य राहूं देत नाही. अध्यात्मवादी साहित्यांत सर्वत्र त्या पूर्ण परमेश्वरच्या व तत्पदलीन अशा मानवांच्या कथा असतात. पण वर सांगितलेलें जें सारस्वत–कादंबरी, नाटक, लघुकथा, आणि इतिहास, राज़कारण–तें अपूर्ण मानवाचें, वैगुण्य, अपयश, दुःख निराशा यांनी भरलेलें असें सारस्वत आहे. अध्यात्मवृत्ति ज्या समाजांत प्रबळ आहे, परमार्थाकडे ज्यांचें सर्व लक्ष आहे, जें 'तरावया' गातात आणि लिहितात त्यांच्या हातून हें सारस्वत निर्माण होणें कधींहि शक्य नाही. रामायणांतल्या अनेक कथा एकनाथ, श्रीधर, वामन इ. मराठी कवींनी काव्यासाठी निवडल्या. मूळ रामायणांत राम, लक्ष्मण, भरत, सीता, हनुमान हे अपूर्ण मानव दिसतात. कामक्रोधादि विकारांना ते तुमच्या आमच्यासारखेच वश होतात. महाभारतांतील कृष्णाची कथा ही मानवी कथाच आहे. पण मराठी कवींना त्या व्यक्तींचें हें मानवत्व मान्य नव्हतें. त्यांनी त्यांच्यांतला मानवी अंश नष्ट केला आणि त्यांना पूर्णतेस पोचवून मग त्यांच्या कथा लिहिल्या. एकनाथांच्या मतें रुक्मिणी व श्रीकृष्ण म्हणजे जीवाशिव होत. ते मानवी प्राणी नव्हतेच. 'ये ग्रंथीचें निरूपण जीवशिवा लागलें लग्न' असें ते म्हणतात. आणि याच चालीवर त्यांनी भीष्मक म्हणजे विवेक, शुद्धमति म्हणजे श्रद्धा असें वर्णन केलें आहे. रुक्मिणी आईच्या पोटांत नऊ महिने होती म्हणजे ती नवविधा भक्ति आचरीत होती. तिचीं नूपुरें नित्य सोऽहं गर्जना करीत. तिची दंतपंक्ति—जैशा ओंकारामाजी श्रुती ! रामायणाची एकनाथांनी हीच अवस्था करून टाकली आहे. राम-ब्रह्म, सीता-आदिशक्ति कौसल्या–सद्‌विद्या असें वर्णन ते करतात. आता अशा व्यक्तींना काम, क्रोध मत्सर, असूया, संताप, स्वार्थ, लोभ, आशानिराशा, विरहदुःख, मीलनाचा आनंद हे विकार कोठून असणार ! एकनाथांच्या भावार्थ रामायणांत सीता ही लंकेंत गेलीच नव्हती. तिची फक्त सावली गेली होती. तिला रावणाने नेलें असें म्हटलें तर ती अपूर्ण, दुबळ्या मानवाची कथा होते ! अहल्येला इंद्राने भ्रष्ट केलें. तेव्हा गौतम ऋषि प्रथम रागावले. पण पुढे त्यांनी विचार केला की यांत रागावण्याचें कारण काय ? सर्वांतर्यामी भोक्ता एकच

आहे हें मी जर जाणतों आहें तर क्रोध येण्याचें कारण काय? “माझी स्त्री, माझें घर। हें कामक्रोधाचें निजमंदिर। येथ ठकले थोर थोर। मजहि साचार नाडिलें क्रोधें॥ का ते कांता, कस्ते पुत्रः। हें मीं वाचलें होतें पण तें सर्व फुकट गेलें.” (बालकांड-१५-८५ ते ९५) असा विचार येऊन गौतमांना अहल्येवर रागावल्याबद्दल पश्चात्ताप झाला; दुःख झालें! श्रीधरस्वामींनी रामकथा अशीच वर्णिली आहे. भवदुःखनिवारण हाच लेखनाचा त्यांचा हेतु होता. त्यामुळे रामसीता हे परमात्मा आत्मा झालेच. पण जेवणांत भात हा निजबोध, वडे म्हणजे अभेद, फेण्या-क्षमा, कढी-समता इतक्या पूर्णतेला त्यांनी मानवी संसार नेला आहे. नाटक-कादंबरी ही अपूर्ण मानवाची कथा आहे. स्त्रीवर अत्याचार झाला तर संतापाने बेभान झालेल्या मनुष्याची ती कथा आहे. गौतमासारखाच विचार ऑथेल्लोने केला असता तर शेक्स्पीयरला नाटक लिहितां आलें नसतें. आम्हां मानवांना आमच्या रागद्वेषाच्या कथा हव्या आहेत. पण ते विकार आम्ही प्रगट केले तर मागले लोक रागावत असत. घरांतल्या लहान बालकाचा वाढदिवस हा आम्हांला केवढा आनंदोत्सव वाटतो, पण ज्ञानेश्वरांनी त्याचा निषेध केला. त्यांच्यापुढे आमच्या वात्सल्याची कथा सांगण्याचें धैर्य आम्हांला होत नाही. ती कथा आंतल्या आंत करपून जाते. पोरांबाळांना खायला मिळालें नाही तर आमचा जीव तुटतो. आमच्या आंतड्याला पीळ पडतो. पण ‘तीं झालींच नाहीत असें समजा’ असें तुकाराम महाराज म्हणतात. मग तें दुःख दाबून टाकून आम्ही कुढत बसतों. पण त्याचा आविष्कार करण्याचें मनोधैर्य आम्हांला होत नाही. महाराजांची भीति वाटते. मग कुठली कादंबरी नि कुठलें नाटक!

जीओव्हॅनी बोकॅशियो (१३१३-१३७५) याने चौदाव्या शतकांत युरोपांतली पहिली कादंबरी लिहिली. डेकॅमेरॉन ही मानवाचे रागद्वेष, प्रेम, रंगविलास, स्वार्थ, लोभ यांची कथा आहे. चौदाव्या शतकांतल्या इटालियन स्त्री-पुरुषांचीं तीं खरीखुरीं चित्रें आहेत. माणसांनी हसायला, आनंद व्यक्त करायला हरकत नाही, नेहमी गंभीर, सुतकी असलें पाहिजे असें नाही, हा विचार ग्रीक विद्येच्या पुनरुज्जीवनांतून उद्भवला आणि त्यामुळे संसारी स्त्री-पुरुषांच्या कथा-कादंबऱ्या लिहिल्या जाऊं लागल्या.

पूर्वीच्या काळीं अध्यात्मवृत्तीचा पगडा युरोपांतहि कसा होता हें मोलियरच्या ' तार्तूफ ' या नाटकावरून दिसून येतें: ऑरगॉन या गृहस्थाने तार्तूफ या धर्मगुरूला घरीं आणलें व त्याचें शिष्यत्व पत्करलें; आणि मग तो मित्रांना सांगूं लागला की, ' या मायामय संसारांतून गुरुकृपेने मी इतका मुक्त झालों आहे की माझी पत्नी व मुलें माझ्या डोळ्यांदेखत मरून पडलीं तरी मला लवमात्र दुःख होणार नाही '. हें सर्व किती कृत्रिम, किती वेडगळ व अनैसर्गिक आहे आणि 'तार्तूफ' हा कसा भोंदू गुरु होता हें या नाटकांत पुढे दाखविलें आहे. आणि हें विनोदाच्या साह्याने. आपल्याकडे त्या वैराग्यशील काळांत विनोद म्हणजे अब्रह्मण्यं होतें. कारण हा विसंगति दाखवितो, विकृति प्रगट करतो आणि मनुष्याला हसायला लावतो. हसणें हें निवृत्तिमार्गाला, परमार्थाला मंजूर नाही. पण हास्य ही जीवनाची शुद्धि आहे, पुष्टि आहे हाच विचार युरोपांत पुनरुज्जीवनाने लोकांना शिकविला. ग्रीकविद्येने मानवाला मानव केलें, कामक्रोध, मदमत्सर प्रेमशृंगार, वात्सल्य हीं संसाराचीं भूषणें आहेत अशी शिकवण दिली. त्यामुळे उल्हसित होऊन मानव स्वतःच्या कथाकादंबऱ्या लिहूं लागला. ज्यांना षड्विकार हे रिपु वाटतात ते कादंबरी लिहूं शकणार नाहीत. आपल्याकडे इंग्रजी विद्या आली आणि विष्णुशास्त्री म्हणाले की ' षड्-विकार हे शत्रु नाहीत. तर जगाचे हितकर्ते मित्रहि आहेत. परमेश्वराने मनाच्या या ज्या शक्ति निर्माण केल्या आहेत त्यांस अनर्थावह म्हणणें हें धर्माच्या दृष्टीने पाप व न्यायाच्या दृष्टीने मूर्खत्व होय. या वृत्ति अपायकारक मुळीच नाहीत. त्या शरीरावयवाप्रमाणे मनुष्याच्या कल्याणार्थच दिल्या आहेत.'–( गर्व–निबंधमाला ) हें जें मनाचें परिवर्तन झालें त्यांतून कादंबरी उद्‌भवली आहे.

वर सांगितलेला पूर्ण अपूर्णाचा विचार ध्यानीं घेतला तर इतिहास, चरित्र, राजकारण, रसायन, पदार्थविज्ञान यांच्या अभावाच्या बुडाशीं हेंच कारण आहे असें ध्यानांत येईल. नाटकांत मागल्या लोकांनी शोकांतिका वर्ज्य मानली होती. इतिहासांत व मानवी चरित्रांत तर पदोपदीं शोकांतिका आहे. ही शोकांतिका स्वतः परमेश्वर अवतार घेऊन जेव्हा फिरवतो आणि तिची सुखांतिका करतो तेव्हा या संसारांतील अपूर्णता नष्ट होते. मग अशा

संसाराच्या कथा महीपति अवश्य लिहितो. त्याचे ' संतविजय ', ' भक्तविजय ' हे चरित्र-ग्रंथ या पूर्णतेच्या कथा आहेत. पण खरें चारित्र असें असूं शकत नाही. खऱ्या संसारांत गोरा कुंभाराला चिखलांत मूल मेल्याचें दुःख होतें. आणि तें विठ्ठल कधीहि जिवंत करूं शकत नाही. समर्थांना घार जिवंत करतां आली तरी शिवाजी किंवा संभाजी यांना जिवंत करतां आलें नाही. अर्थात् त्यांचें चरित्र महीपति लिहिणार नाही. अपूर्ण मानवाच्या चरित्रांत त्याला गोडी नाही. इतिहास लिहावयाचा तरी तेंच. मुस्लीम आक्रमण झालें. परमेश्वराचें कांही चाललें नाही. हजारों स्त्रिया भ्रष्ट झाल्या, त्यांना तो वांचवूं शकला नाही, हेंच लिहावें लागणार ! हें लिहिण्याचें सामर्थ्य त्या काळीं कोणाच्याहि ठायी नव्हतें. सेना न्हावी याला बादशहाच्या हजामतीसाठी जाण्यास उशीर झाला. बादशहा रागावला. तेव्हा भक्ताचा कळवळा येऊन त्रैलोक्यनायक न्हावी झाला. आणि त्याने बादशहाची हजामत केली; ही कथा लिहिण्यांत जें स्वारस्य आहे तें छत्रपति संभाजीमहाराजांच्या धीरोदत्त आत्मसर्पणाच्या कथेंत नाही. तें दिव्य त्यांनी धर्मरक्षणासाठी केलें असलें तरी नाही. कारण त्यांना तारायला त्यांत विठू आलेला नाही.

लो. टिळकांनी आपल्याकडे पूर्वी रसायन पदार्थविज्ञानादि शास्त्रें कां झालीं नाहीत याचीं कारणें सांगतांना, आपली पहिल्यापासूनची निवृत्ति मार्गाकडे प्रवृत्ति आणि आपली समाधान वृत्ति हीं कारणें सांगितलीं आहेत. ही समाधानवृत्ति हें कशाचें निदर्शक आहे ? ती अध्यात्मांतून आलेली आहे. त्या शास्त्राला अज्ञात असें कांही नाही. ' तद् ज्ञात्वा सर्वमिदं ज्ञातं इति भवति– तें जाणल्याने सर्वच ज्ञात होतें, असा त्याचा सिद्धान्त आहे. म्हणून त्यांत पूर्ण समाधान आहे. कांही अज्ञात असेल तरच जिज्ञासा संभवते; पण सर्व ज्ञान झाल्यावर जिज्ञासा कशाची ! उलट भौतिक शास्त्रांत दिवसें-दिवस अज्ञानाचें क्षेत्र वाढत आहे असें म्हणतात. माझें ज्ञान म्हणजे एक वालुकाकणहि नाही, असें न्यूटन म्हणाला. या असमाधानांतून, अपूर्णतेंतून संशोधनवृत्तीचा जन्म होतो. येथे अपूर्णता नव्हतीच. सर्वत्र समाधान होतें. संसार अत्यंत दुःखमय होता हें खरें. पण त्याचें कांहीच महत्त्व कोणाला वाटत नव्हतें. ज्याचें महत्त्व त्यांना वाटत होतें त्या क्षेत्रांत पूर्णता होती. पूर्ण

समाधान होतें. मग संशोधन कशाचें करावयाचें? वर म्हटलें आहे कीं प्राचीन मराठी कवींच्या निसर्गवर्णनांत लतावृक्ष नेहमी फळाफुलांनी लहडलेले असत. जलाशय पाण्यांनी भरलेले असत. त्यांत कमळें सदैव फुललेलीं असत. तसें वर्णन ते कां करीत हें आता कळून येईल. तें त्यांच्या पूर्ण सृष्टीचें वर्णन आहे. फलहीन, पुष्पहीन वनस्पति त्यांच्या लेखीं केव्हाहि कोठेहि नसत. त्यामुळे त्यांचीं वर्णनें त्यांनी केलीं नाहीत आणि म्हणूनच संशोधनहि केलें नाही. एका जुन्या श्लोकांत या ब्रह्माच्युतशंकरप्रभृतिभिर् देवैः सदा वन्दिता। असें सरस्वतीचें वर्णन केलें आहे. त्या कवीने विद्येचा खरा महिमा जाणला होता असें दिसतें. सृष्टीची उत्पत्तिस्थितिलय करणारे देवहि तिच्यापुढे नमतात, तिला वन्दन करतात. कारण त्यांचें सामर्थ्यहि विद्येच्या उपासनेंतच आहे. सरस्वतीच्या या महनीय स्थानाचा समाजाला विसर पडला. देव, त्यांचें निःश्वासित असे वेद, ब्रह्मलिखित पूर्वकर्म, अच्युतभक्ति, यांना तो या हृदयस्थ देवतेपेक्षा श्रेष्ठ मानूं लागला म्हणजे ती तर त्याच्यावर रुष्ट होतेच पण देवहि त्याला पाठमोरे होतात. कारण त्यांना तिनेच निर्मिलेलें असतें. सरस्वती आणि देव पाठमोरे झाल्यावर समाजाचें भवितव्य काय होणार हें सांगण्याची गरज नाही. महाराष्ट्रसमाजाची आणि म्हणूनच सारस्वताची त्या प्राचीन कालखंडांत ती स्थिति झाली होती. एरवी व्यास, वाल्मीकि, कौटिल्य, पाणिनि, आर्यभट्ट, वराहमिहिर, नागार्जुन, सुश्रुत-महाकाव्य, अर्थशास्त्र, भाषाशास्त्र, व्याकरणशास्त्र, ज्योतिष, गणित, रसायन, वैद्यक-यांची महनीय परंपरा सांगणाऱ्या या भूमींत आठशे वर्षांत तसला एकहि उन्मेष, एकहि आविष्कार ग्रंथरूपाने होऊं नये याचा दुसरा काय अर्थ आहे?

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठा . . .
अनुक्रम ........................ वि: ..................
क्रमांक ........................ नों: दि: ..................

: ६ :

## संकराचें अपत्य

विख्यात फ्रेंच कादंबरीकार बालझॅक् याचें स्टीफन् झ्वाइक् याने लिहिलेलें चरित्र मीं वाचावयास घेतलें होतें. हेतु असा होता की साहित्याच्या क्षेत्रांत स्वतःला नेपोलियन म्हणविणाऱ्या या थोर लेखकाच्या कादंबरीविश्वाचा प्रथम या मार्गें परिचय करून घ्यावा आणि मग त्यांत प्रवेश करावा. पण चरित्राची ७०, ८०, १०० पृष्ठें झालीं तसा मी अस्वस्थ होऊं लागलों. कारण त्यांत साहित्याचा व्हावा तसा परिचय होईना. मला जी माहिती हवी होती तिच्या दशांशहि मिळेना. तरी धीर धरून, आशा धरून, तसाच पुढे वाचीत गेलों. पण तीन-साडेतीनशें पृष्ठांचें हें चरित्र वाचून संपविलें तरी कथा तीच ! मी अतिशयच विस्मित झालों. बालझॅक्च्या एवढ्या विस्तृत चरित्रांत त्याच्या साहित्याची माहिती अगदीच तुटपुंजी आहे, केवळ अनुषंगाने आलेली आहे. मग या चरित्रांत आहे तरी काय ? बालझॅक्ने कादंबरी, नाटक, लघुकथा या प्रकारचें साहित्य लिहिण्या-पलीकडे सर्व आयुष्यांत दुसरें कांहीच केलेलें नाही. आणि त्याच्या चरित्रांत त्याची चर्चा अगदीच जुजबी अशी आहे. हा मला मोठा चमत्कार वाटला. पण बालझॅक्ने आयुष्यांत दुसरें कांहीच केलें नाही हें तितकेंसें खरें नाही. साहित्यापेक्षाहि जास्त प्रेमाने, दक्षतेने, वेळप्रसंगीं साहित्यलेखन बाजूला ठेवूनहि, आणखी एक गोष्ट त्याने केली आहे. ती म्हणजे बदफैलीपणा,

व्यभिचार ! त्याचें वर्णन मात्र या चरित्रांत अगदी भरपूर. सुविस्तृत आहे.

मॅडम बर्ने, डचेस डी ॲब्रँटीस, मॅडम डी कॅस्ट्रीज्, मॅडम हंन्स्का, काउंटेसा गिडबॉनी अशा त्याच्या अनेक प्रेयसी होत्या, रखेल्या होत्या. त्यांतील बहुतेक विवाहित होत्या. त्यांना अन्य प्रियकर होते. कांही आठ-दहा मुलें झालेल्या होत्या. या स्त्रियांशीं बालझॅक्ने जे रंगविलास केले त्यांचीं तपशील-वार वर्णनें या चारित्रांत आहेत. बालझॅक्शीं त्यांची ओळख कशी झाली, पत्रव्यवहार कसा चालू होता, चोरट्या भेटीगाठी कशा होत असत, त्या झाला व हा त्यांना कसा फसवीत असे, बालझॅक्ला त्यांच्यापैकी कोणापासून कशी स्फूर्ति मिळाली, याविषयी प्रकरणेंच्या प्रकरणें झ्वाइक्ने माहिती दिली आहे. याच्या जोडीला बालझॅक्च्या कर्जबाजारीपणाची माहिती आहे. त्याने छापखाना काढला तो बुडाला, वर्तमानपत्र काढलें तें बुडालें, त्याच्यावर सारख्या फिर्यादी होत, बेलीफ सारखे घरीं येत, बालझॅक् त्यांना टाळीत असे; याचेंहि वर्णन चरित्रांत आहे.

चरित्रांत मुख्य भर याच्यावर आणि याच्या अनुषंगाने यईल तेवढी साहित्याची माहिती, असा हा थाट आहे. अनेक स्त्रियांशीं केलेले प्रेमविलास आणि कर्जबाजारीपणा यांचा त्याच्या जीवनावर व साहित्यावरहि फार परिणाम झाला होता. मॅडम बर्ने ही पंचेचाळीस वर्षांची बाई. तिला नऊ मुलें व कांही नातवंडेंहि होतीं. तिच्यावर बालझॅक्चें व नंतर तिचें बाल-झॅक्वर प्रेम जडलें. झ्वाइक्च्या मतें ती बालझॅक्ची प्रेयसी, सखी, माता, गुरु—सर्व कांही झाली. त्याच्या अंगचे साहित्यगुण, त्याची प्रतिभा तिच्यामुळेच उदयास आली. बालझॅक् तिच्यामुळेच बालझॅक् झाला. त्याला तरुण स्त्रियांच्याविषयी अत्यंत तिटकारा असे. प्रेमाला, विलासाला, चाळिशीची तरी स्त्री त्याला लागे. पुरुषाच्या पहिल्या प्रेमाची भूक भागविण्यास स्त्रीच्या शेवटच्या प्रेमाइतकें योग्य असें दुसरें कांहीच नाही, असें याचें मत होतें. या असल्या वर्णनांतून बालझॅक्चें व्यक्तिदर्शन होतें. म्हणून हीं वर्णनें भरपूर दिलीं आहेत. तो जितका जास्त कर्जबाजारी असेल, आपत्ति जास्त असतील, तितकी त्याला लेखनाला स्फूर्ति जास्त होई; म्हणून त्या आपत्तींची माहिती दिलेली आहे. आणि या सगळ्यामुळे त्याच्या साहित्या-

वर परिणाम काय झाला, हें सांगतांना अनुषंगाने साहित्याचें वर्णन केलें आहे.

पण बालझॅक्च्या कादंबऱ्यांचें जें अलौकिक वैभव, त्याची कसलीहि कल्पना या चरित्रावरून येत नाही. आपल्या काळच्या फ्रेंच समाजाचें दर्शन त्यानें घडविलें आहे. त्याची नीतिमत्ता, धर्मभावना, त्याच्या जीवनाच्या प्रेरणा यांचा त्याने अभ्यास केला आहे. त्यांतील दुष्ट, अधोगामी वृत्तींचें पृथक्करण केलें आहे, आणि श्रेष्ठ समाज कसा असावा याविषयी मतें सांगितलीं आहेत. " कॉमेडी ह्युमेन ' या कादंबरीमालेंतून मला समाजाला नवा धर्म सांगावयाचा आहे. नेपोलियनने जें कार्य तलवारीने प्रारंभिलें तें मी लेखणीने पूर्णतेस नेणार आहें ", अशी त्याची प्रतिज्ञा होती. हें सर्व साधण्यासाठी त्याने शेकडो व्यक्तिरेखा निर्मिल्या, कथानकें रचिलीं, समाजाच्या सर्व थरांतील लोकांचीं चित्रें काढलीं, आणि त्यांच्या जीवनाचे धागेदोरे उकलून दाखविले. या सर्व कार्यांत त्याचें यशापयश काय, फ्रान्सच्या व अखिल जगाच्या कादंबरीकारांत त्याचें स्थान कोणतें, कादंबरीकार म्हणून कोणतें, तत्त्वज्ञ म्हणून कोणतें, वास्तववादाचा स्वतंत्र पंथ त्याने सुरू केला त्याचे गुणदोष काय, स्वभावलेखन, मनोविश्लेषण, संवादरचना, निसर्गवर्णन, निवेदनशैली, भाषाशैली, जीवनभाष्य या कादंबरीकलेच्या गुणांनी त्याच्या कादंबऱ्या किती संपन्न आहेत, याची कसलीहि चर्चा झ्वाइक्ने केलेली नाही. यामुळे माझा हेतु तर साध्य झाला नाहीच, पण चरित्रलेखनाची ही काय विचित्र तऱ्हा आहे, असा विचार मनांत येऊन मन उद्विग्न होऊन गेलें.

या चरित्राच्या प्रस्तावनेंत असा खुलासा आहे की, स्टीफन झ्वाइक्ने स्वतः या चरित्राचें लेखन केलेलें नाही. त्याने फक्त टिपणें केलीं होतीं आणि विल्यम रोज या गृहस्थाने त्यांवरून हें चरित्र लिहिलें. हें वाचून मनांत असें आलें की मग विल्यम रोज याने हा उद्योग करावयास नको होता. कारण बालझॅक्च्या मुख्य चरित्राचीं टिपणें झालेलींच नाहीत हें त्याच्या ध्यानीं यावयास हवें होतें. पण अधिक शोधाअंतीं असें ध्यानांत आलें की, अर्वाचीन साहित्यशास्त्रज्ञांच्या मतें बालझॅक्चें हेंच मुख्य चरित्र होय ! नवकाव्य, नवकथा, त्याचप्रमाणे गेल्या तीस-चाळीस वर्षांत नवचरित्राचाहि उदय झालेला आहे आणि त्याच्या तंत्राअन्वयें बालझॅक्च्या चरित्राचा हाच प्रधान विषय होय.

कादंबरी हा गौण भाग होय !

आंद्रे मार्वा या फ्रेंच लेखकाचें नांव सध्या आपल्याकडे फार गाजलें आहे. त्याने ' एरियल ' या नांवाने इंग्लिश कवि शेले यांचें चरित्र लिहिलें आहे. प्रा. अ. म. जोशी यांच्या मताने तें आदर्श चरित्र होय. ते म्हणतात की, ' चरित्रकाराने शेलेच्या घरगुती जीवनावरच मुख्य भर दिला असून त्याच्या कवितांसंबंधी वाङ्मयीन चर्चा सबंध चरित्रांत कुठेहि मिळावयाची नाही. शेलेच्या कवितेची चर्चा त्याच्या चरित्रकाराने कशाला करावयाची ? तें काम वाङ्मयटीकाकार करीतच आहेत. उलट, शेलेने जें काव्य निर्माण केलें तें कोणत्या परिस्थितींत केलें हें सांगण्याचें काम चारित्रकाराचें होय. त्याची परिस्थिति कशी होती, त्याच्या आवडीनिवडी काय होत्या, त्याची प्रतिभा कशी जागृत झाली, इत्यादि गोष्टींची अपेक्षा वाचक चरित्रकाराकडून करीत असतात.'–( चरित्र व आत्मचरित्र, पृष्ठ २० ) दुसऱ्या एका लेखकाने मोर्वाच्या शेले–चरित्राची स्तुति करतांना म्हटलें आहे की, ' मार्वाने काव्य-समीक्षणाची ब्यादच काढून टाकली आहे ! ' कादंबरीकाराच्या चरित्रांत कादंबरी–परीक्षण ही ब्याद, कवीच्या चरित्रांत काव्य-चिकित्सा ही ब्याद, त्याचप्रमाणे नेपोलियनच्या चरित्रांत त्याच्या लढायांचें वर्णन ही व ग्लॅडस्टनच्या चरित्रांत इंग्लंडच्या राजकारणाची चर्चा ही कांही टीका-कारांच्या मतें ब्याद आहे.

पन्नास वर्षांपूर्वी त्या त्या व्यक्तीचें जें जीवितकार्य त्याचें समग्र वर्णन, त्याची तपशीलवार माहिती, त्याची चिकित्सा, त्याचें महत्त्वमापन हा चरित्राचा मुख्य भाग मानला जात असे. असें असतांना आता तोच भाग त्याज्य वाटावा, ही एक नसती ब्याद आहे असें टीकाकारांनी म्हणावें, याचें कारण काय, असा प्रश्न साहजिकच उद्भवतो. तें कारण असें आहे की, चरित्र ही एक कला आहे, असें एक नवें मत गेल्या चाळीस-पंचेचाळीस वर्षांत उदयास येऊन फार मान्यता पावलें आहे; आणि कलेच्या दृष्टीने पाहतां चरित्रनायकाचें प्रधान जीवितकार्य हीच एक ब्याद आहे, असें नवचरित्रकार व त्या पंथाचे पुरस्कर्ते म्हणूं लागले आहेत.

सुदैवाने मराठींत ही नवी पद्धति अजून आलेली नाही. पण नवकाव्य, नवकथा, नवनाट्य, नवकादंबरी, हे वाङ्मय-प्रकार झपाट्याने येत असतांना

' नवचरित्र ' हा प्रकार तसा येण्याचा संभव नक्कीच आहे. म्हणून या नवचरित्राचें स्वरूप काय आहे, तें कितपत श्लाघ्य आहे, अनुकरणीय आहे याचा विचार वेळींच करणें अप्रस्तुत होणार नाही.

चरित्र ही मुख्यतः कलाकृति आहे, तो इतिहास नाही, तें व्यक्तीच्या कार्याचें मूल्यमापन नाही, तो नीतिबोध नाही, तो स्तोत्रग्रंथ तर नाहीच नाही, असें नवचरित्रकारांचें म्हणणें आहे. चरित्रलेखन ही कला आहे, हें मत प्रथमतः लिटन स्ट्रॅची या इंग्लिश चरित्रलेखकाने मांडलें. ' एमिनंट व्हिक्टोरियन्स ' या आपल्या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत त्याने हा विचार सांगितला आहे. त्याच्या मतें आधीचे इंग्लिश चरित्रग्रंथ म्हणजे केवळ गौरवग्रंथ होते, स्तुतिपर मृत्युलेख होते; त्यांत योजना नाही, रचना नाही, शैली नाही व अलिप्त वृत्ति नाही. चरित्रग्रंथ असे असूं नयेत. ते कलात्मक असले पाहिजेत. त्यांत निवड असली पाहिजे. पुनरुक्ति टाळली पाहिजे. लेखकाला स्वतःची स्वतंत्र दृष्टि व वृत्ति पाहिजे. कांही सिद्ध करणें, तत्त्वप्रतिपादन करणें हें त्याचें काम नाही. निःपक्षवृत्तीने, स्वतःच्या बुद्धीप्रमाणे सत्य घटना सांगणें, भावनावश न होतां सत्यदर्शन घडविणें, हें चरित्रकाराचें काम आहे. स्ट्रॅचीने व्हिक्टोरियायुगांतील चार व्यक्ति चरित्रासाठी निवडल्या त्यांत हेंच धोरण आहे. त्या युगाचें तत्त्वज्ञान त्याला सांगावयाचें नव्हतें. कांही निष्कर्ष मांडावयाचे नव्हते. केवळ कलेच्या दृष्टीने त्याने ' कार्डिनल मॅनिंग ', ' फ्लॉरेन्स नाइटिंगेल ', ' डॉ. आर्नोल्ड ' व ' जनरल गरडॉन ' या व्यक्ति निवडल्या. त्यांच्या चरित्रांतून त्याला त्या कालखंडाचें केवळ दर्शन घडवावयाचें होतें. शास्त्रीय विवेचन हा त्याचा हेतु नव्हता.

लिटन स्ट्रॅची याने चरित्र ही कलाकृति आहे असें सांगतांना एवढेंच विवरण केलें आहे. 'एमिनंट व्हिक्टोरियन्स' या पुस्तकाला त्याने लिहिलेली प्रस्तावना जेमतेम दोन-अडीच पानें आहे. एक जुनें प्रभावी व रूढ मत खोडून टाकून नवें मत प्रस्थापित करावयास एवढें विवेचन पुरें आहे असें त्याला वाटलें. पण त्याचीं मतें प्रामुख्याने त्याने लिहिलेल्या चरित्रग्रंथांवरून जास्त निश्चित होतात, असें टीकाकारांचें मत आहे.' एमिनंट व्हिक्टोरियन्स ', ' क्वीन व्हिक्टोरिया ' व ' एलिझाबेथ ' हे त्यांचे तीन चरित्रग्रंथ होत. नवचरित्र ही जी कला, तिचें सर्व तंत्र त्यावरून बसविलेलें आहे. त्याच्या चरित्रग्रंथावरून या कलेचें

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम ........................ दि: ..................
क्रमांक ........................ प्रौ. दि. ..................



स्वरूप काय ठरतें तें आपण पुढे पाहूंच. सध्या त्याच्या प्रस्तावनेंतून दिसणारें तंत्र पाहून पुढे जाऊं. चरित्रकाराने भावनावश असूं नये, तटस्थ असावें, त्याने केवळ सत्यदर्शन घडवावें, आपले निष्कर्ष वाचकांवर लादूं नयेत, मिळालेल्या सामग्रींतून नीट निवड करावी, तिची सुश्लिष्ट रचना करावी, आणि पुनरुक्ति टाळून आकर्षक पद्धतीने निवेदन करावें. असें केलें म्हणजे चरित्र ही कलाकृति होते, असें स्ट्रॅचीचें मत आहे.

या पंथांतला दुसरा मोठा लेखक म्हणजे आंद्रे मार्वा हा होय. 'शेले', 'डिझरेली', 'व्हाल्तेअर', 'व्हिक्टर ह्यूगो' या थोर पुरुषांचीं चरित्रें त्याने लिहिलीं आहेत. आणि शिवाय, 'आस्पेक्टस् ऑफ बायॉग्रफी' या नांवाचें पुस्तक लिहून नवचरित्राच्या तंत्राची सुविस्तृत चर्चाहि केली आहे. चरित्रलेखन ही कला आहे, हें मत त्याने आवर्जून मांडलें असल्यामुळे या कलेचें स्वरूप समजण्यासाठी त्याचें विवेचन लक्षांत घेणें अवश्य आहे.

मार्वाच्या मतें नवचरित्राच्या कलात्मकतेचें पहिलें लक्षण म्हणजे सत्यदर्शन हें होय. पूर्वीच्या चरित्रकारांचा यावर तितकासा कटाक्ष नव्हता. मानवी मन संमिश्र आहे, संकुल आहे, त्याच्या भावभावना, श्रद्धा, आकांक्षा व्यामिश्र असतात, हें सत्य पूर्वीच्यांना आजच्याइतकें आकळलें नव्हतें. मार्वाच्या मतें, लिटन स्ट्रॅचीने प्रथम हें जाणलें व नवचरित्राचा पाया घातला. स्ट्रॅची पूर्वीच्या चरित्रकारांप्रमाणे केवळ गौरव करीत नाही; तो दोषदर्शनहि करतो. कोणत्याहि भावनेच्या आहारीं न जातां तो तटस्थपणे, निर्भय वृत्तीने चरित्रनायकाचे गुणदोष दाखवितो. नीतिबोधासाठी पूर्वीच्या लेखकांप्रमाणे तो सत्यापलाप करीत नाही. स्ट्रॅचीने सांगितलेल्या सत्यदर्शन व अलिप्तता या लक्षणांखेरीज चरित्रकलेचीं आणखी दोन लक्षणें मार्वाने सांगितलीं आहेत. व्यक्तिजीवनाची पुनर्घटना, पुनर्रचना हें या कलेचें तिसरें लक्षण होय. प्रत्यक्षांतल्या व्यक्ति या आपल्याला अनाकलनीय असतात. कारण त्यांच्या कृतीमागले, आचरणामागले, कार्यकारणभाव आपल्याला कळत नाहीत. त्यांची संगति आपल्याला लागत नाही. कादंबरीसारख्या ललितकृतींत व्यक्तिरेखा लेखकच निर्मीत असल्यामुळे तो दर पावलाला हें कार्यकारण स्पष्ट करतो व व्यक्तिजीवनाचें सुसंगत चित्र आपल्यापुढे उभें करतो. चरित्रकाराने हेंच केलें पाहिजे. चरित्रनायकाच्या

जीवनांतील मुख्य सूत्र शोधून काढून त्याभोवती त्याच्या जीवनाची पुनर्घटना केली पाहिजे. पण प्रश्न असा येतो की, असें रचनासूत्र, जीवनाचें एकसूत्र वर्ण्य व्यक्तीच्या जीवनांत नसलेंच तर ? कादंबरीकार, ललित लेखक स्वतःच व्यक्ति निर्मीत असल्यामुळे तिच्या जीवनाचें सूत्र आधी ठरवूनच तो तिला घडवितो. हें चरित्रकाराला करणें शक्य नाही. त्याचा चरित्र-नायक ही त्याच्या हातांतली गोष्ट नाही. अशा स्थितींत त्याने त्याच्या जीवनांत बळेंच कांही सूत्र गोविलें तर कलात्मक रचनेसाठी त्याने सत्यापलाप केला असें होईल. यावर मार्वाचें म्हणणें असें की, चरित्रलेखकाने ज्यांच्या जीवनांत असें रचनासूत्र स्पष्ट दिसतें अशाच व्यक्ति लेखनासाठी निवडाव्या. पण त्याच्या मतें, थोर पुरुषांच्या जीवनांत अभावितपणेच असें सूत्र असतें. कांही तत्त्वाने, ध्येयवादाने ते प्रेरित झालेले असतात. त्यामुळे प्रारंभीपासून अखेरपर्यंत त्या एका सूत्राभोवती त्यांचें जीवन गुंफलेलेंच असतें. तें शोधून काढून त्या धोरणाने लेखकाने चरित्राची पुनर्रचना केली की त्यांत एकात्मता येईल, त्याला घाट येईल, आकार येईल, आणि अर्थातच ती एक सुंदर कलाकृति होईल.

आत्माविष्कार हें चारित्रकलेचें चौथें लक्षण होय. मार्वाच्या मतें, कोणत्याहि कलेचें आत्माविष्कार हेंच प्रधान लक्षण होय. कोणतीहि कलाकृति म्हणजे प्राधान्याने भावनांचा निचरा असतो. तो एक परिहार आहे. भार हलका करण्याची ती प्रक्रिया आहे. कलाकारांच्या मनांत भावनांना उधाण आलेलें असतें. जोराने उसळून त्या बांध फोडूं पहात असतात. त्यांना वाट करून देणें त्याला अत्यंत अगत्याचें भासत असतें. त्या दाबांतून स्वतःला मुक्त करणें अगदी अवश्य झालेलें असतें. त्या वेळीं तो भावनांचें जें निरसन करतो, आविष्कार करतो, त्यांतूनच कलाकृति निर्माण होते; किंबहुना तो आविष्कार हीच कलाकृति होय. डिकन्सची कादंबरी 'डेव्हिड कॉपरफिल्ड', जॉर्ज इलियटची 'दि मिल ऑन दि फ्लॉस', फ्लाबेरची 'मादाम बोव्हारी' हीं मार्वाने आत्माविष्काराचीं उदाहरणें म्हणून दिलीं आहेत. 'मादाम बोव्हारी' हें माझेंच जीवन होय, असें फ्लाबेर म्हणत असे. चरित्रलेखकाच्या जीवनाचा असा आविष्कार त्याने लिहिलेल्या चरित्रांत झाला तरच तें चरित्र म्हणजे कलाकृति होईल. हें साधण्यासाठी

पुन्हा चरित्रविषयाच्या निवडीचा प्रश्न आला. लेखकाने आपल्या भावना, आकांक्षा, श्रद्धा, आशा-निराशा, या ज्या व्यक्तींच्या चरित्रांत तशाच उत्कटतेने दिसून येतील अशा व्यक्तींचीं चरित्रें लिहावीं, असें मार्वाचें मत आहे. शेले व डिझरेली यांची निवड करतांना हेंच धोरण आपण ठेवलें होतें असें त्याने सांगितलें आहे.

चरित्रलेखन ही कला आहे, असा जो पक्ष त्याचे जे दोन प्रधान अध्वर्यु त्याचें म्हणणें येथवर मांडलें. हे दोघेहि पाश्चात्त्य आहेत. एक इंग्लिश व एक फ्रेंच. मराठींत या मताचा फारसा पुरस्कार अजून कोणी केलेला नाही. वर उल्लेखिलेलें प्रा. जोशी यांचें ' चरित्र व आत्मचरित्र ' हें जें पुस्तक तें म्हणजे वरील दोन पाश्चात्त्य लेखकांच्या लिखाणाचा मराठी तर्जुमा आहे. स्वतंत्रपणें केलेलें कोणतेंहि विवेचन त्यांत नाही. हें पुस्तक १९४२ सालीं लिहिलेलें आहे. तोंपर्यंत नेपोलियन ( भावे ), काव्हूर ( मुंडले ), ना. गोखले ( साने गुरुजी ), ॲनी बेझंट ( भागवत ), टेरेन्स मॅक्स्विनी ( ना. सी. फडके ) अशीं अनेक चरित्रें मराठींत झालीं होतीं, व त्यांना प्रस्तावना लिहून भावे, राजवाडे, पोतदार, शि. म. परांजपे, न. र. फाटक, यांसारख्या पंडितांनी आपलीं चरित्रलेखनाविषयींचीं मतें मांडलीं होतीं. त्यांचीं दखलहि प्रा. जोशी यांनी घेतलेली नाही. मधून-मधून लो. टिळक व न्यायमूर्ति रानडे यांच्या चरित्रांवर ते टीका करतात. पण स्ट्रॅची व मार्वा यांचीं मतें मराठींत मांडणें यावरच त्यांचा सगळा भर आहे. अर्थातच त्यांच्या पुस्तकाचा निराळा विचार करण्याचें कारण नाही. तेव्हा वरील दोन पाश्चात्त्य पंडितांच्या मताचा परामर्श घेऊन तें कितपत यथार्थ आहे व अनुकरणीय आहे, त्यांनी जीं चरित्रें लिहिलीं त्यांच्या आधारें तरी त्यांचीं मतें टिकतात काय इ. प्रश्नांचा आता विचार करूं.

सत्याचें सम्यग्दर्शन घडविणें हें चरित्रकलेचें पहिलें लक्षण म्हणून स्ट्रॅची व मार्वा यांनी सांगितलें आहे. हें पहिलेंच लक्षण भ्रांतिष्ट आहे. आणि त्यामुळेच त्या भ्रांतींतून पुढे अनेक अपसिद्धान्त निर्माण झाले आहेत. कला ही सत्याची प्रतिकृति दर्शवितें, सत्याभास निर्माण करते. ती सत्याचें दर्शन कधीहि घडवूं शकणार नाही. निसर्गाचें चित्र हा निसर्ग नव्हे. लक्ष्मीचा पुतळा ही लक्ष्मी नव्हे. साहित्यांत तर हें फारच स्पष्टपणें दिसून येतें.

‘ उषःकाल ’ मधील नानासाहेब, रंगराव अप्पा, ‘ सिंहगडां ’ तील कमलकुमारी, या सत्य व्यक्ति नाहीत. ‘ पण लक्षांत कोण घेतो ’ मधील यमुना, ‘ जादूगार ’ मधील इन्दुमती, ‘ अंकल टॉम ’ मधील टॉम, शेक्स्पीयरचा शॉयलॉक या प्रत्यक्षांतल्या व्यक्ति नव्हत्या. प्रत्यक्षांत असू शकतील, संभवनीय वाटतील, अशा त्या व्यक्ति होत्या. अनेक मद्यपी व्यक्ति व त्यांची कुटुंबें पाहून त्यांतून कणकण वेंचून गडकऱ्यांनीं सुधाकर व सिंधू यांचा संसार निर्माण केला. प्रत्यक्षांत तसा केव्हाहि, कोठेहि नव्हता. प्रत्यक्षांतलें जीवन बेबंध, विस्कळित, योजनाहीन असतें, तर कलाकृति ही सुरचित, सुश्लिष्ट व योजनाबद्ध असते. पुन्हा प्रत्यक्षांतल्या व्यक्तींच्या कृतीमागले, वर्तनामागले कार्यकारणभाव कधीहि कोणालाहि पूर्ण सत्याची प्रतिज्ञा भोगून, सांगतां येणार नाहीत. म्हणूनच त्यांत सुसंगति दाखवतां येणार नाही. कलाकृतींत सर्व कल्पनाजन्य असतें; म्हणून कोणतेंहि जीवन योजनेंत बसवतां येतें. त्यांतील कार्यकारणभाव सांगतां येतात. मनोविश्लेषण करतां येतें. हें शक्य आहे म्हणूनच कलाकृति शक्य आहे. कारण कलाकृति म्हणजे रचना, कलाकृति म्हणजे असूर्ताची केलेली मूर्ति. हें लक्षण वरील पंडितांना पूर्ण मान्य आहे. चरित्रांत प्रत्यक्ष सत्याचें दर्शन घडविलें पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे. आणि तरी ती कलाकृति असली पाहिजे हाहि आग्रह त्यांनी धरला आहे. येथूनच विसंगतीला प्रारंभ होतो.

आंद्रे मार्वा याने स्ट्रॅचीच्या व्हिक्टोरियाच्या चरित्रांतून त्याच्या कलेचें उत्कृष्ट उदाहरण म्हणून एक उतारा दिला आहे. राणी मृत्युशय्येवर आहे. ती साधारण बेशुद्धींतच आहे. त्या वेळीं शेवटच्या घटकेला तिच्या डोळ्यांसमोरून गतायुष्याचा सबंध चित्रपट सरकत जातो, असें स्ट्रॅचीने वर्णन केलें आहे. वर्णन बहारदार आहे यांत शंकाच नाही. हें उत्कृष्ट काव्य आहे, येथे चरित्रकार कवीच्या पदवीला पोचला, असें मार्वा म्हणतो तें खरें आहे. पण तें काव्य आहे हेंच खरें आहे. प्रत्यक्षांत त्याला कसलाहि आधार नाही. राणीच्या मनांत अगदी उलट विचार त्या वेळीं असणें किंवा कांहीहि नसणें, हें तितकेंच शक्य आहे. आणि नेमकें काय होतें हें माहीत नसतांना, सत्यदर्शनाची, शंभर टक्के सत्य सांगण्याची प्रतिज्ञा करणाऱ्या लेखकाला, तें असुकच होतें हें सांगण्याचा कसलाहि अधिकार नाही. प्रा. जोशी म्हणतात की, याला

जरी कागदपत्रांचा आधार नसला तरी ते सबंध चित्राशीं विसंगत नसल्यामुळे क्षम्य समजवयास हरकत नाही. पण हें म्हणणें सयुक्तिक नाही. मूळ सत्य हें सबंध चित्राशीं विसंगतहि असूं शकेल. जन्मभर जें केलें नाही तें मरणसमयीं माणसाच्या मनांत आलें, अशीं पुष्कळ उदाहरणें आहेत. सर्व जग जिंकल्यावर, मरतांना शिकंदर रडेल हे कोणाला सुसंगत वाटलें असतें? तरी तें सत्य आहे. व्हिक्टोरिया राणीला त्या वेळीं कांही कृत्यांचा पश्चात्ताप झाला असेल, कांही निराळे लोभ मनांत आले असतील. सर्व शक्य आहे. आणि पुरावा असता तर तें सुसंगत, विसंगत कसेंहि भासलें तरी देणें अवश्य होतें. तो नाही, तेव्हा कांहीहि क्षम्य नाही. कारण या तऱ्हेने मेलबोर्न, पामरस्टन, रॉबर्ट पील, डिझरेली या प्रधानांचें मनोविश्लेषण करून त्यांचीहि वाटेल तशीं चित्रें काढतां येतील. पील, डिझरेली यांनी इतकें विसंगत आचरण प्रत्यक्षांत केलेलें आहे की त्यांच्या बाबतींत कोणतेंहि मनोविश्लेषण सुसंगत वा कोणतेंहि विसंगत ठरवतां येईल. एकदा निराधार चित्रपट काढणें क्षम्य मानलें की त्याला कोठेच मर्यादा घालतां येणार नाही. सत्य घटनांवरून अनुमान काढणें ही चरित्रकाराची मर्यादा होय. त्यापलीकडे मनोविश्लेषणाच्या प्रांतांत कल्पनेच्या साहाय्यानें शिरण्याचा अधिकार त्याला नाही.

मराठींत ब. मो. पुरंदरे यांनी 'लाल महाल', 'प्रतापगड', 'पन्हाळगड', 'राजगड', 'पुरंदर', 'आग्रा', या नांवांनी एक कथारूप शिवचरित्रमाला लिहिली आहे. आणि त्यानंतर 'राजा छत्रपति' या नांवाने दहा खंडांत शिवचरित्र लिहिलें आहे. कला आणि सत्य यांतील फरक ज्यांना समजून घ्यावयाचा आहे त्यांनी हीं दोन्ही शिवचरित्रें अवश्य पहावीं. पहिलें काव्य आहे व दुसरें चारित्र आहे. पन्हाळगडावरून शिवछत्रपति निसटले तो प्रसंग पहा. त्र्यंबकपंत आणि महाराज यांचा संवाद, मावळ्यांची तत्परता, बाजी प्रभूंच्या जिवाची घालमेल, तो पाऊस, तो वारा, तो अंधार आणि प्रत्येक क्षणीं धसकणारीं काळजें यांचें वर्णन चरित्रांत करणें कसें शक्य आहे? भावनांचा हा सर्व तपशील, भोंवतालच्या परिसराचें तें वर्णन, यांनीच काव्य निर्माण होतें. पण चारित्रांत त्यांना कशी जागा मिळणार? 'राजगड' या विभागांतील 'जंजिऱ्याचा शिद्दी' हें प्रकरण पहा. आवजी हरि चित्रे यांना सिद्दीने छळलें, समुद्रांत बुडावलें, त्यांच्या स्त्रीला व मुलांना

गुलाम म्हणून विकलें, दैवयोगेंकरून मुलांच्या मामानेच त्या सर्वांना विकत घेतलें—हे सर्व प्रसंग यांत आहेत. यांतला करुणरस कोणत्या चरित्रकाराला निर्मितां येईल ? एक तर त्याला रस फुलविण्यास अवश्य ती जागा देतां येणार नाही. आणि दुसरें म्हणजे, आधार नाही. पण आपलें काळीज दुभंगून टाकण्याचें सामर्थ्य आहे तें, या चरित्राला वर्ज्य असणाऱ्या प्रसंगांतच आहे. कथारूप चरित्रांत हा प्रसंग पुरंदरे यांनी एकवीस पृष्ठें रंगविला आहे. आणि प्रत्यक्ष चरित्रांत त्याच्या वांट्याला बारा ओळी आल्या आहेत. कारण एका ओळीचीं त्यांनी दोन पृष्ठें केलीं तीं कल्पनेने ! चरित्रांत तिला मज्जाव आहे. आणि काव्यात तीच स्वामिनी आहे, घरधनीण आहे. तिने तेथे उसळलेल्या दर्यालाच वीस ओळी दिल्या आहेत. आणि तेथूनच काव्याला प्रारंभ झाला आहे. रखमाबाईच्या–आवजींच्या विधवा पत्नीच्या-मनःस्थितीचें वर्णन तिने किती विस्ताराने केलें आहे ! करुणरसाचें सर्व सौंदर्य त्यांतच आहे. पण, तो पाण्याचा दर्या व कारुण्याचा हा दर्या यांना चरित्रांत स्थान नाही. म्हणजेच कलेला नाही. हें ज्याच्या ध्यानांत येईल त्याला चरित्राला कला म्हणणें याइतकी दुसरी भ्रांतिष्ट कल्पना जगांत नाही हें सहज पटेल.

सत्य चरित्र व कलात्मक कथा यांतील फरक या पुस्तकांच्या प्रस्तावनेंत पुरंदरे यांनी मुद्दाम आवर्जून वाचकांच्या ध्यानीं आणून दिला आहे. कथारूप चरित्रसुद्धा त्यांनी मूळ सत्याच्या पायावर उभें करण्याचा प्रयत्न केला आहे. ते म्हणतात, “ हीं पुस्तकें म्हणजे सत्य इतिहासाचीं तैलचित्रें आहेत. पण तैलचित्र अगदी जवळून बघायचें नसतें. हीं पुस्तकें म्हणजे काटेकोर इतिहासाची प्रतिनिधि आहेत. पण स्वतः खुद्द काटेकोर इतिहास मात्र नव्हेत. ” कारण अनेक ठिकाणीं त्यांनी कल्पनेचा आश्रय केला आहे. या कथारूप चरित्राविषयी आणखी एक गोष्ट त्यांनी सांगितली आहे. कांही टीकाकारांनी या पुस्तकाचे कादंबरी म्हणून परीक्षण केलें, आणि त्या कसोटीला तीं उतरत नाहीत असें म्हटलें. याचेंहि कारण हेंच की, कादंबरीपेक्षा सत्याचा आधार त्यांनी शतपटीने जास्त घेतला आहे. ‘ उषःकाल ’ मध्ये हरिभाऊंनी शिवाजी, तानाजी, समर्थ, एवढ्या व्यक्ति फक्त ऐतिहासिक घेतल्या आहेत. बाकी सर्व कल्पनेचा खेळ. म्हणूनच

ती कृति कादंबरी किंवा महाकाव्य होऊं शकली. पुरंदरे यांनी मूळ सांगाडा इतिहासाचा ठेवला आहे. व्यक्ति, घटना, त्यांचे संवादसुद्धा जास्तींत जास्त सत्याच्या आधारें लिहिण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळेच त्यांचीं पुस्तकें कादंबऱ्या झाल्या नाहीत. जेथे त्यांनी कल्पना स्वैर सोडली तेथेच फक्त त्यांना कादंबरीचें वा काव्याचें रूप आलें आहे. सर्वच कादंबरी करावी हा त्यांचा हेतूच नव्हता. पण कादंबरी किंवा कला करावयाची असें ठरलें तर तें सौंदर्य निर्माण करण्यासाठी काय करावें लागेल याची कल्पना मात्र यावरून येईल. सत्याच्या आधारेंच, पण तेथे कल्पना स्वैर सोडावी लागेल. ध्वन्यालोककर्ते आनंदवर्धनाचार्य यांनी ललितलेखकांना असें स्पष्ट सांगितलें आहे की, 'मूळ घटनांत रसानुकूल स्थिति नसेल तर मूळचें इतिवृत्त बदलूनसुद्धा रसानुकूल अशा स्वतंत्र ( कल्पित ) घटनांचा तपशील त्यांनी खुशाल घालावा. कारण कवींचा कटाक्ष रसोत्पत्तीवर असल्याने नुसत्या इतिहासाशीं त्यांना कांही कर्तव्य नाही.' ( डॉ. वाटवे, संस्कृत काव्याचें पंचप्राण, उतारा, पृ. २८३ ). पण हें ललितकलेविषयी, काव्या-विषयी झालें. सत्याची प्रतिज्ञा घेतलेल्या इतिहासांत मात्र हें कधीहि चालणार नाही.

यावरून हें ध्यानांत येईल की प्रत्यक्ष सत्याचा जों जों संबंध जास्त येईल तों तों कला ही कलारूप राहणार नाही. तरी चरित्रांत केवळ सत्य, संपूर्ण शंभर टक्के सत्यच, असलें पाहिजे असा आग्रह धरून शिवाय वर ती कलाकृति झाली पाहिजे, असें नवचरित्रवादी म्हणतात.

चरित्र ही कला आहे हें मत प्रथम लिटन स्ट्रॅचीने मांडलें. आणि त्याने लिहिलेल्या चरित्रांच्या आधारें त्याच्या त्या मताचा इतरांनी पुरस्कार केला. पण त्याच चरित्रांच्या आधारें व्हर्जिनिया वूल्फ या विख्यात लेखिकेने चरित्र ही कला होणें कां शक्य नाही तें सांगितलें आहे. तिनेहि वरील विवेचनांत सांगितलेलेंच कारण दिलें आहे. चरित्रावर सत्याचीं बंधनें फार असतात. तीं कलेवर नसतात. हा या दोन वाङ्मयप्रकारांच्या जीवित तत्त्वांतीलच फरक आहे. म्हणून चरित्र ही कधीहि कला होऊं शकणार नाही, असें तिचें म्हणणें आहे. स्ट्रॅचीने व्हिक्टोरियाचें चरित्र लिहिलें, त्या वेळीं त्यानें 'चरित्र' या प्रकाराकडे 'कारागिरी' या दृष्टीने पाहिलें;

कला या दृष्टीने नव्हे. आणि म्हणून तें लिहितांना त्याने सत्याचीं सर्व बंधनें पाळलीं. हीं बंधनें पाळूनहि तें चरित्र उत्कृष्ट झालें. ( ती कलाकृति झाली असें व्हर्जिनियाबाई म्हणत नाहीत. ) याचें कारण असें की, त्या काला-संबंधी व व्हिक्टोरिया राणीसंबंधी खंडीच्या खंडी माहिती उपलब्ध होती. त्यामुळे इतिहासजमा झालेली राणी स्ट्रॅचीला पुन्हा जिवंत करतां आली. हें यश मोठें होतें. पण एलिझाबेथ राणीचें चरित्र लिहितांना याहिपेक्षा वर जावें, अशी आकांक्षा स्ट्रॅचीच्या मनांत उदय पावली. काव्याची रसवत्ता, नाट्याची थरारी या चरित्रांत आणावी असा प्रयत्न त्याने आरंभिला. पण एलिझाबेथच्या चरित्राविषयी व्हिक्टोरियाइतकी माहिती उपलब्ध नव्हती. तिच्याभोवती गूढतेचें वलय होतें. धुकें पसरलें होतें. म्हणून त्या प्रांतांत स्ट्रॅचीने कल्पनेला स्वैर सोडलें. त्यामुळे मूळ सत्य व लेखकाची कल्पना यांचें विचित्र मिश्रण त्याच्या या चरित्रांत होऊन सत्य व कल्पना, चरित्र व कला या दोहींची फसगत झाली. हा संकर फलदायी झाला नाही. व्हर्जिनियाबाईच्या मतें, याचें कारण ‘ चरित्र ’ या वाङ्मयप्रकारांतच आहे. सत्याचीं बंधनें हा चरित्रवाङ्मयाचा अवश्य दण्डक आहे. त्यांतील सत्य घटना व इतर माहिती आधीच निश्चित झालेली असते. तें सत्य दुसऱ्या लोकांनी दृढ करून टाकलेलें असतें. हें सत्य व चरित्रलेखकाने कल्पनेने निर्मिलेलें सत्य हीं परस्परांस मारक ठरतात. हीं दोन विश्वें—सत्य-विश्व व कल्पना-विश्व—एकत्र आणणें कधीहि शक्य नाही. व्हिक्टोरियाच्या चरित्रांत ज्या विभागाची माहिती उपलब्ध झाली नाही तो विभाग स्ट्रॅचीने थोडक्यांत उरकून घेतला. पण एलिझाबेथच्या चरित्रांत या तत्त्वाला त्याने हरताळ फासला. माहिती नव्हती तो भाग त्याने कल्पनेने भरून काढला; पण ‘ चरित्र ’ म्हणण्याचा आग्रह मात्र सोडला नाही. हें सर्व सांगून शेवटीं व्हर्जिनियाबाई म्हणतात की, काव्यकादंबरीचें अमरत्व चरित्राला कधीहि येणार नाही. चरित्र ही कारागिरीच राहणार !

—( दि आर्ट ऑफ बायॉग्रफी–दि डेथ ऑफ दि मॉथ–पृ. १२४–१२५ )

‘ ले मिझरेबलस् ’ ही व्हिक्टर ह्यूगोची कादंबरी पहा. जीन व्हॅलजीन हा प्रथम गुन्हेगार होता. पुढे तो साधुपुरुष झाला. त्यानंतर पॅरिसच्या पोलिसांनी दुसऱ्याच एका माणसाला जीन व्हॅलजीन म्हणून पकडलें. या

वेळीं सत्य तें सांगून आपण प्रगट होऊन त्या माणसाला वांचविलें पाहिजे, असें जीन व्हॅलजीनच्या मनांत आलें. आणि मग कर्तव्याकर्तव्याचें प्रचंड वादळी आंदोलन त्याच्या मनांत निर्माण झालें. या त्याच्या मनांतील द्वंद्वाचें ह्यूगोने सत्तर पृष्ठें वर्णन केलें आहे. ती व्यक्तिरेखा अमर झाली आहे त्याचें कारण म्हणजे हें मनोविश्लेषण, हें अंतरंगदर्शन. प्रत्यक्षांतल्या कोणत्या व्यक्तीचें असें अंतरंगदर्शन घडवितां येईल ? ही माहिती कोठून आणणार ? हें केव्हाहि शक्य नाही. हें काम कल्पनाशक्तीचें आहे. पण जीन व्हॅलजीन ही व्यक्तीहि कल्पनानिर्मितच आहे. म्हणून तिच्या अंतरंगांत कल्पनेला, लेखकाला, प्रवेश करतां आला; आणि लोकांनीहि त्याने सांगितलें तें प्रमाण मानलें. पण व्हिक्टोरियाच्या बाबतींत, ती सत्य व्यक्ति असल्यामुळे, हें शक्य नाही. म्हणूनच तिचें चरित्र कधीहि कलाकृति होणार नाही. कारण व्यक्तीच्या अंतरंगाचें दर्शन हा कलेचा फार महत्त्वाचा घटक आहे.

वैयक्तिक जीवनांतील सुखदुःखें अगदी खाजगी जीवनांतील प्रसंग, यांच्या वर्णनांनी, असल्या प्रसंगांच्या आठवणींनी चरित्र रम्य होतें, त्यांत रस निर्माण होतो असें म्हणतात, तें अगदी खरें आहे. त्यांतून चरित्रनायकाच्या व्यक्तित्वाचें चांगलें दर्शन घडतें हेंहि खरें. असे कांही प्रसंग, अशा कांही आठवणी देऊन स्ट्रॅची, मोर्वा व इतर अनेक लेखक यांनी आपापल्या चरित्र-नायकांचीं चरित्रें अतिशय चित्तवेधक केलीं आहेत. पण कादंबरीमध्ये जीं वैयक्तिक सुखदुःखें, जे खाजगी जीवनांतील प्रसंग वर्णिले जातात, त्यांची सर चरित्रांतल्या या प्रसंगांना येणें शक्य आहे काय ? एक तर कादंबरी अशा प्रसंगांनीच भरलेली असते. चरित्रांत ते मधूनमधून येणार. आणि कादंबरींत अशा वर्णनांत जो तपशील देतां येईल तो चरित्रांत देतां येणार नाही. दिला तर तो ‘ क्षम्य ’ या सदरांतच ढकलावा लागेल. हरिभाऊंच्या ‘ पण लक्षांत कोण घेतो ’ मधील एक प्रसंग पहा. रघुनाथरावांच्या बी. ए. च्या परीक्षेच्या निकालाचा तो दिवस होता. दिवसभर यमुनेच्या जिवाची कोण घालमेल चालली होती ! तिच्या आंतबाहेर खेपा होत होत्या. मनांत आशानिराशेचा खेळ चालू होता. संध्याकाळपर्यंत तार आली नाही तेव्हा तिची पूर्ण निराशा झाली. रघुनाथरावांच्या बी. ए. होण्यावर त्यांची नोकरी व तिच्यावर यमुनेच्या मुंबईच्या स्वतंत्र संसाराचीं स्वप्नें अवलंबून होतीं. तीं सर्व ढासळ-

ण्याची वेळ आली. पण शेवटीं तार आली. ती रात्रीं भेट झाल्यावर रघुनाथरावांनी तिला दाखविली. हा परम सुखाचा प्रसंग! याचें अत्यंत तपशिलाने हरिभाऊंनी वर्णन केलें आहे. प्रथम रघुनाथरावांनी तार आलीच नाही म्हणून यमुनेची थट्टा केली. तिला ती खरी वाटून तिचा जीव व्याकुळ झाला. सकाळपासून, ती मुंबईला जायला हुरळली म्हणून, सासरच्या लोकांनी तिला टोंचून घेतलें होतें तें तिला आठवलें, आणि तीव्र निराशेने तिने खालीं अंग टाकलें. मग रघुनाथरावांनी तारेचें पाकीट तिच्या अंगावर टाकलें, तेव्हा ती अत्यंत आनंदून गेली, व मला मजकूर वाचून दाखवावा, म्हणून पतीला विनवूं लागली. त्या वेळींहि त्यांनी चंद्रबळ आणलें व 'ज्याला गरज असेल तें वाचील' असें उत्तर दिलें. त्यावर पुन्हा थट्टाविनोद झाला. शेवटीं रघुनाथरावांनी 'फर्स्ट क्लास' हे तारेंतले शब्द वाचून दाखविले आणि तिच्या हनुवटीला हात लावून 'झालं का एकदा मनाचं समाधान?' असें विचारलें. तेव्हा मग, हें स्वप्न नसून सर्व खरेंच आहे, असें पक्कें ध्यानीं येऊन यमुना ब्रह्मानंदांत तल्लीन झाली!

हें वर्णन मीं दहा-पंधरा ओळींत दिलें आहे. मूळ वर्णन याच्या दसपट आहे. सासरच्या लोकांचीं खंवचट बोलणीं, यमुनेचीं स्वप्नें, निराशेने डोळ्याला लागलेल्या अश्रुधारा, तिचें निजणें, बसणें, उठणें, रुसणें, रघुनाथरावांचें खोलींत येणें, तिला उठवणें, तिची चेष्टा करणें, तार अंगावर टाकणें, इंग्रजी न येण्यामुळे यमुनेने विनवणी करणें, तार त्यांच्यापुढे धरणें,—हा तपशील चरित्रकाराच्या आवांक्याबाहेरचा आहे. आणि या तपशिलांतच सर्व कला आहे. चरित्रांत इतकी बारीक माहिती मिळालीच तर ती एखाद्या प्रसंगाची मिळणार. फार तर दोन, चार प्रसंगांची. पण कादंबरी म्हणजे असल्या प्रसंगांचीच मालिका असते. तोच कादंबरीचा देह. उलट चरित्रांत तो केवळ अलंकार आहे. असा दोन ध्रुवांइतका फरक असतांना चरित्राची कला करूं पाहणें हा शुद्ध वेडेपणा आहे.

असें असूनहि एखाद्याने हा वेडा छंद घेतला तर त्याला सत्यदर्शनाला नामंजूर असलेले कल्पनेचे खेळ तर करावे लागतातच. पण एवढ्याने भागत नाही. त्याला सत्याचा अपलाप करावा लागतो, विपर्यास करावा लागतो, संदर्भातून तोडून उद्‌गार द्यावे लागतात, घटनांची फिरवा-

फिरव करावी लागते! लिटन स्ट्रॅचीने हें सर्व केलें आहे. ‘ दि नेचर ऑफ् बायॉग्रफी ’ या आपल्या ग्रंथांत जॉन् ए. गॅरेटी याने स्ट्रॅची-विषयी हा अभिप्राय दिला आहे. तो म्हणतो,—‘ चरित्रकाराला अवश्य असा एक प्रधान गुण स्ट्रॅचीजवळ नव्हता. तो म्हणजे सत्यनिष्ठा. स्वतःचें उद्दिष्ट साधण्यासाठी त्याने सत्याकडे दुर्लक्ष केलें आहे. फ्लॉरेन्स नाइटिं-गेलच्याविषयी सर ई. कुक यांनी दिलेल्या मूळ माहितीचा त्याने विपर्यास केला आहे. जनरल गर्डानला मूर्ख ठरविण्यासाठी जाणूनबुजून त्याने खोटे आधार घेतले आहेत. कार्डिनल मॅनिंगला निंद्य ठरविण्यासाठी त्याने संबद्ध पुरावा दडपून टाकला आहे. आणि एलिझाबेथला कृष्णछटा देण्यासाठी त्याने पुरावा कल्पनेने बनविला आहे. यामुळे स्ट्रॅचीने लोकांची करमणूक केली हें खरें असलें तरी चरित्रवाङ्मय अधिक उन्नत व प्रगत करण्यांत त्याला हातभार लावतां आला नाही. ’ (पृ. १०८) आणि हें सर्व कशासाठी? तर चरित्राची कला करण्यासाठी!

पुनर्रचना, आत्माविष्कार इत्यादि नवचरित्राच्या कलागुणांचा विचार यापुढे करावयाचा आहे. पण त्यापूर्वी सत्यदर्शन हा नवचरित्राचा गुण सांगतांना स्ट्रॅची, मार्वा व प्रा. जोशी यांनी नवचरित्राच्या बाजूने एक विचित्र दावा मांडला आहे, त्याचा विचार जातां जातां करूं. मार्वाच्या मतें १९१० च्या सुमारास नवचरित्राचा जन्म झाला. आणि खरें म्हणजे स्ट्रॅचीने १९१८ सालीं त्याला जन्म दिला. या नवचरित्रापूर्वीच्या म्हणजे एकोणिसाव्या शतकांतील चरित्रकारांच्या ठायीं इतकी सत्यनिष्ठा नव्हती, ती नवचरित्रकारांनी या क्षेत्रांत आणली, असा या मंडळींचा दावा आहे. जुनीं चरित्रें कंटाळवाणी आहेत, नीरस आहेत, भारुडें आहेत असें ते म्हणतातच; पण त्याशिवाय तीं चरित्रें म्हणजे केवळ गौरवग्रंथ, स्तुतिस्तोत्रें आहेत, चरित्रनायकाच्या अंगच्या दोषांचें दर्शन त्यांत नाही, असेंहि ते म्हणतात. स्ट्रॅची, मार्वा यांचें हें धाष्ट्र्य पाहून मोठें नवल वाटतें. ‘ फ्रेडरिक शिलर ’ चें चरित्र-लेखक थॉमस कार्लाइल, ‘ रॉबर्ट बर्नस् ’–लेखक ‘ जॉन लॉकहार्ट, ‘ ऑलिव्हर गोल्डास्थिम ’—‘ जॉन फॉर्स्टर ’, ‘ नेल्सन ’—‘रॉबर्ट साउदे, ’ ‘ राणी एलिझाबेथ ’,-स्ट्रिकलँड, ‘ लॉर्ड बायरन ’--चरित्रकार थॉमस मूर,–अशीं चरित्रनायकाच्या गुणांप्रमाणेच दोषांचेंहि दर्शन घडविणारीं

अनेक चरित्रें एकोणिसाव्या शतकांत झालेलीं आहेत. व्हाल्तेअरच्या चरित्रांत मार्वा याने, तो चिक्कू होता, खोटें बोलणारा होता, जसा शूर तसा भित्राहि होता, अशी टीका केली आहे, म्हणून प्रा. जोशी त्याचें कौतुक करतात. पण असें कौतुक त्यांना वरीलपैकी प्रत्येक चरित्राचें करावें लागेल. आणि यांशिवाय एकोणिसाव्या शतकांतील आणखी किती तरी चरित्रकारांचें करावें लागेल. फ्रेडरिक शिलर–याच्या ठायीं वक्तृत्व नव्हतें, त्याच्या वाणीला ओघ नव्हता, इतिहास म्हणजे नुसतें कथन नव्हे, त्यांत भाष्य पाहिजे, हें त्याने जाणलें नाही, आणि तो मोठा नाटककार असला तरी त्याची शेक्स्-पीयरशीं तुलना होणार नाही, अशी टीका कार्लाइलने केली आहे. रॉबर्ट बर्नस् याच्या काव्याचा लॉकहार्टने जितका गौरव केला आहे तितकीच त्याच्या व्यभिचारी बदफैली वृत्तीची निर्भर्त्सनाहि केली आहे. मॉचलीन येथें बर्नस् चार वर्षें होता. त्या काळांत त्याच्या चरित्राची अत्यंत उजळ व अत्यंत काळी बाजू प्रगट झाली असें लॉकहार्टने स्पष्ट म्हटलें आहे. जीन आरमर, मिसेस् मॅकलेहोस या स्त्रियांशीं त्याचे संबंध कसे घाणेरडे होते, त्याच्या पत्रांतून त्याची अत्यंत हीन अभिरुचि कशी दिसते आणि शेवट-पर्यंत दारू, बाया व कर्ज यांतच तो कसा नासत होता हेंहि चरित्रकाराने वर्णिलें आहे. हीं काय स्तुतिस्तोत्रें आहेत ? नेल्सनचें आपल्या पत्नीशीं वर्तन कसें अन्याय्य होतें, लेडी हॅमिल्टनच्या संबंधामुळे त्याच्या संसाराचा कसा नाश झाला हें साउदेने प्रांजळपणें सांगितलें आहे. राणी एलिझा-बेथला म्हातारपणींसुद्धा डामडौल, भपका यांची आवड होती, एक्कण–सत्तराव्या वर्षींहि तिचा नखरा, छचोरपणा कमी झाला नव्हता, तिचें वर्तन अनेक वेळां धरसोडीचें, दुटप्पीपणाचें असे हे एलिझाबेथचे अवगुण स्ट्रिकलँड हिने लपवून ठेविले नाहीत. थॉमस मूर हा तर बायरनचा परम मित्र. पण त्याने सत्यापलाप न करण्याची प्रतिज्ञा करूनच मित्राचें सांग चरित्र लिहिलें आहे. बायरन किती दुर्वर्तनी होता हें जगप्रसिद्ध आहे. तो स्वैरवर्तनी, स्वेच्छाचारी, चंचल असा होता. हें सर्व मूरने दिलें आहे. तरी ठायींठायीं अनिवार मित्रप्रेमहि त्याने प्रगट केलें आहे. ' ड्यूक ऑफ वेलिंग्टन ' चें ग्लेग याने लिहिलेलें चरित्र पहा. प्रस्तावनेंत, चरित्रकाराने 'मुळाबरहुकूम मी चित्र काढणार आहें. त्याच्या सद्‌गुणांचा गौरव मी करणारच आहें. पण सामान्य

मानवाप्रमाणे त्याच्या ठायीं असलेलीं वैगुण्येंहि दाखविणार आहे आणि त्यांचें कांही समर्थन वा स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न करणार नाही, ' अशी ग्वाही दिलेली आहे. ड्यूकचा उल्लेख तो ' माय हीरो ' असा करतो, आणि लोकांना आदर्श दाखवावा या हेतूनेच मीं चरित्र लिहिलें आहे असेंहि तो सांगतो. तरीहि त्याने या उत्तम पुरुषाचे दोष लपवून ठेवण्याचीहि बुद्धि धरली नाही. आणखी एका चरित्राचा निर्देश करून, ' सत्यदर्शन हें आमच्या चरित्रकलेचें पहिलें लक्षण, ही प्रथा आम्ही निर्मिली, ' हा नव-चरित्रकारांचा जो दावा त्याचें विवेचन संपवितों. जी. एच्. लेविस याने जर्मन महाकवि गटे याचें चरित्र १८६३ सालीं लिहिलें आहे. तोहि गटेचा ' पुरुषोत्तम '—हीरो--म्हणूनच उल्लेख करतो. पण, त्याच्या दोषांविषयी मुग्ध राहावें किंवा ते नाकारावे असें मी करणार नाही, अशी प्रस्तावनेंत त्याने प्रतिज्ञा केली आहे. आणि हेंहि स्पष्ट केलें आहे की, गटेची थोरवी एवढी मोठी आहे की, त्याच्या अंगच्या कांही निंद्य अवगुणांमुळे त्याच्या-वरची आपली भक्ति कमी होण्याचा मुळीच संभव नाही. ' दोषादिग्दर्शनामुळे चरित्रनायकाच्या थोरपणाला बाध येत नाही ' हा विचार, नवे कलावादी लोक, आपण कांही तरी नवीन सत्य सांगतों आहों अशा ऐटींत सांगत असतात. पण वर उल्लेखिलेल्या प्रत्येक चरित्रकाराला हें सत्य माहीत होतें असें--त्यांना नाही तरी--वाचकांना सहज दिसून येईल. लेविसने गटेच्या साहित्याचीहि भरपूर चिकित्सा केली आहे. कवीच्या चारित्रांत त्याच्या साहित्याची चिकित्सा ही ब्याद आहे, ही वेडगळ कल्पना त्याच्या मनांत आली नाही. चरित्रनायकाच्या व्यक्तित्वाचें दर्शन हेंच चरित्रलेखकाचें उद्दिष्ट असलें पाहिजे, हें त्याला मान्य आहे. पण कवीचें व्यक्तित्व त्याच्या साहित्यांत प्रकर्षाने दिसून येतें हेंहि त्याला माहीत होतें. म्हणून त्याने साहित्य-चिकित्सा प्राधान्याने केली आहे. सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे असा की, हॅवेलॉक एलिस या थोर पंडिताने या चरित्राची मुक्तकंठाने प्रशंसा केली आहे. नवचरित्रकार हॅवेलॉक एलिसच्या ' चरित्रकारांना पत्र ' या लेखाचा प्रमाण म्हणून उल्लेख करतात. म्हणून त्यानेच लेविसच्या चरित्राचा गौरव केला आहे हें सांगण्याला महत्त्व. ' लेविस हा विभूतिपूजक नाही, जरूर तेथे त्याने

चरित्रनायकावर टीका केली आहे, त्याची निर्भर्त्सना केली आहे आणि या समतोल वृत्तीमुळे इंग्रजी भाषेतलें हें एक अत्यंत प्रशंसनीय चरित्र झालें आहे,' असे धन्योद्गार प्रस्तावनेंत एलिसने काढले आहेत. शेवटीं, 'गटेच्या साहित्याची चिकित्सा हा त्याच्या चरित्राचा अत्यंत महत्त्वाचा भाग होय हें लेविसने जाणलें होतें,' हें सांगण्यासहि एलिस विसरला नाही. 'कवीच्या चरित्रांत साहित्यचिकित्सा कशाला? टीकाकार ती करतीलच!' हें विपरीत मत हॅवेलॉक एलिसला मान्य नव्हतें असें दिसतें.

चरित्र हें प्रत्यक्ष सत्य होय आणि कला हा सत्याभास होय. हा भेद कलावादी चरित्रकारांनी जाणला नाही. आणि हीं दोन्ही विश्वें एक आहेत या भ्रांतिष्ट विचारावर नवचरित्राचा डोलारा उभारला. त्यामुळे तो सहज कसा कोसळून पडतो हें येथवर आपण पाहिलें. आता चारित्रकलेचा दुसरा गुण जो व्यक्ति-चरित्राची पुनर्घटना, त्याचा विचार करावयाचा. येथेंहि कलावादी लोकांनी वरच्यासारखाच गोंधळ केला आहे. कला म्हणजे जीवनाची पुनर्रचना होय, पुनर्निर्मिति-नवनिर्मिति होय, असें म्हणतात तें खरें आहे, पण ती जीवनाची पुनर्निर्मिति आहे, एका व्यक्तीच्या चरित्राची नव्हे, हें नवचरित्रवादी विसरतात. पुनर्निर्मिति करावयाची म्हणजे कोठलें तरी एक सूत्र घेऊन त्या धाग्यांत मानवी जीवन गुंफावयाचें. सुधाकराच्या जीवनांतील मद्यासक्ति हें एकच सूत्र गडकऱ्यांनी घेतलें व त्याभोवती नाटक गुंफलें. त्याच्या जीवनांतील इतर शेकडो प्रसंग, मद्यपानाशीं संबद्ध नसलेले त्याचे विचार, त्याचीं विज्ञान, राजकारण या विषयींचीं मतें, त्या क्षेत्रांतली त्याची ( असलीच तर ) कामगिरी ही अजिबात गाळून टाकण्याचा अधिकार गडकऱ्यांना आहे. दुष्यंताची राज्यकारभारांतील निपुणता, रणपांडित्य यांचें वर्णन न करण्याचा अधिकार कालिदासाला आहे. तो चरित्रकाराला नाही. कवीला तो अधिकार आहे. एका विशिष्ट दृष्टिकोनांतूनच जीवन पाहावें हें स्वातंत्र्य त्याला आहे. म्हणूनच त्याला जीवनाची पुनर्रचना करतां येते. सर्व चरित्र, सर्व क्षेत्रांतली दुष्यंताची कामगिरी वर्णावयाची असें म्हटलें तर पुनर्रचना करतांच येणार नाही. कलाकृतीला एकात्मता, घाट आणतांच येणार नाही. आणि याच कारणासाठी चरित्र ही कलाकृति होऊं शकणार नाही. मार्वा म्हणतो की, थोर पुरुषाच्या जीवनाला कांही तरी एकसूत्र असतेंच. त्याभोवती गुंफण

करून चरित्राची पुनर्रचना करावी. पण हा केवळ भ्रांतिष्टपणा आहे. कलेला अवश्य तें एकसूत्र निराळें आणि थोर पुरुषांच्या जीवनांतलें एकसूत्र निराळें. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि मी तो मिळविणारच' हें टिळकांच्या जीवनाचें इतिहासदृष्टया एकसूत्र होतें. लोकमान्यांच्या जीवनांतले त्यागाचे, धैर्याचे, संग्रामाचे विशेष प्रसंग निवडून त्यावर नाटक रचतां येईलहि. ड्रिंकवाटरने 'अब्राहम लिंकन' हें नाटक असेंच रचलें आहे. पण चरित्रकाराला टिळकांचीं धर्म , तत्त्वज्ञान, इतिहास याविषयीचीं मतें, 'मृगशीर्ष', 'आर्यांचें मूलस्थान', 'गीतारहस्य' हे ग्रंथ यांची दखल घेतली पाहिजे. शिक्षण, समाजसुधारणा, औद्योगिक उन्नति, या क्षेत्रांतल्या त्यांच्या कामगिरीचा साद्यंत इतिहास दिला पाहिजे. गणेशोत्सव, शिवाजीउत्सव यांची माहिती दिली पाहिजे. कॅांग्रेसमधल्या वादांचा, स्वराज्यसंघाचा, प्रतियोगी सहकारितेचा, आणि बहिष्कारयोगाच्या तत्त्वज्ञानाचा परामर्श घेतला पाहिजे. चरित्र म्हणून हें सर्व वरील सूत्रांत बसवितां येईलहि. पण हें सर्व कलाकृतींत आणणें कसें शक्य आहे ? तें आणलें तर कलाकृति होणार नाही. तें गाळलें तर चरित्र होणार नाही. कलाकृति म्हणून चरित्राची पुनर्रचना करण्याजोगें सूत्र बहुधा कोणत्याहि थोर पुरुषाच्या चरित्रांत सापडणार नाही. कलाकार व्यक्तिजीवन एका सूत्रांत गुंफतो तेव्हा तो त्या सूत्रांत न बसणारा भाग कितीहि महत्त्वाचा असला तरी गाळून टाकतो. किंबहुना ते त्याने निर्मिलेलेच नसतात. पण प्रत्यक्षांतल्या थोर पुरुषाच्या जीवनाचे सर्व भाग विधात्याने आधीच निर्मिलेले असतात. ते चरित्रकार एका सूत्रांत कसे गुंफणार ? क्षुद्र प्रसंग गाळावे, महत्त्वाचे ठेवावे, एवढीच निवड त्याला करतां येईल. पण त्या पुरुषाची सर्व क्षेत्रांतली कामगिरी, त्यांतले महत्त्वाचे प्रसंग, घटना, यासुद्धा एका सूत्रांत बसणार नाहीत. त्यांची पुनर्रचना शक्यच नाही. अशा वेळीं मार्वा म्हणणार की ज्यांच्या जीवनांत एकसूत्रता आहे अशाच व्यक्तींची निवड करावी ! हा खरोखर अनर्थ आहे. न्या. रानडे, महात्माजी, जवाहरलालजी यांचीं चरित्रें लिहूंच नयेत असा याचा अर्थ झाला. पुनर्घटनेच्या या विपरीत विचाराला आणखी निराळें उत्तर देण्याची गरज आहे असें मला वाटत नाही. कलाकाराने आपलें विश्व कल्पनेने निर्माण केलेलें असतें. त्याची वाटेल ती रचना,

पुनर्रचना करण्याचा, हवें तें घेण्याचा, नको तें गाळण्याचा अधिकार, वाटेल तीं वळणें देण्याचें स्वातंत्र्य त्याला असतें. तें स्वातंत्र्य असतें म्हणूनच त्याला सुश्लिष्ट आकृति निर्माण करतां येते. चरित्रकाराला तें स्वातंत्र्य नसतें. म्हणून त्याला आकृतिबंध असा कधीहि निर्माण करतां येणार नाही. याचाच अर्थ चरित्र ही कलाकृति होऊं शकणार नाही.

यासंबंधांत व्हर्जिनिया वूल्फ यांनी मांडलेला एक विचार विशेषच उद्‌बोधक आहे. चरित्र ही कलाकृति होऊं शकणार नाही हें सांगतांना त्या म्हणतात की, प्रत्यक्ष जीवनांतील, प्रत्यक्ष घटनांतील क्षणजीवी भाग हा कलाकार गाळून टाकतो. त्यांतील चिरकाल टिकणारा, शाश्वत तेवढाच भाग घेऊन तो कलानिर्मिति करतो. पण चरित्रकाराच्या वांट्याला या क्षणजीवी, अशाश्वत अशा घटना येतातच. म्हणून चरित्र ही केवळ कारागिरीच होणार. कला नव्हे. महात्माजींच्या चरित्रांत त्यांचें बॅरिस्टरीच्या व्यवसायांतलें यशापयश, आहारविषयक प्रयोग, त्यांच्या अपत्यांचे जन्म, त्यांचे नामदार गोखल्यांशीं संबंध, विषयनियामक कमिटींतले अनेक वादविवाद, टिळक-स्वराज्य-फंड, अल्लीबंधूंची माफी, हे जे प्रसंग आहेत त्यांना शाश्वत महत्त्व मुळीच नाही. कोणी महात्माजींच्या जीवनावर नाटक लिहावयाचें ठरविलें, काव्य करावयाचा विचार केला तर तो आफ्रिकेंतला सत्याग्रह, चंपारण्य, खेडा, हे लढे, जालियनवाला बाग, अमृतसर हीं प्रकरणें, बार्डोली, दांडीचें प्रयाण, ' करा वा मरा ' हें आंदोलन, हेच प्रसंग निवडील. निर्देशिलेले प्रसंग अजिबात गाळून टाकील. ते क्षणजीवी आहेत. नीरस आहेत त्यांना कलामूल्य नाही. पण चरित्रकाराला त्यांतला एकहि प्रसंग गाळतां येणार नाही. ते देऊन त्याला त्यांतला आणखी क्षुद्र तपशीलहि केव्हा केव्हा द्यावा लागेल. कारण महात्माजींच्या प्रत्यक्ष जीवनाच्या घडणींतलें त्यांचें महत्त्व वादातीत आहे. विश्वव्यापक, शाश्वत, चिरकालिक, तेंच निवडावें असें कलेचें धोरण असतें. कलेचें आवाहन सर्व स्थळीं, सर्व काळीं, सर्व मानवांना पोचतें तें याच तिच्या गुणामुळे. ती अमर होते ती या विश्वव्यापकतेमुळे होते. वरील क्षणजीवी घटनांचा समावेश तिने आपल्या अभ्यंतरांत केला तर त्यांच्याबरोबर तीहि क्षणजीवी होईल. ' ज्युलियस सीझर ' या नाटकांत शेक्स्पीयरने सीझरच्या चरित्रांतला कोणता भाग

निवडला आहे त्याचा नवचरित्रवाद्यांनी चांगला अभ्यास करावा, आणि मग सीझरच्या चरित्राची हवी तर कला करावी. गोष्ट अशी आहे की, व्यक्तीचें खाजगी, कौटुंबिक भावजीवन, तिचें वैयक्तिक सुखदुःख हा कलेचा विषय आहे. आणि सार्वजनिक, वैचारिक, बौद्धिक, व्यावसायिक जीवन हा चरित्राचा विषय आहे. नवचरित्रकार या दोहोंचा संकर करूं पहात आहेत.

आता आत्माविष्कार या चरित्रकलेच्या आणखी एका महत्त्वाच्या गुणाचा विचार करावयाचा. अलीकडे या गुणाला फारच प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. त्याचे ग्रह इतके जोरावर आहेत की दुसरा कोणताहि गुण त्याच्या तुलनेला बसूं शकणार नाही असें साहित्यशास्त्रज्ञांचें मत असावें, असें अनेक साहित्यसमीक्षणांवरून वाटूं लागतें. ' आत्माविष्कार म्हणजेच कला ' अशी मार्वाने कलेची व्याख्या केली असल्याचें वर सांगितलेंच आहे. आणि चरित्र ही कला आहे, तेव्हा त्याहि कलेचा आत्माविष्कार हा महत्त्वाचा गुण आहे, हें ओघानेच आलें. स्वतः मार्वाने ' शेले ' व ' डिझरेली ' यांचीं चरित्रें लिहिलीं आहेत, व त्यांत हा गुण कसा आहे तेंहि स्पष्ट केलें आहे. तें स्पष्टीकरण आपण प्रथम पाहूं व मग या गुणाचा चरित्राच्या दृष्टीने विचार करूं. मार्वा म्हणतो, ' चरित्रासाठी मीं शेलेची निवड केली याचें कारण असें की तरुणपणीं मीं जीं अनेक जीविताविषयक तत्त्वें मनाशीं निश्चित केलीं होतीं तीं व्यवहारांत आणतांना परिस्थितीशीं संघर्ष होऊं लागला. त्यामुळे अनेक प्रकारचें दुःख मला झालें व मन उद्विग्न झालें. शेलेच्या चरित्रांत नेमकें हेंच घडलें होतें. तेव्हा त्याच्या चरित्रांत पदोपदीं मला माझें चरित्र दिसूं लागलें. आणि त्याचें चरित्र लिहून दुःखभार हलका होईल असें वाटलें. म्हणून त्या वेळीं मीं तें लिहून टाकलें. त्यानंतर डिझरेलीचें चरित्र अभ्यासलें तेव्हा हाच अनुभव आला. उतारवयांतल्या डिझरेलीशीं मी समरस होऊं लागलों. सनातन परंपरेचा अभिमान व लोकशाही वृत्ति यांचा समन्वय त्याच्या ठायीं झाला होता. माझ्या मनाची ठेवण तंतोतंत तीच होती. डिझरेलीने आपलें हें राजकीय तत्त्व प्रत्यक्ष व्यवहारांत आणलें. मला तें आणतां आलें नाही. तेव्हा त्याचें चरित्र लिहून त्याशीं एकरूप व्हावें व तेंच यश आपण अनुभवावें असें मला वाटलें, आणि त्या हेतूने मीं डिझरेलीचें चरित्र लिहिलें. '

चरित्रकला ही आत्मविष्कार या गुणाने कशी संपन्न होऊं शकेल हें याप्रमाणे मार्वा याने स्वलिखित चरित्रांचीं उदाहरणें घेऊनच सांगितलें आहे. तीं उदाहरणें प्रमाण म्हणून त्यांचा निर्देश करतांना एक गोष्ट लक्षांत ठेविली पाहिजे की, याच प्रकरणांत 'शेलेचें चरित्र आता माझे मलाच आवडत नाही' असें मार्वाने लिहिलें आहे. आणि त्याचें कारण असें दिलें आहे की, 'मीं अनेक ठिकाणीं शेलेचा उगीच उपहास केला आहे, हेटाळणी केली आहे. चरित्र लिहितांना, शेले म्हणजे मीच, असें वाटलें आणि स्वतःवर टीका करावी या बुद्धीने मीं त्याच्यावर टीका करून तें चरित्र बिघडवून टाकलें आहे.' दुसऱ्याचें चरित्र लिहितांना आत्माविष्कार करण्याचा प्रयत्न केला तर चरित्रकलेचें काय होईल हें यावरून सहज दिसून येईल. याच प्रकरणांत पुढे आत्माविष्कार या गुणाचें मार्वाने आणखी विवेचन केलें आहे. त्यांत हा गुण पाण्याहून पातळ करून टाकून त्याने त्याची विटंबनाच मांडलेली आहे. प्रारंभीं अभिनिवेश असा की, स्वतःच्या जीवनाचा साक्षात्कार ज्याच्या चरित्रांत घडेल त्याचेंच चरित्र निवडावें व स्वतःच्या भाव-भावनांचा निचरा करून घ्यावा. पुढे मग मार्वा म्हणतो की, बायरनचें चरित्र लिहावयाचें म्हणजे बायरनच व्हावयास पाहिजे असें नाही. त्याची अनुभूति आपणास हवी असें नाही. विल्यम मॉरिसच्या चरित्रकाराच्या अंगीं त्याची उदारवृत्ति, उदात्तता असली पाहिजे असें नाही. तर त्याच्या त्या उदार वृत्तीचें, स्वतःच्या आयुष्यांतील कुठल्या तरी एखाद्या क्षणाच्या अनुभवाच्या साहाय्याने, आकलन झालें की पुरे. इतकेंच नव्हे तर, बायरन किंवा मॉरिस यांच्या वृत्ति, त्यांच्या मनाची ठेवण मानवी आहे, एवढें लेखकाला पटलें तरी काम झालें. शिखरावरून घसरतां घसरतां मार्वाची गाडी पायथ्याच्याहि खाली गेली असें यावरून दिसून येईल. दुसऱ्याच्या वृत्तीचें, उदार किंवा हीन मनाचें आकलन हेंच आत्माविष्काराला पुरेसें असलें तर चरित्रविषयाची निवड केली पाहिजे, प्रत्येकाला वाटेल त्याचें चरित्र लिहितां येईल असें नाही, शेलेची निवड मीं या कारणासाठीं केली, डिझरेलीची त्या कारणासाठी, यापुढे अशाच कारणाने गटे किंवा मेरिडिथ यांची मला निवड करावीसी वाटते,—हा सर्व बकवा कशासाठी?

पण या बाबतींत दुसरी फार महत्त्वाची शंका येते ती अशी : लिटन

स्ट्रॅची हा नवचरित्रकलेचा जनक. त्याने लिहिलेलीं चरित्रें म्हणजे या कलेचे आदर्श ! मग त्यानेहि कार्डिनल मॅनिंग, फ्लॉरेन्स नाइटिंगेल, डॉ. अर्नाल्ड, जनरल गर्डान, व्हिक्टोरिया, एलिझाबेथ, यांच्या चरित्रांत आत्माविष्कारच केला काय? स्वतःच्या जविनाचा साक्षात्कार त्याला यापैकी प्रत्येका-कीच्या जीवनांत झाला काय? त्याच्या कोणत्या भावभावनांचा निचरा, कोणत्या दुःखभाराचा परिहार या चरित्रलेखनामुळे झाला? वस्तुस्थिति अशी आहे की व्हिक्टोरिया-युगाचें आदर्श, त्या युगांतील ढोंगी सभ्यता, पोकळ शिष्टाचार, धर्म, लोकसेवा याविषयीच्या जड कल्पना यांची चेष्टा करावी, उपहास करावा, या बुद्धीने स्ट्रॅचीने ते विषय निवडले. 'एमिनंट व्हिक्टोरियन्स' या पुस्तकांत तर सर्व कथन व्याजोक्ति, वक्रोक्ति उपरोध, उपहास, यांनी भरलेलें आहे. हा आत्माविष्कारच काय? चरित्रनायकाच्या जीवनांत स्वतःच्या जीवनाचा साक्षात्कार होऊन त्याचें चरित्र लिहिणें म्हणजे आत्मचरित्र लिहिणेंच होय, असें आत्माविष्काराचें लक्षण दिलें जातें. मग हीं सर्व चरित्रें म्हणजे स्ट्रॅचीचीं आत्मचरित्रेंच मानावयाचीं काय? तसें नसूनहि त्या युगाविषयीचीं त्याचीं मतें, त्याचे विचार त्याचा दृष्टिकोन त्याने मांडला हाच आत्माविष्कार होय असें म्हणावयाचें असेल तर पूर्वीच्या सर्व चरित्रांतून तो गुण दृष्टीस पडत असल्यामुळे ती सर्व चरित्रें म्हणजे कलाकृतीच होत असें म्हणावें लागेल. कारण साउदे, लेविस, लॉकहार्ट, स्ट्रिकलॅंड, कार्लाइल, यांनी चरित्रनायकांविषयी, त्यांच्या काळाविषयी आपापलीं मतें त्यांत मांडलेलींच आहेत.

खरी गोष्ट अशी आहे की, दुसऱ्याच्या चरित्रांत आत्माविष्कार साधूं पाहणें ही अत्यंत विपरीत आणि विकृत अशी कल्पना आहे. कला म्हणजे आत्माविष्कार, आणि चरित्र ही कला होय, असें समीकरण दिसतांच अंधपणें या टीकाकारांनी चरित्रांत आत्माविष्कार झालाच पाहिजे असें गृहीत धरलें आणि चरित्रलेखनाची विटंबना करून टाकली. आपल्या जीवनाचा साक्षात्कार ज्याच्या चरित्रांत होतो त्याचेंच चरित्र लिहावयाचें असें ठरविलें तर मोठा विपरीत प्रसंग निर्माण होईल. कांही माणसांना अभ्यास, हौस, भक्ति, सर्व असूनहि कोणाचींच चरित्रें लिहितां येणार नाहीत. आणि कांही थोर पुरुषांचीं चरित्रें लिहावयास कोणींच मिळणार

नाही. विष्णुशास्त्री, टिळक, आगरकर यांशीं समानधर्मे कोणी असूं शकतील; नाही असें नाही. पण त्यांना नुसतें समानधर्मत्व असून काय उपयोग? त्यांच्या अंगीं अभ्यास, विद्वत्ता, लेखनकला, हे सर्व गुण असावयास पाहिजेत. असा सर्व विचार केला म्हणजे चरित्रलेखन हा कपिलाषष्ठीचा योगच आहे असें वाटूं लागतें.

चरित्रनायकाशीं समानधर्मत्व असल्यावांचून, त्याच्या जीवनांत आपल्या स्वतःच्या अनुभूतींचा प्रत्यय आल्यावांचून, त्याशीं समरसता होत नाही, आणि समरसता नाही म्हणजे चरित्र चांगलें होणार नाही, हें मतहि असेंच चुकीचें आहे. जर्मन महाकवि गटे याचें जी. एच्. लेविसप्रमाणेच हेन्‌रिच डंटझर यानेहि एक चरित्र लिहिलें आहे. त्याच्या प्रस्तावनेंत तो म्हणतो, 'वास्तविक गटेसारख्या थोर पुरुषाचें चरित्र लिहिण्यास त्याच्या तोडीचाच लेखक हवा. मी सामान्य माणूस त्याच्या प्रतिभेचें आकलन कसें करणार? पण प्रेम, भक्ति यांमुळे हें कार्य साध्य होतें. भक्तीमुळे चरित्रकाराला अंतर्भेद करणारी दृष्टि प्राप्त होते. आणि तिच्यामुळे दिवंगत थोर पुरुषाचें जीवन डोळ्यासमोर प्रत्यक्ष उभें राहतें. या भक्तीमुळे अंधता येते असें मात्र नाही. भक्ति असली तर लेखक थोर पुरुषाच्या वैगुण्यांकडे, दोषांकडे डोळेझांक करील असेंहि समजण्याचें कारण नाही. थोर पुरुष झाला तरी तो मानवच आहे हें भक्ति विसरत नाही. डंटझरच्या बाबतींत तर हें विधान इतकें खरें आहे की, स्वतः गटेने लिहिलेलें आत्मचरित्रहि त्याने अंधपणें प्रमाण मानलें नाही. गटेने तें वृद्धापकाळीं लिहिलें होतें, तेव्हा त्यांत अनेक गोष्टी त्याने केवळ कल्पनेने लिहिल्या आहेत, हें डंटझरने दाखवून दिलें आहे आणि असें करतांना सत्याला स्वस्थानीं सुप्रतिष्ठित करणें, हें चरित्रकाराचें पहिलें कर्तव्य होय, असें सांगून त्याने ही चिकित्सा केली आहे. मागे उल्लेखिलेल्या साउदे, लेविस, लॉकहार्ट, कार्लाइल, मूर, ग्लेग या चरित्रकारांची आपल्या उत्तम पुरुषांच्या ठायीं अशीच भक्ति होती. तिच्यामुळेच ते त्यांच्याशीं समरस होऊं शकले, आणि आत्माविष्कार न करतांहि त्यांनी उत्तम चरित्रें लिहिलीं.

कोणतीहि साहित्यकृति ही कलाकृति होण्यासाठी तिच्या ठायी सत्यदर्शन, पुनर्रचना, आत्माविष्कार व अलिप्तता हे गुण प्राधान्याने असावे लागतात असें टीकाकारांचें मत आहे. त्यांतील तीन गुणांचा विचार झाला. आता

चौथ्याचा विचार करून या संकरजन्य अपत्याचें-कलात्मक नवचरित्राचें-विवेचन संपवावयाचें आहे.

अलिप्तता, तटस्थता, अविचलित मनःस्थिति हा कलेचा एक महत्त्वाचा गुण मानला जातो. चरित्रकाराने निःपक्ष वृत्ति ठेवावी, भावनावश होऊं नये, बोध काढण्याचा प्रयत्न करूं नये, आपले निष्कर्ष वाचकांवर लादूं नयेत, त्याने फक्त चरित्राचें दर्शन घडवावें, असें स्ट्रॅचीने अलिप्तता या गुणाचें स्पष्टीकरण केलें आहे. मार्वानेहि याचें विवेचन केलें आहे. पण त्याने प्रामुख्याने वाचकांची, प्रेक्षकांची अलिप्तता, श्रोत्यांची तटस्थता ही दृष्टीपुढे ठेविली आहे. 'एकच प्याला' नाटक पहात असतांना समोर जरी संतापजनक भीषण प्रकार घडत असले तरी जागेवरून उठून आपण रंगभूमीकडे धावत नाही. सिंधूला किंवा तिच्या बाळाला वांचविण्याचा प्रयत्न करावा असें आपल्या मनांतहि येत नाही. आपल्या डोळ्यांना पाणी येत असतें. तरी त्यांना साहाय्य करण्याची नैतिक जबाबदारी, प्रत्यक्ष व्यवहारांत जी आपल्याला वाटत असते ती, त्या वेळीं वाटत नाही. याचें साधें कारण असें की, समोरचा प्रकार 'सत्य' नाही, हें नाटक आहे, याची जाणीव आपल्याला असते. 'पण लक्षांत कोण घेतो', 'अंकल टॉम' या कादंबऱ्या वाचतांना आपल्या मनाची हीच तटस्थवृत्ति असते. वपनाच्या घोर आपत्तींतून यमुनेला सोडवावी किंवा अंकल टॉमला लेग्रिसच्या हातून वांचवावें असा विचार आपण करीत नाही. तसा—तितका तीव्र—प्रक्षोभच आपल्या चित्ताला होत नाही. कारण हा सर्व सत्याभास आहे ही गोष्ट आपण विसरत नाही. कांही कादंबरीकार लेखन करतांना स्वच्छ हा किंवा तो पक्ष घेतांना दिसतात. तसा घेऊन ते नैतिक सिद्धान्त मांडतात, आणि त्यामुळे आपली व वाचकांचीहि तटस्थ वृत्ति नष्ट करून टाकतात. मग कलेचें सौंदर्य जातें, म्हणून हें लेखकानें वर्ज्य मानलें पाहिजे. 'पॅसेज टु इंडिया', 'डेव्हिड कॉपरफील्ड' इत्यादि पाश्चात्त्य कलाकृतींच्या आधारें हा विचार सांगून शेवटीं निष्कर्ष म्हणून मार्वा असें सांगतो कीं, कलाकृतींत सत्याचें दर्शन इतकें लांबून व्हावें; असें भासमय व्हावें की वाचक-प्रेक्षकांना त्यासंबंधी कांही करण्याची आपली जबाबदारी आहे, अशी भावना होऊं नये. त्यांच्या अलिप्त वृत्तीचा भंग होऊं नये. मार्वाच्या या विवेचनावरून

असें दिसतें की, लेखकाच्या दृष्टीने विचार करतां हें कसब ज्याला साधलें त्याच्या ठायीं तटस्थता आहे, त्याच्या लेखनांत अलिप्त वृत्ति आहे असें म्हणतां येईल.

सुदैव असें की, चरित्र ही कला कां होऊं शकणार नाही याचें कारण, हें विवेचन करतांना मार्वानेच सांगून टाकलें आहे. कादंबरी वाचतांना, नाटक पाहतांना वाचक किंवा प्रेक्षक तटस्थवृत्ति कां ठेवूं शकतात ? तर समोरची घटना ' सत्य ' नाही ही जाणीव त्यांना अखंड असते म्हणून. ज्या क्षणीं ही जाणीव लोपेल, त्या क्षणीं ते प्रक्षुब्ध होतील, व कदाचित् कार्यान्वित होतील. आता प्रश्न असा की, चरित्रलेखन करीत असतांना ' हें सत्य नाही ' अशी जाणीव वाचकांच्या चित्तांत अखंड राहील असें धोरण चरित्रकाराने ठेवावयाचें की काय? आधीच्या प्रकरणांत सत्य—त्रिवार सत्य–हेंच चरित्र-काराचें उद्दिष्ट असलें पाहिजे असें मार्वाने बजावलें आहे. म्हणजे दर क्षणाला ' जें घडतें आहे तें सत्य आहे ' याची जाणीव चरित्रांत अवश्य आहे. आणि ' या घटना सत्य नाहीत ' ही अखंड जाणीव कलेंत अवश्य आहे. तरी चरित्र ही कला व्हावी असा मार्वाचा आग्रह आहे ! या दोन आपेक्षांत विसंगति दिसते, हें त्याला मान्य आहे. पण आपण तिचा परिहार करूं शकूं अशी त्याला उमेद आहे. सर्व पुस्तकांत त्याला तें कोठेहि साधलेलें नाही. वाचकांच्या चित्तांत प्रक्षोभ होऊं नये यासाठी, म्हणजे चरित्राची कलाकृति करण्यासाठी, त्याने एक विचित्र युक्ति सुचविली आहे. ज्या व्यक्ति दिवंगत होऊन बराच काळ लोटला असेल अशांचींच चरित्रें लिहावीं म्हणजे झालें ! ही युक्ति सुचविल्याबद्दल मार्वाच्या प्रतिभेचें सर्वांनी कौतुकच केलें पाहिजे. श्रीकृष्ण, श्रीराम, यांना होऊन गेल्याला आज हजारों वर्षें लोटलीं आहेत. पण त्यांच्या चरित्रांत जरा कोणी कमीजास्त केल्यास आज रणें माजतात. शिवाजी, तुकाराम, समर्थ यांच्या चरित्राचें तेंच आहे. नामदेव, तुकाराम, यांच्या चरित्रांत त्यांच्या भक्तांना अप्रिय अशीं कांही विधानें केल्याबद्दल वि. ल. भावे यांचा नुकताच निषेध करण्यांत आला, हें प्रसिद्धच आहे. हिंदुस्थानांतील मुस्लिम सुलतानांच्या चरित्रांचें ऐतिहासिक परीक्षण करणें कधी काळीं शक्य होईल ही आशा केव्हाच धरतां येणार नाही. आणि मागासलेल्या भारतांतच हें आहे असें नाही. युरोप-अमेरिकेची

अनुक्रम.................. दि: ..................
क्रमांक .......................... नों दि ...............


हीच स्थिति आहे. स्टॅलिन, लेनिन, मार्क्स, हिटलर यांचीं चरित्रें अलिप्त वृत्तीने, केवळ सौंदर्यदृष्टीने वाचणारे वाचक तिकडे किती सापडतील ? स्ट्रॅचीने अलिप्त वृत्तीची कसम खाऊनच ‘ एमिनंट व्हिक्टोरियन्स ’ यांचीं चरित्रें लिहिलीं आहेत. तरी त्यामुळे अनेकांचा संताप झाला व आता स्ट्रॅचीविरुद्ध प्रतिक्रिया चालू झाली आहे, हें प्रसिद्धच आहे. तेव्हा चरित्रांत जोंपर्यंत सत्य सांगावयाचें आहे तोंपर्यंत अलिप्तता टिकविणें, प्रक्षोभ टाळणें हें शक्य नाही. कलाकृतीलासुद्धा हें शक्य होत नाही. हार्डीची ‘ टेस ’ ही कादंबरी प्रसिद्ध झाल्यानंतर त्याच्यावर इंग्लंडमध्ये भयंकर भडिमार झाला. टेसवर बलात्कार झाला होता. तिला एका गांवगुडाने भ्रष्ट केली होती. तरी हार्डीने ‘ शुद्ध शीलवती स्त्री ’ असा तिचा गौरव केला होता; त्यामुळे लोक प्रक्षुब्ध झाले. हार्डी प्रस्तावनेंत म्हणतो की, “ कांही घटनांना कलात्मक रूप देण्याचा मीं प्रयत्न केला आहे. त्यांतील सत्य ज्यांना सहन होत नसेल त्यांनी सेंट जेरोमचें वचन ध्यानांत ठेवावें–‘ सत्याने दुष्परिणाम होणार असतील तर ते होऊं द्यावे. पण सत्य लपवून ठेवूं नये.’

मार्वा म्हणतो की, ‘ मृत्यु हा मोठा कलाकार आहे. तो सर्व विकार, सर्व प्रक्षोभ, सर्व भावना शांत करतो.’ एक तर हें खरें नाही. व्यक्ति दिवंगत झाली तरी शेंकडो वर्षें ती समाजाला प्रक्षुब्ध करूं शकते. आणि दुसरें म्हणजे सत्य निर्भयपणे सांगण्याची प्रतिज्ञा करणाऱ्यांनी त्यामुळे जो प्रक्षोभ माजेल त्याची चिंता कां करावी ? मनुष्य गेल्यानंतर अनेक वर्षांनी, दीर्घ कालाने त्याचें चरित्र लिहावें असें मार्वा ज्या कारणासाठी सुचवितो तें अत्यंत गर्ह्य आहे. मनुष्य जिवंत असतांना किंवा नुकताच दिवंगत झाला असतांना चरित्र कां लिहावयाचें नाही ? तर त्यामुळे प्रक्षोभ माजेल आणि मग चरित्राची कलात्मकता बिघडेल. म्हणजे कलेसाठी सत्यहि दीर्घकाळ दडपून ठेवण्यास हरकत नाही, असा याचा अर्थ झाला. चरित्राची कला करावी या हव्यासापायीं नवचरित्रवादी आपल्या मूलाधारावरच घाव घालण्यास कसे सिद्ध होतात तें यावरून स्पष्ट होईल. खरा अर्थ असा आहे की, कलेंत प्रत्यक्ष सत्यदर्शन झालें पाहिजे हा जो त्यांचा मूलाधार तोच भ्रान्त आहे. त्यामुळे दर ठिकाणीं कांही विपरीत भूमिका नवचरित्रवादी लोकांना स्वीकारावी लागत आहे.

चरित्र ही कला आहे हा भ्रांतिष्ट सिद्धान्त उराशीं बाळगल्यामुळे नवचरित्रकारांना अनेक उपसिद्धान्त स्वीकारावे लागले आहेत. कविचरित्रांत त्याच्या काव्याची चिकित्सा व कादंबरीकाराच्या चरित्रांत त्याच्या कादंबऱ्यांचें मूल्यमापन वर्ज्य होय, हा त्यांपैकीच होय. कारणें काय, तर हें मूल्यमापन म्हणजे शास्त्रीय चर्चा होईल आणि मग कलेला बाध येईल! चरित्रनायकाच्या व्यक्तित्वाचें चित्र काढणें, तें कसें संपन्न आहे हें दाखविणें, हें चरित्राचें खरें उद्दिष्ट आहे. या दृष्टीने पाहतां त्याच्या साहित्याची चिकित्सा, कला हा आत्माविष्कार होय असें मानणाऱ्यांनी तर सर्वांत जास्त कटाक्षाने करावयास हवी. टीकाकार ही चिकित्सा करतातच, असें म्हणून चरित्रकाराने ती वर्ज्य मानली तर चरित्रांतले बहुतेक घटक असेच वर्ज्य मानावे लागतील. मॅनिंगच्या चरित्रांत स्ट्रॅचीने त्या वेळच्या धार्मिक चळवळींचें समालोचन केलें आहे तें काय म्हणून? तें धर्मशास्त्रज्ञ करतातच. नाइटिंगेलच्या चरित्रांत तत्कालीन रुग्णालयांचें वर्णन केलें आहे तें वैद्यकशास्त्राच्या पुस्तकांत येतच असतें. शेलेच्या चरित्रांत त्याच्या काव्याची चर्चा अनवश्य, असें म्हणून त्याच्या आईबापांची हकीकत मात्र अवश्य, असें प्रा. जोशी यांनी म्हटलें आहे. कारण त्याच्या गुणांत आनुवंशाचा भाग किती हें त्यावरून कळतें. पण हें–आनुवंशशास्त्रज्ञ लिहीतच असतात. म्हणून तें वर्ज्य मानावयास हवें. न्या. मू. रानडे यांचें शिक्षणविषयक कार्य शिक्षणशास्त्रांत येईल, त्यांच्या धार्मिक चळवळींची माहिती धर्माच्या इतिहासांत जाईल, त्यांचें राजकीय कार्य राजकारणशास्त्रज्ञ व आर्थिक क्षेत्रांतल्या चळवळी अर्थशास्त्रज्ञ पाहून घेतील. त्यांच्या ग्रंथांचा परामर्श टीकाकार घेतील, समाजसुधारणेची दखल समाजशास्त्रज्ञ घेतील. आणि मग चरित्रकाराने काय करावयाचें? व्यक्तित्व! शुद्ध निर्गुण, निराकार व्यक्तित्व—त्याचें वर्णन! वास्तविक मनुष्याच्या प्रत्येक कृत्यांतून त्याचें व्यक्तित्व आविष्कृत होत असतें. कार्यक्षेत्र राजकीय असो, सामाजिक असो, धार्मिक असो वा वाङ्मयीन असो, त्या मनुष्याचा जुन्याचा वा नव्याचा अभिमान, भावनावशता, तर्कवशता, किंवा दोन्ही वृत्ती, तडफ किंवा ढिलाई, कार्यसिद्धीविषयीची तळमळ वा उदासीनता, आत्मविश्वास वा त्याचा अभाव, मित्र, प्रतिपक्षी यांशी वागणूक, वैयक्तिक संसारांत त्यांविषयी होणाऱ्या प्रतिक्रियासंबंधी धोरण, हें सर्व वारंवार प्रगट होत असतें, व यांतूनच

त्याच्या व्यक्तित्वाचें दर्शन घडतें. आणि जों जों या भिन्न क्षेत्रांतील त्याच्या कार्यांचा जास्त खोल अभ्यास होईल, विवेचन होईल, तों तों त्याच्या रेखा सुस्पष्ट होत जातील. असें असतांना काव्य, कादंबरी, लढाया, धार्मिक चळवळी यांची चिकित्सा म्हणजे व्याद आहे असें मानणें म्हणजे व्यक्तित्वाचा आपल्याला अर्थ कळला नाही असें दर्शविण्यासारखें आहे. सुदैवाने नवचरित्रकारांनीहि हें दर वेळीं असें केलेलें नाही. स्ट्रॅचीने कोठल्याच चरित्रांत ही वेडी भूमिका स्वीकारलेली नाही. अवश्य त्या सर्व अंगोपांगांचा, परिस्थितीचा परामर्श त्याने घेतला आहे. कार्याचें विवेचन केलें आहे. मार्वाने डिझरेलीच्या चरित्रांतहि त्याचें राजकारण, त्या वेळचे पक्षोपपक्ष यांची चर्चा वर्ज्य मानलेली नाही.

चरित्रकाराने अमकी व्यक्ति लेखनासाठी निवडावी व तमकी निवडूं नये याविषयीचीं बंधनें व त्यामागचें धोरणहि असेंच विपरीत आहे. ज्यांच्या चरित्रांत एकसूत्र नाही ते पुरुष निवडावयाचे नाहीत. कारण कलेला अवश्य ती पुनर्रचना करतां येणार नाही! जे जिवंत आहेत किंवा दिवंगत झाले आहेत त्यांचें चरित्र कलेला वर्ज्य. कारण अलिप्ततेला बाध येईल. ज्यांच्या जीवनांत स्वतःचें प्रतिबिंब दिसणार नाही त्यांचीं चरित्रें लिहूं नयेत. कारण आत्माविष्कार साधणार नाही! हे सर्व दण्डक पाळावयाचे ठरविले तर बहुधा जगांत कोणाचेंच चरित्र लिहिणें शक्य होणार नाही असें वाटतें.

या सर्वांचा विचार केला तर चरित्रलेखन ही कला आहे ही अत्यंत विकृत व भ्रांत कल्पना आपण सोडून दिली पाहिजे. चरित्र हा इतिहास आहे. इतिहासाचे दोन प्रकार आहेत. एक समाजाचा व राष्ट्राचा इतिहास आणि दुसरा व्यक्तीचा इतिहास. तेंच चरित्र होय. यामुळे त्या दोन प्रकारांच्या रचनेंत फार मोठा फरक पडेल हें खरें आहे. चरित्रांत व्यक्ति हाच बिंदू कल्पून त्याभोवती सर्व गुंफण केली पाहिजे. इतिहासांत सर्व समाजाचें जीवन हा मध्यबिंदु होईल. पण असें असलें तरी त्यांच्या मूळ प्रकृतींत, जीविततत्त्वांत काडीमात्र फरक नाही हें आपण जाणलें पाहिजे. तें जाणलें तर इतिहासाप्रमाणेच समाजाला ज्ञान देणें, राष्ट्रभक्तीची शिकवण देणें, स्फूर्ति देणें हेंच चरित्रलेखनाचेंहि अंतिम उद्दिष्ट असलें पाहिजे हें आपणांस सहज मान्य होईल. केवळ कलात्मक सौंदर्याचें, रचनेच्या सौंदर्याचें दर्शन घडविणें हाच चरित्राचा हेतु असावा ही खरोखर

अगदी करंटी कल्पना आहे. स्फूर्ति देणें, ध्येयवाद शिकविणें, थोर आदर्श समाजापुढे उभे करणें हेंच चरित्रकारांचें खरें कार्य असलें पाहिजे. श्रेष्ठ चरित्रकार हा समाजाचा शिक्षक आहे. त्याने त्याला पटलेला पक्ष घेऊन स्वतः काढलेले निष्कर्ष समाजाला शिकवावयाचे नाहीत तर कोणी शिकवावयाचे ? हें अध्यापन म्हणजे आपले निष्कर्ष समाजावर, वाचकांवर लादणें होय असें नवचरित्रकार म्हणतात. पण या टीकेचा काडीमात्र विचार करण्याचें कारण नाही. ज्ञात्या पुरुषाचें, पंडिताचें, तत्त्ववेत्त्याचें हेंच कार्य आहे. त्यामुळेच समाज उन्नत होत असतो. या अमृतावरच त्याचें पोषण होत असतें. तेव्हा कला कला म्हणून त्याचा कोणी नाश करूं लागला तर त्याचें रक्षण करणें हें विचारी पुरुषांचें कर्तव्य आहे. राजवाडे, विष्णुशास्त्री यांसारख्या आपल्याकडल्या थोर पुरुषांनी चरित्राकडे याच दृष्टीने पाहिलेलें आहे. मुंडले यांच्या 'काव्हूर 'च्या चरित्रास प्रस्तावना लिहितांना राजवाडे म्हणतात, 'इटलीचे पांचपंचवीस तुकडे एकत्र करण्यांत या थोर मुत्सद्दयाची चतुराई दिसून येते. या एकाच बाबीकरितां काव्हूरचें चरित्र मनन करण्यासारखें आहे. नुसत्या स्वार्थत्यागाने स्वराज्याची व स्वातंत्र्याची उपलब्धि होत नाही. त्या स्वार्थत्यागाचा योग्य परामर्श घेणारें कौशल्य देशांत निपजलें नाही तर त्याग गाभटतो व जिवंत स्वातंत्र्य प्रसविण्यास असमर्थ ठरतो, हें काव्हूरच्या चरित्रावरून दिसतें.' चरित्रलेखनाचें राजवाड्यांच्या मतें उद्दिष्ट काय तें यावरून स्पष्ट होईल. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं डॉ. जॉन्सनचें चरित्र लिहून अर्वाचीन चरित्र-लेखनास चालना दिली. या चरित्राच्या प्रारंभीं, 'संसारास व लोकव्यवहारास उपयोगी असा सदुपदेश चरित्रापासून प्राप्त होतो ' हा त्याचा लाभ म्हणून त्यांनी सांगितला आहे. विष्णुशास्त्री यांनी लिहिलेलें जॉन्सनचें चरित्र हें एक मराठींतलें उत्कृष्ट चरित्र आहे. त्याचे गुण प्रा. जोशी यांनासुद्धा मान्य आहेत असें दिसतें. पण शास्त्रीबुवांनी कलेचे स्ट्रॅचीप्रणीत कोणतेहि नियम पाळलेले नाहीत. आपले निर्णय ते अभिनिवेशाने सांगतात, उपदेश करतात. चरित्रांत जॉन्सनच्या साहित्याची त्यांनी भरपूर चर्चा केली आहे. तरी तें उत्कृष्ट चरित्र झालें आहे. प्रांजळपणे, परखडपणे गुणदोषप्रदर्शन करावें हें व्रत स्ट्रॅचीच्या आधी चाळीस वर्षे शास्त्रीबुवांनी अंगीकारलें होतें, आणि कोणत्याहि चरित्राचा तो प्रधान

गुण होय, सत्यदर्शन हेंच चरित्रकाराचें कार्य होय, असें आवर्जून सांगितलें होतें. ‘ चरित्र ही राष्ट्राची बहुमोल संपत्ति आहे, तरुण मंडळींचा तो खुराक आहे, थोर पुरुषांच्या मार्गांचा, हेतूंचा, ध्येयांचा उलगडा करून तीं चरित्रें लोकांपुढे मांडणें ही मोठी राष्ट्रसेवा आहे, ’ असा सानेगुरुजीकृत ‘ गोखले–चरित्रा ’ च्या प्रस्तावनेंत म. म. द. वा. पोतदारांनी आपला अभिप्राय दिला आहे. ‘ टेरेन्स मॅक्स्विनी ’ या फडकेलिखित चरित्राच्या प्रस्तावनेंत ‘ काळ ’ कर्ते परांजपे यांनी ‘आयर्लंडचें नवें शहाणपण या चरित्रापासून हिंदुस्थान शिकेल ’, अशी आशा प्रगट केली आहे.

या सर्व थोर पंडितांचा एकच दृष्टिकोण आहे. (ज्ञान, ध्येय, स्फूर्ति हेंच चरित्रलेखनाचें उद्दिष्ट असलें पाहिजे. तरुण पिढीच्या मनाचें पोषण यावरच व्हावयाचें असतें. म्हणून चरित्र हें राष्ट्राचें फार मोठें धन आहे. समाजाच्या उन्नति-अवनतीचे नियम समजावून देणें, जीवनावर भाष्य करणें, त्या प्रकाशांत समाजाला मार्गदर्शन करणें हें इतिहासाप्रमाणेच चरित्राचेंहि कार्य आहे. याचा अर्थ असा की, त्याची मांडणी शास्त्रीय पद्धतीनेच झाली पाहिजे. सत्य घटनांची चिकित्सा, त्या आधारें निवेदन, आक्षेप, खंडन–मंडन, व शेवटीं निर्णय ही शास्त्रपद्धति होय. चरित्रें या पद्धतीने व या दृष्टिकोनांतून लिहिलीं गेलीं तरच तीं आपलें उद्दिष्ट साध्य करूं शकतील.

या सर्व मर्यादा संभाळून चरित्र चित्तवेधक करतां आलें तर तें अवश्य करावें. शास्त्रीय पद्धत ही नेहमी जड किंवा रुक्ष असलीच पाहिजे असें नाही. समर-प्रसंग हा कलेचा आत्मा आहे असें म्हणतात. सत्याच्या मर्यादा संभाळून तो चरित्रांतहि वर्णितां येईल. मार्वाचें डिझरेलीचें चरित्र रम्य झालें आहे तें पील व डिझरेली याच्यांतील समराचें त्याने खुमासदार वर्णन केलें आहे त्यामुळे; आत्माविष्कारामुळे किंवा अलिप्ततेमुळे नव्हे. कोणत्याहि थोर पुरुषाच्या जीवनांत समरप्रसंग असणारच. त्यांचें वर्णन अत्यंत चित्तवेधक होऊं शकेल. वि. ल. भावे यांनी लिहिलेलें नेपोलियनचें चरित्र या दृष्टीने आदर्श आहे. आकर्षक, चित्तवेधक या अर्थाने कलात्मक हा शब्द वापरावयाचा असेल तर तो येथे सार्थ होईल. महात्माजींच्या चरित्रांतील अनेक समरप्रसंग दा. न शिखरे यांनी रसाळ करून सोडले आहेत. विष्णुशास्त्री यांचे माडखोलकरांनी लिहिलेलें चरित्र याच दृष्टीने उल्लेखनीय आहे. समरप्रसंगांप्रमाणेच मनो-

विश्लेषण किंवा व्यक्तीच्या अंतरंगाचें दर्शन हें कलेचें मोठें आकर्षण होय. कांही प्रमाणांत चरित्रांत तेंहि करतां येईल. वैयक्तिक सुखदुःखाच्या आठवणी हा तर अगदी अवीट रस होय. कलेची सर्व रम्यता तर त्यांतच आहे. सामान्यांतून विशिष्टाकडे कला आपल्याला नेते, म्हणूनच ती आपला चित्त-वेध करते. हा रसहि चरित्रकार आळवूं शकेल. पण हें सर्व त्याला फार मर्यादितपणे करतां येईल काव्य, कादंबरी, लघुकथा, नाटक यांच्या आसपासहि त्याला जातां येणार नाही. आणि त्याने तसा प्रयत्नहि करूं नये. कारण त्याला सत्याचीं बंधनें आहेत. सत्याच्या पायावर अनुमान उभारणें हें त्याला शक्य आहे. तेवढ्यांत त्याला जी कार्यकारणमीमांसा करतां येईल, जें अंतरंग-दर्शन, जें मनोविश्लेशण साधेल, वैयक्तिक जीवनाचा जो तपशील देतां येईल तो त्याने अवश्य द्यावा. त्यामुळे चरित्र जास्त रम्य, जास्त मनोरंजक, अधिक चित्तवेधक होईल यांत शंका नाही. तसें तें करणें हें चरित्रकाराचें कर्तव्य आहे हेंहि खरें आहे. पण अनुमानापलीकडे जाऊन त्याने कल्पना चालवून मनोविश्लेषण करणें, काल्पनिक चित्र उभारून रसपरिपोष करणें किंवा वैयक्तिक जीवनाचा कादंबरीसारखा तपशील भरणें हें चरित्राच्या अंतिम उद्दिष्टाला अत्यंत घातक होय. तें अगदी निषिद्ध, वर्ज्य मानलें पाहिजे. मेकॉलेने तर इतिहासाची कला करण्याचा घाट घातला होता. ‘माझीं इतिहासाचीं पुस्तकें इंग्लंडमधील लोकांच्या मेजावरील कादंबऱ्यांचें उच्चाटन करतील’, अशी प्रौढी तो मिरवीत असे. पण तसें झालें नाही. कारण त्याने ऐतिहासिक सत्याचें पालन केलें नाही, कल्पना स्वैर सोडून रसनिर्मिति केली. त्यामुळे आज त्याच्या इतिहासग्रंथांचेंच उच्चाटन झालें आहे. स्ट्रॅचीच्या चरित्रांविषयीं आज इंग्लंडमध्ये हीच प्रतिक्रिया होत आहे. म्हणून मराठी लेखकांनी सावध होऊन, चरित्र या राष्ट्रधनाची कलाकल्पनेपासून जपणूक केली पाहिजे. सत्य व कला या दोन भिन्न शक्ति आहेत. त्या राष्ट्राला सारख्याच हितकर आहेत. पण त्यांचा संकर केला तर दोहींचाहि प्रभाव नष्ट होतो आणि पुरुषार्थहीन असें अपत्य त्यांतून निर्माण होतें. तें म्हणजे नवचरित्र ! वाचकांचें रक्त उसळूं द्यायचें नाही हीच त्याची प्रतिज्ञा ! आणि राष्ट्राचें चैतन्य रसरसून वर आणणें हें तर चरित्रवाङ्मयाचें खरें कार्य !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलांतर
अनुक्रम ............................ दि: ............
क्रमांक ............................ नों: दि: ............

: ७ :

## वास्तवाची अभिरुचि

वास्तवाकडे, सत्याकडे अविचलित दृष्टीने पाहण्याचें आणि जें पाहिलें त्याचें यथातथ्य वर्णन करण्याचें सामर्थ्य हें मानवी मनाच्या प्रगतीचें लक्षण समजलें जातें. या सामर्थ्यामुळेच आतापर्यंत मानवी मनाची प्रगति झाली आहे, आणि पुढे झाली तर होणार आहे. पण मानवाचा आतापर्यंतचा इतिहास—आणि त्यांतल्या त्यांत साहित्याचा इतिहास पाहिला, तर सत्याचें यथार्थ वर्णन न करतां त्याला निराळेंच कांही रूप द्यावें अशी प्रवृत्ति निरनिराळ्या कारणांनी सामान्य व थोर पुरुषांनाहि झालेली आहे असें दिसून येतें. स्वार्थासाठी दुष्ट लोक सत्यापलाप करतात तें निराळें. त्यासंबंधांत त्यांना वास्तवाची अभिरुचि नाही असें कोणी म्हणत नाही. येथे प्रामुख्याने समाजकल्याणाच्या सद्हेतूने किंवा मानवी जीवनाविषयी काही विशिष्ट दृष्टि असल्यामुळे मोठमोठ्या साहित्यिकांनी सत्याला जें अद्भुताचें रूप दिलें, किंवा आपापल्या लोककल्याणाच्या दृष्टी-प्रमाणे त्यावर जे निरनिराळे रंग चढविले त्याचा विचार करावयाचा आहे. अर्थात् इतर प्रवृत्तींचा विचार अनुषंगाने होईलच. पण प्रामुख्याने साहित्या-मध्ये कणखर वास्तवाची अभिरुचि कोणी प्रकट केली आणि त्याला सद्भावनेनेच पण अन्यथारूप कोणी दिलें, त्याचा इतिहास पाहावयाचा

आहे. वास्तवाची अभिरुचि हें मानवाच्या उन्नत, विकसित मनाचें लक्षण आहे. मन जसजसें प्रौढ, प्रगल्भ होत जाईल, जगांतल्या घडामोडींचें त्याला जसजसें सम्यक् आकलन होईल, संसारांतल्या बऱ्यावाईट अनुभवाने त्याला जसजसें निबर रूप येईल, तसतशी त्याची ही अभिरुचि वाढत जाते. आणि या अभिरुचीने संपन्न असलेलीं सकस, कणखर मनें समाजांत जितकीं जास्त तितका तो समाज जास्त पराक्रमी, जास्त समर्थ व जास्त कर्तृत्वसंपन्न असतो.

आपल्याला येथे मुख्यतः साहित्यांतील वास्तवाच्या अभिरुचीचा इतिहास पहावयाचा आहे. साहित्य व समाजजीवन यांचा अगदी घनिष्ठ संबंध असतो असें म्हणतात. पण हा सिद्धान्त फार मर्यादित अर्थाने खरा आहे. कधी असा संबंध असतो, पण केव्हा केव्हा साहित्य जीवनापासून अगदी अलिप्त असतें. साहित्य धार्मिक असेल तर समाजजीवनांत त्याचे खोलवर परिणाम होतात. एरवी होतीलच असें नाही. पुन्हा 'संबंध', 'परिणाम' यांचे अर्थहि भिन्न असतात. पुष्कळ वेळां साहित्यांत समाजजीवनाचें नुसतें प्रतिबिंब असतें. समाजजीवनामुळे अमक्या प्रकारचें साहित्य निर्माण झालें असें तेव्हा म्हणतां येत नाही. कधी साहित्याची मानवी जीवनावर अप्रतिहत सत्ता चालते. त्या वेळीं उन्नतिअवनतीचा कार्यकारणभाव त्यांत जोडला तरी युक्त होईल इतका तो निकट संबंध असतो. म्हणून याविषयीचा सिद्धान्त मर्यादित अर्थाने खरा आहे असें वर म्हटलें आहे. पुढील विवेचनांत तो तशाच अर्थाने स्वीकारलेला आहे. जेथे तसा संबंध आहे, अमक्या साहित्यामुळे समाजावर अमका परिणाम झाला असें जेथे म्हणतां येते, तेथे तसे विचार मीं मांडले आहेत. पण असा कार्यकारणभाव नित्य जोडतां येईलच असें मला वाटत नाही. म्हणून आपल्या साहित्यांत प्राचीन काळापासून आतापर्यंत वास्तवाची अभिरुचि कोठे दिसते व कोठे दिसत नाही तें पाहत जावें एवढाच हेतु येथे मनांत धरला आहे. मात्र वास्तवाची अभिरुचि हें मानवी मनाच्या कणखरपणाचें, सामर्थ्याचें लक्षण आहे एवढें मात्र निश्चित आहे. आणि यामुळे अशा समर्थ प्रज्ञेंतून निर्माण झालेल्या साहित्याचा समाजाशीं संबंध आला तर त्याच्यांतहि ती अभिरुचि उत्पन्न होऊन तो समाज प्रबल होईल यांतहि शंका नाही. समाजजीवनाशीं साहित्याचा

संबंध येणें न येणें हें भाषा, प्रचारसाधनें, तत्कालीन लोकप्रवृत्ति इत्यादि अनेक कारणांवर अवलंबून असतें. त्याचा विचार येथे करणें शक्य नाही. येथे वास्तवाची अभिरुचि ही एक फार मोठी शक्ति आहे हें निदर्शनास आणून त्या अभिरुचीचा आपल्या साहित्यांतून मागोवा घेत जावयाचें आहे.

महाकवि वाल्मीकि यांचें जें रामायण महाकाव्य त्याचा या दृष्टीने प्रथम विचार करूं. ‘ महाराजांनी मला दोन वर दिले आहेत, आणि त्यांअन्वयें तुला चौदा वर्षें वनवासांत गेलें पाहिजे व भरताला राज्य दिलें पाहिजे, ’ असें कैकेयीने रामचंद्रांना सांगितलें आणि ती आज्ञा शिरसावंद्य मानून मर्यादापुरुषोत्तम रामचंद्र कौसल्येच्या मंदिरांत परत आले. त्या वेळचा प्रसंग पहा. ती महाभयंकर वार्ता ऐकतांच कौसल्या प्रथम मूर्च्छितच झाली. आणि थोड्या वेळाने शुद्धीवर आल्यावर अतिशय विलाप करूं लागली. त्या वेळीं लक्ष्मण तेथेच होता. हा सर्व प्रकार पाहून तो डिंवचलेल्या नागाप्रमाणे संतप्त झाला आणि रामचंद्रांना म्हणाला, “रामा, तुझ्या मनांत आहे तरी काय? राज्यत्याग करून वनवासांत जाण्यास तूं मान्यता तरी कशी दिलीस? अरे, विषयांध झालेला, स्त्रीलंपट, म्हातारचळ लागलेला हा राजा, त्याच्या आज्ञेची किंमत ती काय? तूं असला अविचार करूं नकोस. राज्य प्रथम ताब्यांत घे. मी काळासारखा तुझ्यामागे उभा आहें. तुझ्या प्रयत्नाच्या आड भरताच्या पक्षाचे कोणी लोक येतील तर त्यांचा मी संहार करीन. इतकेंच काय, प्रत्यक्ष दशरथ राजा जरी आड आला तरी त्याला मी कैदेंत घालीन, आणि वेळ आली तर ठारसुद्धा मारीन. विवेकभ्रष्ट होऊन उन्मत्ताप्रमाणे वागणाऱ्या पित्याला शासनच केलें पाहिजे. ”

लक्ष्मणाचें हें भाषण अत्यंत जहाल, अत्यंत कटु व प्रखर असें आहे. त्याविषयी कांही विवेचन करण्यापूर्वी येथे इतकेंच सांगतों की, लक्ष्मण, राम, कौसल्या, सीता व इतर व्यक्ति यांचीं जीं भाषणें, यांच्या ज्या कृति, यांचें जें आचरण पुढे मी वर्णन करून सांगणार आहें तें वाल्मीकि-रामायणांत जसेंच्या तसें असूनहि जुन्या मराठींतील एकनाथ, श्रीधर इत्यादि कवींनी जीं रामायणाचीं रूपांतरें मराठींत केलीं आहेत त्यांत मुळीच सापडणार नाही. त्या उक्ति, त्या कृति, ते प्रसंग यांचें रूप त्या मराठी कवींनी सर्वथा पालटून टाकलेलें आहे. कांही प्रसंग, कांही भाषणें त्यांनी अजिबात गाळूनच

टाकलीं आहेत. महाकवि वाल्मीकीचें रामायण वाचीत असतांना राम, लक्ष्मण, सीता या मानवी व्यक्ति आहेत, त्यांचे रागद्वेष आपणा सामान्य माणसांसारखे आहेत, अयोध्येंत जे प्रसंग घडत आहेत ते स्वार्थ, लोभ, धैर्य, त्याग, हीनता, उदात्तता, राज्यलोभ, सत्तालोभ, स्त्रीमोह, बंधुप्रेम, पतिभक्ति, ध्येयनिष्ठा, सत्त्वनिष्ठा यांतूनच नेहमीप्रमाणे निर्माण झालेले आहेत हें पदोपदीं जाणवत असतें. त्यांतल्या थोर व्यक्ति या विवेक, संयम, निष्ठा यांनी थोर झालेल्या असल्या तरी सामान्यांचे रागद्वेष, विकारविचार हे त्यांच्या ठायींहि आहेत हें सारखें दिसत असतें. मराठी कवींनी हें कधीहि दिसूं द्यावयाचें नाही अशी दक्षता बाळगलेली आहे. हें वास्तव रूप समाजाला दाखविणें हें त्यांना मान्य नाही. त्यांनी रामकथा, कृष्णकथा यांना काय रूप दिलें आहे तें पुढे पाहूं; पण त्यांची दृष्टि आद्यकवींहून निराळी आहे, त्यांच्या ग्रंथांतून वास्तवाची अभिरुचि दिसून येत नाही, एवढाच विचार येथे ध्यानांत ठेवावा.

लक्ष्मणाचे जहाल, विषदिग्ध शब्द तर महाकवींनी जसेच्या तसे दिलेच आहेत; पण याहिपेक्षा जहाल व अभद्र आणि अमंगल वाटणारे कौसल्येचे उद्गारहि दिले आहेत. रामांच्या तोंडून ती अभद्र वार्ता ऐकतांच कौसल्येला धक्काच बसला. ती म्हणाली, "रामा, मीं गेलीं अठ्ठावीस वर्षें अत्यंत हालअपेष्टा भोगल्या; मी पट्टराणी असून राजाने मला दासीसारखें वागविलें, त्याच्या प्रेमाचा शब्द मला कधी मिळाला नाही. सवतींचे काळजाला घरे पाडणारे शब्द मला नित्य ऐकून घ्यावे लागत. दासीपेक्षाहि मला हीन लेखून कैकेयी माझा नित्य अपमान करीत असे. पण, माझा राम राज्यावर आल्यावर तरी मला सुखाचे दिवस येतील, या एकाच आशेने मी दिवस कंठीत होतें. तूं येथे असतांनाहि माझें जिणें पोतेऱ्यासारखें होतें. मग आता तूं गेल्यावर काय होईल? आजपर्यंत थोड्या तरी मला अनुकूल असलेल्या दासदासींसुद्धा आता कैकेयीच्या भीतीने माझा पाणउतारा करतील. रामा, अरे, यापेक्षा मी वंध्या झालें असतें तरी बरें झालें असतें." कौसल्येने गेलीं अनेक वर्षें किती यातना सोसल्या होत्या, किती अवमान साहिला होता, हें यावरून दिसून येईल. आणि मग, 'मी प्रत्यक्ष दशरथराजालाहि कैदेंत टाकीन किंवा वेळ आल्यास ठारहि करीन,' असें लक्ष्मण म्हणाल्यावर

अठ्ठावीस वर्षांची सगळी खळमळ बाहेर येऊन क्षणभर भान न राहून ती जर म्हणाली असली की, ' रामा, अरे लक्ष्मण काय म्हणतो आहे तें ऐक. आणि तें तुला उचित दिसलें तर त्याप्रमाणे तूं कर, तर जरी तें आपल्याला अगदी अभद्र, भयंकर वाटलें तरी साहजिक आहे, मानवी मन असेंच असतें, असें आपल्या ध्यानीं येईल. स्त्रीने, आर्य स्त्रीने, पतिव्रता स्त्रीने असें कदापि म्हणूं नये हें खरें. पण अठ्ठावीस वर्षें कमालीचा छळ व अवमान सोसल्यावर ओठांशीं आलेला अमृतकलश एकदम पालथा झाला तर क्षणभर कौसल्येसारख्या स्त्रीचें मनहि विचलित होणें शक्य आहे हें वाल्मीकि जाणतात. आणि मानवाचें यथार्थ दर्शन घडविणें अवश्य वाटल्यावरून त्याचें वर्णनहि करतात.

रामायणामध्ये अनेक प्रसंगीं सत्याचें असें उग्र दर्शन आद्यकवींनी आपल्याला घडविलेलें आहे. भरताचें एकंदर चारित्र अत्यंत उज्ज्वल, अत्यंत सात्त्विक असें आहे. पण हें पुढे दिसून आलें. प्रथम सर्वांनाच त्याच्याविषयी शंका आली होती. कैकेयीने तें तांडव मांडलें तेव्हा त्यानेच दूर राहून त्याचें सूत्रचालन केलें असावें असें पुष्कळांच्या मनांत आलें. दशरथाला हीच भीति वाटत होती. त्यामुळे अभिषेकाविषयी रामाशीं बोलतांना तो म्हणाला, " रामचंद्रा, अरे, सध्या भरत येथे नाही तेंच बरें आहे. तो धर्मनिष्ठ आहे; पण माणसाचें मन कसें फिरेल हें सांगतां येत नाही. तेव्हा तो नसतांना राज्याभिषेक व्हावा हेंच ठीक. तरी तूं आज रात्रीं जपून रहा. आणि तुझ्या वाड्याभोवती आज तुझ्या मित्रांचा पहारा असूं दे. नेहमीचे पहारेकरी नकोत." हें अत्यंत वास्तव असें मानवी चित्र दिसतें. सत्तेचा लोभ, त्यामुळे होणारे घातपात, भाऊबंदकीचे अनर्थ यांनीच राजघराण्यांचे इतिहास घडलेले असतात. आणि त्यांनीच अयोध्येच्या सूर्यवंशाचा इतिहास रामांच्या काळीं घडत होता. रामचंद्र, सीता, भरत यांनी आपल्या असामान्य, अलौकिक सात्त्विकतेने, धीरोदात्त आचरणाने त्याला निराळें वळण लावलें हें खरें. पण म्हणून त्यांच्या मनांत संशय, संताप आलाच नाही, राज्यत्यागाचें दुःख रामांना झालेंच नाही, सीता या संकटाने व्याकुळ झालीच नाही असें नाही. त्यांच्याहि मनांत संताप आला, दुःख झालें, पित्याविषयी रामांना चिरडहि आली; पण कांही एका श्रेष्ठ कर्तव्याच्या,

धर्माच्या कल्पनेने, त्या निष्ठेमुळे त्यांनी निग्रह केला, संयम केला आणि संताप गिळून सर्व दुःखें भोगलीं. यांत त्यांचें असामान्यत्व आहे. पण हें असामान्यत्व मानवी आहे, अद्‌भुत नाही. पुराणांची रचना करणाऱ्या ग्रंथकारांना आणि पुढच्या मराठी कवींना हें मानवी असामान्यत्व नको होतें. त्याची अभिरुचि त्यांना नव्हती. त्यांना अद्‌भुत, अतिमानव, दैवी, अवास्तव याचें प्रेम होतें. म्हणून त्यांनी महाकवींचें रामायण सगळेंच बदलून टाकलें. महाकवींना सत्याची अभिरुचि होती म्हणून त्यांनी सर्व रागद्वेषांचीं, विकारविचारांचीं यथातथ्य वर्णनें केलीं आहेत.

लक्ष्मण व सीता यांसह गंगानदी ओलांडून गेल्यावर आणि सुमंत सारथ्याला परत पाठविल्यानंतर रात्रीं रामचंद्र एका झाडाखाली पाचोळ्यावर पडले. आणि मग लक्ष्मणाशीं बोलतांना त्यांच्या मनांतली सर्व खळमळ बाहेर आली. ती महाकवींनी जशीच्या तशी दिली आहे. श्रीरामचंद्र म्हणाले, " लक्ष्मणा, तुझें म्हणणें खरें आहे. आपले पिताजी विषयलोलुप आहेत. त्या तरुण पत्नीच्या मोहाला वश होऊनच त्यांनी मला वनवासाला धाडलें आहे. अरे, अज्ञानी मनुष्यसुद्धा अशा पुत्राचा त्याग करणार नाही. धर्म व अर्थ सोडून महाराजांनी केवळ कामाचाच आश्रय केला. लक्ष्मणा, यामुळे त्यांच्यावर आता फार मोठी संकटपरंपरा कोसळणार आहे. आणि त्यांत माझी माताहि सापडणार आहे. तिने मला इतक्या कष्टाने वाढविलें, आणि मी तिच्या दुःखाला कारण झालों. मला धिक्कार असो. माझ्यासारखा पुत्र, खरोखर कोणत्याहि स्त्रीला होऊं नये ! कैकेयी आमच्या कुळाचा नाश करण्यासाठीच जन्माला आलेली असावी. आता आपण इकडे आल्यावर ती सुमित्रा आणि कौसल्या यांना विषसुद्धा घालील. ती अत्यंत अधम, दुष्ट आहे. तेव्हा तूं अजून परत जा, आणि महाराजांचें आणि आपल्या मातांचें रक्षण कर. " दशरथ व कैकेयी यांच्याविषयी रामचंद्रांनी अयोध्येंत असेपर्यंत संतापाचें, अनुदारपणाचें एक अक्षरहि तोंडावाटे येऊं दिलें नाही. इतकेंच नव्हे, तर इतरांनाहि तसें काढूं दिलें नाही. कोणी तसें निंद्य भाषण केलेंच तर त्याचा त्यांनी निषेध केला. पण हें केवळ कर्तव्यबुद्धीने; त्यांच्या मनांतच कांही आलें नाही असें नाही. अंतरांत काय प्रक्षोभ चालला होता तो वर वर्णिलाच आहे. त्या मर्यादा

पुरुषोत्तमाने तो दिसूं दिला नाही, इतकेंच. त्यांनी संयम केला, मनोनिग्रह केला. या मनोनिग्रहामुळे माणूस असामान्य होतो. विवेकामुळे, संयमामुळे त्याला अलौकिक पदवी प्राप्त होते. सामान्यांचे रागद्वेष, काममोह, दुःख संताप त्याला नसतातच असें नाही. त्यांचा तो निग्रह करतो. यांतच त्याचें मानवत्व व असामान्यत्व आहे; त्याच्या ठायी ते विकारच नव्हते असें म्हणण्यांत नाही.

श्रीरामकथेप्रमाणेच श्रीकृष्णांची कथा आहे. महाभारताची रचना करणाऱ्या वेदव्यासांना आद्यकवि वाल्मीकि यांच्याप्रमाणेच किंवा त्यांच्याहून थोडी अधिकच वास्तवाची अभिरुचि आहे. वाल्मीकींनी रामचंद्रांचें असामान्य वैभव जसें मोठ्या भक्तीने वर्णिलें आहे तसेंच व्यासांनी श्रीकृष्णांचें अलौकिक चरित्र व चारित्र्य लिहून ठेविलें आहे. आणि उग्र सत्याचें दर्शन घडविण्यास कचरावयाचें नाही हें वाल्मीकींचें धोरणहि त्यांनी तितक्याच निष्ठेने संभाळलें आहे. युद्ध समीप येऊन ठेपलें त्या वेळीं धर्मराज, भीम, अर्जुन या सर्वांचींच मनें व्याकुळ झालीं. श्रीकृष्णांशीं प्रत्येकजण निरनिराळ्या प्रकारें चर्चा करीत होता. त्या वेळीं श्रीकृष्ण सर्वांना सांगत होते की, " पुरुष-प्रयत्नांची पराकाष्ठा करून जें होण्यासारखें असेल तें मी करीन. पण दैव आणि पुरुषप्रयत्न या दोहोंनी मिळून लोकांचें हित साधतें. शत्रूशीं होणाऱ्या युद्धामध्ये निश्चयाने जयच प्राप्त होईल असें नाही. जमीन कसणें शेतकऱ्यांच्या हातीं आहे. पण अवर्षण झालें तर तो काय करणार ? " अशा तऱ्हेच्या श्रीकृष्णांच्या अनेक भाषणांवरून श्रीकृष्ण म्हणजे मानवी पुरुष आहेत, अद्‌भुत, अतिमानुष अशी कोणतीच शक्ति त्यांच्या ठायी नाही हें आपणांस जाणवत असतें. श्रीकृष्ण अलौकिक, असामान्य पुरुष होते हें खरें, पण भागवत-पुराणाने बनविलेला अद्‌भुत, दैवी सामर्थ्यसंपन्न, असा पुरुष ते नव्हते. मराठी कवींनी वर्णिलेले सर्वसाक्षी, सर्वशक्तिसंपन्न, पूर्णावतार श्रीकृष्ण तर महाभारतांत जवळजवळ दिसतच नाहीत. रामायण-महाभारत या महाकाव्यांत अद्‌भुताचे खेळ नाहीत असें नाही. कांही नाही तरी चार-पांच हजार वर्षांपूर्वीच्या त्या कथा आहेत. त्या काळीं अद्‌भुतावर लोकांची खुरीखुरी श्रद्धाच होती. तेव्हा त्या महाकाव्यांत राम-कृष्णांच्या अद्‌भुत लीलांचीं वर्णनें असतील यांत नवल नाही. नवल आहे तें हें की, अशा

काव्यांतहि पूर्ण वास्तववादी दृष्टीनें त्यांचें वर्णन अनेक ठिकाणीं असावें. दुसरें हेंहि आपण ध्यानांत ठेविलें पाहिजे की, या दोन्ही महाकाव्यांत नंतरच्या अनेक पिढ्यांनी सारखी भर टाकली आहे. आणि ही भर टाकतांना मूळच्या वास्तवकथेचें त्यांनी लीलाचरित्र करून ठेवलेलें आहे. समुद्र तरून जाण्यासाठी रामांनी सेतु बांधला अशी रामायणांत कथा आहे. त्या वेळीं वानरांनी ' राम ' हीं अक्षरें लिहून दगड पाण्यांत टाकले व रामनामाच्या पुण्याईमुळे ते तरले अशी एक दंतकथा प्रचलित आहे. मूळ रामायणांत ही नाही. मोठ्या प्रचंड शिळा घालून त्यांवर प्रचंड वृक्ष टाकून नलाने सेतु बांधला असें साधें मानवी प्रयत्नांचें तें वर्णन आहे. मूळ रामायणानंतर झालेल्या अध्यात्मरामायण, शिवरामायण, स्कंदरामायण अशा अनेक रामायणांनी मूळ कथेवर अद्‌भुताचीं अनेक पुटें चढवून दिलीं. तेंच महाभारताचें झालें. या आवरणांतूनहि महाकवींची वास्तवाची अभिरुचि प्रखर रूपांत प्रकट होते हेंच नवल आहे. असो. महाभारतांतील व्यक्ति, प्रसंग व घटना यांतील वास्तवता आपण पहात आहों.

धर्म, अर्जुन, भीम, नकुल, सहदेव हे पांच पांडव एकमेकांना प्राणाहून प्रिय होते. एकमेकांच्या जिवाला जीव देण्यास ते केव्हाहि तयार असत. ' आमच्यापैकी एकाला जरी मृत्यु आला तरी आम्ही सर्व जण प्राणत्याग करूं ', असें ते म्हणत असत. आणि प्रसंग येतां तर त्यांनी तसें केलेंहि असतें. पण अशा या बंधूंमध्ये अत्यंत विपरीत वाटतील अशीं भांडणेंहि कधी कधी होत असत हें आपण विसरतां कामा नये. कर्णाने एकदा युधि-ष्ठिराचा पराभव केला, त्याला जखमी केलें, तेव्हा रणांतून निघून युधिष्ठिर शिबिरांत परत आला. त्या वेळीं तो अत्यंत उद्विग्न झाला होता, विषण्ण झाला होता, चिडून गेला होता. तो जखमी झाल्याचें ऐकून अर्जुन मुद्दाम रणांगण सोडून त्याच्या समाचारासाठी आला. कर्णाचा वध न करतां अर्जुन आलेला पाहून युधिष्ठिर अगदी भडकून गेला, आणि ' तुझें धनुष्य केवळ शोभेचें आहे, तें हातांत घेण्यापेक्षा फेकून कां देत नाहीस ? ' असें त्याला म्हणाला. आपल्या गांडीव धनुष्याचा कोणी अवमान करील तर त्याचा शिरच्छेद करावयाचा अशी अर्जुनाची प्रतिज्ञा होती. त्यामुळे त्याने खरोखरच तलवार उपसली व तो धर्माच्या अंगावर धावून गेला. श्रीकृष्णाने

मध्ये पडून तो अनर्थ टाळला हें निराळें. दुसऱ्या एका प्रसंगीं अर्जुन आणि भीम यांचें भांडण असेंच विकोपाला गेलें होतें. कपट करून द्रोणगुरुंना भीमाच्या साह्याने धृष्टद्युम्नाने मारलें हें अर्जुनाला सहन झालें नाही. त्यामुळे तो त्याची फार निंदा करूं लागला. आणि अश्वत्थामा पांडवांवर चालून येत होता त्याचीच प्रशंसा करूं लागला. 'आता त्याचाच जय होणार, सामर्थ्य असेल तर स्वतःचें रक्षण करा', असेंहि तो म्हणूं लागला. त्या प्रसंगीं त्याने युधिष्ठिराला फारच कटु वचनें ऐकविलीं. तेव्हा भीम अत्यंत खवळून गेला व अर्जुनावर त्याने भयंकर शब्दप्रहार केले. 'आज तुला धर्माची आठवण झाली हें मोठें भाग्यच होय! अरण्यांत जाऊन राहिलेल्या संन्याशाप्रमाणे तूं आज बोलत आहेस. धर्मराजाशीं असें वागतांना तुला लाज कशी वाटली नाही? तुला गुरुपुत्राचें एवढें भय वाटत असेल तर हो बाजूला. मी एकटा त्याचें निर्दाळण करतों'. अशा तऱ्हेचे प्रसंग महाभारतांत अनेक आहेत. आणि त्यांतूनच त्या प्रसंगांची, व्यक्तींच्या चरित्रांची, घटनांची वास्तवता प्रतीत होते. हे सर्व मानव आहेत, रागद्वेष, लोभमोह हे मानवी विकार यांच्या ठायींहि आहेत, हें पदोपदीं दिसत असल्यामुळे त्यांच्या पराक्रमाचें, विवेकाचें, बंधुप्रेमाचें, निष्ठांचें, श्रद्धांचें कौतुक वाटतें. लोभमोह असूनहि त्याला ते बळी पडले नाहीत. निग्रहाने त्या विकारांना त्यांनी स्वाधीन ठेवलें हें दिसल्यामुळे त्यांच्या मनःसामर्थ्याविषयी आदर दुणावतो. आणि हीं वर्णनें साक्षेपाने करणाऱ्या कवीची वास्तवाची अभिरुचि त्या प्राचीन काळांतहि इतकी कणखर राहूं शकली याचा विस्मय वाटतो.

द्रौपदीचा कीचकाने अपरिमित छळ केला, तो असह्य होऊन ती रात्रीं भीमाला भेटावयास गेली. त्या वेळी, 'इकडे कशासाठी आलीस? तुला कसलें दुःख प्राप्त झालें आहे?' असें भीमाने विचारतांच ती काडकन् म्हणाली, 'कसलें दुःख झालें आहे? जिचा पति युधिष्ठिर आहे तिला कसलें सुख मिळणार आहे?' असें म्हणून 'जुगारी, जुगारी' म्हणून तिने धर्मराजाची अत्यंत कटु शब्दांत भीमाजवळ निर्भर्त्सना केली. 'सर्व राज्य गेलें, धनदौलत गेली, तरी अजून त्यांचें जुगाराचें व्यसन जात नाही. मला जें अपार दुःख प्राप्त झालें आहे त्याला तुमचा तो ज्येष्ठ भ्राताच कारणीभूत आहे.' असें म्हणून विव्हल झालेली ती मानिनी धाय मोकलून रडूं लागली. पुढच्याच

क्षणीं, धर्मराजाला हीन स्थिति प्राप्त झाल्यामुळे आपल्याला कसें दुःख होत आहे हें ती सांगूं लागली. त्यांत तिची अपार पतिभक्तिहि दिसून येते. पण यातना असह्य झाल्यामुळे तोल जाऊन ती अत्यंत कटु वचनेंहि बोलते. सीतेलाहि रामचंद्रांना असें बोलण्याचे प्रसंग आल्याचें रामायणांत वर्णिलें आहे. प्रथम, 'मला बरोबर न्या,' अशी रामचंद्रांना प्रार्थना करतांना ती म्हणाली, 'राज्यत्याग करून आपण वनांत जाणार असाल तर मीहि आपल्या बरोबर येईन आणि रस्त्यांत सदैव आपणांपुढे राहून काटेकुटे, दगड झाडून रस्ता साफ करीन. मग आपण त्या रस्त्याने चालावें.' या वाक्यांतलें अपार, अगाध प्रेम अगदी निस्तुल असें आहे. पण कांही केल्या रामचंद्र तिला बरोबर नेण्यास तयार होईनात, आणि 'दशरथकौसल्येप्रमाणे भरताचीहि तूं मर्जी संभाळ, त्याच्या अनुरोधाने वागत जा', असें ते सांगूं लागले. तेव्हा मात्र सीतेचा संताप अनावर झाला. भरताबद्दल तिला अत्यंत भीति वाटत होती. राजसत्ता हातीं आल्यावर रामचंद्र जवळ नाहीत असें पाहून भरत काय वाटेल तो प्रसंग आणील अशी धास्ती तिच्या मनांत होती. या भरता-मुळेच आपलें वैभव गेलें यामुळेहि ती चिडून गेली होती. अशा भरताची सेवा करावी ही पतीची आज्ञा ऐकतांच तिचा प्रक्षोभ अनावर झाला आणि ती म्हणाली, "हे पुरुषश्रेष्ठा, वीर पुरुषांच्या शौर्याला काळिमा लावण्याजोगें आपण बोलत आहांत. आपलें भाषण मुळीच ऐकण्याजोगें नाही. आपण भरताची सेवा मला सांगतां तर आपणच त्याची मर्जी संभाळा, आपणच त्याची सेवा कराना. भरताची एवढी स्तुति आपण करतां ! परक्या पुरुषाला स्त्री द्यावी अशी तर आपली इच्छा नाही ना !"

श्रीकृष्णांचा आणि एकंदर यादवसमाजाचा अंत कसा झाला याचें वर्णन महाभारताच्या अखेर आलें आहे. तें लिहिणाऱ्या कवीच्या कठोर वास्तवप्रिय वृत्तीची कोणालाहि प्रशंसा करावी लागेल. पराक्रमी यादव हे शेवटीं अत्यंत उन्मत्त व मदांध झाले होते आणि त्यांची मद्यासक्ति पराकोटीला गेली होती. एकदा ते समुद्रस्नानाला गेले असतांना त्यांच्यांत मारामारीस प्रारंभ होऊन त्या यादवींतच त्या सर्वांचा संहार झाला. सात्यकी व प्रद्युम्न—एक श्रीकृष्णांचा सेनापति व दुसरा ज्येष्ठ पुत्र—दोघेहि मद्य पिऊन बेभान झाले होते. श्रीकृष्णांच्या देखत त्यांच्या निषेधाची पर्वा न करतां ते भीषण कंदन करूं

लागले आणि त्यांतच दोघेहि ठार झाले. तो प्रकार पाहून श्रीकृष्ण अत्यंत उद्विग्न झाले आणि घरीं येऊन पिता वसुदेव यांस सर्व सांगून तत्काळ अरण्यांत निघून गेले. तेथे एका पारध्याचा बाण लागून त्यांना मृत्यु आला. या सर्व वार्ता ऐकून द्वारकेंत एकच हलकल्लोळ माजला. सर्वत्र आकान्त सुरू झाला. कांही काळाने श्रीकृष्णाच्या निरोपाप्रमाणे द्वारकेंतील प्रजाजनांना, श्रीकृष्णांच्या स्त्रियांना व मागे राहिलेल्या कांही यादवांना हस्तिनापुरास घेऊन जाण्यासाठी पांडववीर अर्जुन तेथे आला आणि आज्ञेप्रमाणे या सर्वांना घेऊन निघाला. पण त्याचेंहि सामर्थ्य, रणशौर्य आता संपुष्टांत आलें होतें. वाटेंत आभीर नांवाच्या रानटांनी या समाजावर भयंकर हल्ले चढविले आणि बहुतेक सर्व यादवस्त्रिया पळवून नेल्या. महाभारतकार सांगतात की, त्या यादव-स्त्रियांपैकी कित्येक स्त्रिया आपखुषीने त्या रानटांबरोबर गेल्या !

श्रीकृष्णांच्या कुटुंबीयांचा व आप्तांचा हा केवढा भीषण अंत ! डोळ्यांदेखत मारामारींत पुत्र मारले गेले. स्वतः ते अरण्यांत व्याधाच्या बाणाने मृत्यु पावले. आणि रुक्मिणी, जांबवती आदि त्यांच्या स्त्रियांनी अर्जुनाबरोबर हस्तिनापुरीं आल्यावर अग्निप्रवेश केला. धृतराष्ट्र, गांधारी आणि कुंती हीं याच्याआधीच अरण्यांतील वणव्यांत सापडून दग्ध होऊन मृत्युमुखीं पडलीं होती.

रामायण-महाभारत या महाकाव्यांतील हीं कठोर वास्तववर्णनें, हें उग्र सत्याचें दर्शन, संसाराचें, मानवी जीवनाचें यथार्थ दर्शन घडविण्याची ही कणखर वृत्ति पाहून आपण पुराणांकडे वळलों की तेथे सर्वत्र रम्य पुष्पवाटिका दिसूं लागतात. तेथे कोणाचा शोककारक अंत होऊंच द्यावयाचा नाही अशी लेखकांची प्रतिज्ञा असावी असें दिसतें. त्यासाठी पुराणिकांनी शंकरपार्वतींची योजना केलेली आहे. मनुष्यावर कोणतेंहि संकट येवो, श्रीशंकर त्याला त्यांतून सोडवितात. राज्य गेलें, पत्नी विकून टाकली, पुत्र मेला, तरी हरिश्चंद्राला शेवटीं या सर्वांची पुन्हा प्राप्ति झालीच. श्रियाळचांगुणा यांनी पुत्राला स्वतःच मारलें होतें; पण बाळ चिलया पुन्हा जिवंत झाला. अंबरीषाची कथा, ध्रुवाची, प्रल्हादाची कथा, सावित्रीचें आख्यान, मार्कंडेयाचें आख्यान या सर्व कथा अशा प्रकारच्या आहेत. पुराणें वाचीत असतांना लेखकांच्या दृष्टींत असलेला फरक अगदी स्पष्टपणें जाणवतो. अज्ञान-

तिमिरांध लोकांना ज्ञानांजन देऊन त्यांचे डोळे उघडावे असा महाभारतकारांनी आपला लेखनहेतु सांगितला आहे. पण पुराणें हीं बहुधा विशिष्ट देवतेच्या-त्यांतहि शिव व विष्णु यांच्या -गौरवासाठी लिहिलेलीं आहेत. आणि गौरव हा हेतु असल्यामुळे प्रत्यक्ष घटनेंत तसतसा बदल करणें हें अवश्य होतें. मूळ सत्याला भिन्न रंग चढवून त्याचीं अन्यथा वर्णनें करण्यामागे दुसरीहि एक वृत्ति असते. लोकांना सदाचार, नीति यांचा उपदेश करावा असा सगळ्यांचाच हेतु असतो. पण त्यांत दोन भिन्न दृष्टिकोन असलेले उपदेशक आढळतात. सत्य आहे तें स्पष्ट दाखवून सत्यनिष्ठेमुळे, धर्मभक्तीमुळे, पातिव्रत्य, मातृभक्ति यांमुळे, संकटें येत असलीं, अपरिमित हानि होत असली तरी मनुष्याने या निष्ठा व हीं व्रतें सोडूं नयेत असें सांगणारा एक पंथ असतो. दुसऱ्या पंथाचें धोरण असें की सत्य, सदाचार, नीति यांचा सर्वत्र विजय होतो, प्रारंभी हरिश्चंद्र, प्रल्हाद यांच्यावर आलीं त्याप्रमाणे संकटें आलीं तरी शेवटी परमेश्वर सत्पक्षाचा कैवार घेऊन दुष्टांचें निर्दाळण करतो, असें लोकांना सांगावें. यायोगें त्यांची सदाचरणाकडे प्रवृत्ति, सुलभतेने होईल असें त्या उपदेशकांना वाटतें. पुराणिकांची मनोवृत्ति, त्यांचा दृष्टिकोन हा दुसऱ्या प्रकारचा आहे. वर निर्देशिलेल्या कथांवरून याचा प्रत्यय येईल. महाभारत, रामायण यांत पुष्कळ ठिकाणीं पहिल्या प्रकारची वृत्ति दिसते. यामुळे अभिमन्यु व द्रौपदीचे सर्व पुत्र मारले गेले, सीता शेवटी भूमींत गडप झाली, लक्ष्मणाला देहविसर्जन करावें लागलें, कृष्णाच्या कुटुंबाचा अंत अतिशय हृदयद्रावक असा झाला, अशीं वर्णनें महाकवि करून टाकतात. त्यामुळे कांही हानि होईल असें त्यांना वाटत नाही. उलट जगाच्या घडामोडींचें सम्यक् आकलन होऊन त्यामुळे मनुष्याचें मन जास्त कणखर होईल, सत्याकडे पाहण्याचें सामर्थ्य त्याच्या ठायी निर्माण होईल, तो भोळाभाबडा न राहता कुशाग्र आणि व्यवहारचतुर होईल अशी त्यांची विचारसरणी दिसते. आणि यामुळेच प्रारंभी दर्शविल्याप्रमाणे कित्येक सत्यांचें अगदी मूळच्या स्वरूपांत त्यांनी दर्शन घडविलें आहे. पुराणिकांना ही विचारसरणी मान्य नाही. म्हणून सत्याचा अंतीं जय होतो, हें तत्त्व मनाशीं धरूनच त्यांनी आपल्या कथा रचल्या आणि मूळच्या निराळ्या स्वरूपांत असलेल्या कथा आपल्या धोरणास पोषक होतील अशा रीतीने बदलून टाकल्या.

आपल्या जुन्या मराठी काव्यांकडे पाहिलें तर त्या वेळच्या संतकवींनी व पंडितकवींनीं पुराणिकांचेंच अनुकरण केलें आहे असें दिसतें. रामायण, महाभारत या महाकाव्यांतील कथांचाच त्यांनी मराठी अनुवाद केला आहे. पण त्यांच्या मनावर सत्ता आहे ती पुराणांची. प्रारंभी वर्णिलेले रामायणांतले प्रसंग त्या स्वरूपांत त्यांनी चुकूनसुद्धा आपल्या ग्रंथांत येऊं दिले नाहीत. राम, कृष्ण, लक्ष्मण, सीता, कौसल्या यांच्या स्वभावांमध्ये मूळ काव्यांत ज्या तामसी छटा कधी कधी दिसतात, त्यांचा वाससुद्धा त्यांनी आपल्या काव्यांत येऊं दिलेला नाही. या थोर व्यक्ति सामान्य मानवाप्रमाणे राग, द्वेष, काम, मोह, लोभ यांच्या अधीन कधी होत असतील हें त्यांना मान्यच नाही. त्यांच्या चरित्रांतला तो भाग साफ धुऊन टाकून त्यांना शुद्ध करून मगच आपल्या ग्रंथांत या थोर स्त्री-पुरुषांना मराठी कवींनी प्रवेश दिला आहे. तीं सामान्य मानवी वैगुण्यें त्यांच्या ठायी जोंपर्यंत आहेत तोंपर्यंत त्यांना इतकी थोर पदवी देतां येणार नाही, असें त्यांचें मत दिसतें. महाकवींच्या व त्यांच्या महापुरुषत्वाच्या कल्पना निराळ्या आहेत.

एकनाथस्वामींनी ‘ भावार्थ रामायण ’ व ‘ रुक्मिणी–स्वयंवर ’ हे दोन आख्यानपर ग्रंथ लिहिले. पण त्यांत मूळच्या कथांना त्यांनी इतकें आध्यात्मिक रूप दिलें आहे की त्यांत वास्तवाचा अंशहि शिल्लक उरलेला नाही. एकनाथांच्या मतें राम हें ब्रह्म आहे, कौसल्या ही सद्विद्या आहे, सुमित्रा ही मेधा, कैकेयी ही अविद्या आहे, रावण हें वासनांचेंजुंबाड होय. तें रामाने छेदिलें. रामायणांतील थोर व्यक्तींवरच रूपकें करून एकनाथ थांबत नाहीत. सामान्य व्यक्ति, सामान्य प्रसंग यांतहि त्यांना अध्यात्म दिसतें. सुमंत सारथी रामचंद्रांना बोलावण्यासाठी गेला. त्याने रामांच्या वाड्याचे सात चौक ओलांडले. ते चौक म्हणजे काम, क्रोध, हे विकार. ते ओलांडल्यावांचून राम भेटणार नाही. जनकाचा निरोप घेऊन दशरथाकडे त्याचा प्रधान निघाला. त्याने वाटेंत तीन मुक्काम केले. पहिला मुक्काम म्हणजे श्रवणमनन, दुसरा निजध्यास, तिसरा साक्षात्कार. अशीं वर्णनें आहेत. ‘ भावार्थ रामायण ’ वाचीत असतांना एकनाथस्वामींच्या मतें, कांही अर्वाचीन टीकाकारांप्रमाणे, रामकथा मुळांतच घडलीच नसून अध्यात्मविद्या स्पष्ट करण्यासाठी कोणी तरी हें रूपक केलेलें आहे, असें असावें, असें वाटतें.

रामकथेंतील मानवी घडामोडी, मानवी रागद्वेष त्यांनी इतके नाहीसे करून टाकले आहेत.

जेथे अध्यात्म नाही तेथे सर्व अद्‌भुताचे खेळ आहेत. वाल्मीकींनी आधी रामायण लिहिलें व मग त्याप्रमाणे सर्व घडून आलें ही दंतकथा मराठी कवींनी पूर्ण श्रद्धेने स्वीकारल्यामुळे त्यांच्या काव्यांत वास्तवतेला थाराच मिळाला नाही. मध्वमुनीने तर तें मूळ चरित्र पाहूनच राम-सीता वर्तत होते असें म्हटलें आहे. रामचंद्र सीतेला वनांत नेईनात तेव्हा ती म्हणाली, ' वाल्मीकींनी काय लिहिलें आहे तें नीट पहा पाहूं ! मला वनांत नेलें असेंच त्यांनी लिहिलें आहे ! ' इतर कवींनी थोडाफार असाच प्रकार केला आहे. रावणाला भिक्षा घालण्यासाठी सीता लक्ष्मणरेषेच्या बाहेर जाऊं लागली तेव्हा देवांना चिंता पडली. ' हिचा हात रावण धरील. मग ती त्याला शापाने तत्काळ भस्म करील. असें झाल्यावर मग रामचंद्र लंकेला येणार नाहीत. मग इंद्रजिताच्या हातून आम्हांला कोण सोडवणार ? ' असें म्हणून ते घाबरून जाऊन पंचवटीस आले. ( बंदींत असतां आले कसे ? —हीच लीला. ) आणि सीतेला म्हणाले की," तूं बाहेर जाऊं नको. हा रावण आहे. तो तुला पकडून नेईल. " यावर सीता हसूं लागली. ती म्हणाली " तुम्ही महामूर्ख आहां. मला हें सर्व माहीत आहे. मी प्रत्यक्ष बाहेर जाणारच नाही. माझी फक्त छाया जाईल. तिलाच सीता समजून रावण घेऊन जाईल. " एकनाथस्वामींनी मूळ कथेला असें रूप दिलें आहे. इतरांनी थोड्या फेरफाराने हेंच केलें आहे. छायारूपाने स्वतःहून सीता गेली नाही, देवांनी तिला तशी विनंती केली, असें श्रधिर म्हणतो; इतकाच फरक. पण सीता गेली नाही, तिची छाया रावणाबरोबर गेली, हें सगळ्यांना मान्य आहे. आता हें मान्य केल्यावर वास्तवता कोठे राहिली ? पुढलें सर्व राम, लक्ष्मण सीता यांनी वठविलेलें नाटकच झालें ! मूळ रामायणांत यांतलें कांही नाही. अत्यंत ख्याति पावलेली लक्ष्मणरेषा मुळांत नाही. ती ओलांडण्याचा प्रश्न नाही, देवांचें आगमन नाही, सीतेची छाया नाही. तो अगदी साधासुधा मानवी प्रसंग आहे. रावणाने आपला भाव प्रगट करतांच सीता संतापली. तिने त्याला झिडकारलें. पण त्या अबलेचें कांही चाललें नाही. त्या बलदंड राक्षसाने जबरदस्तीने तिला

ओढून रथावर घातलें व तो तिला घेऊन गेला. पण मराठी कवींना हें रुचत नाही. राक्षस जिला अशी नेऊं शकतो ती सीता त्यांना थोर वाटत नाही. रावणाला भस्म करून टाकण्याचें सामर्थ्य जिला नाही ती सीता त्यांना मान्य नाही. मग तिचें पातिव्रत्य तें काय, असें त्यांना वाटतें. जी अशी अनिच्छेने पळविली जाऊं शकते तिच्या पातिव्रत्यांतच कांही उणेपणा आहे असें त्यांचें मत आहे. आद्यकवींचें तसें मत नाही. पण यांचें आहे. म्हणून त्यांनी वाल्मीकींची घडण मोडून टाकली व स्वतःची नवी घडविली. सीतेच्या भेटीसाठी रघुनाथ अधीर झाले, अगदी काममोहाने अधीर झाले, तर असले रघुनाथ मराठी कवि नामंजूर करतील. असें वैगुण्य असलेल्या रामचंद्रांना मराठी काव्यांत महापुरुष मानायला मराठी कवि तयार नाहीत. ते प्रथम त्याची शुद्धि करतील, त्याच्या मोहाचें उन्नयन, उदात्तीकरण करतील व मग त्याला स्थान देतील. एरवी नाही. ही जेथे रामचंद्राची कथा तेथे इतरांचें काय ? लक्ष्मण, कौसल्या, सीता यांचीं आरंभीं दिलेलीं भाषणें, त्यांचे ते उफाळून आलेले रागद्वेष संतांना व पंडितांना आक्षेपार्ह वाटून त्यांनी ते अजिबात गाळून टाकले यांत नवल कसलें !

एकनाथस्वामींच्या ' रुक्मिणीस्वयंवरां 'त हेंच धोरण आहे. सगळा वेदान्त. श्रीकृष्ण म्हणजे शिव, रुक्मिणी म्हणजे जीव. हा श्रीकृष्णरुक्मिणी यांचा विवाह नाही, तर ' ये ग्रंथींचें निरूपण जीवशिवा होतसे लग्न.' भीष्मक म्हणजे विवेक, शुद्धमती म्हणजे श्रद्धा. आईच्या पोटांत रुक्मिणी नऊ महिने होती, ती नवविधा भक्ति. तिचीं नूपुरें सोहं गर्जना करतात. दारुकामांतील हवाई ही ममता, भुईनळा हा क्रोध; आणि या वेदान्तांतून आपण खाली येतांच काय दिसेल ? द्वारकेची महाराणी म्हणून घरीं आलेल्या रुक्मिणीला थोरली जाऊ उपदेश कसला करते ? तेलातुपाचीं भांडीं कशीं स्वच्छ करावीं,कडधान्यें कशीं ठेवावीं, कणकेची काळजी कशी घ्यावी याचा ! ही वास्तवाची अभिरुचि !

रामायण–महाभारतांतील थोर पुरुषांचें, थोर व्यक्तींचें अंत अत्यंत दुःखद झाले हें वर सांगितलेंच आहे. थोर पुरुषांत वैगुण्य असणें हें जसें मराठी कवींना पसंत नाही त्याचप्रमाणे त्यांचे दुःखद अंत होणें हेंहि त्यांना मान्य नाही. श्रीधरस्वामींनी 'रामविजय','हरिविजय', व 'पांडवप्रताप' या ग्रंथांत अखेरीचीं वर्णनें केलींच नाहीत. तो भाग त्यांनी गाळून टाकला आहे. त्यांनी दिलेलें

कारण मात्र अभिनव आहे. ते म्हणतात की, ' पंढरिनाथाने, या पुरुषांचें निजधामगमन तूं वर्णू नकोस, असें मला बजाविलें आहे. तूं जर माझी आज्ञा मोडशील तर तुझी प्रतिभा नष्ट होईल व तुझ्यावर अनर्थ ओढवेल असें देवानेच सांगितल्यावर काय करणार ? ' म्हणून महाभारतांतील मौसल, महाप्रस्थान इ. पर्वें, त्याचप्रमाणे इतर ग्रंथांतलीं शेवटचीं प्रकरणें त्यांनी गाळून टाकिलीं.

एकनाथ व श्रीधर यांच्याप्रमाणेच जुन्या मराठींतला तिसरा मोठा ग्रंथकार म्हणजे महीपती. 'भक्त-विजय,' 'संत-विजय,' ' भक्त-लीलामृत' इ. अनेक ग्रंथ त्याने लिहिले. त्यांत अनेक साधुसंतांचीं चरित्रें त्याने वर्णिलीं आहेत. त्यांत वास्तवाची अभिरुचि अगदी शून्य आहे. प्रत्येक साधुपुरुषाचें चरित्रें अद्भुत चमत्कारांनी भरलें आहे. हे सर्व चमत्कार देऊन त्याने ज्ञानेश्वर, तुकाराम, रामदास यांच्या खऱ्या कार्याची जर कल्पना दिली असती तरी फारशी हानि झाली नसती. पण 'ज्ञानेश्वरी', ' दासबोध ' यांचा पवित्र ग्रंथ, मोठे ग्रंथ असा निर्देश करण्यापलीकडे महीपती जातच नाही. त्याचा सर्व भर चमत्कारांवर. मराठी मनाचें पोषण झालें तें सर्व यावर झालें. महीपतीने एवढीं चरित्रें लिहिलीं, पण त्यांत शिवछत्रपति, सुभेदार तानाजी मालुसरे, बाजीप्रभु, खंडो बल्लाळ, बाजीराव यांचा समावेश करावा असें त्याला वाटलेंच नाही. ही अभिरुचि त्याच्या ठायी नव्हतीच. आणि हीं चरित्रें जाणण्याची, त्यांचें आकलन करण्याची त्याला ऐपतहि नव्हती. श्रीतुकारामांच्या चरित्रांत शिवछत्रपति एकदा आले आहेत. तेथे त्याने त्यांचें वर्णन कसें केलें आहे पहा : लोहगावीं बुवांचें कीर्तन चालू होतें, छत्रपति कीर्तनाला आले होते. त्या वेळीं पठाणांनी देवळाला वेढा घातला, आणि छत्रपतींना मारण्याचा घाट घातला. या वेळीं छत्रपतींनी काय केलें ? कीर्तनांतून उठणें हें पाप होय. तेव्हा परमेश्वरावर भार टाकून ते स्वस्थ बसले. ते म्हणाले, ' तारता मारता रुक्मिणीपति त्याविण त्रिजगतीं असेना.' खरोखर, शिवछत्रपतींची ही वृत्ति असती तर त्या रुक्मिणी-पतीचें नांव सांगायलाहि येथें कोणी हिंदु राहिला नसता. पण याहून निराळी वृत्ति काय असते हें जाणण्याचें सामर्थ्यच या कवींत नव्हते. शिवछत्रपतींचें समग्र चरित्र होऊन गेल्यानंतर, मराठ्यांचें साम्राज्य विस्तारल्यानंतर डोळ्यां-पुढे हें सर्व असतांना महीपति लिहावयास बसला होता. पण त्यांची वास्तव

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३४३८६. वि: ...
क्रमांक ... नों. दि. ...



दृष्टि त्याने वर्णिली तर नाहीच, पण ती त्याला समजलीसुद्धा नाही. रुक्मिणीपतीवरच ते विसंबून होते अशी त्याची भावना होती. छत्रपति इतके सावध होते की, पठाण पन्नास मैल दूर असतांनाच त्यांना बातमी लागली असती. आणि ती लागल्यावर त्यांनी कडेकोट बंदोबस्त करून टाकला असता. किंवा ते कीर्तनालाच गेले नसते. बेसावधपणे कोठे तरी जाऊन शत्रूच्या हातीं सहज सापडण्याइतके राजे गाफील असते तर हिंदवी स्वराज्याचा स्थापना झालीच नसती. पण महीपतीच्या लेखीं रुक्मिणीपतीच्या कृपेनेच राजे या सर्व प्रसंगांतून निभावले होते.

मागल्या त्या चारपांचशे वर्षांच्या काळांत वास्तवाची खरी अभिरुचि असणारे दोनच महापुरुष दिसतात. शिवछत्रपति आणि समर्थ. छत्रपतींची परंपरा पुढे कांही अंशीं तरी पेशवे, पटवर्धन, शिंदे, होळकर यांनी चालविली. म्हणून तर मराठी साम्राज्याचा विस्तार झाला, यावनी सत्तेचा उच्छेद झाला. पण समर्थांनी वास्तवाचें जें तत्त्वज्ञान सांगितलें त्याची परंपरा चालविणारा पुढे कोणीच झाला नाही. त्यांच्या शिष्यांना त्यांच्या कार्याचें सम्यक् आकलनच झालें नव्हतें. महाराष्ट्राचें आणि भारताचें हें मोठें दुर्दैव होय. समर्थांना सत्याचें उग्र दर्शन झालें होतें आणि तें दर्शन महाराष्ट्राला घडवावें असा त्यांचा प्रयत्न होता. 'शक्तीने मिळती राज्यें, युक्तीने यत्न होतसे, शक्तियुक्ति मिळे जेथे, तेथे श्रीमंत नांदती', हें लोकांना ते सांगत होते. केवळ दैवाने किंवा परमेश्वरकृपेने, रुक्मिणीपति प्रसन्न झाल्याने कार्यसिद्धि होणार नाही. 'केल्याने होत आहे रे, आधी केलेंचि पाहिजे.' अशा तऱ्हेची वास्तव दृष्टि लोकांना देण्याचा फार मोठा प्रयत्न समर्थांनी केला. 'मुक्त केल्या देवकोडी सर्वहि शक्तिच्या बळें!' हें त्यांचें वचन फारच अर्थपूर्ण आहे. रामचंद्रांनी रावणाच्या बंदींतून देवांना मुक्त केलें तें शक्तीच्या बळाने. त्यांना लीलामात्रें करून हें करतां आलें नाही. साधुसंतांचीं चरित्रें पाहिलीं तर सर्व कार्यसिद्धि लीलामात्रेंकरून होते अशीच त्यांची व त्यामुळे जनतेची दृढश्रद्धा असल्याचें दिसून येतें. शिवाजीचें रक्षण रुक्मिणीपतीच्या कृपेने होणार. दामाजीच्या रकमेचा भरणा देव करणार. देव शेत पिकवणार, परचक्र निवारणार, सावकाराचें कर्ज फेडणार, दळण दळणार, सर्व कांही

करणार. अशा भोळसट, अवास्तव सृष्टींत महाराष्ट्र त्या वेळीं नांदत होता. रामायण-महाभारताच्या वाचनाने कांहीं भ्रमनिरास व्हावा, तर हीं खरीं काव्यें लोकांपर्यंत कधी पोचलींच नाहीत. त्यांच्यापर्यंत पोचलें तें भागवत आणि या महाकाव्यांचीं अद्‌भुत रूपें ! मराठी कवींनी या दोन्हीं काव्यांचें अगदी भागवत करून टाकलें आहे. ते मानवाने केलेले पराक्रम नव्हेतच, त्या व्यक्ति मानवी नव्हत्याच, अशी शिकवण महाराष्ट्राला दिली गेली. म्हणून महाराष्ट्राची अत्यंत हानि झाली.

शिवछत्रपति, समर्थ यांच्या प्रेरणेने हिंदवी स्वराज्याची स्थापना झाली. त्याचें पुढे साम्राज्य झालें हें खरें. पण स्वराज्य आणि साम्राज्य पेलण्यास व त्यायोगे मानवी जीवनाचा विकास साधण्यास जी कणखर, समर्थ मनें लागतात तीं येथे कधीच उदयास आलीं नाहीत. अशीं समर्थ मनें, अशीं समर्थ माणसें असलीं म्हणजे अनंत अंगांनी तीं जीवन समृद्ध करतात. आणि मग स्वराज्य व साम्राज्य स्थिर, दृढ व बलाढ्य होतें. पण येथे कोणी युद्धविद्येचा अभ्यास केला नाही, शस्त्रास्त्रांच्या मागचें रहस्य जाणून घेण्याचा प्रयत्न केला नाही. मराठी सेनानी नेहमी कर्जबाजारी असत. पैशासाठी व्यापारवृद्धीची आवश्यकता असते. इंग्रजांनी हें जाणून येथले सर्व व्यापारी आपल्या लगामीं लावले होते. कारण ते वास्तव जगांत राहत होते. आणि आम्ही परमेश्वराने लीलामात्रेंकरून निर्माण केलेल्या भ्रामक जगांत राहत होतों. राज्य चालविण्यास अर्थव्यवस्था भक्कम असावी लागते हें येथे कोणी जाणलेंच नाही. इतिहास येथे कोणी लिहिला नाही. भूगोलशास्त्र पाहिलें नाही. मग रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान, वनस्पतिशास्त्र, वैद्यकशास्त्र यांचीं नांवें कशाला घ्या ! वास्तव जगांत ‘ केल्याने होत आहे रे, ’ हा सिद्धान्त खरा असतो. पण पुराणांच्या, भागवताच्या जगांत रामनामाने शिळा तरतात, पतिव्रतेच्या शापाने राक्षस भस्म होतात, शिवाजीसारखे अनेक चेहेरे दिसूं लागल्यामुळे राजांचें रक्षण होतें. या जगांत सत्याचा नेहमी जय होतो. होत नाहीसें दिसतांच शंकरपार्वती धावून येतात. वास्तव जगांत मात्र सत्याच्या मागे दृढ संघटना उभी केली, शस्त्रास्त्रांचा त्याला आधार मिळाला, तरच त्याचा जय होतो. एरवी त्याची अवस्था अत्यंत केविलवाणी होते. पण भागवती जगांत सत्य स्वयमेव आत्मरक्षणास समर्थ असतें. शिवसमर्थांच्या आधी असल्या भ्रामक

भागवती जगांत महाराष्ट्र राहत होता. वास्तवाकडे पाहण्याचें त्याचें सामर्थ्य नष्ट झालें होतें. त्यांच्यानंतर थोडा बदल झाला. पण खरी वास्तवदृष्टि येथे निष्पन्न झाली. नाही नाही तर इतिहास, विज्ञान, व्यापार, युद्धशास्त्र, कला, काव्य तत्त्वज्ञान हीं सर्व अंगें या भूमींत परिपुष्ट झालीं असतीं. पण वर सांगितल्याप्रमाणे वास्तवावर लोकांची दृष्टि सारखी खिळवून टाकणारे तत्त्ववेत्ते व नेते पुढे झाले नाहीत. पाश्चात्त्य विद्या येईपर्यंत आपण पुराणनिर्मित जगांतच राहत होतों.

पाश्चात्त्य विद्या आल्यावर मात्र आपल्या समाजांत वास्तवाची अभिरुचि फार झपाट्यानें प्रसृत झाली. 'केल्याने होत आहे रे' हें दादोबा पाडुरंग लोकहितवादी ज्योतिबा फुले, न्या. मू. रानडे यांच्या त्वरित ध्यानीं आलें आणि समाजरचना पालटून टाकण्याच्या प्रयत्नास त्यांनी तत्काळ प्रारंभ केला. पण या अभिरुचीचा साहित्यांत आविष्कार होण्यास जरा विलंब लागला. 'मुक्तामाला', 'मंजुघोषा', 'मित्रचंद्र', 'विश्वासराव' या कादंबऱ्या आणि 'विचित्रपुरी', 'सत्यविजय' हीं नाटकें वास्तवापासून फारच दूर होतीं. त्या अभिरुचिला हरिभाऊ येईपर्यंत कुचंबून बसावें लागलें. त्यांनी मात्र आपल्या वाङ्मयांत तिचा संपूर्ण आविष्कार केला. यमुना, रघुनाथ, शंकरमामंजी, भाऊ, ताई, शिवरामपंत, यशवंतराव खरे, श्रीधरपंत या त्यांनी निर्मिलेल्या व्यक्तिरेखा अगदी जिवंत आहेत. त्यांच्यावरचे प्रसंग नित्याच्या संसारांतले, प्रत्येकाच्या अनुभवाचे आहेत. त्यांच्या वाङ्मयांतील घटना अगदी वास्तव आहेत. संसार कसा आहे, सुख पाहतां जवापाडें हें कसें खरें आहे, हें हरिभाऊंनी चांगलें जाणलें होतें. आणि संसारांतील पर्वताएवढया दुःखाचें त्यांनी अगदी वास्तव दर्शन घडविलें आहे. वास्तविक पाश्चात्त्य विद्या येथे प्रसृत झाल्यानंतर, समाजाचा सर्व दृष्टिकोनच बदलल्यानंतर, भोळसट, भाबड्या श्रद्धा नष्ट झाल्यानंतर ही गोष्ट दुर्मिळ नसावी असें कोणाला वाटेल. पण पुढच्या वाङ्मयाच्या तुलनेने पाहिलें तर ही गोष्ट—संसारांतील दुःखाचें यथार्थ वर्णन करण्याचें सामर्थ्य—फारच दुर्मिळ आहे असें वाटतें. हरिभाऊंनी संसारांतील दुःखाचें वर्णन असें केलें आहे की काळजाला घरेच पडावेत. या दुःखाला अंत नाही, काळजांत घुसलेली ही कट्यार मेल्यावरच निघावयाची आहे ही संसारांत पदोपदीं जाणवणारी भावना हरिभाऊंनी उत्तम

तऱ्हेने चित्रित केली आहे. पण त्यामुळे मानवी जीवनाचा उबग येईल, किळस येईल, असें मात्र त्यांनी कोठेंहि होऊं दिलेलें नाही. कारण वस्तुस्थिति तशी नाही. मनुष्य क्षणभर जगाला, संसाराला विटून जातो. पण पुन्हा भविष्याच्या, आशेमुळे, जगण्याचा नैसर्गिक प्रवृत्तीमुळे, कांही ध्येयवादामुळे,-अनेक कारणांमुळे,-संसारांत रमूं लागतो. पुन्हा तो तडाखा खातो. पुन्हा उठतो. ध्येयवादी माणसें तर मनाला तडाखाच बसूं देत नाहीत; तीं धीर-गंभीरपणे दुःखें गिळतात आणि कामाला लागतात. पुढे कांही बरी परिस्थिति येणार आहे असा भोळसट आशावाद त्यांच्या मनांत नसतो. तरी तीं आपल्या ध्येयवादांत सुखी असतात हें हरिभाऊंनी चांगलें जाणलें असल्यामुळे त्यांचीं संसाराचीं चित्रें पूर्ण वास्तव अशीं झालीं आहेत.

पण आश्चर्य असें की, 'ध्येयें हींच दुःखें' हें तत्त्वज्ञान सांगणाऱ्या वामनराव जोशी यांना वास्तवाचें असें कठोर दर्शन घडविण्याच्या कामीं यश आलेलें नाही. 'रागिणी', 'सुशीलेचा देव', 'इन्दु काळे, सरला भोळे' या आपल्या कादंबऱ्यांतून कांही तत्त्वासाठी, ध्येयासाठी झगडा करणारे पुरुष व त्यांच्या स्त्रिया यांचीं चित्रें वामनरावांनी काढलीं आहेत. आता ध्येयवादी माणसाचें, समाजाविरुद्ध जाऊन त्याला आव्हान देणाऱ्या व्यक्तीचें जीवन किती खडतर, किती सुखहीन, किती वैराण असतें तें आपणां सर्वांना माहीत आहे. त्याची प्रतीति वामनरावांच्या कादंबऱ्यांत येते काय हा प्रश्न वाचकांनी आपल्या मनाला विचारावा. वामनरावांनी या सर्वांना सुस्थिति आणि श्रीमंती बहाल केली आहे. त्यामुळे असला लढा करणाऱ्या स्त्रीपुरुषांना कापीत जाणारी परिस्थितीची धार बोथटच होऊन गेली आहे. आत्म्याच्या, सद्धर्माच्या शोधासाठी संसाराचा त्याग करून रागिणीला टाकून भय्या-साहेब निघून गेले. या वेळीं पतीने टाकलेली स्त्री असें रागिणीचें चित्र डोळ्यांपुढे येतच नाही. अशा स्त्रीला, उद्या खायचें काय, कोणाच्या आश्रयाने रहावयाचें, जनापवादापासून, टवाळांपासून, गुंडांपासून स्वःतचें कसें रक्षण करावयाचें हे भीषण प्रश्न खाऊं की गिळूं करतात. त्यांतला एकहि प्रश्न रागिणीला सोडवावयाचा नव्हता. तिचें सासर श्रीमंत, माहेर श्रीमंत. रक्षण करायला आईबाप खंबीर, आनंदरावादि इष्टमित्र खंबीर. तिला दुःख फक्त पतिवियोगाचें. पण यमुना, ताई किंवा 'माझें रामायण'

मधील उषा यांना पतिवियोगामुळे जें दुःख भोगावें लागलें त्यापुढे हें दुःखच नव्हे. आणि ही स्थिति एकदोन प्रसंगीं नाही; सर्वत्र, सर्व कादंबऱ्यांत हेंच. आपल्या वाङ्मयीन अपत्यांना दुःख देणें वामनरावांना असह्य होत असावें असें वाटतें. सुशीला ही देवाचा शोध घेणारी स्त्री आहे. यासारखी कठिण आणि समाजाला प्रक्षुब्ध करणारी दुसरी कोणतीच गोष्ट नसेल. ॲनी बेझंट यांनी हा प्रयत्न करतांच त्यांच्या संसाराचा उन्हाळा झाला आणि समाजांतून उठण्याची पाळी त्यांना आली. राजा राममोहन रॉय हे देवाचा शोध घेत होते. त्या प्रयत्नांत त्यांनी एकदा आजारी असतांना चुकून मांसरस घेतला. तेवढ्यासाठी तारिणीदेवींनी–त्यांच्या सख्ख्या आईने–त्यांना घरांतून हाकलून दिलें आणि कोर्टांत दावा करून बेवारस करून टाकलें. पण वामनरावांची सुशीला जहाल क्रान्तीची भाषा बोलत असूनहि तिच्यावर कसलाहि प्रसंग ओढवत नाही. ती अगदी सहीसलामत सुटून जाते आणि सुखाने दुसरा संसार मांडते, इंग्लंडला जाते. तिला वामनरावांनी प्रारंभपासूनच संपन्न स्थिति दिलेली आहे. त्यामुळे प्रश्न असे उद्भवतच नाहीत. आणि उद्भवले तर तिला त्या गावांतून निघून जातां येतें. इंग्लंडला जाऊन राहतां येतें. हा कोण्या गावचा वास्तववाद? 'इंदु काळे, सरला भोळे' या कादंबरींत कांही खऱ्या दुःखांची जाणीव एकदोनदा होते. काशीचें दुःख काळीज भेदून जातें. आणि सरलेवर शेवटी आकाश कोसळतें. तिला वैधव्य येतें. पण तेथेहि शेवटी वामनराव सदय झाले आहेत. विनायकरावांच्या मृत्यूनंतर त्याच खेड्यांत परत जाऊन समाजसेवा करावी असा सरलेचा विचार होता. हें चित्र वामनरावांनी दाखविलें असतें तर कांही वास्तव प्रसंग पहावयास मिळाले असते. एक विधवा स्त्री खेड्यांत जाऊन तेथील सनातन धर्ममार्तंड, गावगुंड यांच्या विरोधाला न जुमानतां अस्पृश्योद्धारासारख्या सुधारणा करणार! कादंबरी प्रथम वाचली तेव्हा हा प्रसंग येतांच मी मनांत म्हणालों, वामनराव, ही घटना आम्हांला वर्णून दाखवाच तुम्ही. पण वामनरावांनी प्रसंगाची धार एकदम नेहमीच्या पद्धतीने बोथट करून टाकली. सरलाबाईचे बंधु श्रीमंत होते. त्यांनी एकदम तिला २५००० रुपये देऊन टाकले! ही पूर्वीचीच वृत्ति आहे. त्या काळीं शंकर-पार्वती, लक्ष्मी या देवता प्रसन्न होऊन मोहरांची रास भक्तांना

देत असत. आता निराळ्या मार्गाने पण त्यांनाच आणण्याची ही चाल आहे.

फडके-खांडेकर यांच्या जगांत सिनेमाचें प्राबल्य असल्यामुळे त्यांनी लक्ष्मीऐवजी सिनेमानटींची योजना केली आहे. गरीब, दरिद्री, दुःखी या शब्दांचा त्यांच्या कादंबऱ्यांत अर्थच निर्माण होत नाही. 'उद्धार' मधील विद्या ही गरीब आहे. पण विषया ही नटी तिला प्रसन्न आहे. त्यामुळे लोणावळें, माथेरान येथे महिना महिना तिला राहतां येतें. परवडत नसलें तरी सैंपाकीण बाई ठेवतां येतें. वाटेल ती चैन करतां येते. खांडेकरांच्या 'दोन मनां' तील श्रीला अशीच नटी प्रसन्न आहे. त्यामुळे सत्याग्रहाला निघालेला हा वीर अत्यंत ऐषआरामांत रहातो. तो आजारी पडला तर मुंबईहून डॉक्टर धावत येतात. नटी प्रसन्न असल्यावर काय तोटा आहे? वास्तवाचा कणखरपणा या लेखकांच्या मनोवृत्तींत आला नाही हाच याचा अर्थ आहे. त्यांचीं मनें जुनींच आहेत. त्यामुळे शंकरपार्वती, लक्ष्मी यांना ते आणतात. त्यांचीं नांवें आणि रूपें बदललेलीं असतात, एवढेंच. अद्‌भुत घटना घडवून सत्याचा जय होतो हें दाखवून समाजाला नीतिपाठ द्यावे असा जुन्यांचा हेतु होता. या नव्या लेखकांचा तसा हेतु मुळींच नाही. मग हे सत्यदर्शन कां घडवीत नाहीत? विधवेचें किंवा नवऱ्याने टाकलेल्या स्त्रीचें जिणें किती दुःसह असतें, तो कसा जिवंतपणींचा नरक असतो, हें यांना माहीतच नाही काय? एखाद्या ठिकाणीं, एखाद्या कादंबरींत तरी तिचें खरें चित्र यांनी दाखवावयाचें होतें. फडक्यांना तर तें शक्यच नाही. बंगले, मोटारी, महाबळेश्वर, माथेरान यांच्याबाहेर आपल्या वाङ्मयीन अपत्यांना नेणें त्यांना भावतच नाही. 'जादूगार' मधील इन्दुमतीच्या आईला पतीने टाकलें होतें. पण तिच्यामागे कापसाच्या व्यापारांत गडगंज पैसा मिळविणारा तिचा भाऊ उभा आहे. 'अटकेपार'मधील माईला तिचा पति दारू पिऊन पशूसारखी मारहाण करतो; पण तिचा भाऊ सुधीर लगेच तिला सोडवून आणतो. 'उद्धार' मधील वीणामावशी विधवा आहे; पण तिच्याजवळ गडगंज पैसा आहे. प्रत्यक्ष संसारांत विधवा, परित्यक्ता यांना पतिवियोग एवढेंच दुःख नसतें. हें दुःख कांहीच नाही असे दुःखाचे डोंगर त्यांच्यावर कोसळतात. प्रत्यक्ष आई-बापांना त्या नकोशा होतात. आणि इतकीं तीव्र संकटें कोसळलीं नाहीत तरी त्यांच्यापैकी बहुतेक स्त्रियांना कष्टाचें नीरस, शून्य, भकास जीवन शेवट-

पर्यंत जगावें लागतें. पण याची प्रतीति या साहित्यांत कोठे येतच नाही. कोणी तरी शंकरपार्वती त्यांना प्रसन्न होतातच. वास्तवांत तसें घडत नाही येवढेंच दुःख आहे.

'ब्राह्मणकन्या' या कादंबरींत डॉ. केतकरांनी हाच प्रकार केला आहे. कालिंदी कॉलेज सोडून एकदम एका वाण्याची रखेली म्हणून राहते. कारण अकुलीन संततीला दुसरें भवितव्य नाही असें तिला वाटतें. या प्रारंभावरून, या कादंबरींत अकुलीन संततीच्या असह्य दुःखाचें चित्रण पहावयास सापडेल, समाजाने तिचा कसा क्रूर छळ केला, हें केतकर दाखवितील आणि हा प्रश्न किती बिकट आहे याची जाणीव करून देतील असें वाटतें. पण तसा प्रकार कांहीच नाही. कादंबरी खाली ठेवतांना अकुलीन संततीचा कांही प्रश्नच नाही असें मत होतें. कालिंदी जीव द्यावयास जाते, पण कादंबरीच्या नियमाप्रमाणे तिची मैत्रीण तिला वांचविते. आणि तेथून पुढे अडचण, संकट असें कांही नाहीच. तिला उत्तम नोकरी मिळते, तिच्या मुलाला संभाळण्याची व्यवस्था होते, आणि रामरावासारख्या सुविद्य, सुस्थितींतल्या तरुणाशीं तिचें लग्न होतें. तिचा अकुलीनपणा तर याच्या आड येत नाहीच, पण ती रखेली म्हणून राहिली होती, तिला त्या संबंधांतून एक मूल झालें होतें, तें जिवंत होतें, ही गोष्टहि आड येत नाही. ही शंकरपार्वतीची कृपा नव्हे काय ? कालिंदीच्या बहिणीचें लग्नहि अगदी सुखाने होतें. त्यांत कसलाच व्यत्यय येत नाही. मग अकुलीन संततीच्या भवितव्याचा प्रश्न बिकट आहे म्हणजे काय, असा वाचकाला प्रश्न पडतो. डॉ. केतकरांना हा भेसूर प्रश्न हाताळण्याचें, त्याचें यथातथ्य वर्णन करण्याचें सामर्थ्य नाही हें त्याचें उत्तर आहे. वास्तवाची अभिरुचि दुर्मिळ आहे हें त्यांचें उत्तर आहे.

वरेरकरांची 'धांवता धोटा' ही कादंबरी किंवा तिच्यावरून केलेलें नाटक—'सोन्याचा कळस'—हें याच जातीचें आहे. मालक आणि मजूर, भांडवलदार आणि कामकरी ही जगांतली अत्यंत बिकट समस्या त्यांनी घेतली आहे. आणि एका शेठजीची मुलगी व दुसऱ्या शेठजीचा मुलगा यांचें लग्न लावून ती सोडवून टाकली आहे !

१९३०-४० पर्यंतच्या वास्तववादाची ही कथा झाली. त्यानंतर महायुद्ध आलें. त्यामुळे अनेक रम्य कल्पनांचा, ध्येयांचा आणि तत्त्वांचा नाश होऊन

जगांत अश्रद्ध वृत्तीची, संशयवादाची एक प्रचंड लाट उसळली, आणि तिच्यामुळे जगांतलें अमंगळ, गलिच्छ, विपरीत तेवढेंच साहित्यांत दर्शवावें अशी प्रवृत्ति निर्माण झाली. आणि आश्चर्याची गोष्ट अशी की, अशा साहित्यालाच वास्तववादी म्हणावें असें सध्या धोरण रूढ झालें आहे. वास्तविक जगांत मूलतः बदल असा कसलाच झालेला नाही. रम्य कल्पनांचा, तत्त्वांचा नाश आतापर्यंत अनेक वेळां झाला आहे. तो नाश व्हावयाचा आणि जगाने पुन्हा त्याच्याच मागे लागावयाचें असा नित्याचा क्रम आहे. आणि हें जाणून जो जीवनदर्शन घडवील तोच खरा वास्तववादी. पण हीच गोष्ट दुर्मिळ आहे असें वाटतें. दुसऱ्या युद्धानंतर वास्तविक भारताला स्वातंत्र्य मिळालें. तेव्हा या नव्या जीवनांतून कांही साहित्य निर्माण होईल अशी अपेक्षा निर्माण झाली होती. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर समृद्ध जीवनाच्या अपेक्षा फसल्यामुळे लोकांच्या मनावर घोर निराशा पसरली आहे. आज आमच्या जीवनाची ती बिकट समस्या आहे. पण तिला कोणी हातहि लावलेला दिसत नाही. आतांचे मर्ढेकर, गाडगीळ यांच्या साहित्यांतील वैफल्य निराळेंच आहे. हे जंतुवादी लोक आहेत. त्यांना किंवा त्याच्या परंपरेंतल्या कोणत्याहि साहित्यिकाला आजच्या आमच्या जीवनाचें यथार्थ चित्रण करण्याचें सामर्थ्य आहे असें वाटत नाही. मागल्या लोकांनी जसें एक अद्भुत-रम्य असें काल्पनिक जग निर्माण केलें होतें तसें यांनी एक गलिच्छ, ओंगळ, किळसवाणें पण तितकेंच काल्पनिक असें जग निर्माण केलें आहे. सध्याच्या आपल्या कौटुंबिक जीवनांत भाऊबहीण, पतिपत्नी, पितापुत्र, मित्र, आप्त यांचें परस्परप्रेम, एकमेकांवरच्या निष्ठा, एकमेकांसाठी झीज सोसण्याची प्रवृत्ति यांत कांही विलक्षण क्रांति झाली आहे असें नाही. हे सद्भाव, संसाराला रम्यता आणणाऱ्या, मानवी जीवन सुसह्य करणाऱ्या या निष्ठा पूर्वीं जशा होत्या तशाच अजूनहि आहेत. त्यांवाचून आपले संसार उभेच राहणार नाहीत. पण आतांचे साहित्यिक यांचें वर्णन करणार नाहीत. अशा कांही सात्त्विक भावनांचें वर्णन केल्यास आपणास जुनाट, बुरसटलेले, प्रतिगामी म्हणतील अशी या नव्या परंपरेंतल्या साहित्यिकांना भीति वाटत असावी असें वाटतें. गेल्या आठ–दहा वर्षांतले दिवाळी–अंक काढून त्यांतील नव्या परंपरेंतल्या तरुण साहित्यिकांनी लिहिलेल्या कथा काढून पहा. ज्या व्यक्ती-

बद्दल आपल्याला आदर वाटेल, जिच्यापुढे मस्तक नम्र होईल, अशी व्यक्ति त्यांत दुर्मिळच आहे. जणू काय अशीं माणसें, असे स्त्रीपुरुष जगांत नाहीतच.

या नव्या वृत्तीमागे एक तत्त्वज्ञान आहे. प्रत्येक नव्या लेखकाला तें माहीत असेल असें नाही. पण त्यांतल्या धुरीणांनी तें जाणूनच ही प्रवृत्ति रूढ केली आहे. मार्क्स आणि फ्रॉइड हे यांच्यामागे उभे आहेत. या दोघांनी प्रेम, वात्सल्य, पातिव्रत्य, राष्ट्रनिष्ठा, धर्मनिष्ठा, यांची भिन्न कारणांनी का होईना, पण चेष्टा केलेली आहे. या सात्त्विक गणलेल्या भावनांचीं मुळें भांडवलशाहीच्या स्वार्थांत एकाला दिसलीं, तर दुसऱ्याला तीं कामवासनेंत दिसलीं. त्यामुळे या भावनांचें पावित्र्य, त्यांतली उदात्तता नष्ट झाली. वास्तविक १९३५-४० पर्यंत या तत्त्ववेत्त्यांच्या सिद्धान्तांतील एकांतिकता, त्यामागील भ्रामक युक्तिवाद, त्यांतील अतिव्याप्ति, त्यांचा भुसभुशीत पाया हे दोष दाखवून अनेक समाजशास्त्रवेत्त्यांनी समाजाला जागें केलें होतें. पण ही जागृति आपल्याकडे यावयास अजून एक पिढी तरी जावी लागेल. तोंपर्यंत जें जें म्हणून हिडीस, गलिच्छ, ओंगळ, हीन, अधम त्याचेंच वर्णन साहित्यांत येणार. आणि तोच वास्तववाद म्हणून साहित्यिक अभिमान बाळगणार असें दिसतें. मल्याळी साहित्याचे एक टीकाकार, तिकडील साहित्यांतील वास्तववादाचे अध्वर्यु म्हणून ख्याति पावलेले लेखक थाकाजी शिवशंकर पिले यांच्याविषयी लिहितांना म्हणतात,—'थाकाजी हे जाणूनबुजूनच जीवनाच्या विकृत व ओंगळ अंगाचें वर्णन करतात. त्यांची बुद्धीच तशी आहे. या हीन, अमंगळ अंगाचें वर्णन म्हणजे जर वास्तववाद असेल तर थाकाजी वास्तववादी आहेत.' बंगालमधील संतोष घोष, ज्योतीन्द्र नंदी यांच्यावर तेथील टीकाकारांनी हीच टीका केली आहे. मानवव्यक्तीकडे पहाण्याची त्यांची दृष्टीच हीन आणि विकृत अशी आहे. जी विकृति आहे तिलाच ते प्रकृति मानतात. आणि त्यामुळे त्यांचें सर्व जगच असभ्य, अशिष्ट, अधम असें दिसतें. इंग्रजींतल्या नवकाव्याचें वर्णन करतांना नॉईस हा टीकाकार म्हणतो की, हे कवीहि रूढीचे गुलामच आहेत. जुने कवि सौंदर्याचें वर्णन करीत म्हणूनच हे कुरूपतेचें करणार. जुने कवि स्वर्गीय गुणसंपदा वर्णीत म्हणूनच हे आसुरी संपत्तीचीं चित्रें रंगविणार. केवळ नावीन्याचा ध्यास, क्रांतीची हौस यांतूनच हा अविचार निर्माण झाला आहे

आणि त्यामुळे नव्या शृंखला निर्माण झाल्या आहेत. मराठींतल्या सध्याच्या भ्रामक वास्तववादाच्या प्रेरणा कोणत्या तें या विवेचनावरून स्पष्ट होईल. आपल्याला क्रांतिकारक समजणारे हे नवे तरुण लेखक मागल्याप्रमाणेच अंध, रूढिबद्ध आणि डोळ्यांना ढापणें लावून चाकोरींत घिरटत राहणारे असे आहेत.

साहित्यांतील वास्तववादाचा जो इतिहास आपण येथवर पाहिला त्यावरून असें दिसून येईल की, वास्तववाद हा एका जीवनविषयक तत्त्वज्ञानांतून निर्माण होत असतो. पण मानवी जीवनाचें सम्यक् आकलन झालेलें असेल तरच या तत्त्वज्ञानाची अभिरुचि माणसाच्या ठायीं निर्माण होते. स्वार्थ, लोभ, मोह या विकारांचें काय सामर्थ्य आहे, सात्त्विकता, ध्येयनिष्ठा, त्यागवृत्ति यांची जोपासना कशाने होते, त्या विचलित कशाने होतात, भिन्न मानवावर त्यांचें भिन्न वर्चस्व कसें असतें, हें जाणणें यासाठी फार अवश्य आहे. भिन्न काळीं समाजांत भिन्न तत्त्वज्ञानें, भिन्न विचारसरणी रूढ असतात. प्रवृत्ति, निवृत्ति, राष्ट्रनिष्ठा, मार्क्सवाद, समाजवाद, जातिभेद, चातुर्वर्ण्य, वंशवाद, परिस्थितिवाद, ईश्वरवाद, जडवाद इत्यादि रूढ असलेल्या तत्त्वज्ञानांमुळे मानवाचा वैचारिक पिंड बनत असतो. आणि प्रत्येक मानवाची आंतरिक शक्ति कांही निराळीच असल्यामुळे रागलोभादि विकार, हीं तत्त्वज्ञानें आणि ती आंतरिक प्रवृत्ति यांच्या अनंतविध मिश्रणांतून मानवी मन घडत असतें. म्हणून साहित्यिक व्हावयाचें तर या सर्व प्रेरणा मानवाला कशा खेळवितात याचा सूक्ष्म अभ्यास करणें अवश्य आहे. टिळक, वॉशिंग्टन, चर्चिल, यांच्यासारख्या नेत्यांना मानवसमाजाचें ज्ञान जितकें अवश्य, तितकेंच वास्तववादी महाकाव्य निर्माण करणाऱ्या कवीला तें अवश्य आहे असें वाटतें. नाही तर फ्रॉइड वाचून कामपिसाट मानवाचें चित्र काढावें, मार्क्स वाचतांच झिंज्या फिसकारून ओरडूं लागावें, आणि महायुद्ध पाहून निराशा, वैफल्य म्हणून आक्रोश करावा, असा प्रकार होईल. सध्या तसाच होत आहे.

सध्या आपल्या सामाजिक जीवनाला घोर अवकळा आली आहे. राजकारण सर्व सडून गेलें आहे. समाजजीवन उध्वस्त होऊं पाहत आहे. गुन्हेगारी वाढत आहे. लाचलुचपत, काळा बाजार, वशिला यांनी कारभार सगळा भ्रष्ट झाला आहे. संप, दंगली, अत्याचार, गोळीबार यांना ऊत आला आहे. यांतच विकासयोजना चालू आहेत, भूदानयज्ञ चालू आहे,

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ३७३८६ वि. नीबंध
दाखल क्रमांक १८३२२ नों. दि. २३-२-६३



राष्ट्रीयी-करण चालूं आहे. गांधीवाद, मार्क्सवाद, समाजवाद, अराजकवाद हीं तत्त्वज्ञानें आपापलें राज्य स्थापण्याचा प्रयत्न करीत आहेत. पाश्चात्त्य भौतिक संस्कृति आणि पौर्वात्य आध्यात्मिक संस्कृति यांच्या संघर्षांतून निराळ्याच कल्पना निर्माण होत आहेत. या सर्वांचा अर्थ बसवून, त्याचे सध्याच्या मानवी मनावर काय परिणाम घडत आहेत तें जाणून आपल्या सध्याच्या जीवनाचें यथार्थ चित्र निर्माण करणारा वास्तववादी महाकवि निर्माण होणें ही सध्याची आपल्या समाजाची फार मोठी गरज आहे. नेहरूंच्या मागे तेवढ्याच तोलाचा खंदा नेता निर्माण होणें जितकें आवश्यक तितकेंच हें अवश्य आहे असें वाटतें. किंबहुना अशा महाकाव्यांतून स्फूर्ति घेऊनच थोर नेते निर्माण होत असतात. साहित्याचें हें सामर्थ्य जगांतल्या पंडितांनी एकमुखाने मान्य केलें आहे. पण थोर पुरुष निर्माण करण्याचें सामर्थ्य असलेलें महाकाव्य निर्माण करणाऱ्या पुरुषाला केवढी तपश्चर्या, केवढें परिश्रम, केवढा आलोक पाहिजे, याचें आजच्या साहित्यिकांना आकलन होईल काय ? वास्तवाच्या अभिरुचीचें विवेचन करण्याचा येथवर जो प्रयत्न केला आहे तो याच हेतूने केला आहे. चाकोरींतून आधीच जे घिरटूं लागले आहेत त्यांच्यावर कांही परिणाम होईल असें वाटत नाही; पण ज्यांनी अजून ढापणें बांधलेलीं नाहीत ते वास्तवाकडे वळतील अशी थोडी आशा आहे.

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१२२९४
REFBK-0012294
REFBK-0012294

## डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांचे ग्रंथ

राजविद्या
स्वभावलेखन
माझें चिंतन
लपलेले खडक
भारतीय लोकसत्ता
विज्ञानप्रणीत समाजरचना
लोकसत्तेला दण्डसत्तेचें आव्हान
पराधीन सरस्वती

कॉन्टिनेन्टल प्रकाशन

## आगामी प्रकाशनें

**अर्वाचीन मराठींतील खंडकाव्यें**
ह. कि. तोडमल

**प्रो. विजापूरकर यांचे लेख**
संपादक : मु. गो. देशपांडे

**वामन पण्डितांची यथार्थ दीपिका :**
[ टीकात्मक अभ्यास ]
वि. रा. करंदीकर